

पाखरांची भाषा
प्रा. श्रीराम काळे

**•प्रकाशक**

ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे

**•मुखपृष्ठ** व **पेज सेटींग**

साईराज कॉम्प्युटर्स, देवगड

**•टंक लेखन**

१.सुजय झेरॉक्स ॲण्ड कॉम्पुटर सेंटर, कणकवली

२. शर्वरी काळे, पडेल


**•पाखरांची भाषा**


लेखक - प्रा. श्रीराम विनायक काळे.

मोबा·**८७६६७६४६४१**



**•प्रकाशन वर्ष**

प्रथम आवृत्ती डिसेम्बर २००८

द्वितीय ई आवृत्ती २५फेब्रुवारी २०२४

• **PAKHARANCHI BHASHA**

**Prof.shreeram V. kALE**

**ISBN 978-81-90818**

**(6th March2024 )**



परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत गोपालाश्रमस्वामी महाराज
मठ संस्थान सातार्डा (ता.सावंतवाडी) यांचे चरणी

# देवघराची वाट



कथालेखक श्रीराम काळे यांचा, ‘रुजवातीच्या गोष्टी’ हा कथासंग्रह पाचवर्षापूर्वी प्रसिद्ध झाला. या कथा संग्रहातल्या सगळ्याच कथा चित्तवेधक आहेत. नुकत्याच वाचल्या सारख्या त्या अजूनही मनात ताज्या आहेत. त्या कथा प्राधान्याने ‘संसार कथा’आहेत.त्या मर्यादेत राहून, प्रकृति-विकृतीच्या सीमारेषांचा शोध घेणाऱ्या आहेत. अनेक पर्याय सूचित करणाऱ्या आहेत. त्यातल्या व्यक्तिरेखा संस्मरणीय होत्या. ‘करंजी’ कथेत आपला मुलगा विसू मार्गाला लागल्यावर त्याच्या बळावर दिवाळीच्या करंज्या समाधानाने करणारी आई आहे. ढासळलेल्या चिरेबंदी वाड्याचे अवशेष म्हणून खेळण्यातला लाकडी घोडा आणि सांबर

शिंग घेवून जाणारा, व्यवहारात फसलेला अशोक ‘सांबरशिंग’ कथेत होता. पाखरांना, वानरांना त्रास देणारा, त्यांचा अकारण जीव घेणारा मोहन ‘देवाची सामक्षा’ या कथेत होता.‘मरणभोग कथेत पतीच्या व्यभिचाराचे आणि पुत्राच्या अकाली निधनाचे दु:ख यांनी डोके सैरभैर झालेली चंद्रू आक्का होती. ‘शिदोरी’ मध्ये सुखाला चटावलेला आणि त्यासाठी आपण होऊन श्रीमंता घरी दत्तक जाणारा बाळु होता. कांडेचोरांच्या शिकारीची भुतां रडचत, तुंबसाळ,वकिली डाव,आणि देवकळा या कथा वेगळ्याच कथावस्तू मुळे स्मरणात राहतात.वाघजईतले दिवस ही कथा तर एखाद्या स्मृती श्राद्धासारखी होती. या कथांमुळे श्रीराम काळे यांच्या पुढच्या कथासंग्रहाविषयी उत्कंठा निर्माण झाली होती.

पाच वर्षांच्या कालावधीनंतर त्यांचा ‘पाखरांची भाषा’ हा कथासंग्रह प्रसिद्ध होत आहे.लेखकाचा कल मोजक्याच पण कसदार कथा लिहिण्याकडे आहे, हे त्यावरून दिसतं. ‘रुजवातीच्या गोष्टी’ मधिल कथांसारख्या संसारकथा याही संग्रहात आहेत. विशेषत: ‘माधुकरी’ याकथेनं लेखकाची या प्रदेशातली क्षमता अधोरेखित केली आहे. ‘पाखरांची भाषा’ ‘अळवावरचं पाणी’ या कथांमध्येही ‘संसाराच्या अवखळ रानी’उमटणारे ध्वनी- प्रतिध्वनी आहेत.चक्रनेमिक्रमेण संसारात जे चढउतार येत जात असतात त्याकडे लेखकानं किती ममत्वानं पाहिलं आहे याच्या दर्शक या कथा आहेत.

‘माधुकरी’ या कथेनं तर मूल्यशिक्षणाच्या आदर्शाचीच प्रस्थापना केली आहे असं मला वाटतं. पंडित महादेवशास्त्री

जोशींच्या ‘धन आणि मन’ सारख्या रम्य कथेची आठवण व्हावी, अशी ही कथा.या कथेतलं वास्तव तसं बघितलं तर पन्नास वर्षांपूर्वीच संपलं. पण तरीही‘सत्याचाच विजय होतो’ या भारताच्या ध्येय वाक्यातली पुण्याई थोडीच संपते? ‘माधुकरी’ या कथेत या पुण्याईचा अंश आहे.

‘आत्मनस्तुकामाय:’,‘अखेरचा पर्याय’ आणि ‘निषादपर्व’ या कथांमध्ये एक वेगळा प्रयोग आहे. काही पूर्वज्ञात कथांची नवी मांडणी किंवा या कथांचा कल्पित उत्तरभाग लिहिण्याचा हा प्रयत्न आहे. ‘अखेरचा पर्याय’ वाचताना ‘ऑर्फिअस’ या जी. ए. कुलकर्णी लिखित कथेची स्वाभाविकपणे आठवण येते.वळणं वेगळी पण वाट तीच!

‘परीस मेळ्ळो’आणि ‘पिंगळ्याची भाक’ या कथांमध्ये गुप्तधन मिळवण्यासाठी तोडगे शोधणाऱ्या आणि त्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्न करीत राहणाऱ्या माणसांच्या विफल सायासांची कहाणी आहे. या माणसांच्या हेतूंवर लेखकाचं प्रेम नाही, पण त्यांच्या सायासांचे तपशील मात्र तो विस्ताराने मांडतो. ‘धन्वंतरीचा वसा’ या कथेतल्या मांत्रिक वैदूच्या कुटुंब कहाणी इतकाच त्याच्या साधनेतही लेखकाला रस आहे, हे जाणवतं. पर्याप्त धनाची अपेक्षा लेखकाला समर्थनीय वाटते, पण अमर्याद धनलालसेचा निषेध तो ‘सुवर्णप्राप्ती’ या कथेतून करतो.

लेखक श्रीराम काळे यांच अनुभव-विश्व राजापूर आणि देवगड या कोकणातील तालुक्यांमधल्या लोकजीवनाशी निबद्ध आहे. मैलोनगणती पसरलेला कातळ, त्यावरची खुरटी झाडं झुडपं, दटावणारं काळं करडं आभाळ, भणाणता वारा, नदी काठच्या खाडीकाठच्या लोकवस्त्या, लेखक ज्या समाजात वाढला

तो ब्राह्मण समाज, या समाजाच्या आजूबाजूने वावरणारे कुळवाडी- कातकरी, त्यांच्या मधले लोकभ्रम यांच्यासकट लेखक वाढला आहे. हे वाढणं स्वीकारशील आहे. सभोवतीचं सगळं संपूर्णपणे नाकारता येत नसतं हेलेखक शिकला आहे. आणि ते नाकारायचं तरी कशासाठी? जगण्याचे काही थोडके धागेच मानवाच्या हाती असतात हे सत्य एकदा स्वीकारलं की पुढचं सारंच सोपं हो ऊन जातं.

श्रीराम काळेंचं बलस्थान त्यांची ‘स्वीकारशील वृत्ती’ हे आहे. हे बलस्थान त्याना पुढचा मार्ग दाखवील. अजुन बराच कातळ ओलांडायचा आहे.नदीच्या पैलतीरीच्या देवघरात लागलेला दिवा खुणावतो आहे. श्रीराम काळेंची पावलं या देवघरापर्यंत नक्की पोहोचतील असा मला विश्वास आहे.

त्यांच्या या काहीशा एकल प्रवासाला माझ्या हार्दिक शुभेच्छा !

विद्याधर करंदीकर

# मनोगत

हा माझा दुसरा कथासंग्रह. या संग्रहात समाविष्ट केलेल्या कथा अपूर्व, जत्रा, वसुधा, किरात, माहेर,प्रतिबिंब इ. दिपावली विशेषांकामध्ये पूर्व प्रसिध्द आहेत. निषादपर्व, अखेरचा पर्याय, आत्मनस्तु कामायः या कथा महाभारतातील किंचित संदर्भावर आधारित आहेत. कथेतील घटना,प्रसंग वर्णनं,संभाषणं इ. माझा कल्पना विलास आहे. मात्र मूळ कथानकात विकृत बदल केलेले नाहीत. उर्वरित सर्व कथा ही माझी स्वतंत्र निर्मिती आहे. लेखन हा माझा छंद आहे. हा आत्मानंदासाठी, मर्यादित वर्तुळात वितरण करण्याच्या हेतूनं प्रकाशित केला आहे.

श्री. शशी सावंत, श्री. श्रीधरराव मराठे, श्री. अण्णा देसाई आणि श्री. रणजित हिर्लेकर यांचं प्रोत्साहन मिळालं. माझे प्रथम वाचक आणि समीक्षक प्रा. डॉ. रविराज फुरडे,ग्रंथपाल श्री. जमदाडे, श्री. प्रमोद जोशी आणि माझे ज्येष्ठबंधु श्री. शरद काळे यांचा ऋणनिर्देश अपरिहार्य ! सिंधुदुर्ग मधील संपन्न जाणीवा असलेले साहित्यिक डॉ. विद्याधर करंदीकर यांचा मी वाचक आहे. या संग्रहाला त्यांनी प्रस्तावना लिहून दिली यातच माझ्या कार्याची पोचपावती मिळाली असं मी मानतो.

कथासंग्रहाच्या मुद्रण प्रतीचं शुध्दलेखन श्री. चंद्रकांत करंदीकर यांनी तपासून दिलं. आणखी एक उल्लेख आवर्जून करायला हवा. माझ्या लिखाणाची सुंदर हस्ताक्षरात प्रत करून देण्याचं काम माझ्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थी - विद्यार्थीनी यानी केलं, ती मुलं डोळयासमोर आहेत... सगळ्यांच्या नावाचं मात्र स्मरण होत

नाही म्हणून नामोल्लेख टाळला आहे, त्यानी मला माफ करावं...!

माझ्या कथा दिपावली ज्या विशेषांकामध्ये प्रसिध्द झाल्या त्यातील चित्रे या कथासंग्रहात वापरायला संबंधितानी आनंदाने परवानगी दिली टंकलेखन माझी कन्या शर्वरी व श्री . जोईल, यानी केलं! पेज सेटिंग, आर्टवर्क या कामी माझे मित्र श्री . विक्रम सनये यांचं सहकार्य मिळालं . या मंडळीनी मोठ्या हौसेनं कसब पणाला लावून काम केलं!

प्रा . श्रीराम विनायक काळे .

एम्. ए. एम्. एड्. एम्. फ़िल्.

## द्वितीय आवृत्ती च्या निमित्ताने

हीआवृत्ती नवीन तंत्रज्ञान युगाच्या बदलत्या जाणीवा आणि गरजा लक्षात घेवून ई स्वरूपात ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे यांच्या मार्फत प्रसिद्ध होत आहे. माझी साहित्य निर्मिती कशीही असो ई साहित्य रूपाने ती चिरकाल टिकणार आहे. या बद्दल ई साहित्य प्रतिष्ठान चा मी ऋणी आहे. प्रथमावृत्तीची सॉफ्ट कॉपी सीडी च्या रूपाने हयात असल्यामुळे ई आवृत्ती तयार करायला फार सायास पडले नाहीत. या संग्रहात ‘स्वयम् भगवान उवाच’ ही कथा नव्याने समाविष्ट केली आहे. या संग्रहाला रसिक वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळो अशी अपेक्षा व्यक्त अरून हे मनोगत पूर्ण करतो.

प्रा. श्रीराम काळे

# अनुक्रमणिका

१. सुवर्णप्राप्ती
२. आत्मनस्तु कामाय
३. माधुकरी
४. धन्वंतरीचा वसा
५. अखेरचा पर्याय
६. पाखरांची भाषा
७. परिस मेळ्ळो
८. अळवावरचं पाणी
९. पिंगळयाची भाक
१०. स्वयम् भगवान उवाच
११. निषादपर्व

# १. सुवर्णप्राप्ती

तेजपाल कपारीजवळ जाऊन उभा राहिला अन् सुर्यास्त झाला. अवघड चढणीचा मार्ग वेगाने पूर्ण केल्यामुळे अति श्रमाने त्याला धाप लागली. खरे तर बसल्या जागी अंग पसरावे इतकी मरगळ आलेली. तथापि या निर्मनुष्य परिसरात रात्र बिनघोर घालविण्यासाठी सुरक्षित जागा पहाणे क्रमप्राप्त होते. म्हणून मरगळ झटकून तो उठला. तो कपारीतून आत शिरला. आत चांगली दोन खण ऐसपैस जागा पाहून त्याला बरे वाटले. आत इतस्ततः विखुरलेली पिसे अन् विष्टा या जागी पक्षाचे वास्तव्य असल्याची सूचक होती. मात्र अवघड चढणीच्या मार्गाने एखादे हिंस्त्र श्वापद इथपर्यंत पोहोचणे शक्य नव्हते. पिसे अन् विष्ठा यांचे सूक्ष्म अवलोकन करता पक्षी सांप्रत काळी येथे वास्तव्यात नसावा हे त्याच्या ध्यानात आले. म्हणून कपारीच्या एका कडेला थोडी साफसफाई करुन त्याने बाणांचा भाता, धनुष्य, सामानाचे बोचके आणि मध-पाणी यांचे बुधले तिथे ठेवले. कटीवस्त्रावर वेष्टिलेले उत्तरीय सोडून कमरेचे खड्ग, परशु ही आयुधे उतरुन ठेवली अन् पाय लांब करीत सैल अंगाने कपारीच्या कडेला टेकून त्याने नेत्र बंद केले.

अर्धा घटिका विश्रांती घेतल्यावर त्याला जरा हुशारी वाटू लागली. बोचक्यातले पिठाचे गाठोडे सोडून चार पसे पीठ कटोऱ्यात घेतले. त्यात थोडासा मध आणि पाणी ओतून त्याने चांगले मिश्रण केले. पीठाचे चार बेताचे गोळे करुन बोटाच्या फटीत अडकलेले कण तो चाटू लागला. इतक्यात पंखांच्या फडफडाचा प्रचंड ध्वनी आला. कर्कश चित्कार टाकीत पक्षिराज कपारीच्या मुखालगतच्या खडकावर

विसावला. तेजपाल निस्तब्ध होऊन कपारीच्या मुखाकडे पाहू लागला. काही क्षणातच अणकुचीदार चोच आणि निखाऱ्यासारखे लालबुंद डोळे असलेला पक्षिराज कपारीतून आत शिरला. ‘‘हे मानवा... घाबरु नकोस! माझा अजस्त्र देह पाहून तुला भीती वाटणे स्वाभाविकच आहे. पण मी मनुष्यभक्षक नाही. या दुर्गम भागात सुवर्णाचा शोध घ्यायला आलेले मानव बहुशः माझ्या कपारीचाच आश्रय घेतात.’’



पक्षिराजाचा अजस्त्र देह पाहून पुराण कथांमधील जटायू, वैनतेय, संपाती आदी पक्षिगणांचे स्मरण त्याला झाले.तसेच त्याने चिरक्या आवाजात उच्चारलेली मनुष्यवाणी ऐकून तो विस्मय चकित झाला. दोन्ही हात जोडून विनम्र भावाने तेजपाल उद्‌गारला. ‘‘पक्षिराज, आम्हा मानवांच्या धर्मकथांमधील जटायू, संपाती अन् वैनतेय अशा पराक्रमी पक्षिवर्गीयांचे स्मरण आपल्या दर्शनाने मला

झाले असून मी तुम्हाला आदराने वंदन करितो! दूर दक्षिण क्षेत्राकडून निघालेला मी संपूर्ण भरतखंड पालथा घालून इथवर आलो आहे. घनदाट वृक्षराजीनी भरलेल्या वनप्रदेशात अजस्त्रकाय सर्प, अक्राळ विक्राळ हिंस्त्र श्वापदे मी पाहिली. यमुनेच्या पात्रात विकराल नक्रही मी पाहिले.परंतु तुमच्या तुलनेत ते नगण्य जीवजंतू आहेत असे मला वाटू लागले आहे. खेरीज आपण उच्चारित असलेली मनुष्यवाणी...! शरीरमर्यादा ओलांडून आमची देववाणी आपण कशी काय आत्मसात केलीत या गोष्टीचेही बहुत आश्चर्य मला वाटत आहे.त्याहीपेक्षा माझा हेतू आपण कसा काय ओळखलात याचेही कुतूहल वाटून मी पहातोय ते स्वप्न आहे की सत्य याचा संभ्रम मला झाला आहे.''

तेजपालच्या कथनाने प्रसन्नचित्त होत्साता पक्षिराज उद्‌गारला, ''बा मानवा ! केवळ आपण पाहिलेले जग म्हणजे परिसीमा नव्हे. हे विश्व किती अद्‌भूतअतर्क्य गोष्टींनी भरलेआहे याची कल्पना तरी तुम्हा मानवांना कशी यावी? दिक्कालापर्यंत मुक्त संचार करणारे आम्ही वैनतेयाचे वंशज!सर्वत्र संचार करुन हे विश्व आम्ही अवलोकिले आहे. आता तू ज्या सुवर्ण प्रदेशात जाणार आहेस त्याही पलिकडे गृध्रराज संपातीचे वंशज आहेत. त्यांना पाहूनतर तुझ्या जाणिवाच ठिकाणावर राहणार नाहीत. आता प्रश्न उरला मी मनुष्य वाणी कशी काय उच्चारितो हा...! तर निसर्गाने आम्हा पक्षिवर्गीयांना दिलेली जिव्हा... ती सुद्धा मानवांपेक्षाही कार्यक्षम आहे. आम्ही पक्षिवर्गीय जे स्वर उच्चारितो त्याशी तुलना करता मानवांची स्वरमाला अगदीच प्राथमिक ठरते असे माझे मत आहे.अर्थात मनुष्य वाणी हे फक्त माझेच वैशिष्ट्य असून माझ्या इतर बांधवांना मनुष्य वाणी अवगत नाही! ही मला कशी प्राप्त झाली तो मोठा अद्‌भुत इतिहासच आहे

म्हणेनास

पक्षिराज पुढे सांगू लागला,‘‘माझी आयुर्मर्यादा एक शत संवत्सरे एवढी आहे.माझा पितामह अद्याप उडावयासही शिकला नव्हता त्यावेळी कोणी मानव देहधारी तापस या हिमगिरीवर आला. या कपारीच्या मागील बाजूला जे पर्वत शिखर आहे त्याठिकाणी एकअजस्त्रगुंफा आहे. त्या गुंफेत तो तापस शिरला आणि गुंफेचे मुख त्याने एका प्रचंड शीलेने बंद करुन घेतले. त्यापासून आजपर्यंत अव्याहतपणे त्याचे तप सुरु आहे. केवळ वायू भक्षण करुन त्याने आपले जीवीत टिकविले आहे. मी लहान असता एका वेळी तो तापस गुहेबाहेर आला. मी बालसुलभ कुतूहलाने त्याच्या संन्निध गेलो. त्यावेळी त्याने मजवर कृपादृष्टी केल्यामुळेमानवांची वाणी मला अवगत झाली.त्यानंतर उतारा वरील सरोवरात स्नान करुन तो पुनश्च गुंफेत गेला.त्या उपरान्त मात्र मी त्याला पाहिलेले नाही. मात्र अद्यापही त्याचे तप सुरु आहे, तो गुंफेत आहे याचा प्रत्यय मला आला आहे.’’

पक्षिराजाचे अद्‍भूत कथन ऐकून तेजपालला क्षुधेचेही भान राहिले नाही. आपल्या हेतूपूर्ती मध्ये या पक्षिराजाचे काहीना काही सहकार्य आपणांस जरुर मिळेल याची खात्री त्याला वाटू लागली. याच हेतूने त्याच्याशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचे त्याने योजिले. कटोऱ्यातला मधुयुक्त पीठाचा गोळा समोर धरीत तो म्हणाला, ‘‘पक्षिराज! मी गृहस्थधर्मी आहे. माझ्या क्षुधा शमनाच्या वेळी आपण मजसोबत असता हे अन्न एकट्याने खाणे काही मला उचित वाटत नाही. म्हणून त्यातला अल्प भाग मी आपणांस देऊ इच्छित आहे, त्याचा आपण स्वीकार करावा.’’पक्षिराजाने पिठाचा

गोळा चोचीत घेतला. मधुयुक्त असे पीठ फारच रुचकर लागले. ‘‘तुम्हा मानवांची कल्पकता मात्र वर्णनातीत आहे. तू दिलेले अन्न फारच स्वादिष्ट आहे. कोणत्या प्राणी वा पक्षाच्या मांसापासून हे बनविलेस बरे?’’ पक्षिराजाने पृच्छा केली.

तेजपाल उत्तरला,‘‘पक्षिराज, हे अन्न मांसापासून केले नसून साळीच्या लाह्यांचे पीठ आणि मध यांचे ते मिश्रण आहे. प्रवासात कंदमुळे, फळे,प्राणी--पक्षी काहीही मिळाले नाही तर अडचण येऊ नये यास्तव साळीच्या लाह्यांचे पीठ अन् मध मी सोबत वागवीत आहे. अग्निसंस्कार झाल्यामुळे हे पीठ दीर्घकाळ टिकते. ते स्वादिष्ट आहे अन् पौष्टिकसुद्धा आहे बरे! खेरीज त्यात मध मिसळलेला असल्यामुळे तर ते फारच रुचकर लागते.’’ मग कटोऱ्यातला आणखी एक पिठाचा गोळा पक्षिराजाला देऊन उरलेले गोळे तेजपाल खाऊ लागला. दुसरा गोळा चवीने खाल्ल्यावर पक्षिराज सांगू लागला, ‘‘मानवा, खरेतर तृण, धान्य, किटकादी क्षुद्र आहारावर उपजिविका करणाऱ्या कनिष्ठ पक्षी कुलातील मी नाही. परंतु भक्ष्याच्या उष्ण रुधिरापेक्षाही तू दिलेले अन्न रुचकर अन् मधूर आहे हे मात्र खरे. खेरीज त्याचे सेवन करताना काहीच सायास पडत नाहीत. मध आणि धान्य ही चविष्ट असते, हे नवीनच ज्ञान मला तुझ्यामुळे प्राप्त झाले.’’

पिठाचे गोळे भक्षण करुन पक्षिराज प्रसन्नचित्त झाला आहे हे तेजपालने ओळखले. याचा फायदा घेऊन आपल्या हेतूपूर्तीसाठी त्याचा काही उपयोग होईल का? हे अजमावून पहावे असा विचार करुन त्याने पृच्छा केली.‘‘पक्षिराज,आपण सर्वत्र मुक्त संचार करता. तर सुवर्ण प्रदेशाचे ज्ञान आपल्याला असणारच. तेथे सुवर्णाचा साठा

नेमका कोठे आहे? त्यावर कोणाची सत्ता आहे? तो प्रदेश येथून कितीसा दूर आहे? त्या भागात कोणी मानव राहतात का?तसेच त्या प्रदेशातून प्रवास करताना कोणते धोके संभवतात? या माझ्या शंकांचे परिमार्जन करुन आपण मला उपकृत करावे.या निर्मनुष्य प्रदेशात तुमच्या रुपाने साक्षात देवदूतच मला भेटला आहे,असे माझे प्रांजळ मत आहे.मोठ्या भाग्यानेच मला आपले दर्शन झाले असे माझे मत आहे.आपण ज्ञानी असून माझा हेतू आपण ओळखिला आहेच! तर माझ्या शंकांचेही निरसन करावे अशी माझी प्रार्थना आहे!''

आपल्या कथनाचा इष्ट परिणाम पक्षिराजावर होत असल्याचे हेरुन तेजपाल पुढे बोलू लागला,''पक्षिराज, आम्ही मानव तर गरूडांना देवस्वरुप समजतो.आमच्या पवित्र धर्म ग्रंथामध्ये तुमच्या पूर्वजांनी केलेल्या पराक्रमांचे सर्गच्यासर्ग आहेत.तुमच्या कुळातील महाशक्तिशाली पक्षिराज विनता सुत! त्याने तर स्वर्गलोक जिंकून अमृत कुंभ प्राप्त केला असे वर्णन मी मोठ्या भक्तिभावाने धर्म मार्तण्डांच्या तोंडून श्रवण केले आहे. देवराज श्रीविष्णूंचे वाहन गरूड हेच असून तो पक्षिवर्गातील उच्च कुळातील आणि समस्त पक्षिवर्गाचा राजा आहे. असाही निर्वाळा मानवांचे धर्मग्रंथ देतात. ज्या देवता प्रतिमांची प्रतिष्ठापना करून आम्ही त्यांचे नित्य पूजन करतो, त्यामध्ये पक्षिराज गरूडाची प्रतिमासुद्धा असते.तेजपालाच्या कथनाने संतुष्ट होत्साता पक्षिराज वदला,''तू कथन केलेल्या महान परंपरेचा उल्लेख माझ्या पिता-पितामह आदी ज्येष्ठांच्या मुखी मीही ऐकीला आहे.ज्या विनता सुताचा तू उल्लेख केलास त्याच्याच महान कुळातील मी स्वतः आहे, याचा मला अभिमान असून या गोष्टी तुम्हा मानवांना ज्ञात आहेत याबद्दल मला अतीव आनंद झाला आहे.''

पक्षिराजाला खुलवून इप्सित साध्य करण्याचा हा सुवर्ण क्षण आहे.हे ओळखून तेजपाल म्हणाला,''आपले दर्शन हे तर माझे परम भाग्यच आहे.भविष्यात महान पराक्रमी वैनतेयाने मला दर्शन दिले होते एवढेच नव्हे तर मजशी प्रत्यक्ष संभाषणही केले होते हा सुवर्णक्षण मी माझ्या हृदय संपुटात नित्य जतन करीन. आपल्या भेटीचे वृत्त ऐकून इतर मानव तर माझ्या भाग्याचा हेवाच करतील.हे पक्षिराजा,तू अत्यंत वंदनीय आहेस. तू अगदी अकल्पितपणे माझा भाग्यविधाताही बनला आहेस. तर कृपा करुन मी पृच्छा केलेली माहिती तू इत्यंभूत कथन करावीस अशी प्रार्थना मी तुझ्या चरणी करतो.'' मानववाणी ज्ञात असणाऱ्या त्या पक्षिराजाला मतलबी -स्वार्थी हेतूसाठी मानव विनयाचे कसे ढोंग करु शकतो याचा काडीमात्रही अनुभव नव्हता. म्हणूनच त्याच्या प्रार्थनेला भुलून त्याला सुवर्णप्रदेशाची माहिती द्यावयाची एवढेच नव्हे तर सुवर्णप्राप्तीच्या त्याच्या कार्यात त्याला सर्वतोपरी सहाय्य करण्याचा मनात निर्धार करीत पक्षिराज कथन करु लागला.

''बा मानवा! या हिमगिरीच्या पश्चिम दिशेला कांचनगंगा नदीच्या उद्‌गमापाशी टेकडीमध्ये सुवर्णसंचय आहे.या स्थानापासून अवकाशमार्गे अडीच घटीकांमध्ये तिथवर पोहोचता येईल. मधला प्रदेश निबिड अरण्याने व्याप्त आहे. त्यामध्ये अतिविशाल सर्प, हिंस्त्र श्वापदे वस्ती करुन आहेत. मात्र ती निशाचर असल्यामुळे दिवसा त्यांचा उपद्रव व्हायचा नाही. त्या प्रदेशात मानवांची वस्ती आहे. ते मानव तुझ्या तुलनेत फारच अप्रगत आहेत. त्यांचे वागणे श्वापदांप्रमाणे असून त्यांना मानवांची भाषाही अवगत नाही. धातूच्या शस्त्रांचे ज्ञान सोडाच पण साध्या वस्त्रांचेही ज्ञान त्यांना अद्यापि झालेले नाही. सुवर्णसाठा त्यांच्याच कबजात आहे. ते वृत्तीने

पशुवत अन् आक्रमक,तामसी स्वभावाचे आहेत. पर्वताच्या कडे कपारी, गुहा, झाडांच्या ढोली यांच्या आश्रयाने ते वास्तव्य करतात. यापूर्वी सुवर्ण प्राप्तीच्या हेतूने त्यांच्या प्रदेशात गेलेल्या नागर मानवांची त्यांनी हत्या केली. एवढेच नव्हे तर त्यांचे मांसही त्यांनी भक्षण केले. ते सर्व भक्षीच आहेत.''

''भक्ष्य प्राप्तीसाठी सुवर्ण प्रदेशात माझा नित्य विहार असतो, हे खरे.पण सुवर्णाचा साठा नेमका कोठे आहे याचे ज्ञान मी प्राप्त केलेले नाही. आम्हा पक्षिराजांना तर भक्ष्याखेरीज इतर कशातही स्वारस्य असत नाही.पण तुम्हा मानवांना सुवर्णाचा एवढा मोह का असावा हे काही मला कळलेले नाही. सुवर्ण प्राप्तीसाठी आपले जीवन सर्वस्व गमाविण्याचे मूर्ख धाडस तुम्ही मानव प्राणी का करु धजावता हे माझ्या दृष्टीने एक गूढच आहे. तू तरी सुवर्णाच्या मोहाने असला धोका पत्करु नयेस असे मला वाटते.तू शस्त्र सज्ज आहेस हे ठीक. पण सुवर्णप्रदेशातील त्या मानवी श्वापदांची संख्यातरअगणित आहे.दगडांचा मारा करीत एकदा का त्यांनी भक्ष्याला कोंडीत धरले की हिंस्त्र श्वापदेसुद्धा सहसा त्यांच्या कचाट्यातून सुटत नाहीत. तशी पाळी तुझ्यावर आली तर तुझे जिवित रक्षण कसे करायचे ही समस्याच माझ्यापुढे निर्माण झाली आहे.''

पक्षिराजाला काय उत्तर द्यावे याचा क्षणभर तेजपाललाही संभ्रम पडला.थोडा विचारकरून त्याने सावध स्पष्टीकरण केले. ''पक्षिराज,सुवर्णप्राप्तीमध्ये माझा तसा व्यक्तिगत स्वार्थाचा हेतू नाही. आमच्या जीवनातही सुवर्णाला फारसे मोल नाही.पण मघाशी मी उल्लेखिले त्याप्रमाणे देवतांच्या प्रतिकृती तयार करावयाला टिकावू आणि शुद्ध धातू म्हणून आम्हाला सुवर्णच लागते. पक्षिराज! माझा

हेतू साध्य झाला तर माझ्या प्रदेशातील मानव मला दुवा देतील.त्याचे श्रद्धास्थान अशा देवतांच्या प्रतिमा घडविण्यासाठी जिवावरचे संकट पत्करुन मी सुवर्ण प्राप्त केले या माझ्या कृत्याची मोठी प्रशंसा होईल.नाहीतरी हा देह कधी ना कधी मृत्युमुखी पडणारच आहे.तर मग काही देदिप्यमान पराक्रम तरी करावा हा माझा यामागे हेतू आहे.केवळ या आणि एवढ्याच इच्छेने मी येथवरचा पल्ला गाठला आहे.''

''पक्षिराज,यशाचा क्षण अगदी जवळ आला असता भ्याडा प्रमाणे जीव रक्षणासाठी आधार घेण्यास मी सुद्धा क्षुद्र कुलातील थोडाच आहे? माझ्या पूर्वजानीही दिग्गज पराक्रम गाजविला असून त्यांच्या नावाला बट्टा लागेल असे भीरुतापूर्ण कृत्य मी कदापि करणार नाही. माझ्या या साहसकार्यात तुझ्यासारखा परमप्रतापी सहाय्यकर्ता लाभला असता माघार घेणे हा तर करंटेपणाच म्हणावा लागेल. माझ्या अमोघ शरसंधानाची जराशी चुणूक पाहिल्यावर हल्ला करण्यासाठी पुढे येण्याचे धाडस ते नरदेहधारी पशू कदापि करणार नाहीत याची खात्री हे पक्षिराजा तू बाळग. खेरीज अगदीच जीवावर बेतले तर मला उचलून तू उंच आकाशात उड्डाण मारुन माझे रक्षण करु शकशील,यावर माझा पूर्ण भरवसा आहे.पक्षिराज किमानपक्षी माझे हे साहस एका अर्थाने तरी यशस्वी झाले आहे. सुवर्णप्राप्ती झाली नाही तरी वैनतेयाचा पराक्रमी वंशज मला भेटला! तसेच हिमगिरी पासून स्वर्गलोकांचा आरंभ होतो असा आम्हा मानवांचा आजपर्यंतचा समज सपशेल खोटा आहे, याचे ज्ञान मला झाले हे सुद्धा भाग्यच म्हणायला हवे.''

तेजपालच्या कथनाने पक्षिराजाला चांगलाच हुरुप आला.''

मानवा, मी काय सांगतो हे लक्षपूर्वक ऐक. हिमगिरी पासून देवलोक सुरु होतो, हा तुमचा समज निखालस खोटा आहे. एवढेच नव्हे तर तुम्ही म्हणता तो स्वर्गलोक या अवनीवर कुठेही नाही हे ही तू ध्यानात घे.स्वर्ग लोक मेघमालांच्याही पलीकडे उंच आकाशात आहे. स्वर्गलोक पहाण्याच्या हेतूने मी खूप वेळा उंच अवकाशात उड्डाण करुन पाहिले. पण देवलोक गाठण्याचे सामर्थ्य मी एवढा बलसंपन्न असून मजकडेही नाही, हे ही तू ध्यानात ठेव. मानवा आताच मला स्मरण झाले...कांचन गंगेच्या उगमापाशी पूर्व दिशेला टेकडी मध्ये एक मोठे विवर आहे. त्या विवरातून सुवणर्ङ प्रदेशातील मानव देहधारी बाहेर पडताना पाहिल्याचे मलास्मरते. ते मानव अधूनमधून आपल्या देहावर सुवर्णमृत्तिकेचे लेपन करतात.तसे लेपन करुन विवराबाहेर येणारे काही मानव मी दोन संवत्सरांपूर्वी पाहिले होते.''

''मानवा, निस्संदेहपणे, त्या विवरातच सुवर्णाचा संचय असावा. तुझ्या शोधाला आता दिशा सापडली आहे.तू अशी काहीतरी युक्ती काढ की जेणेकरुन मी तुला सुरक्षितपणे त्या स्थळापर्यंत अवकाश मार्गाने नेऊ शकेन. अन् हो! तत्पूर्वी तू मला असेही वचन दे की, तुला सुवर्ण प्राप्ती झाली तर तू ज्या देवतांच्या प्रतिकृती करशील त्यामध्ये वैनतेयाचीही प्रतिमा नक्की करशील!'' पक्षिराजाचे कथन ऐकून तेजपालचे हृदय आनंदाने उचंबळून आले. पण वरकरणी तसे न भासविता तो गंभीर स्वरात म्हणाला, ''पक्षिराज! पवित्र देवतांची अन् मानवाच्या पवित्र धर्माची शपथ घेऊन मी तुला वचन देत आहे! मला सुवर्णप्राप्ती झाली तर विनतासुताची प्रतिमा मी बनवीन. एवढेच नव्हे तर तिची प्रतिष्ठापना एका विशाल मंदिरात समारंभपूर्वक करुन अखिल मानव जातीसाठी एक कायमचे श्रद्धास्थान मी निर्माण करीन!!''

संकल्प पूर्तीचा क्षण नजिक आला या आनंदाने तेजपाल निर्धास्त झाला.त्याची वणवण आता संपणार होती.कर्तव्यच्युत आळशी दरिद्री म्हणून त्याची निर्भर्त्सना या उपरांत कोणी करू शकणार नाही असा अमूल्य धनसंचय करून जीवनाचे साफल्य प्राप्त करून देणारा क्षण आता दूर नाही याची खात्री वाटून तो सुखावला.निर्मनुष्य प्रदेशातून भटकंती सुरू असता कित्येक दिवस निश्चिंतपणे निद्रा घेण्याचे सुखही त्याला लाभलेले नव्हते. मात्र आज...पक्षिराजाच्या कृपाछत्राखाली तो निःशंक मनाने गाढ झोपला. पंच पंच उषःकाली पक्षिराजाच्या कर्ण कर्कश चित्कारानी त्याला जागृती आली.तो खडबडून उठला. पक्षिराजा कां ओरडत आहे त्याचा वेध घेत असता काही क्षणातच पंख फडफडवीत आलेला दुसरा गरुड पक्षिराजाच्या सन्निध्य घेऊन बसला. सूक्ष्म निरिक्षण केले असता नवागत गरुड मादी वर्गांपैकी असावा अन् बहुशा ती पक्षिराजाची मादी असावी असा तर्क तेजपालने केला.

सावध पावले टाकीत तेजपाल कपारीच्या मुखापाशी थांबला अन् पक्षिराजाला हाक मारुन त्याने वंदन केले.''मानवा ही माझी भार्या आहे.आम्हां गरूडांमध्ये प्रणयाराधनाच्या काळातच नर- मादी एकत्र राहतात. एरव्ही त्यांची विश्रांती स्थळे भिन्न असतात.या माझ्या भार्येला मनुष्यांची वाणी अवगत नाही. तसेच तिला मनुष्यांविषयी खूपच घृणा आहे. त्याचे कारणही तसेच आहे. खूप संवत्सरांपूर्वी मुक्त विहार करीत ती मनुष्य वस्ती नजिक एका उद्यानात आली असता कुणी दुष्ट मानवाने तिजवर शरसंधान केले. आम्ही गरुड विश्रांती घेत असताही सावधचित्त असतो म्हणून बाण येताना दिसताच माझ्या भार्येने प्रसंगावधान राखून त्वरेने उड्डाण केले.तिचा मर्मभेद झाला नाही परंतु तिच्या वाम पक्षांत बाण रूतला. त्या जागी

अजूनही जखमेचा व्रण आहे.’’पक्षिराजाचे कथन सुरू असता मादी कर्णकटू चित्कार करीत राहिली.तिचे ओरडणे थांबताच पक्षिराजाचे खंडित झालेले कथन पुन्हा सुरू झाले.‘‘बा मानवा!तुला पाहून तिच्या पूर्वस्मृती जागृत झाल्या असून तू काही दगा फटका तर करणार नाहीस ना? अशी शंका तिला वाटत आहे. पक्षिवर्ग प्रायः मनुष्य जातीवर विश्वास ठेवत नाही.त्यात आणखी माझ्या भार्येला माणसांचा विषारी अनुभव आला आहे. तेव्हा तू कोण? तुला पक्षिराजा विषयी कसा आदर आहे हे मी तिला कथन करतो ’’

पक्षिराज आणि त्याची मादी यांचे कर्कश चित्कार दीर्घकाळ सुरु राहिले. खूप वेळाने मादी किंचित शांत झाली दोन्ही हात जोडून मस्तक झुकवीत तेजपाल उद्गारता झाला.‘‘पक्षिराज! तुम्ही उभयता देव स्वरूप असून मला वंदनीय आहात. तुझ्या भार्येवर मर्माघाती शरसंधान करणारा मानव कुळातील होता हे कळल्यामुळे मी व्यथित झालो आहे. त्या दुष्टकृत्याची भरपाई करण्यासाठी,त्या निंद्य कृत्याचा सूड घेण्यासाठी पाहिजे तर तुझ्या भार्येने आपल्या तीक्ष्ण चोचीने माझ्यावर प्रहार करून मला शिक्षा द्यावी. तसे झाले तर माझ्या जीवनाचे सार्थक झाले असेच मी समजेन. पण माझ्या हेतूविषयी तिने शंका घेऊ नये अशी माझी विनंती तू तिजप्रत विदित करावीस. ती देईल तो न्याय मी आनंदाने मान्य करीन’’. त्यांचे हे कथन गरूड वर्गीयांच्या भाषेत पक्षिराजाने आपल्या भार्येला कथन केले. उभयंताचे चित्कार आणि कर्कश ध्वनी यावरून कसलाच अंदाज तेजपालला करता येईना.

‘‘बा मानवा! तुझे निवेदन मी भार्येला कथन केले आहे. अर्थात पक्षि धर्माप्रमाणे ती तुजवर किमपि विश्वास ठेवायची नाही.मात्र तुझे

हृदय चंचुप्रहाराने विदीर्ण करून मृत्यूदंड द्यायची तिची इच्छा नाही.भावी योजनेतही ती कसलेही सहकार्य करणार नाही अन् त्याची जरूरीही नाही. मी माझ्या इच्छेप्रमाणे वर्तावे. परंतु पुनरपि तू येथे येऊ नयेस असे मात्र तिने बजाविले आहे.बा मानवा! या वेळी मात्र तिने तुला अभय दिलेले आहे!''पक्षिराजाचे कथन पूर्ण होत असता मादी झेप घेऊन दूर उडून गेली. मोठे अरिष्ट टळले याबद्दल तेजपालने सुटकेचा निश्वास टाकला. त्याने प्रस्थानाची तयारी सुरू केली. संभाव्य योजनेत पक्षिराजाच्या सामर्थ्याचा पुरेपूर वापर करून घ्यायचा त्याचा बेत होता.अत्यंत आर्जवी, मधूर स्वरात त्याने आपला बेत पक्षिराजाप्रत कथन केला.

कमरेभोवती उत्तरीयाचे वेढे देऊन पक्की गाठ मारून तेजपाल भूमीशायी झाला. पक्षिराजाने अवकाशात उंच झेप घेतली.थोडावेळ आकाशात गोल गोल घिरट्या घालीत तो तेजपालच्या समीप उतरु लागला. त्याच्या जवळ येताच आपल्या बळकट नखांनी तेजपालच्या कमरेला बांधलेल्या उत्तरीयावर घट्ट पकड घेत त्याने तेजपालला उचलले.तेजपालने नेत्र मिटून घेतले. तो बलसंपन्न पक्षिराज तेजपालला घेऊन सुवर्ण प्रदेशातील कांचन गंगेच्या उगमाकडे झेपावू लागला. नियोजित स्थळी येताच पक्षिराजाने गोल गोल घिरट्या घेऊन संपूर्ण परिसराचे सूक्ष्म अवलोकन केले. कांचन गंगेच्या उगमा नजिकच्या विस्तृत क्षेत्रात मानव अथवा अन्य कोणत्याही प्राणी नाही याची पूर्ण खात्री पटल्यावर पक्षिराज विवरास सन्मुख येत तेजपालचा देह त्याने अत्यंत हळूवारपणे तृष्णाच्छादित भूमीवर ठेवला

दीर्घकाळप्रचंड वेगाने अवकाश भ्रमण केल्यामुळे तेजापालचे मस्तक बधीर झाले.थोड्या अवधीनंतर भानावर येत तो उठून बसला.

तद्नंतर कांचन गंगेच्या उगमापाशी त्याने मुख प्रक्षालन केले.ओंजळ भरुन कांचनगंगेचे स्वर्णयुक्त जल प्राशन केल्यावर तो चांगलाच तरतरीत झाला.आता आजुबाजूच्या प्रदेशाचे अवलैंकन त्याने केले.टेकडीच्या पायथ्यापाशी नदीच्या उगमा पासून तो नजरेच्या टप्प्यांच्या अंतरावर सुरू होणाऱ्या वनप्रदेशा पर्यंतच्या भूमीवर कमरे इतक्या उंचीचे तृण माजलेले असून क्वचित एखादे दुसरे झुडूप उगवलेले दिसले. उगमाच्या दुतर्फा असेलला चिखल फिक्कट शेवाळी रंगाचा असून त्यात अधून मधून असणारे सुवर्णकण सूर्य प्रकाशात चमचम करीत होते. उगमस्थानाच्या उजवीकडे अदमासे चार वाव लांब रुंद असलेल्या विवराच्या तळाला तृणहीन भूमीवर उमटलेली फिक्कट शेवाळी रंगाची पदचिन्हे खचितच त्या प्रदेशातील आदिमांची होती. त्या पदचिन्हांमध्ये सुवर्णकणांचे प्रमाण एवढे होते की पदचिन्हांची संपूर्णकडा सोनेरी रंगाने चमकत होती आणि संपूर्ण आसमेंतात कोणाचीच चाहूल लागत नव्हती. संकल्प पूर्तीच्या उन्मादात तेजपाल विवरासमोर झाला.

‘‘मानवा मी आता क्षुधार्थ झालो आहे. येथे येत असता काही अंतरावर झुडूपांच्या आश्रयाने बसलेला मृगांचा थवा मी हेरला आहे. मी भक्ष्य पकडून त्वरेने परत येतो.’’ असे सांगून पक्षिराजाने गगनात झेप घेतली.तेजपाल विवराच्या अंतर्भागाचे अवलोकन करु लागला. सूर्योदय होऊन अर्धा प्रहर उलटलेला असल्याने सूर्यकिरणे थोड्या प्रमाणात विवरातून आत शिरल्यामुळे अंतर्भागात उजेड दिसत होता. विवराच्या मुखापासून सुमारे दीड-दोनशे पावलांच्या अंतरावर विवराची लांबी पूर्ण होत असून तेथे पुरुषभर उंचीवरुन संततधार जलप्रवाह पडताना दिसला. त्याचे अवलोकन सुरु असता पायाच्या नख्यांमध्ये घट्ट पकडलेला मृग घेऊन आलेला पक्षिराज

दिसला.त्याच्या समीप येताच पक्षिराजाने उंचावरुनच मृग सोडून दिला.गरगरा फिरत मृग भूमीवर आदळला अन् त्याच्या पाठोपाठ पक्षिराजही त्वरेने उतरला. ‘‘मी विवरात प्रवेश करतो. तू शांतपणे भोजन कर. काही धोका वाटलाच तर मला इशारा कर!’’ असे सांगून तेजपाल विवरात शिरला.



अंतर्भागात दहा पावले चालल्यावर जे दृश्य दिसलेते पाहून तेजपाल स्तिमित झाला. विवर चांगले ऐस पैस आणि लांब रुंद होते.अंतर्भागात एका टोकाला दरडीमध्ये फिक्कट हिरव्या रंगाच्या प्रस्तरांमधून, कोसळणाऱ्या जलप्रवाहातून असंख्य सुवर्ण कण ओघळत होते. भूमीवर पडून विवराच्या डाव्या बाजू पर्यंत वहात येणाऱ्या जलौघाच्या दोन्ही बाजूनी फिक्कट हिरव्या चिखलावर पुजंक्या पुंजक्यांनी सुवर्णाचे थर साठलेले होते. दीड- दोनशे पावले वहात येणारा तो जलौघ विवराच्या डाव्या बाजुला भूमीत लुप्त झाला होता. हेच जल भूमीच्या अंतर्भागातून वहात नदीच्या टेकडीबाहेरच्या

उगमस्थानी उमटत असावे! म्हणूनच तेथे हिरवट रंगाचा चिखल दिसतो.अन्यथाआजुबाजूची भूमी पिवळसर रंगाची दिसत होती. इतक्या अवचितपणे अन् विनासायास सुवर्णाचा अमाप साठा हाती आला याबद्दल त्याने आराध्य देवतेचे आभार मानले. संकल्पपूर्तीच्या त्याक्षणी धर्म दत्तांनी सांगितलेले भाकित त्याला आठवले.

सुवर्णप्रदेशाच्या शोधात येण्यापूर्वी त्याने नगरातल्या नृसिंहाच्या देवालयात कौल घेतला होता.देवस्थानचे प्रमुख आचार्य. धर्मदत्त..त्यांच्या कुडीतनृसिंहाचा संचार व्हायचा.त्यावेळी त्यांनी उच्चारलेले भाकित सहसा चुकायचे नाही.अशी लोकवदंता होती अन् त्यामुळे नगर श्रेष्ठी ंपेक्षाही त्यांना आदर दिला जायचा. तेजपाल तर कुमार वयात त्यांच्या वाऱ्यालाही फिरकत नसे.नृसिंह मंदिराच्या मागील बाजूला पाठशाळेत मात्र त्याला नेमाने जायला लागायचे. वृध्द अध्यापक गंगभट्ट म्हणजे साक्षात जमदग्निचा अवतार.अविवाहित राहून वेदविद्या प्रसाराला त्यांनी वाहून घेतलेले.अशा समर्पण भावाने कार्य करणाऱ्या विद्वांनाचे ठायी हटकून आढळणारी अहंमन्य तऱ्हेवाईक वृत्ती त्यांच्या ठायी ठासून भरलेली. मंडुकाचार्य, कृष्ण वराह,बकध्यान,गर्दभ  अशी देववाणीतली शेलकी विशेषणे छात्रांना बहाल करीत ते विशेष असणाऱ्या प्राण्यालाच साहेल असे ताडनही ते करीत. त्यांना फारच कष्ट झाले तर उर्वरित कार्य त्यांच्यावतीने त्यांच्या मर्जीतला कुणी छात्र पार पाडायचा.

समोर बसलेला अध्ययनार्थी म्हणजे निर्बुद्ध मर्कट आहे अशा आवेशातच अध्यापन कार्य चालायचे. व्यास -पीठासमोरच्या रांगेतील ब्रह्मकुमारांना वेदातील ऋचेची संथा दिल्यावर त्या मागच्या क्षात्रकुलोत्पन्नांना नीतीबोध सांगायला ते उठले की तेजपालच्या

पोटात गोळा यायचा.ते उठून उभे राहीतो घडघडा पाठ केलेल्या कालच्या वचनाचे पूर्ण विस्मरण त्याला व्हायचे. मग त्यांच्या हातीच्या वेत्रकाष्ठाचे तडाखे खाता खाता,‘‘या घटोत्कच बोळक्या तोंडाच्या गंगैयाला कंठसूत्र घालून अश्वाच्या पाठी बांधून धर्मस्थलाभोवती तीन प्रदक्षिणा घालीन तरच मी नावाचा तेजपाल’’ या अशक्य प्रतिज्ञेचे अंर्तमनात उच्चारण तो करायचा. यांचा मार खाऊन खाऊन आपली अवस्था खचितच निर्बुद्ध अजापुत्रासारखी होणार याचे अतीव दुःख होऊन त्या काचातून सुटण्यासाठी नगरा बाहेरच्या अलकंनदेच्या पैंत्रात आत्मसमर्पण करण्याच्या निर्णयाप्रत तो आला.अन् अकस्मात या साऱ्या वास्तवाला अद्‌भुत कलाटणी देणारी घटना घडली.

त्याच्या पित्याचा आकस्मिक मृत्यू झाला. मृत्तिका पात्रात निखारे घेऊन स्मशानाकडे अनवाणी जात असताही पितृ वियोगाच्या दुःखापेक्षाही सक्तीने पाठशाळेत जायला लावणारी कुटुंबातील अधिकारी व्यक्ती नष्ट झाल्याबद्दल त्याचे मन आनंदाने मोहरून गेले. तेजपाल आता मन मानेल तसा वागायला मोकळा झाला.मातेचा धाक त्याला कधीच वाटला नाही. पति वियोगाच्या दुःखाने उन्मळून गेलेली ती आर्य स्त्री! तेजपालच्या पाठीवर जन्मलेले अंगावर पिणारे लेकरू असल्या मुळेच सती गेली नाही इतकेच! उभी हयात मरण येत नाही म्हणूनच ती जगत राहिली.उनाडक्या करीत स्वच्छंदपणे फिरणाऱ्या तेजपालची शरीर संपदा मात्र क्षत्रियाला शोभणारी धष्ट पुष्ट होऊ लागली. वर्ण धर्माला शोभणाऱ्या अश्वारोहण, धर्नुविद्या, खड्‌ग विद्या मात्र त्याने नगरातल्या मल्लशाळेत साध्य केल्या .तो असे निर्धास्त जीवन जगतअसता पाठशाळेतील त्याचे समवयस्क मित्र अध्ययन पूर्ण करून आपापल्या वृत्ती संभाळीत सुखासीन जीवन जगू लागले.

कनिष्ठ भ्राता भार्गव अध्ययन पूर्ण करुन नगर रक्षक म्हणून राजसेवेत रूजू झाला.त्यादिवशी मात्र तेजपाल अंतर्मुख झाला. अकिंचन रिकामटेकड्याला समाजात स्थान नाही हे त्यावेळी त्याला उमगले. मग मात्र विनासायास अर्थार्जन करण्याचे विविध मार्ग त्याला खुणावू लागले.अर्थप्राप्तीसाठी गैरमार्ग पत्करायला त्याचे संस्कारी मन तयार होईना. मग तो सिद्धींच्या मागे लागला. साधू अवलियांच्या अनुग्रहाने द्रव्य साधनेचे अद्‌भुत मार्ग प्राप्त करण्या साठी तो त्यांच्या कच्छपी लागला. आता त्याचा कायम मुक्काम नगरातल्या धर्मशाळेत पडू लागला. अशाच प्रयत्नात एका जराजर्जर हठयोग्याशी त्याचा परिचय झाला.त्या आसन्नमरण बैराग्याची मनोभावे सेवा करून हिमगिरी पलीकडच्या सुवर्ण प्रदेशाची माहिती त्याला प्राप्त झाली.आता त्या प्रदेशात जाऊन सुवर्ण प्राप्ती करण्याच्या तयारीला तो लागला. अनंत स्नेही सोबत्यांचे अनंत सल्ले घेऊन त्याने योजना तयार केली. आपण ‘अर्थार्जनासाठी देशाटन करणार’ असा बेत घरात जाहीर केला. प्रस्थानापूर्वी नगरातील आराध्य दैवत नृसिंहाचा कौल घेण्याचा सल्ला मातेने दिला.

तेजपाल नृसिंह मंदिरात जाऊन पोहोचला.धर्मदत्तांभोवती कडे केलेल्या पृच्छकांची पांगापांग झाल्यावर तो हळूच पुढे सरकला. मग धर्मदत्ताना साष्टांग नमस्कार करुन सुवर्णप्राप्ती होण्यासाठी हिमगिरी पलीकडे जायचा मनोदय त्याने व्यक्त केला. त्याचे कथन ऐकताच थयथया नाचत धर्मदत्त ओठातल्या ओठात काहीतरी पुटपुटत राहिले. खूप वेळानंतर तेजपालच्या नेत्रात रोखून पहात त्यांनी भाकित वर्तवले,

**‘‘ज्याच्या प्राप्तीत सुखाचा आभास आहे त्याचा मनुष्याला हव्यास**

**असतो. म्हणून ते परम प्राप्तव्य असे त्याला वाटते.परंतु ही जाणीव म्हणजे क्षितिजाला केलेला स्पर्श आहे.जे आपल्या हाती आहे ते आपलेच आहे याची शाश्वती देता येऊनये एवढे आपले अस्तित्व क्षणजिवी आहे.असे असता तू सुवर्णप्राप्तीचा मोह धरून येथे यावेस अन् मी तुला घटित सांगावे या गोष्टीला तरी काय अर्थ उरतो? सुवर्ण हे काही जीवनसर्वस्व नव्हे, सुखनिधान तर नव्हेच नव्हे ! हे मला कळते !! त्याने क्षुधा तृष्णा शमन होत नाही कि त्याला सुंगधही येत नाही. मग त्याचा हव्यास तरी कशाला असावा? अर्थात माझे हे कथन म्हणजे भग्न पात्रात जल साठविण्याचा प्रयत्न आहे. पण तू श्रद्धेने येथे आलास तर माझा उपदेश तू खचितच ऐकावास. लक्ष्मी चंचल असते म्हणून तिच्या प्राप्तीचा हव्यास बाळगू नये. कष्ट केले तर मानवाच्या गरजा भागू शकतील एवढे कर्तृत्व त्याच्या ठायी निसर्गतः असते तसे ते तुझ्या ठाई सुद्धा आहे. सुवर्ण राशींची प्राप्ती ही तुझी गरज नाही हे ध्यानी घेऊन तू त्याच्या प्राप्तीचा हव्यासच धरू नयेस. विहित कर्तव्यापासून पराङःमुख होऊन सुवर्ण प्राप्तीची; ती विनासायास व्हावी अशी इच्छा तरी तुझ्या मनी का उत्पन्न व्हावी? आयते धन हे निद्रिस्त भुजंगा सारखे असते, सांभाळणेही कठिण आणि त्याग करणेही कठिण.''**

हे असंबद्ध भााकित ऐकून तेजपाल क्रोधित झाला. ''आचार्य! मला तुमचा सल्ला नकोय. मी योजिलेल्या मार्गात मला यश मिळेल अथवा नाही.... यश कसे मिळवावे यावर तोडगा सांगा.'' त्याचे भाषण ऐकल्यावर नेत्र मिटून घेत धर्मदत्त उद्गारले,''पृच्छकाची ईप्सित पूर्ती करण्यासाठी उघडलेले हे धर्मछत्र नव्हे! भाकित मी वर्तविले आहे. इत:पर ज्या मार्गाने ईप्सित पूर्ती होईल असे तुला वाटते त्या मार्गाने जायला तू स्वयंसिद्ध आहेस. त्यासाठी धर्मस्थळी

येण्याची तसदी तरी तू कां घ्यावीस? तू जसे इच्छितोस तसे होईल असेही समज हवे तर! पण या क्षणी मी तुझे मुखावलोकनही करु इच्छित नाही. जा! दूर हो मज समोरुन...!''या उद्दाम ब्रह्मचाऱ्याला धर्मस्थळीचे प्रमुख आचार्यपद कुणा मूर्खाने दिले असेल बरे? याचा विचार करीत तेजपाल धर्मस्थळाबाहेर पडला.

तेजपाल भानावर आला. समोर दिसणाऱ्या अपार सुवर्ण राशीचा स्वामी या क्षणी मी आहे ! ही भावनाच अतीव सुख देणारी वाटली. कोसळणाऱ्या जलप्रवाहाबरोबर क्षणोक्षणी भूमीच्या उदरा बाहेर पडणारे सुवर्णकण प्रवाहाच्या कडेला साचत इथल्या संचयात क्षणोक्षणी भरच घालीत राहणार.जणू कुबेराचेच हे अमाप भांडार आपल्याला ज्ञात झाले आहे. नगरातील सोडाच पण संपूर्ण आर्यावर्तातील कोणताच धनिक... साक्षात सम्राट चारुगुप्त सुध्दा आपली बरोबरी करु शकणार नाहीत. नृत्यालयातल्या रमणीय सुंदरींची उत्तरीये आता आपल्या एका भृकुटीभंगा बरोबर ढळतील... भूलोकीचे कोणतेही सुख आता आपल्याला दुष्प्राप्य नाही. या विचारांच्या आवर्तात गुंगून दिङमूढ झालेला तेजपाल अनिमिष नेत्रांनी निसर्गाने मुक्त केलेले स्वर्ण भांडार पहातच राहिला. थोड्या वेळाने स्वप्न रंजनातून बाहेर आल्यावर तो पुढे सरसावला.

जलप्रवाहाच्या कडेला कणाकणानी साचलेला सुवर्णाचा गठ्ठा थरथरत्या हातांनी पकडून किंचित जोर लावून तो हलविताच तळातल्या ओल्या मृत्तिकेपासून विलग होऊन अलगद तेजपालच्या हाती आला. अपेक्षेपेक्षाही जडशीळ असलेला तो गठ्ठा छातीशी कवटाळून तेजपाल मागे वळला. बोचक्यातली कटी वस्त्रे बाहेर काढून खड्गाने त्यांचा छेदघेऊन विशिष्ट आकाराचे आठ तुकडे

तेजपालने केले. प्रवाहाच्या कडेला साचलेले सुवर्णांचे गट्ठे जमवून कटिवस्त्राच्या फडक्यात त्याचे नेटके गाठोडे बांधले. सुवर्णांचे जडशीळ गाठोडे पाठीवर घेऊन वेडीवाकडी पावले टाकीत तो कपारीच्या मुखापाशी आला.अर्धोन्मिलित नेत्रांनी डुलक्या घेणाऱ्या पक्षिराजाला हाक मारुन तो म्हणाला, ‘‘पक्षिराज हे गाठोडे तुझ्या निवासस्थानी कपारीत ठेऊन त्वरेने परत ये. तोवर मी दुसरे गाठोडे बांधतो.’’पक्षिराज सुवर्णाचे गाठोडे घेऊन निवास स्थानाकडे झेपावला अन् तेजपाल दुसरे गाठोडे बांधायच्या तयारीला लागला.

तेजपालच्या अपेक्षेपूर्वीच पक्षिराज परत आला.तोपर्यंत चार गाठोडी बांधून झाली.अतिश्रमामुळे तेजपाल धापा टाकीत होता. ‘‘अरे मानवा तू तर फारच थकलेला दिसतोस.’’ पक्षिराज म्हणाला. त्यावर तेजपाल म्हणाला, ‘पक्षिराज, माझ्या थकव्याची काळजी नको करुस. तू मात्र थकू नकोस. अजून अशी सात गाठोडी सूर्यास्तापूर्वी तुला वहावयाची आहेत.’’पक्षिराज म्हणाला, ‘‘माझ्या शक्तीची अन् वेगाची तुला कल्पना नाही. या कामासाठी सूर्यास्तापर्यंतचा अवधी तरी कशाला? अपरान्ह काळापर्यंत उर्वरित सातही खेपा पूर्ण करुन आपण तुझ्यासह आपला मुक्काम गाठू. तू गाठोड्यांची संख्या अजून वाढवित असलास तरी माझी काही हरकत नाही.’’गाठोडे घेऊन पक्षिराज मुक्कामाकडे झेपावत असता आणखी गाठोडी बांधण्यासाठी एखादे सुद्धा कटीवस्त्र आपणापाशी नाही याचे अतीव दुःख तेजपालला झाले. सुवर्णाचे गाठोडे सूर्यकिरणात चमचमत असलेले तेजपालला दिसले.

सहावे गाठोडे घेऊन पक्षिराजाने अवकाशात उड्डाण केले. तेजपालचे कार्यतर पूर्ण झालेले होते.दूर जात जात ठिपक्याएवढ्या

दिसणाऱ्या पक्षिराजाकडे तो पाहत राहिला. केवळ वस्त्रांअभावी आपणाला आठ गाठोड्यांवरच समाधान मानावे लागते,याचे दुःख त्याच्या जिव्हारी लागले होते.येथून आणखी सुवर्ण नेण्यासाठी काय युक्ती करावी या विवंचनेत तेजपाल पडला असता नजरेच्या टप्प्या-एवढ्या अंतरावरील झाडीतून बाहेर पडून अनाकलनीय स्वरात आरडाओरडा करीत विवराच्या दिशेने येणारा आदिमांचा जथा त्याला दिसला. सुवर्णाचे गाठोडे घेऊन झेपावणारा पक्षिराज त्यांना दिसला होता.विवरातील सुवर्णाचा अपहार करण्यासाठी कुणी आले असावे याचा बोधत्यांना झाला. म्हणूनच ते विवराच्या दिशेने दगड धोंड्यांचा मारा करीत पुढे पुढे सरकू लागले.

विवराच्या मुखाआडून तेजपाल त्यांचा वेध घेऊ लागला. त्याने धनुष्य सज्ज केले. जथ्यातील आघाडीवरचे आदिम बाणाच्या टप्प्यात येताच एकाच्या वक्षाचा वेध घेत त्याने आकर्ण प्रत्यंचा ताणली. सरसरत गेलेल्या बाणाने आपले कार्य निर्वेध बजावले अन् उरात रूतलेल्या बाणासह आरोळी मारीत तो आदिम रक्ताच्या थारोळ्यात पडला.त्यांनतर आणखी दोघांचीही तीच अवस्था झाली.आता मात्र जथा जागच्या जागी खिळून राहीला. काय होते आहे याचा अर्थबोध होईतो चौथा आदिम धराशायी झाला.त्याबरोबरप्रसंगाचे गांभिर्य कळलेले उर्वरित आदिम पळतच माघारी वळले.तेजपालने सुटकेचा सुस्कारा सोडला. माघारी वळलेले आदिम भयाने वाट मिळेल तिकडे पळत सुटले.त्याचवेळी सहावे गाठोडे ठेऊन पक्षिराज सुवर्णप्रदेशात येत होता.भूमीवर पडलेले शरविद्ध आदिम पाहून तो किंचित भांबावला. खाली न उतरता तो गोलगोल घिरट्या घालत राहीला. विवराच्या मुखातून तेजपालने घिरट्या घालणाऱ्या पक्षिराजाला पाहिले. उत्तरीय फडकवीत तो विवराबाहेर आला तेव्हाच पक्षिराज

खाली उतरला.''अखेर त्यांना आपल्या पत्ता लागला म्हणायचा.पण तू युक्तीने त्यांचा हल्ला परतवून लावला आहेस. अक्राळ विक्राळ ओरडत दूर जाणारे पशुमानव मला दिसले. तद्नंतर शरविद्ध होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडलेले त्यांचे चार साथीदारही मी पाहिले. तरीही सावधगिरी म्हणून मी खाली उतरलो नाही. मानवा आता सुर्वणाचा मोह सोडून आपण माघारी जावे हे बरे. ती उरलेली गाठोडी इथेच राहू द्या. तू माझ्या सोबत चल कसा!'' पक्षिराजाने सल्ला दिला.

''पक्षिराज,यश एवढे हाताशी आलेले असता कच खाणारा मी भिरु वृत्तीचा नाही! माझ्या भात्यात अजून अठरा बाण आहेत.पण त्याहीपेक्षा प्रभावी इलाज मला आता सुचलेला असून त्या आदिमांचा कायमचाच काटा मला काढावयाचा आहे, ''तेजपाल बोलला. पक्षिराज चिंतेच्या सुरात बोलला,''मानवा! त्यांचे संख्याबळ! ते तुला अजिबात ज्ञात नाही. ते जितक्या त्वरेने घाबरून पळून गेलेत, तितक्याच त्वरेने ते पुन्हा हल्ला करू शकतात.... संभाव्य परिणामांचे विचार करण्या इतके तारतम्य त्यांजपाशी नाही. दुसरे म्हणजे आपला कार्यभागही बराचसा उरकला आहे. आता त्या पशु मानवांशी वैर धरण्यात काय स्वारस्य? शेवटी काहीही झाले तरी ते या भागातले मूळ रहिवासी आहेत. आपल्या लालसेसाठी त्यांचा घात करणे मला उचित वाटत नाही. त्यांच्या भूमीत येऊन आपण त्यांचे संकेत मोडीत आहोत हे माझ्या मनाला पटत नाही.'' त्यावर तेजपाल म्हणाला, ''अती श्रमामुळे तुझी मती भ्रष्ट झाली आहे. पण ठीक आहे. पूर्वी ठरल्याप्रमाणे ही दोन गाठोडी तरी आपल्याला नेलीच पाहिजेत. अन्यथा आदिमांना घाबरून आपण पलायन केले म्हणून तुझी भार्या अवहेलना करील.'' यावर पक्षिराज सातवे गाठोडे घेऊन

निघाला.

भूमीवर पडलेल्या आदिमांचे तेजपालाने सूक्ष्म अवलोकन केले.रक्ताच्या थारोळ्यात पडलेले ते आदिम पूर्ण दिगंबरावस्थेत होते.हातापायांची नखे रानटी श्वापदांप्रमाणे वाढलेली, अंगावरील लव पशुंप्रमाणे अंगूळभर लांब अन् डोईच्या केसांचे तर शिप्तर झालेले आहे. पडलेल्यांपैकी एक स्त्री आहे हे ही त्याच्या ध्यानी आले. हे ओंगळ पशुतुल्य आदिम मानव कुळातले आहेत या कल्पनेनेच त्याला शिसारी आली. हा अमुल्य सुवर्ण खजिना त्यांच्या कब्जात असणे त्याला योग्य वाटेना. आपल्या अन् खजिन्याच्या मार्गातून त्यांचे समूळ उच्चाटन करण्याचा नामी बेत त्याने आखला. कमरबंदाच्या थैलीतले चकमकीचे दगड अन् कापूस घेऊन तो भूमीशायी आदिंमापर्यंत गेला. थोडेसे गवत उपटून त्यात कापूस ठेवून त्याने चकमक घासली. असंख्य अग्नि कणानी  कापूस धुमू लागला.त्यावर हळूवार फुंकर घालून त्याने अग्नि प्रज्वलित केला. आता आदिमांचे या प्रदेशातून समूळ उच्चाटन त्याचे हे अमोघ अग्न्यास्त्र करणार होते.

सहस्त्र जिव्हानी ग्रास घेत अग्नि हळू हळू रौद्ररूप धारण करू लागला.विवराच्या दिशेने येणारा अग्नी झुडूपांच्या डहाळ्यांनी झोडपून नष्ट करीत स्वतःच्या सुरक्षिततेची व्यवस्था करून झाडीच्या दिशेने स्वाहाकार करीत निघालेल्या अग्नीचे रौद्र तांडव तेजपाल पहात असता पक्षिराज माघारी आला. ‘‘मानवा! तू हा भलताच उपाय योजिलास की रे?’’ अनिर्बंध सुटलेला हा अग्नी साऱ्या प्रदेशाचे भस्म करील.’’पक्षिराजाची ही शंका ऐकून तेजपाल छद्मी हसत म्हणाला,‘‘पक्षिराज, न जाणो ते आदिम पुनश्च चाल करुन

आले अन् त्यांच्या संख्या बलापुढे माघार घेण्याची नामुष्कीची वेळ आली तर! हा वणवा असा फार काळ भडकणार नाही.भूमीवरचे शुष्क तृण जाळीत अग्नी गर्द वनराई पर्यंत गेला की आपोआप शमेल.तूर्त आदिम वीरांचा धोका पूर्ण टळला असून तू हे आठवे गाठोडे ठेऊन मला न्यायला ये!''

पक्षिराज आठवे गाठोडे ठेऊन तेजपालला न्यायला येईतो वणव्याने रौद्र रुप धारण केले होते. गर्द वनराईतील झाडांची पाने आगीने होरपळल्यामुळे शुष्क होऊन उभी झाडे पेटू लागली. अग्नीचे भयाकारी तांडव पाहून घाबरलेला पक्षिराज वेळ न दवडता तेजपालला घेऊन कपारीच्या दिशेने निघाला.संपूर्ण आकाश धुरामुळे भरुन गेल्यामुळे या पूर्वीच्या मार्गाने न जाता जरा दूरच्या मार्गाने पक्षिराजाने आपला निवास गाठला. पक्षिराजाच्या कपारीजवळून सुवर्ण प्रदेशाच्या दिशेने पाहिल्यावर अर्धचंद्रकार अग्नी रेषा स्पष्ट दिसत होती. आकाशात धुराचे लोट उसळताना दिसत होते.अन् प्राणभयाने दूर उडून चाललेले पक्षिवर्गही कुठे कुठे दृष्टोत्पत्तीस येत होते. ''मानवा, गर्द वनराई पर्यंत गेल्यावर अग्नी शमेल असे तू म्हणाला होतास पण प्रत्यक्षात उलटच झालेले दिसतेय! संपूर्ण सुवर्ण प्रदेश आता वणव्याने बेचिराख होईल.'' पक्षिराज सचिंत स्वरात म्हणाला.

तेजपाल म्हणाला,''पक्षिराज!आपला कार्यभाग आता निर्वेधपणे उरकला आहे. त्या रानटी आदिमांना चांगलीच अद्दल घडविण्याची माझी इच्छा होती, ती पूर्णांशाने फलद्रुप झालेली पाहून मला अत्यानंद होत आहे. त्यांच्या संख्याबळाची तुला भीती वाटत होती ना?यापुढे सुवर्णप्रदेशात येणाऱ्या कोणालाही अटकाव करायला

एकही आदिम शिल्लक राहणार नाही.हा वणवा योजनेच्या योजने त्यांचा पाठलाग करीत जाईल. पवित्र सुवर्ण भांडार आता आदिमांच्या कब्जातून मुक्त झाले आहे. पुन्हा कधी गरज पडलीच तर तुझे सहाय्य मला मिळावयाचे नाही. तशी अटच तुझ्या भार्येने घातली आहे.पण पक्षिराज मी केवळ माझ्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर माझा मार्ग निर्वेध केला आहे.पक्षिराजा या जीवनकलहात शेवटी शक्तीचेच साम्राज्य उरते. अशक्त दुर्बलांना जगण्याचा अधिकारच नसतो. आज अनपेक्षितपणे आर्यावर्तातील सामर्थ्यवतांच्या हाती या अमाप सुवर्ण साठ्याचे स्वामित्व आले आहे.मित्रा! तुझे सहाय्य माझ्या चिरस्मरणात राहील.''किंचित काळ थांबून विषय बदलीत तेजपाल बोलला, ''मित्रा गरुडा, अतिश्रमामुळे मी क्लांत झालो आहे. आलेला शीण घालविण्यासाठी मला स्नान केले पाहिजे.येथे जवळपास कुठे एखादा जलाशय असेल तर कृपया सांग.''

पक्षिराजाने सांगितल्याप्रमाणे कपारीच्या विरुद्ध दिशेने उतरणीच्या मार्गावर दिसणाऱ्या औदुंबर वृक्षासमीपच्या जलाशया कडे तेजपाल निघाला. निवळशंख नीलवर्णी जल पाहताच त्याचे रोम रोम स्नानासाठी आतूर झाले.कटीचे खड्ग अन् परशू उतरवून तेजपालने जलाशयात उडी मारली.मनसोक्त जलविहार करुन त्याने उत्तरीय कमरेभोवती गुंडाळीत कटीवस्त्र दूर केले. ते स्वच्छ धुऊन सुकण्यासाठी उन्हात पसरुन तो विशाल औदुंबराच्या मुळात पहुडला. झालेल्या श्रमांनी त्याला तात्काळ निद्रा आली. तो तृषार्त होऊन जागा झाला,तेव्हा सूर्य अस्ताला जात होता. जलाशयात मुख प्रक्षालण करुन ओंजळीभर भरुन पोटाला तडस लागेतो जल प्राशन करुन तो उठला.सुकलेले कटीवस्त्र चापून चोपून नेसल्यावर खड्ग परशू कमरेला खोचून तो कपारीच्या दिशेने निघाला.

कपारीपासून तो हाकेच्या अंतरावर पोहोचला असता कपारी समोर पाच गरुड कर्कश चित्कार करताना त्याला दिसले. त्यापैकी दोन माद्या होत्या. पण आपला सहाय्य कर्ता गरुड काही त्याला ओळखता येईना. तो थिजून जागच्या जागी खिळला. ‘‘मानवा! गोंधळून जाऊ नकोस... ये...! माझी भार्या आणि माझे बांधव माझा समाचार घ्यावयास आले आहेत. तथापि मी येथे असता तू त्यांना घाबरण्याचे काहीच कारण नाही.’’ संथ पावले टाकीत तेजपाल पुढे गेला अन् पक्षिराजापासून थोड्या अंतरावर एक चांगलासा खडक पाहून त्यावर तो आसनस्थ झाला. ‘‘मानवा! माझ्या भार्येचा सल्ला न ऐकता मी तुला सहाय्य केले. सातवे गाठोडे न्यायला मी कांचन गंगेच्या उगमापाशी आलो असता तू मारलेले पशुमानव मला दिसले. त्यावेळी उरलेल्या दोन गाठोड्यांचा मोह न करता मी तुला परत येण्याविषयी सुचविले. पण सुवर्णाच्या लोभाने अन् त्याही पेक्षा मनात योजिलेले कपटी कारस्थान पूर्ण करण्यासाठी तू मज सोबत आला नाहीस. तुझा पुढील बेत किती निंद्य आहे, याची कल्पना मला त्यावेळी आली असती तर तुझा बेत मी कदापि तडीस जाऊ दिला नसता. पण मानवा शेवटी तू माझी घोर वंचनाच केलीस.’’

‘‘सुवर्ण प्रदेशातील पशुमानवांचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी तू किती नीच पातळी गाठलीस ते माझ्या आता लक्षात आले आहे! माझ्या ज्ञाती बांधवांनी त्याचे गांभीर्य माझ्या निदर्शनास आणून देऊन तुझ्या निंद्य कृत्यात अजाणतेपणाने कां होईना सहाय्य केल्याबद्दल ते मला दूषणे देत आहेत.कपटी मानवा! वरपांगी विनयाचे ढोंग दाखवून शेवटी तू मानवाच्या मूळ ‘विध्वंसक’ वृत्तीचेच प्रदर्शन केलेस.तुझ्या करणीचे किती घातक परिणाम होतील याची पुरेपूर कल्पना असूनही आम्हा पक्षिगणांचा आधार केवळ क्षुल्लक

स्वार्थापोटी तू भस्मसात केला आहेस.तू पेटविलेला अग्नी किती दूरपर्यंत सारा समृद्ध वनप्रदेश बेचिराख करीत जाईल कोण जाणे.........!''दुःखावेग अनावर झालेल्या पक्षिराजाच्या नेत्रातून टप्टप् अश्रुबिंदू ओघळले.

मानवा ! क्षुधा शांती साठी निर्बलांचा वध करुन आम्ही अस्तित्व टिकविले आहे. तरीही क्षुधा क्षमना एवढेच वध कृत्य करण्याचा संकेत वैनतेय वंशज कदापि भंग करीत नाही. सुवर्ण प्रदेशावर एकछत्री वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी तू पेटविलेल्या वणव्यामध्ये किती निष्पाप पशुपक्षी, समृद्ध वनसंपदा नष्ट होणार आहे, याचा तर तारतम्याने विचार दूरच... उलट आपल्या कृतीचे निर्लज्ज समर्थन करुन तू तर पशूंनाही न शोभणाऱ्या वृत्तींचे प्रदर्शन केले आहेस. मानवा! तू स्वतःला फारच बुद्धिमान म्हणवितोस! मात्र तुझे बुद्धिचातुर्य, तुझी कृतघ्न वृत्ती लपविण्यास पूर्णपणे तोकडे पडले असून तुझी कुटील नीती मी पुरती ओळखली बरे! भेटीच्या आरंभी मोठ्या मानभावीपणाने मला देवता स्वरुप मानणारा तू माझा आदराने उल्लेख करीत होतास. परंतु किंचित परिचयानंतर मला अरे तुरे करण्यापर्यंत तुझी मजल गेली. तरीही मला तुझ्यापेक्षा थोड्या वरच्या प्रतीचे स्थान तू देत होतास. परंतु सुवर्णप्राप्तीचा तुझा हेतू सिद्ध होताच तुझ्या वृत्तीत बदल होऊन मला वरकरणी मित्र म्हणून संबोधित तू स्वतःच्या पातळीवर आणलेस.भविष्यात तू पुनश्चः सुवर्ण प्राप्ती साठी या प्रदेशात येशील, त्यावेळी मी तुला सहाय्य केले नाही तर मला शत्रूस्थानी लेखून माझ्यावर मर्माघाती शर संधान करायलाही तुझे मन कचरणार नाही, याची पूर्ण खात्री मानवा,मला पटली आहे. तुम्हा मानवांची उफराटी वृत्ती आम्ही पक्षिवर्गीय पुरेपूर ओळखून आहोत.''

''देवस्वरुप मानलेला पक्षिराज आपल्या हेतूच्या आड येऊ लागताच त्याला मतिभ्रष्ठ ठरविण्याचे तुझे धारिष्ट्य पाहिल्यावर तुझ्याशी सख्य केल्याचा पश्चात्ताप मला होऊ लागला. तरीही मी तुला माफ केले असते. पण मानवा, सुवर्ण प्रदेशावर स्वामित्व, निर्वेध स्वामित्व प्राप्त करण्याच्या आपल्या हेतूपूर्तीसाठी साधन शुचिता पायदळी तुडवून पशु मानवांचे अस्तित्वच नष्ट करण्याचा कुटील डाव तू रचिलास. हे करीत असता तुझ्याशी काडीमात्र शत्रुत्व नसलेल्या पक्षी, पशु, किटक, वृक्षवल्ली यांचाही बळी तू देऊ धजलास हे पाहता माझी भ्रष्ट मती ताळ्यावर आली. मानवा! तुझ्या या नृशंस कृत्याबद्दल वध दंडही अपुरा पडावा!! मित्रा, आता अखेरच्या क्षणी तरी तुला आपल्या दुष्कृत्याचा पश्चाताप व्हावा, धीरोदत्त राहून बुद्धिमान मानवाला शोभेलसे तुझे वर्तन संयमित रहावे, अशी माझी मनःपूर्वक इच्छा आहे. मित्रा, तुझ्या हातून घडलेल्या दुष्कृत्याचे परिमार्जन होण्यासाठी माझे बांधव तुला वधदंड देणार आहेत. तरी सद्सद्विवेक बुध्दीने तू न्याय पालनाच्या कार्यात सहकार्य करावेस असा माझा तुला सल्ला आहे!''

प्रसंगाचे गांभीर्य पुरेपूर ओळखलेल्या तेजपालचा हात न कळत कमरेच्या खड्ग मुठीवर स्थिरावला. पक्षिवर्गीयांपैकी एक मादी त्वेषाने त्याच्याकडे झेपावली.सावधचित्ताने खड्ग सरसावीत हल्ला करावयास झेप घेणाऱ्या मादीवर त्याने क्रोधाने खड्ग प्रहार केला. हल्ला करणारी मादी त्याची चाल ओळखून असल्यामुळे चटकन बाजूला वळली. तरीही खड्गाचा निसटता वार तिच्या वाम पक्षावर होऊन रक्त स्त्रवू लागले. त्याचे हे कृत्य पाहून हळहळत पक्षिराज उद्गारला, ''मानवा! शेवटी तूही आपल्या मूळ वृत्तीलाच जागलास! रक्षण कर्त्या पक्षिराजाच्या भार्येवर तू खड्ग प्रहार केलास की रे!''

क्रोधित झालेला तेजपाल म्हणाला,''क्षुद्र गरुडांनो मजसारख्या सामर्थ्यसंपन्न मित्राशी तुम्ही निष्कारण वैर पत्करिले आहे. सांप्रतच्या घटनेशी तुमचा दूरान्वयानेही संबंध नाही. सुवर्ण प्रदेश विधात्याने तुम्हाला वंशपरंपरेने दिलेला मक्ता नव्हे.तो प्रदेश बेचिराख झाला तर स्वसामर्थ्यांने तुम्ही त्या प्रदेशाच्या पलिकडे जाऊन आपले साम्राज्य स्थापू शकता. सामर्थ्यांच्या पोकळ कल्पनांच्या आहारी जाऊन माझ्याकडून मृत्यू पत्करण्यापेक्षा येथून दूर जाऊन आपला जीव वाचविण्याचा बहुमोल सल्ला, क्षूद्र गरुडा तू आपल्या बांधवांना दे आणि तू स्वतःसुद्धा तोच मार्ग स्वीकार!''

आता चारही गरुडांनी त्याला चहू अंगांनी वेढले. त्याना खड्ग भयाने दूर ठेवताना तेजपाल पुरता मेटाकुटीला आला. त्याचे चापल्य क्षणाक्षणाला क्षीण होत चालले. एका मोक्याच्या क्षणी पाठीमागून झेपावलेल्या गरुडाने त्याच्या दोन स्कंधाच्या मध्ये चोचीने प्रहार करताच किंकाळी फोडून पाठीमागे मोहरा वळवित असता त्याच्या हातीचे खड्ग गळून पडले. तत्क्षणी दुसऱ्या गरुडाने त्याच्या खांद्यात नखे रुतवीत त्याच्या टाळूत चोच खुपसली. प्राणघातक किंकाळी फोडीत रक्ताने न्हालेला तेजपाल जमिनीवर पालथा पडला.आता पक्षिराजाची मादी पुढे सरसावली. आपल्या बळकट पंजानी त्याच्या बाहूवर मजबूत पकड घेत तीने त्याचा देह उताणा केला. मग त्याच्या उदरात तीक्ष्ण नखे खुपशीत तीने त्याच्या हृदयापर्यंत खोलवर चंचूप्रहार करताच क्षीण आरोळी मारुन तेजपालचा आत्मा देहपंजरा बाहेर पडला. चेतनाहीन लोळा गोळा झालेल्या त्याच्या शरीरावर क्रोधाविष्ट मादीने पुनःपुन चोचीने प्रहार करुन त्याचा देह छिन्न विछिन्न झाल्यावर ती दूर झाली.

पक्षिराजाभोवती घिरट्या मारीत चारही गरुड म्हणाले, ‘‘मित्रा,आता तुझी पाळी! स्वतःला मनुष्यवाणी अवगत असल्याची भारी घमेंड होती ना तुला?ती मनुष्य वाणी तुला न येती तर आजचा हाअनर्थ टळला असता अन् स्वबांधवाला त्याच्या दुर्वर्तनाबद्दल वधदंड देण्याची नामुष्कीची वेळही आम्हावर आली नसती. आता आपले उत्तरदायित्व स्वीकारुन तू वध दंड भोगण्यास सिद्ध हो!’’ खिन्न मनाने पक्षिराज उत्तरला, ‘‘मित्रांनो! माझे कृत्य मान्य करुन तुम्ही सांगितलेला दंड भोगावयास मी खुशीने तयार आहे.मात्र ज्या उच्चपक्षीकुळात मी जन्मलो त्या कुळीच्या उच्च धर्मानुसार तुम्हाकडून हीन-दीन होत मृत्यू पत्करण्यास मी कचरत आहे. जे अग्निकुंड भडकण्यास मी कारणीभूत ठरतो त्यात स्वेच्छेने आत्मसमर्पण करण्याची मुभा तुम्ही मला द्यावी!’’ पक्षिराजाचे हे कथन ऐकून चारही गरुडांनी माना डोलावल्या. त्याची भार्या म्हणाली, ‘‘नाही तरी तुझे कृत्य एवढे निंद्य अन् गरुड कुल कलंकित करणारे आहे की, तुजसारख्या कुलघ्नाच्या रुधिरात आमच्या चोची अपवित्रच झाल्या असत्या!’’ पत्नीचा मर्मघातक वाक्‌बाण जिव्हारी लागलेल्या पक्षिराजाने आपले पंख पसरले अन् वनराजीचे दहन करणाऱ्या वडवानलाच्या दिशेने तो  झेपावला.

# २. आत्मनस्तु कामायः

लाक्षागृहातून सुरक्षित बाहेर पडल्यावर पांडवांनी ब्राह्मणवेष धारण केला. भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत मत्स्य, पांचाल, त्रिगर्त आदि अनेक देश हिंडत ते एकचक्रा नगरीत एका एका ब्राह्मण कुटुंबात राहिले. वेशांतर केल्यामुळे कुणीही त्यांना ओळखू शकले नाही.तेथे एका ब्राह्मणाकडून पांचाल देशात द्रुपदाची कन्या ‘कृष्णा’ हिचे स्वयंवर आयोजित केल्याचे वृत्त त्यांना समजले.यज्ञकुंडातून प्राप्त झालेली, दैदीप्यमान अंगकांती असलेली कृष्णा ‘पण’ जिंकून मिळवण्यासाठी पांडव एकचक्रा नगरीबाहेर पडले. कुंतीसह अहोरात्र मार्गक्रमण करीत करीत ते पांचाल देशात पोहोचले. तेथे एका कुंभाराकडे कुलाल शाळेत त्यांनी मुक्काम केला. स्वयंवराचा दिवस येईपर्यंत भिक्षा मागण्याच्या निमित्ताने त्यांनी संपूर्ण कुसुमावती नगरीचे निरीक्षण केले.

स्वयंवराचा दिवस उजाडला.राजधानीच्या ईशान्येला भव्य मंडप उभारला होता.सारामंडप देशोदेशीचे राजे, क्षत्रियवीर यांनी फुलून गेला. दुर्योधन,दुःशासनादि बंधु, कर्ण, अश्वत्थामा, शकुनी, सौबल, विराट,भोज, सुकेतु, सहदेव, भगदत्त, चेकित, पौंड्रक, शल्य, चित्रायुध, भूरिश्रवा, दृढधन्वा, जरासंध, सुषेण, शिशुपाल, सोमदत्त हे वीर मंडपैंत जमले.पांडव ब्रह्मवृंदामध्ये आसनस्थ झाले. द्वारकेहून श्रीकृष्ण, बलरामही स्वयंवर पाहण्यासाठी आलेले होते. मंगल वाद्यांच्या घोषात स्वयंवराची घटिका भरत आली. श्वेतवर्णी कटिवस्त्र, कंचुकी आणि उत्तरीय परिधान केलेली सुकेशिनी कृष्णा सखीसह मंडपात आली.

महाराजद्रुपद सिंहासनारूढ झाले.उपस्थितांचे स्वागत करून धृष्टद्युम्न स्वयंवरातील ‘पण’ कथन करू लागला.मंडपाच्या एका बाजूस ‘वैहायस’ नामक यंत्र उभारले असून त्याजवळ एक अवजड धनुष्य ठेविले होते. गरागरा फिरणाऱ्या वैहायसाच्या छिद्रातून बाण मारून यंत्रस्थित मत्स्याचा भेद करावयाचा होता. मात्र हा लक्ष्यभेद जलपात्रातील प्रतिबिंब पाहून करण्याची अट होती. हा अवघड ‘पण’ ऐकताच कित्येक वीर गलितगात्र झाले. नंतर धृष्टद्युम्नाने कृष्णेसह वीरमंडलात फिरून आपल्या भगिनीला उपस्थित राजांचा परिचय करुन दिला. जवळून दिसलेले तिचे लावण्य आणि नीलकमलाप्रमाणे दरवळणारा तिचा अंग गंध यामुळे उपस्थितांमध्ये चैतन्य आले. कृष्णेच्या हातातील कमलपुष्प वेष्टीत सुवर्णाची वरमाला आपल्या गळ्यात पडावी अशी तीव्र इच्छा उपस्थित वीरांच्या मनात जागृत झाली.

धृष्टद्युम्नाने संकेत करताच वैहायस गरागरा फिरू लागले. मंडपातील एकएक वीर पुढे येऊन शरसंधान करू लागले.काही वीरांना त्या अवजड धनुष्याला प्रत्यंचाच चढविणे जमेना.तर काही जणांनी सोडलेले बाण वेडेवाकडे जात निष्फळ ठरले.त्यांच्या फजितीमुळे उपस्थितांचे मनरंजन झाले.मग धनुर्धर कर्ण पुढे सरसावला. त्याला पहाताच, ‘मी सूतपुत्राला वरणार नाही.’ असे उद्गार कृष्णेने काढले. अपमानित कर्ण माघारी वळला.आता मात्र कोणीही वीर पुढे येईना. ‘या भूतलावर एकही धनुर्धर शिल्लक नाही का? कृष्णेचे स्वयंवर व्यर्थच ठरणार..!’ अशी गर्जना धृष्टद्युम्न करु लागला.हे ऐकताच युधिष्ठिराने अर्जुनाला संकेत केला.ब्राह्मणवेषधारी अर्जुन वैहायसाच्या दिशेने जाऊ लागला.तो वैहायसाकडेजात असता

कृष्णेने सखीकडे साभिप्राय कटाक्ष टाकला.

वैहायसाखाली असलेल्या धनुष्याला अर्जुनाने प्रदक्षिणा घालून नमस्कार केला.भगवान रुद्र आणि श्रीकृष्णाचे मनात स्तवन केले. मग धनुष्यावर प्रत्यंचा चढवून भूमीवरील जलपात्रात पाहत त्याने यंत्रस्थित मत्स्याचा वेध घेतला.त्रिभुवन सुंदरी कृष्णा सलज्ज पुढे झाली. तिने हातातील वरमाला त्या ब्राह्मण वीराच्या गळ्यात घातली. त्याच वेळी भीमाला मंडपात ठेवून नकुल, सहदेवांसह युधिष्ठीर भिक्षा मागण्यासाठी मंडपाबाहेर पडला. कृष्णेची प्राप्ती एका ब्राह्मणाला झाली या गोष्टीचे  क्षत्रिय वीरांना वैषम्य वाटले. 'प्रिय बंधो युधिष्ठीरा, स्वयंवर मंडपस्थित क्षत्रिय कुलोत्पन्न वीर धनुर्धरांना न जमणारा अत्यंत अवघड लक्ष्यभेद करुन मी माझे धनुर्विद्येतील श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. माझ्या या कृत्यामुळे पराक्रमी भीष्मांशी असलेले नाते सार्थ ठरले आहे. एवढेच नव्हे तर माझ्या या वीरोचित कृत्यामुळे कुरुंच्या इतिहासाला एक वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे. प्रभू रामचंद्रांनंतर श्रेष्ठ धनुर्धर म्हणून द्वापरयुगामध्ये माझे नाव घेतले जाईल असा मला साभिमान विश्वास आहे. तथापि या माझ्या पराक्रमाला त्यागाचे परिमाण लावणे अस्थायी होत आहे...''

किंचित विराम घेऊन कृष्णेकडे कटाक्ष टाकून युधिष्ठीर पुढे म्हणाला,''पण उद्या जेव्हा स्वयंवरात प्राप्त केलेल्या या कृष्णेचे दान तू ज्येष्ठ भ्रात्याला देशील तेव्हा अलौकिक त्यागाचे एक उदाहरण म्हणून अखिल विश्वात तुझ्या कृत्याचा कीर्ती सौरभ निश्चितच पसरेल. भीष्मांनी काशिराजाच्या तीन कन्यांचे हरण करुन त्याचे दान विचित्रवीर्याला केले. त्याहीपेक्षा उच्च श्रेणीतले परिमाण तुझ्या

अकृत्रिम त्यागाला लावावे लागेल. कारण भीष्म प्रतिज्ञाबद्ध असल्याने त्यांच्या लेखी स्त्री ही भोगशून्य, त्याज्य वस्तु आहे.उलट तू आज ना उद्या मी निवडलेल्या सुंदरीचे पाणीग्रहण करुन गृहस्थधर्मात पदार्पण करणार आहेस.म्हणून तुझ्या त्यागाचा दर्जा श्रेष्ठ ठरणार आहे.तुझे हे कृत्य भरताच्या बंधुस्नेहाशी मिळते जुळते आहे.'



युधिष्ठीराच्या कथनाचा मतितार्थ ध्यानी येताच अर्जुन गडबडला. नखशिखांत हादरून तो कंपित स्वरात म्हणाला,''बंधु युधिष्ठीरा...!

कृष्णेच्या सौंदर्याने स्थलकालाचे भान राहू नये हे समर्थनीय आहे. कृष्णेने माझ्या गळ्यात वरमाला घालताच हताश नजरेने माझ्याकडे पाहत तू मंडप त्याग केलास त्या तुझी मनःस्थिती मी समजू शकतो. तात्पर्य, तुझी लालसा जागृत व्हावी हे निसर्गसुलभच आहे. त्याबद्दल मी तुला दोषही देणार नाही. युधिष्ठीरा भानावर ये...! सौंदर्याच्या क्षणिक मोहाने तुझ्यासारख्या ज्येष्ठ भ्रात्यानेच जर असे ताळतंत्र सोडले तर मग कनिष्ठांनी कोणाचा आदर्श ठेवायचा बरे?''

अर्जुनाच्या उत्तराने यत्किंचितही विचलित न होता निग्रही स्वरात युधिष्ठीर म्हणाला, ''अर्जुना, तुझे कथन खरेतर तुला स्वतःलाच अधिक लागू पडणारे आहे. आम्हा पाचही बंधूंमध्ये ज्येष्ठता क्रम डावलून शरसंधान करण्याची प्रथम संधी मी तुला दिली म्हणूनही कदाचित तू असा हुरळून गेला असशील. कदाचित कामिनीच्या सौदर्यासक्तीने तुझी सारासार विवेकबुध्दी लोप पावली असेल. कदाचित मंडपस्थित वीरांमध्ये एकट्या तुलाच यशप्राप्ती झाली म्हणूनही तुला उन्माद झाला असेल. पण तुझा हा धर्मनिष्ठ संयमी बंधू जिवंत असताना, त्याची सद्सद्विवेक बुध्दी, नीरक्षीर न्यायाने योग्य निर्णय घेण्याची त्याची समदृष्टी पूर्ण शाबूत असताना तुझे पतन तो कसे बरे होऊ देईल? पवित्र आर्य संस्कृतीत कुटुंब व्यवस्थेमध्ये कोणते आचरण संकेत आणि वर्तनदंड पाळणे अनिवार्य असते याचे ज्ञान तुला नसेल तर ते समजावून सांगणे माझे आद्य कर्तव्यच नव्हे काय?

फाल्गुना,ज्येष्ठ भ्राता अविवाहित असता कनिष्ठाला विवाह करण्याचा अधिकार नाही.मग माता कुंती तुला विवाह करायची अनुमती कशी बरे देईल?आणि विवाह न करता या सोज्वळ कृष्णेला

तू भोगदासीचा दर्जा दिलास तर तिचा पिता द्रुपद तरी त्या गोष्टीला कशी काय संमत्ती देईल?'' युधिष्ठीराचा हा युक्तिवाद बिनतोड असला तरी त्याचे खंडन कसे करावे याचे चिंतन अर्जुनाने केले होते.''प्रिय बंधो! तुझे मत मी कदाचित मान्यही केले असते. पण त्याला छेद जाणारे उदाहरण अलिकडेच घडलेले आहे.भीमसेन तुझ्या पेक्षा कनिष्ठ असूनही प्रत्यक्ष कुंती मातेनेच त्याला हिडिंबेचे पाणीग्रहण करण्याची अनुमती दिली.तुला याचे विस्मरण झाले असावे. 'कामातुराणां न भयं न लज्जा' या वचनाची सत्यता मला आता पटू लागली आहे.वासनेच्या आहारी जाऊन पवित्र क्षात्रधर्माची पायमल्ली तुझ्यासारखा धर्मनिष्ठ करु धजावेल हे मला स्वप्नातही खरेवाटले नसते. मी मत्स्यभेद करुन जिंकलेल्या कृष्णेवर माझा पूर्ण अधिकार असताना अन्य कोणी तिची अभिलाषा करावी हा अक्षम्य आणि दंडनीय अपराध आहे.

ज्येष्ठताक्रम डावलून तू मला शरसंधानाची संधी दिलीस, या मध्ये तुझे योजना चातुर्य जरुर आहे.कारण तू स्वतः आणि भीमसेन.....तुम्ही स्वतःला धनुर्धर समजत असलात तरी वैहायस स्थित मत्स्यभेद करणे तुमच्या कुवती बाहेरचे आहे.पण जिंकून मी कृष्णेची प्राप्ती केली आहे. त्यामुळे तू दिलेले भिष्मांचे उदाहरण माझ्या संदर्भात गैरलागू ठरते. त्यानी काशी राजाच्या कन्यांची प्राप्ती अपहरण करुन केली होती. 'पण' जिंकून नव्हे, हे ही तू ध्यानात ठेव. त्यातही त्या तिघीं पैकी अंबेने आपण शाल्व राजाला मनाने वरले आहे, असे सांगताच भीष्मानी तिला शल्वाकडे रवाना केले ही बाब लक्षणीय आहे.तेव्हा कितीही मधूर भाषण करुन माझ्या मनात कालत्रयीही येणार नाही असा विचार तू माझ्यावर लादू पाहशील तर

ती गोष्ट मी मान्य करणार नाही.’’

अर्जुनाच्या कथनामुळे व्यथित होत्साता युधिष्ठीर उद्‌गारला, ‘‘फाल्गुना,माझ्या कथनातील मर्म दुर्लक्षित करुन केवळ स्वतःच्या कामशमनार्थ तू जो वितंडवाद घालीत आहेस तो तुला खचितच भूषणावह नाही.ज्येष्ठांनी केलेल्या सूचनांचे अंतर्मुख होऊन चिंतन करणे हे कनिष्ठांचे परम कर्तव्य आहे. गुरुनी केलेल्या या उपदेशाचे तुला विस्मरण झाले का? ज्या क्षूद्र संकुचित हेतूने तू हे घातकी औधत्य करीत आहेस ते तर धर्माज्ञेनुसार दंडनीय आहे. शास्त्राप्रमाणे ज्येष्ठ भ्राता हा गुरु आहे, पिता आहे! त्याच्या कथनाविषयी शंका घेणे हे महापातक असून त्याच्या परिमार्जनार्थ परखड प्रायश्चिते धर्मशास्त्राने वर्णिली आहेत. अर्जुना, तरीही तुझे अपराध पोटात घालून तुझ्या मनात उत्पन्न झालेली किल्मिषे आधी दूर करुन मगच मी तुला सौम्य प्रायश्चित सुचवीन. हा नरदेह म्हणजे अस्थि, मांस, चर्माचे नश्वर गाठोडे आहे. विषय सेवनाची उर्मी प्रसंगी सद्‌गुणांचाही व्यय करते हे ध्यानात घेऊन तू कामिनीचा नाद सोडावास! कारण ती पुरुषश्रेष्ठाच्या पतनाचे कारण असते ही दिव्य वाणी आहे!!

या धर्मज्ञ युधिष्ठीराला भीम -हिडिंबा संबंधांचे उदाहरण तू द्यावेस हे अज्ञान आहे. अर्जुना, हिडिंबा राक्षसी असल्याने मानवी वर्तन संकेत तिला लागू नाहीत याचे ज्ञान तुला नाही प्राप्त केलेल्या वस्तूचा भोग घेणे हाच क्षात्रधर्म असल्याचे संदर्भ तुला  कोणत्या ग्रंथात सापडले? क्षणिक काम पूर्तीच्या आहारी जाऊन दंभ मदादि रिपूनी ग्रासलेल्याअर्जुना...तुझेऔधत्य सहजासहजी दुर्लक्षिण्याजोगे नाही! तरीही हा दयाघन युधिष्ठीर तुझ्या अंगी असलेल्या शरसंधान कौशल्यामुळे पुनःपुन्हा द्रवत आहे. ज्या कृष्णेच्या मोहापायी माझ्याशी

आदराने आचरण करण्याच्या व्रताचा तू भंग केलास, त्या तुझ्या पतनाला कारण असलेली कृष्णा प्रायश्चित स्वरुप म्हणून तू मला अर्पण करावीस असा माझा सल्ला राहील.''

हे कथन ऐकून अर्जुन तात्काळ कृष्णेचे दान युधिष्ठीराला देईल की काय....? या भीतीने भीमाला ग्रासले.अर्जुनाने कथनाच्या ओघात शरसंधान कौशल्यात त्याला तुच्छ लेखले त्यावेळीच त्याचे बाहू स्फुरण पावू लागले.तथापि उपस्थित झालेल्या कलहामध्ये त्याचेही हेतू गुंतले होते. अशा वेळी बाहुबला पेक्षा बुद्धिचातुर्याची गरज आहे हे ही त्याच्या ध्यानात आले. अर्जुन आणि युधिष्ठीर दोघांनाही निरुत्तर करुन आपले हक्क सिद्ध करण्यासाठी तो प्रभावी शब्द योजना जुळवू लागला.परंतु युधिष्ठीराने अंतिम निर्णय उद्‌घोषित करताच तो भानावर आला.आता विचार करण्यात जास्त अवधि घालविणे धोक्याचे आहे असे वाटून भीम बोलू लागला.

''प्रिय युधिष्ठीरा... तुझी आनुज्ञा असेल तर प्रस्तुत विषयात काही मतप्रदर्शन करावे असा माझा मनोदय आहे.'' भीमाचा विनय पाहता तो आपलेच समर्थन करील या अपेक्षेने युधिष्ठीराने अनुमती दर्शविली.''प्रिय बंधुनो, वक्तृत्व हा खरे तर माझा प्रांत नव्हेच! वादविवाद म्हणजे महाजटिल कार्य. प्रतिस्पर्ध्याला भिडून त्याला चांगले रगडून काढावे किंवा गदेच्या प्रहारांनी त्याचे चूर्ण चूर्ण करावे, हे माझे आवडते कार्य. बंधूनो माझे कथन सुरु असता कुणीही मध्येच व्यत्यय आणून माझा ओघ खंडित करु नये.त्याचप्रमाणे एखादा शब्द किंवा वाक्यप्रयोग चुकला तर अर्थ समजून घ्यावा.'' यावर चारही बंधूनी स्मित करीत माना डोलावल्या.

‘‘हं... तर अर्जुनाने प्रायश्चित म्हणून ही कृष्णा युधिष्ठीराला देण्याची घाई करु नये. तिचा त्याग करावयाचा या कल्पनेनेच त्याचे हृदय किती व्यथित झालेले आहे हे स्पष्ट दिसून येत आहे. हा निर्णय त्याने सावध चित्ताने घ्यावा. आता मी थेट मुद्द्यालाच हात घालतो! स्वयंवरात भाग घेण्याची प्रथम संधी युधिष्ठीराने अर्जुनाला दिली. माझे जेष्ठत्व त्याने डावलले, हे समर्थनीय नाही! आता युधिष्ठीर म्हणेल की, मी स्वतः तरी ती संधी प्राथम्याने कुठे घेतली? तर त्यावरही माझे उत्तर आहेच.तो स्वतः ज्येष्ठ असल्यामुळे त्याला ती संधी घेता आली असती. पण तसे न करता त्याने परभारे अर्जुनाला संकेत केला.याचा एकच अर्थ निष्पन्न होतो. स्पर्धा,बलप्रदर्शन हा युधिष्ठीराचा प्रांतच नाही !

स्वतः धर्माचरण करायचे अन् इतरांना तसा उपदेश करायचा. हे ऽ हे...म्हणजे निर्बलाला शोभणारे कौशल्य त्याला युद्धापेक्षाही छान जमते.म्हणजे स्वयंवरात भाग घेतला नाही तर कृष्णेची अभिलाषाही नाही! याबद्दल आता त्याने कोणतेही भाष्य करु नये. उलट अर्जुनाला कौशल्य दाखवायची संधी आयतीच मिळाली. त्यात त्याने समाधान मानावे. संधी मिळून वर आणि कृष्णेचीही इच्छा अर्जुनाने करावी म्हणजे अतीच झाले. हे ऽहे म्हणजे एका कार्याची दोन-दोन श्रेये घेण्यासारखे झाले. ते काही नाही. त्याला संधी मिळाली आहे. आता कृष्णा मिळणार नाही. फारतर तिच्या प्राप्तीसाठी आपण पुन्हा एकदा ‘पण’ लावूया.हा ‘पण’गदायुद्धाचा असावा.माझी तयारी आहे.’’

आपले बोलणे अद्याप संपलेले नाही.असा संकेत करीत त्याने नेत्र बंद केले.‘‘आता दुसरा मुद्दा! म्हणजे-अर्जुनाने म्हटले की, मी

हिडिंबेचे पाणिग्रहण ज्येष्ठत्व डावलून केले.पण माझा बलशाली देह पाहून स्वतःहिडिंबा असूरवृत्तीनुसार माझ्यावर अनुरक्त झाली. तिच्या प्राप्तीसाठी काही'पण' नव्हता.माझे सगळे बंधू स्त्री सुखापासून वंचित असता त्याची प्राप्ती मला एकट्याला व्हावी इतका मी स्वार्थी नाही.पण केवळ कुंती मातेनेच मला हिडिंबेची इच्छा तृप्त कर अशी अनुज्ञा दिली म्हणून... त्यावेळी ज्येष्ठ मानाचा मुद्दा युधिष्ठीराने उपस्थित केला नाही.तुम्ही इतरांनीही त्यावेळी मौन धरलेत.मग तसेच आताही करा अन् कृष्णेची प्राप्ती मलाच होऊ द्या कशी!

बंधुनो! कृष्णेच्या स्वयंवरात दुर्योधन, शिशुपाल, जरासंध, कर्ण,शल्य असे नाठाळ दुर्जन दिसले. तेव्हा पणाची वाट न पाहताच कृष्णेचे बळाने अपहरण करण्याची अनुज्ञा मी युधिष्ठीराकडे मागितली होती. वास्तविक भीष्मांचे उदाहरण पाहता तशी संधी मला मिळणे आवश्यक होते. माझ्या कृत्याने कुरुंच्या लौकिकात मोलाची भर पडली असती पण युधिष्ठीराने परवानगी नाकारली. हे कृत्य मी स्व बलावर करणार होतो.काही आपत्ती आली असती तर निवारण करायला मी समर्थ होतो.माझ्या बलाची पूर्ण कल्पना युधिष्ठीराला आहे. पण त्याने संधी दिली नाही.मग कर्ण मत्स्यभेद करायला उठला.त्यावेळी माझ्या इच्छेचा मी पुनःश्च उच्चार केला. पुन्हा त्याने नकोंच म्हटले. स्थल काल परिणामांचे भान हरपलेल्या, जाण नसलेल्या या... या... युधिष्ठीराने मला नको म्हटले. त्याचे आदेश न जुमानता मी माझी इच्छा पूर्ण करु शकलो असतो आणि मागाहून माझ्या कृतीचा पश्चाताप मला व्यक्त करता आला असता पण..... त्यावेळी काही ही गोष्ट मला सुचली नाही. पण समजा सुचतीच तर...? त्याबद्दल युधिष्ठीराने माझ्याकडे कृष्णेची मागणी केली

असती तर...? मी काही अर्जुनाप्रमाणे वितंडवाद घातलानसता.दिली असती कृष्णा त्याला. तर मग बंधुनो! त्याने मला शरसंधानाची संधी तरी कां बरे दिली नाही? कोणी सांगावे कृष्णेच्या प्राप्तीसाठी,तीव्र इच्छेमुळे कदाचित मी अचूक शरसंधान केलेही असते.वेळी मत्स्यभेद न होता तरीही क्रोधायमान होऊन या कृष्णेचे तिच्या गौरांगी सखीसह हरण तरी मी नक्कीच केले असते! प्रतिष्ठेच्या अशा निर्णायिक क्षणी मला भलतेच अवसान येते. माझे धैर्य गळत नाही अन् मागाहून काहीतरी धर्मसूत्र घोळवून मी त्याचे निरसन सुद्धा करायला जात नाही. असले कर्म या युधिष्ठीरालाच शोभते!

बंधुनो,जरा विचार करा. कृष्णेने कर्णाचा अपमान करुन त्याला शरसंधान करु दिले नाही. ते ठीकच झाले. पण क्षणभर गृहित धरा, जर का त्या दुष्ट कर्णाने शरसंधान केले असते तर? तर आज आम्हा पांडवांमध्ये कृष्णेवरुन वाद होण्याचा प्रसंगच उद्भवला नसता...! आता मी काही त्या दुष्टाला ही कृष्णा सुखासुखी पचू दिली नसती. कर्णाच्या गळ्यात वरमाला घालण्यापूर्वीच ही कृष्णा या बलदंड भीमसेनाच्या स्कंधी आरुढ होऊन,गौरांगी सखीसह मंडपाबाहेर अदृश्य झाली असती.कृष्णेची प्राप्ती करण्याचे माझे सगळे मार्ग याऽया युधिष्ठीरामुळे बंद झाले. आता तुम्हीच सांगा, या कृष्णेवर खरा अधिकार कोणाचा...? तर माझाच! अर्जुनाने वातहायस यंत्रामधील मीनाचा भेद केला. कृष्णेने त्याच्या गळ्यात वरमाला टाकली. म्हणून काही फारसे बिघडले नाही. पण मंडपातील मत्सरी राजांनी गदारोळ घातला. तरी तो पाहूनही अर्जुनाच्या सहाय्यार्थ न थांबता हाऽऽहा युधिष्ठीर....नकुल,सहदेवासह मंडपाबाहेर गेला.

हा भिक्षा मागायला गेला अन् इकडे मत्सरी राजसमुहाने अर्जुनावर हल्ला केला. एका ब्राह्मणाने कृष्णा मिळवावी याचे वैषम्य वाटले ना त्यांना...! यावेळी जर का मी त्याच्या सहाय्याला गेलो नसतो तर...? तर सगळ्यांचा समाचार अर्जुनाने कसा काय घेतला असता? विशेषतः शल्यासारख्या योद्ध्याचे आव्हान स्विकारुन हाऽऽहा धनुर्धर त्याच्याशी द्वंद्व कसले कर्माचे खेळणार? भले त्याला आपल्या धनुर्विद्येचा कितीही अहंकार असू द्या...! मी नसतो तर कदाचित अर्जुन युद्धात गुंतलेला पाहून शिशुपाल,जरासंध यासारख्या अधमांनी तिला पळवूनही नेले असते. आज केवळ माझ्यामुळे अर्जुन आणि कृष्णा दिसत आहेत. बंधुनो... माझे पाचही मुद्दे किती बिनतोड आहेत पहा बरे! आता या कृष्णेवर युधिष्ठीर आणि अर्जुन या दोघांपेक्षाही माझाच अधिकार प्राबल्याने सिद्ध झाला आहे. आता जर कोणाची काही शंका असेल, संदेह असेल तर स्पष्ट सांगावे. मी त्याचे निर्मूलन करीन. अर्जुनाने त्याचा निर्णय जाहीर करण्यासाठी मी त्याला योग्य अवधीही देण्यास तयार आहे.''

भीमसेनाचे प्रदीर्घ कथन पूर्ण होत असता सचिन्त मुद्रेने कृष्णा बोलू लागली,''विप्र श्रेष्ठहो ...तुमचे कथन ऐकून मी संभ्रमित झाले आहे.काही गोष्टी स्पष्ट होण्यासाठी मी हे औधत्य करु धजावले, तरी मला क्षमा असावी. तुमची संख्या, तुमची नावे आणि भीमसेनांच्या वक्तव्यातील संदर्भ... हे ध्यानात घेता तुम्ही ब्राह्मण आहात की ब्राह्मण वेष केलेले पांडव आहात हे कृपा करुन...''तिचे कथन खंडित करीत उताविळीने भीम म्हणाला,''कृष्णे आम्ही पांडवच आहोत.लाक्षागृह जळत असता मातेसह आम्ही भुयारी मार्गाने निसटलो अन् ब्राह्मण वेशामध्ये देशाटन करीत आहोत.मला या

सोंगाचा फारच कंटाळा येऊ लागला आहे.तुझा भावी पती...बलदंड भीम म्हणजे मीच. अन् तुला पण जिंकून प्राप्त करणारा अर्जुन,जडजंबाल दुर्बोध शास्त्रार्थ सांगणारा हा ज्येष्ठ पंडुपुत्र युधिष्ठीर अन् हे कनिष्ठ बंधू,माद्री मातेचे पुत्र नकुल सहदेव.''हे ऐकत असता मधूर स्मित करीत कृष्णा उद्गारली, ''कृपया मला थोडे मनोगत स्पष्ट करण्याची अनुमती असावी.'' त्यावर मान डोलावीत युधिष्ठीराने संमती दिली.

तुम्ही जिवंत आहात हे ऐकून, विशेषतः लक्ष्यभेद करुन मला प्राप्त करुन घेणारा वीर, ज्याला मी पूर्वीच मनाने वरले होते, श्रेष्ठधनुर्धर अर्जुन आहे हे कळताच मला जीवनाचे जणू श्रेय गवसले आहे. स्वयंवरामध्ये मत्स्यभेदाचा पण ठेवण्याची चतूर योजना अर्जुनाला आव्हान देऊन प्रगट व्हायला लागावे याच एकमेव हेतूने मी केली होती. लाक्षागृह जळले तरी श्रीकृष्णांसारखा पाठीराखा तुमचे खचितच रक्षण करील याची खात्री असल्याने पांडव लाक्षागृहात भस्मसात झाले या वदन्तेवर माझा विश्वास नव्हताच! आपले शरसंधानाचे कौशल्य सिध्द करण्यासाठी अर्जुन नक्कीच येईल असे मला वाटले होते

सखी समवेत स्वयंवर स्थानी प्रवेश केल्यावर उपस्थितांचा परिचय धृष्टद्युम्नाने मला करुन दिला. मंडपातील राजमंडलामध्ये अर्जुन नाही हे लक्षात येताच मला आत्यंतिक नैराश्य आले. त्या उद्विग्न मनःस्थितीत लाक्षागृहामध्ये पांडवांचा अंत झाला ही लोक वदंता खरीच असावी असे माझ्या मनाने घेतले. त्याच अवस्थेमध्ये उपस्थित जरठ, तेजहीन वीरांच्या तुलनेत ब्रह्मवृंदातून उभा राहिलेला तरुण मला श्रेष्ठ वाटला.''

युधिष्ठीर यत्किंचितही विचलित न होता निश्चयी स्वरात म्हणाला, ‘‘कृष्णे... तुझ्या कथनामुळे तर तू अर्जुनावरचा हक्क स्वहस्तेच गमावला आहेस. तुझे विचारसुद्धा दुटप्पी आहेत. तू खरोखर अर्जुनावर अनुरक्त असतीस तर तो स्वयंवरात प्रकट झाला नाही हे पाहिल्यावर तू अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला असतास.पण तसे न करता प्राप्त परिस्थितीमध्ये ब्राह्मण कुमाराचा स्वीकार करण्याइतकी तुझी चंचल वृत्ती मात्र खचितच प्रत्ययाला यावी.’’

‘‘कृष्णेच्या कथनातून स्वतःला सोईस्करअसा अर्थ युधिष्ठीराने काढला असला तरी तिच्या कथनातला मतितार्थ त्याने बुद्ध्या दुर्लक्षिला आहे. पती म्हणून केवळ माझाच स्वीकार करण्याचा तिचा निर्धार होता. तोही एवढा दृढ की,कोणत्याही ज्परिस्थितीत माझी प्राप्ती निर्वेधपणे व्हावी अशी पूर्ण खबरदारी तिने घेतली होती. प्राप्त परिस्थितीत तडजोड करण्याची तिची वृत्तीही स्त्रीसुलभच आहे.परंतु केवळ स्वतःच्या हेतूपूर्ती साठी कृष्णेची वृत्ती चंचल आहे असा तर्कदुष्ट, विपर्यस्त निष्कर्ष युधिष्ठीरा तू काढू पाहत आहेस. ही बाब तुझ्या लौकिकाला बाधा आणणारी आहे.’ असे प्रतिपादन अर्जुनाने केले. त्यावर कृष्णा म्हणाली, ‘‘मी केवळ अर्जुनावर अनुरक्त आहे आणि माझे स्वामित्व अर्जुनाकडे आहे. ही गोष्ट त्यानेही मान्य केली आहे. माझी उत्पत्ती यज्ञकुंडातून झालेली असून माझ्या निष्ठा अग्नि जिव्हां सारख्या ज्वलंत आहेत. तेव्हा अर्जुनाखेरीज कोणत्याही पुरुषाने माझ्या प्राप्तीचा हव्यास धरणे अयोग्य अनैतिक ठरेल.’’

युधिष्ठीर म्हणाला,‘‘कृष्णे, माणसाचे विचार हे जलाशयावर उठणाऱ्या तरंगांप्रमाणे क्षणजीवी असतात. त्याच्या उक्ती आणि कृती

यामध्ये जमीन अस्मानाचे अंतर असते. केवळ अनुरक्तिच्या निकषावर जन्माची नाती जुळत नसतात. कामांध मनोवृत्तीच्या माणसांनी आपल्या वृत्ती दडविण्यासाठी करावयाचा तो एक भ्रामक अर्थहीन शब्दप्रयोग आहे, असे तुझ्या उदाहरणावरुन मला आता वाटू लागले आहे.अर्जुनाची आशा मावळल्यावर मंडपस्थित कोणा भिन्नवर्णियाशी जन्माचे नाते जोडू पाहणाऱ्या तुझ्या निष्ठा किती ज्वलंत आहेत हे मी पूर्णपणे ओळखले आहे. तुझ्यासारख्या धूर्त आणि चंचल स्त्रीला काबूत ठेवण्यासाठीच माझ्यासारख्या धर्मज्ञ,संयमी पुरुषोत्तमाची निर्मिती बह्म्याने केली असावी. हे कार्य माझ्या निरागस बंधूंच्या कुवतीबाहेरचे आहे. म्हणून बंधू प्रेमापोटी त्यांचा संभाव्य दुःखभार स्वतःच्या माथ्यावर घेण्यासाठी मला स्वतःलाच बद्धपरिकर होण्यावाचून गत्यंतर नाही !''

इतका वेळ सर्वांचे कथन शांतचित्ताने श्रवण करणारा नकुल पुढे सरला अन् मृदू स्वरात उद्गारला, ''थांब जेष्ठ बंधो ! भातृप्रेमा पोटी निरंतर चिंतामग्न असणाऱ्या युधिष्ठीरा! तुझी  अतिव करुणा मला येत आहे. तुझ्या कथनातून ओसंडणारा स्नेहभाव भीमार्जुनांच्या पुरता लक्षात आला असेल असे त्यांच्या मुद्रेवरुन प्रत्ययाय येत नाही. म्हणूनच केवळ मला तोंड उघडणे भाग पडले. युधिष्ठीरा, कुंतीपुत्रांमध्ये तू ज्येष्ठ तर माद्रीपुत्रांमध्ये मी ज्येष्ठ! तात्पर्य तुझ्या व्यथा इतर तिघांपेक्षाही मलाच तीव्रतेने जाणवू शकतात. आतापर्यंत झालेल्या चर्चेतून भीमार्जुनांचा कृष्णेवरील हक्क जवळ जवळ संपुष्टातच आला आहे.'' त्याचे हे वाक्य ऐकून उल्हासित झालेला युधिष्ठीर त्याला प्रोत्साहन देत म्हणाला, ''ज्येष्ठ माद्रीपुत्रा,बोल! माझा प्रत्यक्ष सहोदर नसलास तरी माझ्या स्वभावाची पूर्ण पारख

तुला झाली असावी असे तुझ्या कथनावरुन ध्वनित होते.

वास्तविक ज्येष्ठ भ्राता या नात्याने मी एकदा निर्णायक आज्ञा दिली तर कोणीही बंधुला त्याचे उल्लंघन करता येणार नाही असा पवित्र धर्मसंकेत आणि शास्त्रार्थ आहे.परंतु स्त्री सुखाची वासना एवढी तीव्र आणि दाहक असते की, माणसाची सारासार विवेक बुद्धीच ती भस्मसात करु शकते.विश्वामित्र, पराशर असे देवतुल्य तापसही स्त्री सुखासाठी लंपट झाल्यामुळे निष्प्रभ झाले. कुरुंचे दिग्गज पूर्वज महाराज नहुष आणि ययाति यांचेही कामवासनेपायी अधःपतन झाले.इतके दूरवर तरी कशाला जा...! आमचे जनक महाराज पंडु, क्षणिक सुखाच्या आहारी गेल्यामुळे आम्ही पांडव पोरके झालो.सत्याचे हे विदारक स्वरुप ध्यानात येऊन तरी भीमार्जुनांची कृष्णेच्या प्राप्तीची लालसा नष्ट व्हावी! नकुला माझा हा हेतू तुझ्या शब्दसामर्थ्याने तरी त्यांच्या कर्णरंध्रात शिरावा अशी माझी अपेक्षा आहे.त्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी तरी, ज्येष्ठ माद्रीपुत्रा... तू अवश्य बोल!''

''युधिष्ठीरा,कामातुरतेचे दुष्परिणाम आणि यथातथ्य स्वरुप पूर्णांशाने ज्ञात व्हावे इतके तुझे शब्द सामर्थ्य खचितच प्रत्ययकारी आहे. तू दिलेली उदाहरणे तर इतकी समर्पक आहेत की अल्प मतीच्या माणसाचेही तात्काळ मतपरिवर्तन व्हावे. अर्जुनाची भोग तृष्णा आता खचितच शमन झाली असून तिचे त्यागामध्ये उन्नयन होत असावे असे त्याच्या क्लांत मुद्रेवरुन दिसत आहे.आता राहिला भीमसेन! त्याने आपल्या कथनात कृष्णेची प्राप्ती त्याला स्वतःला होणे कसे योग्य आहे ही एकच गोष्ट कोणतेही प्रमाण न देता पुनःपुन्हा ऊधृत केली म्हणून काही ती सिद्ध झाली असे थोडेच

आहे?युधिष्ठीराने ज्येष्ठ भ्रात्याची कशी कुचंबणा होते याचे यथातथ्य वर्णन केले आहे.त्यामुळे आता भीमसेन बहुधा तटस्थच राहतील, (हो नाही काहीही समजावे असे भीमाचे हास्य) हा माझा अंदाज खरा ठरला आहे.

आता या कलहाचे कारण असलेली प्रत्यक्ष कृष्णा! तिचाही विचार करणे न्यायोचित ठरते. तिची वृत्ती चंचल असली तरी प्राप्त परिस्थितीत योग्यायोग्यतेचा विचार करण्याएवढी स्थिर बुद्धी तिच्याकडे आहे.अर्जुन दुष्प्राप्य आहे हे कळताच आयुष्यभर नैराश्याच्या गर्तेत खितपत पडण्यापेक्षा मंडप स्थित तरुणांमधील भिन्न वर्णाचा का असेना सुयोग्यवर निवडून आपल्या पूर्वनिष्ठा त्याच्या चरणी समर्पित करण्याएवढे सामर्थ्य तिच्याकडे आहे. लौकिकार्थाने तिचे स्वामित्व अर्जुनाकडे असल्यामुळे तिच्या इच्छा अनिच्छांचा विचारसुद्धा स्वतंत्रपणे करण्याचे प्रयोजन उरत नाही. ज्या निर्धाराने आपण अर्जुनावर अनुरक्त आहोत असे तिने सांगितले त्याच निर्धाराने अर्जुन तिचे दान ज्या पांडवाच्या हाती देईल त्याच्याशी काया-वाचा-मने एकनिष्ठ राहून पातिव्रत्याचे नवे संकेत ती दृढ करील अशी माझी खात्री आहे.तेव्हा युधिष्ठीरा तिची फिकीरही तू करुनकोस!

आता सर्वांच्या हितासाठी अहर्निश झटणारा युधिष्ठीर हाच कृष्णेसाठी एकमेव पर्याय उरला असे सकृतदर्शनी सर्वांनाच वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही.तथापि मनाच्या आत्यंतिक निराश अवस्थेत, कृष्णेचा स्विकार करण्यावाचून अगदी गत्यंतर नाही म्हणून,शून्य आसक्तिने,केवळ ज्येष्ठ भ्रात्याचे कर्तव्य पालन करण्यात कसूर झाली असा जनापवाद आणि कृष्णेला वाऱ्यावर

सोडली असा स्वकियांचा दोषारोप टाळण्याच्या,केवळ याच एकमेव हेतूने कृष्णेचे स्वामित्व आपल्या शिरावर घेण्याची पाळी युधिष्ठीरावर येऊ घातली आहे.

तर बंधु जनहो! ज्येष्ठ भ्रात्याला आयुष्यभर वेदना सहन करायला लावणे मला माद्रीपुत्राला योग्य वाटत नाही म्हणून ज्येष्ठत्वाच्या नात्यामुळे कृष्णेचा आपल्या मनाविरुध्द स्विकार त्याने करु नये असे माझे मत असून मनाच्या आत्यंतिक अवस्थेत हा ज्येष्ठ माद्रीपुत्र त्यागाला सिध्द झाला आहे. युधिष्ठीराच्या दुःखाचे कारण असणारी कृष्णा....! हिचे पाणीग्रहण करण्याचा संकल्प मी व्यक्त करीत आहे. युधिष्ठीरा आता तरी शांत हो. मुळात हा कलह तू स्वतःच निर्माण केल्यामुळे तुला कृष्णेचे दान स्विकारण्याचा अधिकार कोणत्याही शास्त्रसंकेताच्या आधारे सापडणार नाही. तेव्हा त्याच्या वाटेलाही तू न जावेस यातच तुझे ज्येष्ठत्व शाबूत राहिल.

कुंतीपुत्रांनो...! या माझ्या संकल्पामुळे तुम्हालाही मोठा लौकिक प्राप्त होईल. एक तर चारुगात्री रुपयौवना कृष्णेसाठी साक्षात मदन स्वरुप असलेला हा नकुलच अनुरुप पांडव आहे याची खात्री पटून समस्त प्रजानन तुमच्या योजना चातुर्याची तारीफ करतील. खेरीज पति परायण माद्रीच्या पुत्रावर कुंतीपुत्र सहोदरापेक्षाही प्रेम करतात हा भ्रातृभावाचा नवा संकेतही भरतवर्षामध्ये रुढ होईल.''

''धन्य आहे नकुला! आपल्या हेतूचा पत्ताही लागू न देता आपला कार्यभाग साध्य करुन घेण्याचे तुझे कौशल्य अन् चातुर्य केवळ अद्वितीय!'' सहदेवाच्या या उद्‌गारानी उर्वरित पांडवांसह

कृष्णेनेसुद्धा केवळ या उद्‌गारामुळेच त्याची दखल घेतली.‘‘अरे नकुला! तुझ्या समवेत नऊ मास माद्री मातेच्या उदरात पाठीला पाठ लावून राहिलेल्या आपल्या समवयीन बंधूलाही मोठ्या चाणाक्षपणे कनिष्ठ लेखून, त्यास युधिष्ठीरासारख्या जेष्ठ-धर्मज्ञ भ्रात्याची सहजी मान्यता मिळवून तू आपले नाव सर्वार्थाने सार्थ केले आहेस. मलाही हे मान्य करण्यावाचून गत्यंतर उरले नाही  की,तुम्हा चारही वीर शिरोमणी महाप्रतापी पांडवांमध्ये मी कनिष्ठ तम माद्रीपुत्र अगदी नगण्य ठरलो आहे....!

कृष्णेच्या प्राप्तीची अभिलाषा करणे दूरच. तिच्याबद्दल विचार करण्याएवढेही कर्तृत्व नसलेला, केवळ संख्यारुप अस्तित्व असलेला मी पंचम स्थान स्थित पंडुपुत्र आहे. चार वेद, चार वर्ण, चार आश्रम,चार पुरुषार्थ अशी किती उदाहरणे सांगावीत? कोणत्याही श्रेष्ठ -अलौकिक तत्वांची संख्यासुद्धा चार या अंकापुढे जात नाही. तुम्ही माझे जेष्ठ,श्रेष्ठ बंधू जणू चार वेदच असून नुकतेच तुमच्या पांडित्याचे दर्शन घडल्यामुळे माझ्या आयुष्याचे जणू सार्थकच झाले आहे. तुमच्या अलौकिकत्वापुढे कधी मान वर करुन पहावयाचे धाडसही मी यापूर्वी करु शकलो नाही. पण कृष्णेच्या अभिलाषेने भोगलोलुप होऊन तुम्ही यापूर्वी केलेले कथन चतुर्थ वर्णियांपेक्षाही चार श्रेणीनी खालच्या स्थानी दाखविले तरी पुरे होणार नाही.

तुमच्या अधःपतीत, विकृत मनोवृत्तीचे दर्शन घडल्यामुळे तुम्हा चौघांना‘ज्येष्ठ’ म्हणणे निरर्थक असून तुम्ही माझ्यापेक्षाही कनिष्ठ ठरला आहात. अर्थात या मुद्द्याला अनुलक्षून मी कृष्णेवर माझे स्वामित्व सिद्ध करु इच्छित नाही. तुमचे बाष्कळ वक्तव्य

ऐकण्यापेक्षा माझी श्रवण संवेदनाच नष्ट झाली असती तरी चालले असते, असे म्हणण्याची पाळी तुम्हीच माझ्यावर आणिली आहे. तुम्हा चौघांकडेही लोकोत्तर गुणांचा समुच्चय जरुर आहे. पण तुमच्या मनात वास्तव्य करणारी विषारी कामांधता लक्षात घेता भीष्मांचे नावही तुम्ही उच्चारु नये.

युधिष्ठीरा,जेष्ठत्व निसर्गक्रमावर ठरत नसून ते वर्तनाने, उन्नत विचारांनी सिध्द व्हावे लागते!भीमसेना,बलप्रदर्शनासाठी द्वंद्व खेळण्याची आवश्यक नसते,विकारांवर काबूठेवूनही ते प्रदर्शित करता येते ! अर्जुना, शौर्य पण जिंकून नव्हे तर अहंकार जिंकून सिध्द करावे लागते! नकुला, शाश्वत सौंदर्य शरीरास्थित नसते. सुंदर विचार अभिव्यक्त करुन ते प्राप्त होते!कृष्णे!याचारही श्रेष्ठ पांडवांच्या तुलनेत तू मात्र स्वच्छ विचारांची वाटतेस.स्वतःचा हेतू वा अयोग्य कृती झाकून न ठेवता केलेल्या कथनातून,तुझ्या बुध्दीचे प्रांजलत्व, तुझ्या वस्त्र प्रावरणांमधून प्रत्ययालाही न येणाऱ्या तुझ्या शरीर सौदर्याप्रमाणे अबोध आहे. कनिष्ठाने जेष्ठांच्या नेत्रात अंजन घातल्याचा हा प्रसंग पांडवांच्या इतिहासात न राहो!

ज्येष्ठ बंधुनो! मी काही अलौकिक भव्य दिव्य गुणांचा भीष्म,रामचंद्र यांसारखा पुरुषोत्तम नाही. निसर्गक्रमानुसार होणारी मनःशारीर स्थित्यंतरे माझ्यातही झालेली असल्यामुळे यौवनसुलभ विषय सेवनाची ओढ कृष्णेच्या दर्शनाने माझ्याही मनात जागृत झाली. माझ्यासाठी कृष्णेसारखी त्रैलोक्यसुंदरी केवळ दुष्प्राप्य याची पूर्ण जाणीव असूनही तिला स्वयंवर मंडपात पाहताक्षणीच तिच्या प्राप्तीची तीव्र लालसा माझ्या मनातही जागृत झाली. बंधुनो, तुमचा विश्वास बसो न बसो! म्हणजे तो बसणार नाही याची जाणीव मला आहे.परंतु

क्षणिक विकारांवर विचारानी ताबा मिळता क्षणीच वरमाला घेऊन सज्ज झालेली कुरळकुंतला,सौजन्यमूर्ती श्यामा माझ्यापेक्षाही माझा धर्मज्ञ बंधु युधिष्ठीर यालाच अधिक अनुरुप आहे! सुडौल देहयष्टीची संयमी पांचाली माझ्या पेक्षाही माझा जेष्ठ बलशाली बंधू भीमसेन यालाच अधिक शोभून दिसेल! धनुराकार भ्रुकुटी असलेली मृगलोचना द्रौपदी माझा ज्येष्ठ धनुर्धर बंधू अर्जुन यालाच अधिक साजिरी आहे! कृशकटी चारुगात्री अंगगंधा याज्ञसेनी माझ्यापेक्षा माझा ज्येष्ठ मदनरुप बंधू नकुल याच्यासाठीच भूलोकी अवतरली असावी! या भावना माझ्या मनात उचंबळून आल्या. तथापि पूर्ण विचार करता तुमच्यापैकी एकही ज्येष्ठ पांडव कृष्णेचा स्वीकार आणि सांभाळ करण्यासाठी योग्य नाही असे माझे स्पष्ट मत झाले आहे.

अर्जुनाच्या प्राप्तीसाठी आतूर झालेली कृष्णा...तिचे भवितव्य कोणा पांडवाच्या हाती आहे हा निर्णय आता काळच करील.'' पांडवांमध्ये झालेला कलह त्यांच्यातील ऐक्य अभंग राखणारा ठरो अशी इच्छा करणे एवढेच आता माझ्या हातात राहिले आहे! कदाचित माझी इच्छा सामान्य तर्काच्या निकषांमध्ये बसणारी नसेल, कारण विनाशाचा आरंभ कलहामधून होतो असा आजवरचा तरी इतिहास आहे. पण कुणी सांगावे काही नियम अपवादानेही सिद्ध होतात!''

**भीमार्जुनांसह कृष्णा स्वयंवर मंडपातून बाहेर पडली तेव्हा त्यांना पत्ताही लागू न देता बलरामासह प्रत्यक्ष श्रीकृष्ण त्यांच्या मागोमाग चालत राहिले.पांडव अश्वत्थाखाली थांबले. मग कृष्णेच्या प्राप्तीसाठी त्यांच्यात वाद विवाद सुरु झाला.**

**त्यांचे संपूर्ण संभाषण आडोशाला राहून कृष्णाने ऐकले. सहदेवाने कलहाचा उपोद्घात करताच श्रीकृष्ण कुलाल शालेत गेले.त्यांनी कुंतीची भेट घेतली. पांडवांमधील वितंडवादाचे सारांशाने कथन करुन त्याच्या निवारणासाठी योग्य उपाय सांगून ते बलरामांसह निघून गेले.**

सहदेवाने केलेल्या निर्भर्त्सनेमुळे लज्जित झालेले पांडव माना खाली घालून मुक्कामाकडे, कुलालशालेच्या दिशेने निघाले. संपूर्ण मार्गात कुणीच काही बोलले नाही. कृष्णेसह पांडव कुलालशाळेत पोहोचले. अंतर्गृहात असलेल्या कुंतीला त्यांचा पदरव ऐकू आला. बाहेर येण्याचे कष्ट न घेताच तिने आतूनच खणखणीत आवाजात विचारले,''बाळानो,आज भिक्षा मागून आणलीत ना?''

युधिष्ठीराने तात्काळ 'होय' असे उत्तर दिले. मग प्रत्येक शब्दाचे स्पष्ट उच्चारण करीत कुंती माता अंतर्गृहातूनच म्हणाली, ''बाळानो! आज तुम्ही जे काही आणले आहे ना, ते पाचही जणात समान वाटून घ्या!!'

# ३. माधुकरी

राणे वाडीत पहिल्या कोबंड्याने खच्चून दिलेली बांग कानात पडली अन् बाया विंचू डसल्यासारखी अंथरूणात उठून बसली.उत्तर रात्री पर्यंत टक्क जागी असलेली बाया चुरचुरणारे डोळे मुठीने चोळत चोळत रामा - रामा- रामा - पांडुरंगा असं देवाचं नाव घेत उठून उभी राहिली. कार्तिकातली चावरी थंडी आणि उभे लावण्याचा एक धडपा जमिनीवर अंथरून मुटकुळं करून झोपलेल्या, संसाराच्या चिंतेने काळजारलेल्या बायाचं अगं ठणकायला लागलेलं ! अलीकडे भविष्याचा घोर आणि अर्ध्या संसारातून निघून गेलेल्या नवऱ्याचं दुःख यामुळे बायाला नीज अशी येतच नसे. पण राम लक्ष्मणासारखे अश्राप मुलगे आणि त्यांच्या पाठीवरची अजाण सुशी ही तीन पोरं अन्नाला लागेपर्यंत तरी हा देह जगवायला हवा इतक्या निरिच्छ बाण्याने बाया आला दिवस ढकलायची एवढच!त्यात आज चाव दिवस! पहाटेच सगळ्यांच्या आंघोळी व्हायला हव्या, देवावर फुलं पडायला हवी म्हणून अंधारातच चाचपडत बाया माजघर आणि ओटीच्या दरम्यान असलेल्या चौकडी जवळच्या कोनाड्यातला लामणदिवा आणायला गेली. दिवा हाताशी आल्यावर सावध पावल टाकत ती स्वयंपाक घरात गेली.

रात्री जेवणखाण होऊन झाकपाक झाल्यावर चुलीतल्या मुंबरात ओल्या शेणाचा गोळा ठेवायचा म्हणजे पहाटेपर्यंत तो आमसुखा होऊन किटळ धरतो आणि उजाडत विस्तव जिवंत करता येतो. रोज रोज विस्तव पेटण्यासाठी काडी जाळायची चैन बायाला परवडणारी नव्हती. चुलीसमोर दिवा ठेवून तिने मुंबरातला शेणगोळा बाहेर काढला आणि फुंकरून - फुंकरून ज्वाळ धरल्यावर दिवा लावून घेतला. मग लामण दिव्याच्या वातीसमोर हाताचा आडोसा धरून ती मागील दारी गेली आणि थाळीतील राख भरून नवीन विस्तव केला आणि हंड्यात भर घातली.

''विठू ऽऽ, सदू ऽऽ अरे उठा रे! आज चाव दिवस ना? सूर्योदया पूर्वी

आंघोळ, पूजा व्हायला हवी!'' बायाने साद घातली. विठूची झोप सावध!जेमतेम दहा वर्षाचं वय! पण बाप गेल्यावर परिस्थितीने त्याला जाणत्या बापयासारखा शहाणपणा आलेला ! बायाच्या हाके सरशी तो ताडकन उठून बसला. जमिनीला वंदन करून 'समुद्र ऽऽ वसने देवी पर्वतः स्तन मंडले। विष्णुपत्नी नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे।।' हा श्लोक म्हणत त्याने सदू-सुशीला उठवून घातलं.मुलांच्या आंघोळी, संध्या, देवपूजा होईपर्यंत बाहेर भिणभिणायला लागलेलं.''विठू, बाहेर जरा दिसायला लागेपर्यंत सदूला महिम्न शिकव. मग दोघांनी पायाखाली बघीत उंबरा -पिंपळावर पाणी घालून या. मग फराळाचं देते.'' घागर घेऊन विहिरीवर जाता जाता बाया म्हणाली.

सदू-सुशी थंडीची थाळीपुढे शेकत बसलेली. आईचं बोलणं ऐकल्यावर सदू समंजस्यपणे विठू समोर येऊन बसला. महिम्न म्हणून झाल्यावर भाऊ-भाऊ उंबर-पिंपळ यांची पूजा करून आले.अन् झोपाळयावर बसले. बायांने स्वयंपाक घरात केळीची चार पाने मांडून त्यावर मूठ-मूठ वऱ्यांच्या लाह्या आणि गुळाचा खडा असा फराळ मांडून मुलांना फराळाला हाक मारून देवाला नैवद्य दाखवणे, तुळशीपुढे गुळ लाह्या ठेवून झालेवर मुलं फराळाला बसली. ''आई, तुझं पान कुठे ऽ?'' समजसं विठू म्हणाला,''तुमचं झाल्यावर मग बघीन आणि जेमतेम दोन तीन मुठीच लाह्या शिल्लक आहेत. म्हार- कातकरी फराळ मागायला आले तर त्याना चिमटी -चिमटी तरी द्यायला नको का?आज त्यांचा हक्काचा दिवस! आमच्या कपाळालाच मुळी दळिद्र पुजलेलं आहे. दारात आलेल्याच्या पुढे का हे गाऱ्हाणं सांगायचं आहे? घ्या तुम्ही !''

तिन्हीसांजेबरोबर चार पळ्या पातळ भात खाऊन निजलेल्या पोरांच्या पोटात भुकेचा वडवानल उठलेला.सुशी-सदूनं बघता बघता बकाणे मारून केळीच्या फाळक्यांवर चुकार राहिलेल्या लाह्याही टिपून टिपून खाल्ल्या. दिवाळीच्या दिवशीही आई दाढेत आवळा धरुन राहिलीय ही गोष्ट

विठूच्या जिव्हारी लागलेली. पोटात उठलेला भुकेचा डोंब आणि गूळ लाह्याने तोंडांला सुटलेले पाणी आवरून विठूने प्रथम पाण्याचा घोट घेतला. लाह्यांचा बकाणा मारायची त्याची इच्छाच मेली. अधाशीपणे गूळ लाह्या खाणारी भावंडं आणि तोंड मिटून गप्प राहिलेली आई या चित्राने विठूच्या पोटात उमळून आलं. दुःखाचा अनावर आवेग आणि मेलेल्या बापाची आतडं पिळवटणारी आठवण,यामुळे आलेला कढ जिरवण्यासाठी आवंढा गिळून घोटून, आलेला आवेग शांत होईपर्यंत बसून राहिला. पानातल्या उरल्या सुरल्या लाह्यांचे कण टिपून खाणारी भावंड बघून त्याला अकाली प्रौढत्व आलं.त्याची भूकच मेली अन् आपल्या वाटणीच्या लाह्या भावंडांना घालून तो उठला.

शेजारच्या दाते, देवधर, भावे यांच्या घरात चाललेल्या जल्लोषाचे आवाज कानावर येत होते.बायाच्या घरभाटाला लागूनच देवधरांचं घर! त्यांच्या उंबऱ्यात बसलेलं माणूस बायाच्या ओसरीवर ओळखू यावं इतकं नजीक!देवधरांची बगी कडबोळी खात खात बाहेर आली. बगी सुशीच्याच वयाची.बायाच्या पावळी जवळच्या बेड्यात येऊन तिने सुशीला हाक मारली. सुशी धावतच बाहेर गेली.न्हाऊन माखून नवीन गवंज घातलेल्या डोक्याच्या खोप्यात सोन्याचं फूल माळून कडबोळं खाणाऱ्या बगीकडे सुशीबघतच राहिली.‘‘तुमचा फराळ करून झाला की नाय? आमच्याकडे चकल्या, कडबोळी, अनारसे, करंज्या किती किती फराळाचं केलेलं आहे!’’ बगी उत्साहाने सांगू लागली. सुशी आशाळभूतपणे बगीच्या हातातील कडबोळ्याकडे बघत राहिली. तिने एक तुकडा मागितलाही असता पण तेवढ्यात बाहेर येऊन विठूने डोळे मोठे करून दाखवले म्हणून फुरंगटलेली सुशी पाय आपटत घरात आली. आई समोर हात वेळावत ती म्हणाली, ‘‘आय्यऽऽ बगीकडे किती किती फराळाचं केलेलं आहे नि तू कायपण केलसं नाय!’’

विठूने मागून येऊन तिचा बुचडा धरून तिला बाजूला फरफटत नेलं नि म्हणाला, ‘‘आपले तात्या देवा घरी गेले ना ? तुला काय सुद्धा

अक्कल नाय अगोऽऽ घरातलं माणूस गेलं की मग वर्षभर काय गोड धोड करायचं नसतं.चल, पाढे म्हणायला बस!''सुशीचा चांगलाच हिरमोड झालेला. तिचं बालमन स्वस्थ बसेना. ती पुन्हा आई समोर गेली आणि म्हणाली, ''आय्यऽऽ मग फोडणीचे पोहे तरी कर ना ग्ये ! मला पोहे हवे म्हणजे हवे !''आणि तिने भोकाड पसरलं. बायाला कसनुसं झालं. जेमतेम दहा मण भात खंडाचं आलं. चार तोंडं खाणारी. ती स्वतः नवरा गेल्या पासून एकभुक्तच राहायची. एक वेळेला सुध्दा फक्त जीव जगेल एवढाच चार पळ्या पातळ भात खाऊन ती रहायची. एवढा पहाडा सारखा खंबीर नवरा... किती किती बेत केलेलं... कुठून कुठूनशोध घेऊन उत्तम धरत्या माडा-पोफळींचे नारळ-सुपाऱ्या रूजवून आवण काढलेले आणि सगळ्या घरभाटात दोनशे माड, पाचशे पोफळी लावून नुसतं नंदनवन केलं.एवढं शिंपण एकट्याने करायचं.

वळकुवातल्या मोरोपंत गोगटयांकडे त्याचं उठणं बसणं. तिथे जे - जे बघायचे त्याप्रमाणे घरी आल्यावर उद्योग सुरू. धारेवरचं पडण बेणून तिथे हापूस-पायरीची कलमं लावायचं मनातं आलं. एवढा आवाका घ्यायला हात अपुरे पडले. मग बन्याबापू कडून अडीचशे रूपयांचं कर्ज काढलं. चार वर्ष मुदतीत कर्जाची परत फेड करायचा कागदही करून दिला. पडणात ही थोरली ऐन, किंदळ, नाणा, शिवणीची झाडं. ती तोडून त्यांचा सिलीपाट विकायला काढला. त्याचं हे भीमकृत्य बघून गावातले लोक, शेजारीपाजारी टिंगल कारायचे ... ''कुठे मोरोपंत आणि कुठे हा ऽऽ! अशाने भिकेला लागेल!'' पण सिलिपाट विकूनच तीनशे रूपये उभे झाले तेव्हा कशी सगळ्यांची तोंड काढेचिराईत घेतल्यासारखी झाली.

बन्याबापूला मुदतीपूर्वीच चारशे रूपये वाजवून देऊन एकहाती मोकळा केला.कलमं दिसामाजी नजरेत भरायला लागली. स्वतः मोरोपंत सुध्दा मद्दाम येऊन बघून गेलेले. ही बागशाही द्यायला लागली की घरावर सोन्यांची कौलं पडतील असं त्यांनीसुध्दा कबूल केलं.पण ते वैभव बघायचं काही तात्यांच्या नशिबात नव्हतं हेच खरं. बन्याबापूला लिहून दिलेल्या प्रॉमिसरी नोटेची मुदत

भरल्यावर पंधरा दिवसांनी वकिलाची नोटिस आली आणि तिरीमिरीतच तात्या बन्याबापूकडे गेले. ''तीन वर्ष व्हायच्या आतच एक रकमी साडेचारशे रूपये देऊन तुझं ऋण भागवलं आणि हे आता काय?'' हातातली नोटीस त्याच्यासमोर आपटून तात्या रागात म्हणाले.

बन्या पक्का निर्लज्ज.''तुला जे काय सांगायचें ते असेल कोर्टात सांग. मुद्दल राहोच पण व्याज भागवलं असतेस तरी मला  कोर्टात जावें लागलें नसतें. पण बागशाहीच्या नादात तू टकल्याने चालायला लागलास. दोन - तीन निरोप देऊनही दाद दिली नाहीस मग माझाही नाईलाज झाला.'' बन्याबापूने आपल्याला तोंडघशी पाडलं हे आता तात्यांना उमगलं.  कर्जफेड करतानाच प्रॉमिसरी नोट परत घ्यायला हवी होती. आपण फार मोठी चूक करून 'चुडीन वाघ  घरात घातला' असं तात्यांना वाटलं. तात्या घरी आले ते अंगात ताप घेऊनच. या झेंगटातून आता आपल्याला परमेश्वरही वाचवू शकणार नाही. बन्याबापूची बुध्दी फिरली.आता आपली पत रहात नाही. एवढी रक्कम कुठून देणार?

बेअब्रूच्या भीतीने तात्या आणि बाया दोघांनी अक्षरशः मरणभोग भोगला.बायाने गडी पाठवून दादा काळे यांना बोलवून घेतलं.ते त्यांच्याच वकलातले. हुशार माणूस ! लांब लांबून त्यांना पंच म्हणून पाचारलं जायचं. ते आले, तात्यांकडून त्यांनी सगळी हकीकत विचारून घेतली. ते सुदधा हतबुध्दच झाले. पुरावा तात्यांच्या पूर्ण विरोधात. आता चार शहाण ेसुरते जमवून आपापसात समझोता करून बेअब्रू-जप्ती टाळायची हाच एकमेव पर्याय उरला. मग दादा काळे, सदू जोशी, अंतू मराठे असे पंच बसले.कर्जाच्या पोटी माडपोफळी लावलेला घरभाटाचा तुकडा आणि बामणकोंडी जवळची चार खंडी भात पिकणारी शेतजमीन बन्याबापूच्या घशात घालायची अशी तडजोड झाली. तसा समजुतीचा कागद होऊन पंचांसह तात्या- बन्याबापू यांच्या सह्या झाल्या.तात्यांची बेअब्रू वाचली खरी पण तात्या गाजीचा पाजी झाला.

तात्या घराबाहेर पडेनासा झाला.त्याला रोजच ताप यायला

लागला. दोन तीन वैद्य झाले पण ताप हटेना. मग मग अन्नही तुटलं. एवढा दांडगा तात्या पण हा घाव त्याच्या वर्मी लागला.जेमतेम चार महिन्यांतच तो हाय खाऊन मेला अन् बायाच्या दुर्दैवाला सुरूवात झाली. मोरोपंत स्वतः पाचारायला आले,मदतही देऊ केली पण मानी बायाने त्यांना शप्पथ घातली. ‘हे माझे भोग आहेत ...मला भोगले पाहिजेत. देवाला जर काय लाज असेल तर तोच माझ्या सहाय्याला येईल. तुम्ही कोणाचे कोण... पण ह्यांना भावासारखं सहाय्य केलंत. तुमचे उपकार आहेत तेच या जन्मात फिटायचे नाय. सोन्यासारखा माझा पती गेला तेव्हाच माझी माती झालेली आहे. तुम्ही आपुलकीने मदत करायला आलात तेवढा आधार मला पुरे आहे. घरात अगदीच चूल पेटायची नाही त्याचवेळी तुमच्याकडे पदर पसरीन पण तुम्ही कितीही दिलंत तरी माझं प्राक्तन काही चुकणार नाही.’

यावर मोरोपंतही निरूत्तर झाले.मानी बायाने गाठीला गाठ मारून आला दिवस साजरा करायची मनाची तयारी केली.आभाळचं फाटलेलं! ठिगळ कुठे नि किती लावायचं? विचार करून डोक्याच्या चिंध्या चिंध्या व्हायची वेळ यायची. मग बायाने अक्षय देवाचा जप सुरू केला. तोंडाने देवाचं नाव आणि दिवस उजाडल्यापासून मावळेपर्यंत काम असा तिचा नेम सुरू झाला. खाजणाच्या कडेला दहा वीस भांगे होते. त्याचा सहा मण भाताचा खंड! तेवढाच पुरवून पुरवून खायचा. वर्षभर काळ मागे पडला म्हणजे गावात कुणाचं दळण-कांडण करून दे, धुणी भांडी कर, काही करून पोरांना जगवायचं. देवाला किती सत्वपरीक्षा बघायची असेल तेवढी बघू दे ! असा तिने चंगच बांधला. बिचारी पोरंही पानात पडेल ते अन् तेवढं खाऊन राहायची. नाही म्हणायला आजच सुशीने जरा हट्ट केला. हे भवजळ त्या अश्राप बाल जीवाला कसं उमजावं. लाडा- कोडात वाढलेलं,खाल्लं प्यायलेलं लेकरू.दारिद्रय काही बघितलेलंच नाही. नशिबाचे फेरे उलटे पडले म्हणून पोट मारून रहायची वेळ आली.

बायाला भडभडून आलं. शेजार घरून दोन पसे पोहे उसने मागून आणायचे म्हणून तिने अर्धी रोवळी भात घेतलं अन् मागील दाराने ती

सावित्री देवधरणीकडे जायला बाहेर पडली. बेडं ओलांडून बाया सावित्रीच्या मागील दारी गेली. बाया आलेली बघितल्यावर सावित्रीच्या मनात आलं की ही अवदसा अशा सणावाराच्या दिवशी पांढरं कपाळ घेऊन माझ्याकडे कशाला येत्येय? आजपर्यंत कधी आली नव्हती खरी पण आता धीर चेपला की रोज उधारी उसनवारीला ही कपाळफुटकी सतावत राहणार. मग बाया उंबरा चढून आत येण्यापूर्वी सावित्रीच उंबऱ्यात जाऊन उभी राहिली.

''सावित्री काकूऽऽ, सणासुदीला तोंड वेंगाडीत येऊ नये खरं, पण सुशी अगदी हट्टच धरून बसली. मला दोन पसे पोहे द्या. असेच नको मी रोवळीतून थोडं भात आणलं आहे त्याच्या बदली द्या.'' बायाचे शब्द ऐकल्यावर सावित्रीचा जीव जरा भांड्यात पडला.''तुम्ही इथेच आड रहा. उगीच पुरूष माणसांच्या डोळ्यावर यायला नको. मी पोहे घेऊन येते.'' असं सांगून ती आत गेली. सावित्री स्वयंपाकघरात पोचली तेवढ्यातच सावित्रीची सासू म्हणाली,''मागील दाराशी कोणाशी गो कुचूकुचू करत होतीस? कोण आलं हे?''

त्यावर सावित्री म्हणाली,''कपाळपुसकी बाया भात देऊन त्या बदली पोहे मागायला आलीय.''सास्वेचं तोंड मोठं फटकळ! ''बरी सदला बदली करायला आलीऽहे. आपलं सोपवून झालं आणि आता दुसऱ्याकडे मानभावी पणा करायला आली हे. म्हणे भाताच्या बदली पोहे हवे. अगो, आज सणासुदीचा दिवस. दारातल्या भिकाऱ्याच्याही हातावर खमंग टमंग जिनसाचा तुकडा पडणार. कोण काय नुसते पोहे देणार नाही. दोन फराळाचे जिन्नस लाजेकाजेने का होईना कोणी देणारच म्हणून आलीय भीकमागी तर करंजीची टोक नि एखादं कडबोळं टाक.उगीच वांछा राहायला नको.''

सावित्रीच्या सास्वेचे हे शब्द कानात पडताच आपल्या मस्तकावर कुणीतरी घावच घालत आहे असं बायाला वाटलं. एवढी खंबीर बाई पण हा आहेर ऐकल्यावर तिच्या काळजाला भगदाड पडलं आणि रड्याचा बांध फुटण्यापूर्वी घर गाठावं म्हणून ती लगबगीने घरी परतली. घराचा उंबरठा

ओलांडून आत पाय टाकल्याबरोबर बाया जवळ जवळ खाली कोसळलीच. हे जग दुष्ट आहे खरंच पण इतकी निष्ठुर- निर्दयी माणसंही या जगात आहेत याचं पहिल्यानेच बायाला प्रत्यंतर आलं.आपणच सणासुदीला निर्लज्जासारखं त्यांच्या दारात जाऊन आपल्या हाताने आपलं नाक कापून घेतलं याचं शल्य बायाच्या काळजात अधिक खुपलं. बाया हमसाहुमशी रडायला लागली. आईला अशी रडताना बघितल्यावर पोरंसुद्धा सैरभैर झाली. विठूने प्रसंगावधान राखून कथलीतून पाणी आणून आईच्या पुढ्यात ठेवलं.


तेवढ्यात पुढील दारातून हाक आली,''अहो विठ्ठलपंतऽऽ, घरात कुणी आहे का रे बाळा?''''अरे बापरे! दादा काळे आले वाटतं?''या विचारा सरशीच बायाने रडं आवरलं आणि खुणेनेच विठूला' पुढील दारी जा!' असं सुचवलं. तात्या वारले म्हणून रिवाजाप्रमाणे फराळाचा डबा घेऊन दादाकाळे आलेले! पंचाच्या धडप्यात बांधलेला डबा विठूच्या हाती देत दादा काळे विठूला म्हणाले,''जा बाळ, आत जाऊन आयशीकडे दे आणि मला तांब्याभर पाणी घेऊन ये.''विठू पाणी घेऊन बाहेर आला.त्याला शेजारी बसवून दादांनी चौकशी केली. शेजारी देवधरांकडून वगैरे फराळ आला की नाही हे त्यांनी काढून घेतलं. मग खंडाचं भात आलं की नाही वगैरे चौकशी करून''काही लागलं सवरलं तर निःसंकोच सांगा. आम्ही नी तुम्ही बारा दिवसातलेच. तुझ्या बापसाने काय कधी कोणाचं वाईट चिंतलेलं नाय. बऱ्याबापूने नर्क खाल्ला, अंगाला भगे पडतील भगे!''असं बोलून ते उठले.दारात गेल्यावर जरा थांबून ते बायाला उद्देशून म्हणाले, ''वैनीऽ, ही पोरं सोन्यासारखी आहेत. तुमचे पांग ती फेडतील. आपण देवावर भार टाकून त्याचं नाव घेतं राहावं. हेही दिवस जातील. पापाचे घडे भरल्याशिवाय राहणार नाहीत. दुसऱ्याचं असं निर्दाळण करून पोराबाळांच्या तोंडाचा घास काढून घ्यायचा हे कसायाच्या पुढचं काम! ज्याचं त्याला निस्तरायला लागेल. जगलो वाचलो तर त्यावेळी बऱ्याबापूला चौघात्री नाही सुनावलं तर मी नावाचा दादा काळे नव्हे.''

संध्याकाळी बायाचा नरसोबाच्या वाडीत राहणारा एकुलता एक भाऊ गोविंदा आला. तात्यांचे दिवसवार झाल्यावर त्याला कळलं तेव्हा तो एक वस्ती राहून गेलेला. आज मुद्दाम बहिणीला दिवाळीचा फराळ घेऊन लांबचा पल्ला मारून तो तंगडतोड करत आलेला. बायाने पटकन पाण्याचा मोघा चुलीवर ठेवून पाणी गरम करून गोविंदाला पाय धुवायलं दिलं. आड करून ठेवलेले नाचणे भाकरी भाजण्यासाठी दळायला घेतलेले.रात्री जेवण-खाण झाल्यावर मुलं झोपल्यावर बाया भावापुढे मन मोकळं करायला लागली.

''इथे चरितार्थाचं काय साधन नाय. तीन तोंडं खाणारी! त्याना जाऊन वर्ष होईपर्यंत कोणाचं दळण - कांडण करायला जायचं तरी चोरी. उपासमारी बरोबर तोंड दडवून दिवाभीताप्रमाणे रडायचं त्यापेक्षा मला तुझ्याबरोबर ने. मी तिथे चार घरची धुणीभांडी करीन, स्वयंपाक करीन, वाटेल ते कष्ट करीन.विठू चार घरी माधुकरी मागेल • माझा भार तुझ्यावर टाकणार नाही. पण मला आधार दे. इथे शेजारीपाजारी आम्हांला जगू द्यायचे नाहीत. पोरं तुझ्या छत्राखाली वाढतील. सन्मार्गाला लागतील. नाही म्हणू नको.'' असं सांगून बायाने भावाचे अक्षरशः पाय धरले.काय करावं? मोठा पेच गोविंदापुढे पडला. त्याची काय जहागिरी नरसोबाच्या वाडीत उतू जात नव्हती. सागव्यासारख्या कुग्रामात पोट जळत नाही.म्हणून बापाच्या माघारी घर बंद करून तो कोणाच्यातरी आश्रयाला गेलेला. काशीकर सावकरांच्या वाड्यात मागील बाजूला एका पडवीत तो,बायको आणि त्याची चारं मुलं कसेबसे दिवस ढकलायची. तीर्थक्षेत्र असलं तरी तिथेही पोटार्थी ब्राह्मणांचा सुकाळ, केवळ उपाशी रहावं लागत नसे एवढीच जमेची बाजू. तरीही बहिणीचं आर्जव ऐकल्यावर त्याच्याने नाही म्हणवेना.

घर बंद करून जमीन कसणाऱ्या कुळाकडेच धारेवर पडणात लावलेल्या कलमांची देखभाल सोपवून, दादा काळ्यांना लक्ष ठेवायला सांगून बाया गोविंदाच्या बिऱ्हाडी डेरेदाखल झाली. एक दिवस गेला आणि विठूने रोज माधुकरी मागून आणावी असं बायाने योजलं. गोविंदाबरोबर पाठवून विठूच्या डोईवर भोवरा ठेवून चकचकीत हजामत करवून घेतली.

संध्याकाळी नरसिंह सरस्वतीच्या समाधी समोर जाऊन बाया नी विठू समाधीच्या पाया पडली. नदी काठी धर्मशाळेत बसून बाया विठूला समजावून सांगू लागली,''उद्यापासून चार घरी जाऊन तू माधुकरी मागून आण.हा आपला धर्म आहे आणि त्यात काय कमीपणा नाही. मामा तुला कुणाकडे तरी भिक्षुकी शिकवायला ठेवील.तू मन लावून शिक आणि मोठा हो. एकदा तू आपल्या पायावर उभा राहिलास की आमचं दैन्य संपेल. एवढे मोठे दत्तगुरू पण ते सुध्दा भिक्षा मागून खातात. कोणाची चोरीमारी, अपहार करणं यापेक्षा अन्नाची भिक्षा मागणं, ती सुध्दा अशा पुण्यक्षेत्रात हे आपलं भाग्यच समज! देव आपली सत्वपरीक्षा बघतोय. हे दिवस जातील, मग भिकेच्या अन्नावर जगायला नको. मामाची परिस्थिती काय आहे हे दिसतंच आहे त्यांच्यावर किती भार घालायचा?तू विचारी आहेस.''



आईचं बोलणं ऐकल्यावर समोर कृष्णेच्या पात्रात उडी मारून जीव द्यावा असं विठूला वाटलं. दुपारी चौपदरी हातात घेऊन निसगेपणाने ‘ओम भवति भिक्षांदेही’ करत फिरणारे माधुकरी दिसल्यावर तो मनात कुचेष्टेने हसलाही होता. पण उद्यापासून आपणही त्यांच्या माळेत उभं रहायचं हे सत्य त्याला पचवणं अवघडं वाटलं. काहीही न बोलता तो विषण्णतेने बसून राहीला. उद्याच्या विचाराने रात्री विठूला घास गिळवेना. अन्न तोंडात फिरायला लागलं. अन्न टाकून तो उठला. रात्री तर त्याच्या डोळ्याला डोळा लागेना.

सगळी झोपल्यावर गुपचूप बाहेर जाऊन कृष्णेच्या पाण्यात उडी मारायची असा निर्धार करून तो टक्क जागा राहिला. ताटकळून - ताटकळून अखेर उत्तररात्री त्याचा डोळा लागला.स्वप्नात तो माधुकरी मागायला रस्त्याने चाललेला अन् थोरा मोठ्यांची मुलं फिद्री फिद्री हसत त्याच्याकडे बोट दाखवित राहिलेली.‘अरे, तो बघ भिकाराडा! मोठा स्वाभिमान दाखवत होता ना ! पण आता बघ अन्नासाठी कसा भिक्षां ऽऽ देही करत फिरतो आहे बघा!’त्यांच्या या उद्गारासरशी आपला निर्धार आठवून विठू उठून बसायला लागला पण कोणाचा तरी बळकट पंजा त्याच्या मस्तकावर दाबला गेला.विठू चमकून बघायला लागला. भगवी छाटी घातलेला कोणीतरी गोसावी... त्याने विठूला बळेच दाबून धरलेलं. छाटीधारी म्हणाला,‘‘बाळ,आईने काय सांगितलं ते विसरलास? मुंजीत भिक्षा मागितलीस की नाही......? त्यापूर्वी भटजींनी काय सांगितलं आठव...यापुढे भिक्षा मागून आपलं पोट भरायचं. आपला भार दुसऱ्यावर टाकायचा नाही. ब्रह्मकर्म शिकायचं आणि स्वतःचा उदरनिर्वाह करण्याचं सामर्थ्य मिळवायचं. तू आणि तुझी भावंडं यांची जबाबदारी कुणावर टाकून तू जीव द्यायला जाणार आहेस ? तू गेल्यावर आईचे, भावंडांचे काय हाल होतील याचा विचार केलाहेस? शांत हो... अविचार करू नकोस.’’

दुसऱ्या दिवशी मध्यान्हीला चौपदरी घेऊन विठू घरा बाहेर पडला.

मामाने सांगितलेल्या वाटेने चालत निघाला. पहिलाच वाडा दिसला तिथे दिंडी दरवाजातून आत जाऊन ओसरी समोर थांबून त्याने खणखणीत आवाजात भिक्षेची याचना केली,'ओम् भवति भिक्षांऽऽदेही!' तो वाडा नारायणशास्त्री दिवेकरांचा! नारायणशास्त्री हे व्युत्पन्न पंडित आणि ख्यातनाम वैद्य. ते ओसरीवर कुणा रुग्णाची नाडी बघत बसलेले. विठूचे 'ॐभवति भिक्षां देही' हे खणखणीत बोल कानात पडताच त्यांनी चमकून समोर पाहिलं. अत्यंत तेजःपुंज गोरापान असा ब्राह्मणाचा मुलगा म्हणजे साक्षात श्रीनृसिंह सरस्वती दतात्रेयच बालरूपात भिक्षेसाठी आल्याचा प्रत्यय येऊन ते सद्‌गदित झाले. नारायणशास्त्रींना काय प्रेरणा झाली कोण जाणे? ते तसेच उठले अन् दरवाजापाशी जाऊन त्यांनी पत्नीला हाक मारली,''अहो, आतला कमंडलू घेऊन बाहेर या.''

त्यांच्या हाकेसरशी लक्ष्मीबाई लगबगीने कमंडलू घेऊन बाहेर आल्या.अंगणातला गोंडस, तेजस्वी मुलगा बघताच त्या चकित झाल्या. नारायण शास्त्रींनी खूण करताच त्यासुद्धा त्यांच्या मागोमाग अंगणात आल्या.पती-पत्नींनी विठूचे पाय धुतले अन् स्वतःच्या उपरण्याने शास्त्रीबुवांनी त्याचे पाय पुसून त्याला चरणस्पर्श करून नमस्कार केला आणि आत चलण्याची विनंती केली.विठूला आत नेऊन त्यांनी चौरंगावर बसवलं.दोघांनीही त्यांच्या अंगठ्याचं तीर्थ घेतलं अन् तो कोण, कुठचा, कशाला आला याची चौकशी केली. भांबावलेल्या विठूने नाव सांगितलं, ''विठ्ठल दामोदर काळे.'' मी कोकणातून आलो. उपळे माझं गाव.मी, माझी आई, लहान भाऊ आणि बहिण मामाबरोबर इथे आलो.''शास्त्री म्हणाले, ''बाळ, तुझे गोत्र, प्रवर सांगता येईल?'' विठू म्हणाल, ''हो ! मी शांडिल्य गोत्री, पंचप्रवरी यजुर्वेदी शाखेतला.'' पत्नीकडे वळून शास्त्री म्हणाले, ''शंकाच नाही! अहो, हा बाळ साक्षात नृसिंह सरस्वतींच्या कुळातला. हे तेज, हा बाणा हा त्यांचाच वारसा आहे.''

मग विठूची साद्यंत चौकशी करून शास्त्रीबुवा आणि पत्नी त्याच्या मामाच्या बिऱ्हाडपर्यंत आले.बायाला तिच्या मुलांसह शास्त्री बुवांनी आपल्या

वाड्यात रहायला यायची विनंती केली. बायाचे कर्मभोग आता फिटल्यातच जमा झाले. नारायणशास्त्रींच्या आधाराने बायाच्या मुलांचा विद्याभ्यास सुरू झाला. सहा सात वर्षांनी उपळ्यातल्या कलमांचे साली १०/१२ रूपये उत्पन्न सुरूझाले. हळू हळू उत्पन्न वाढत वाढत ठोक ऐंशी शंभर अशा मोठ्या रक्कमा लागल्या. दादा काळे हिशोबाचा कागद नी रक्कमा पाठवित. जवळ जवळ सोळा वर्षाचा काळ मागे पडला. विठू नारायणशास्त्रींचा रुग्ण चिकित्सेचा वसा पुढे चालवू लागला. दूरदूरचे रूग्ण विठूच्या औषध योजनेने रोगमुक्त व्हायला लागले. सुशी नृसिंह वाडीतल्याच जोगांच्या घरात पडली, तर श्रीरंग बी.ए. पर्यंत शिकून पुण्याला सर परशुराम कॉजेलात नोकरीला लागलेला. लक्ष्मीसारखी सून आणि नातू यांच्या कौतुकात बायाला दिवस पुरेना.अठरा वर्षात कुणीच गावाकडे फिरकलं नाही की तिथल्या लाजिरवाण्या जिण्याची स्मृती उगाळलेली नाही. पण एके दिवशी आईबरोबर दत्तात्रेयाच्या पादुकांचे दर्शन घेऊन नदीकाठी पायऱ्यांवर बसल्याबसल्या विठू म्हणाला, ‘‘आईऽऽ अलीकडे तात्या एकसारखे माझ्या स्वप्नात येऊन घरी चल म्हणताहेत.घरच्या देव्हाऱ्यातलं पंचायतन मला दिसतं. एक सुलक्षणी श्वेत धेनु आमच्या घरासमोर अंगणात उभी राहून हंबरताना मला दिसते. आई, मला घरी उपळ्याला जाऊन रहावंसं फार वाटतं. माझं भाग्य तिथल्या मातीतच आहे.’’ विठूने एवढं सांगितल्यावर बायाला काही शंका-कुशंका काढायला वावच राहिला नाही. फक्त विठूत जीव गुंतलेल्या नारायण शास्त्रींची अनुज्ञा मिळणं बाकी राहिलं.

दिवसवार बघून बाया, विठू, श्रीरंग त्यांच्या बायका आणि विठूचा मुलगा असा सगळा गोतावळा मूळ गावी जायला निघाला. घरी पोचेपर्यंत संध्याकाळ होत आलेली. घराच्या पडव्यांची पडझड झालेली पण माजघर मात्र शाबूत राहिलेलं.परांगदा झालेली काळ्यांची माणसं परत आली हे ऐकल्यावर सगळा गाव जमा झाला. देवधरानी घर दुरूस्ती होईपर्यंत त्यांच्याकडे राहायचा आग्रह केला. तरीही काळे मंडळी निग्रहाने माजघर बेणून तिथेच राहिली. दुसरे दिवशी दादा काळ्यांचा मुलगा जगू नी कलमांची देखभाल करणारा भिकू शेवरे आला.मग भाऊ-भाऊ कलमांच्या बागेत फिरु

लागले. तात्यांचे कष्ट कलमांच्या रुपाने फळाला आले याचं प्रत्यंतर त्यांना आलं. घर दुरूस्तीचा बेत ठरवून श्रीरंग आणि त्याची बायको पुण्याला निघून गेली. चार दिवसांतच घर दुरूस्तीचं काम सुरू झालं. बायाने पदर खोचून सगळं आवार आरशासारखं लख्ख बेणून काढलं. गडी माणसांची लगबग सुरू झाली.

एके दिवशी दुपारची जेवणं झाल्यावर विठ्ठलशास्त्री झोपाळ्यावर बसलेलेअसताना बन्याबापूंची सून काळ्यांकडे आली. आल्याआल्याच विठ्ठलशास्त्रींना नमस्कार करून ती बाई घो - घो रडायला लागली. तिचा नवरा-बन्याबापूंचा थोरला मुलगा दिनकर आसन्नमरण अवस्थेत शेवटच्या घटका मोजीत असलेला!त्याच्यावर उपचार करण्यासाठी विठ्ठलशास्त्रींना बोलवायला ती आलेली. शास्त्रीबुवा लगेच उठून तिच्याबरोबर बन्या बापूंच्या घरी गेले.जलोदराने पोटाचा नगारा झालेला दिनकर यातून वाचत नाही हे शास्त्रीबुबांनी त्याला पहाताक्षणी ओळखलं.आपण उपचार करून उगाच अपयशाचे धनी होण्यापेक्षा असंच माघारी जावं असा विचार त्यांच्या मनात येऊन गेला.पण दिनकराच्या बायकोचा उजळलेला चेहरा बघून तिच्या समाधानासाठी तरी काही उपचार करून बघावे असं त्यांनी ठरवलं.तसंच नारायणशास्त्रींनी त्यांना केलेला उपदेशही आठवला- ‘वैद्याने केलेली चिकित्सा अगर औषध योजना ही केवळ निमित्तमात्र असते. कोणाही रूग्णाची आयुष्यरेषा विधात्याच्या हातात असते. म्हणून अपयशाला भिऊन उपचार न करणं हे वैद्याच्या पेशाला लांछन आहे. रूग्ण जोपर्यंत जिवंत आहे. तोपर्यंत उपचार करणं हे वैद्याचं आद्य कर्तव्य आहे.’नारायणशास्त्री आणि श्री नृसिंह सरस्वतीचं स्मरण करून विठ्ठल शास्त्रींनी दिनकराची नाडी धरली आणि औषधयोजना नक्की केली.

जवळ जवळ पाऊण महिना रोज तीन खेपा घालून शास्त्रीबुवा जातीनिशी औषध द्यायचे. दिनकरचं फुगलेलं पोट हळूहळू ओसरू लागलं. दुखण्याला उतार पडू लागला तसा शास्त्रीबुवांचा आत्मविश्वासही वाढला. दिनकराची आयुष्यरेषा बळकट होती की शास्त्रीबुवांचा हातगुणही थोर होता

श्री दत्तगुरू जाणे! पण दीड महिन्यांनी दिनकर हिंडू फिरू लागला.दिनकर शास्त्रीबुवांच्याउपचाराने असाध्य व्याधीतून बरा झाला हा सगळ्यांच्या चर्चेचा विषय झाला.शास्त्रीबुंवाकडे नानाविध रूग्णांची रीघ लागली. दिनकर, त्याची बायको यांनी वारंवार विनवणी करूनही शास्त्रीबुवांनी आपल्या उपचाराचा मोबदला सांगितला नाही. उलट ‘तुमच्या सद्‌भाग्यामुळेच माझ्या उपचाराला गुण आला. जनलोकात मोठा लौकिक मिळाला’असं शास्त्रीबुवांनी सांगितलं.नाही म्हटलं तरी बन्याबापूच्या दुष्ट कृत्याची उगाळणी लोकांनी केलीच.काही लोकांनी तर त्याला तोंडावरही आडपडद्याने सुनावलं.त्यात भर म्हणजे शास्त्रीबुवांनी उपचारादाखल एक पैसुद्धा घेतली नाही. प्रत्यक्ष सुनेने आणि मुलानेसुद्धा बन्याबापूला ऐकवलं,“तात्यांना फसवून तुम्ही त्यांचं सोन्यासारखं घरभाट गिळंकृत केलंत अशी वंदता आहे. पण विठ्ठल शास्त्रींनी मनात डूख न धरता दिनकरला जीवदान दिलंच पण त्याचा मोबदलाही घेतला नाही.”

“कसायालासुद्धा दया यावी, एवढा देवतुल्य मनुष्य!अजुनही तुमचं मन तुम्हाला खात असेल, त्या केल्या कृत्याची शरम वाटत असेल, तर त्याचं ठिकाण त्यांना देऊन टाका! तुमच्या पापाची फळं पुढच्या पिढ्यांना नका भोगायला लावू.” बन्याबापू कानकोंडा झाला. केलं कर्म त्याला खायला येऊ लागलं अन् तिन्हीसांजेला तो विठ्ठल शास्त्रींना भेटायला गेला. दिनकरच्या आजाराबद्दल आभाराचं बोलून झाल्यावर बन्याबापू म्हणाला, “तुम्ही गेल्यानंतर दहा- बारा वर्षे माडा-पोफळीचं उत्पन्न मला मिळालं. माझं ऋण फिटलं. आता तुमची ठेव तुम्हाला परत द्यावी असं सून- मुलगा सांगताहेत. तेव्हा आता तुमचं ठिकाण शेतजमीन नी घरभाट तुमच्या ताब्यात घ्या. मी तुम्हांला बक्षीसपत्र करून देतो.”

विठ्ठलशास्त्री शांत,संयमी आवाजात म्हणाले,“बन्याबापू, तुम्ही मला वडिलांसारखे!’ तुमचा उपमर्द करण्याची माझी इच्छा नाही. पण जे काय त्यावेळी झालं त्याचा साक्षीदार माझी- आई अजून जिवंत आहे.जे झालं ते झालं. आमच्या नशिबात वनवास होते.आता दत्तात्रेयाच्या कृपेने बरे

दिवस आले आहेत. मला काही कमी नाही. ठिकाण आमच्या तात्यांनी तुम्हांला दिलं ते दिलं. मला त्याची अभिलाषा नाही. देणारच असाल तर ठिकाण सोडून दुसरी एक गोष्ट मागेन म्हणतो. म्हणजे माझा तसा आग्रह नाही पण....'' शास्त्रीबुवांचं बोलणं अर्धवट तोडत बन्याबापू उतावळेपणाने म्हणाला, ''मागा ...मागा माझ्या मुलाला तुम्ही जीवदान दिलंत. पूर्वीच्या घटनेबद्दल मनात अढी न धरता तुम्ही जाती निशी खेपा घालून दिनकरवर उपचार केलेत म्हणून तो वाचला. मुलाच्या आयुष्यापुढे मला कोणतीच गोष्ट मोठी नाही. तुम्ही काय मागाल ते देईन. लक्ष्मी येण्याच्या तिन्हीसांजेच्या वेळी मी दिला शब्द फिरवणार नाही. निःशंक मनाने मागा. तुम्ही मागाल ते द्यायचें वचन मी तुम्हाला देतो.''

शास्त्रीबुवा काय मागतात हे त्यांची पत्नी आणि आई कानात प्राण आणून ऐकू लागली. घसा खाकरून आवंढा गिळत शास्त्रीबुवा म्हणाले, ''बन्याबापू, तुमच्याकडून कर्जाऊ घेतलेली रक्कम ठरलेल्या व्याजासह तात्यांनी दिली होती. फक्त प्रॉमिसरी नोट त्याच वेळी परत मागून घेतली नाही ही त्यांची चूक झाली, असं आई म्हणते. कायदा वस्तुस्थिती जाणत नाही...पुरावा जाणतो. पैसे दिल्याचा पुरावा तात्यांकडे नव्हता हीच त्यांची चूक झाली. त्याची शिक्षा त्यांना भोगावी लागली. माड पोफळी लावलेल घरभाट नी शेतजमीन त्यांना तुमच्या हवाली करावी लागली. ही गोष्ट खरी आहे की नाही? एवढंच सांगा... सत्य आहे तेच सांगा... मी हेच मागणं मागतोय तुमच्याकडे... द्यायचं असेल तर द्या...''

अवाक झालेला बन्याबापू मान खाली घालून म्हणाला,''होय, सत्य आहे... मी झंक मारली, कर्जाऊ घेतलेली रक्कम ठरलेल्या व्याजासह तात्यांने दिलीन होती. माझी बुद्धी त्यावेळी फिरली खरी..!''

# ४. धन्वंतरीचा वसा

राजा धुवाळ्याला साप चावला. त्याचा चुलता, वाडीतले झिलगे सोबत घेऊन बोंबा मारत भांब्याच्या मांगराकडे आला. दंश करणारं जनावर मारुन त्याने ते बरोबर आणलेलं. जनावर उताणं करुन भांब्या किलकिल्या डोळ्यांनी बघू लागला.''म्हाताऱ्या! अडीच पाराचा हये जनावर.'' त्याचा पोरगा गंग्या पटकन म्हणाला. सख्या धुवाळी मान हलवत म्हणाला, ''हां हां बराबर. दीस उगवोन दोन घंटे झाले असती नसती. उडदळीत जोतां धरलेली हुती. राजो कोपरे मारी हुतो. नी ह्या लचांड मेरेसून भायर इला. उजवे पायाच्या आंगठ्याक ढास मारुन जनावर परातला आनी ढास सोडून मेरेतल्या बिळात जावक लागला. राजो निसतो ब्बांव मारुक लागलो. जोतये जोता सोडून धावले.''

''राजो बिळाहारी ब्वॉट दाकवित हुतो. परशान् बीळ खणलान् हात दोन हात तवा साप मिळालो. मी राजाचो पाय बगलो. सापाचो डवस बघलो सोत्ता. डोयेचो फडको सोडून पोटरेक वेढे मारले आनी गाठ आवळली ज्याम. झिलगे राजाक उचलून घरी घेवन ग्येले. आम्ही धाव मारीत इलाव तुझ्याकडे.'' सख्याचं बोलणं लक्षपूर्वक ऐकणारा भांब्या मान डोलवत म्हणाला,''हां....हां त्ये ब्येस क्येलं. म्हंजी सापाचा डंवस झाला त्येला येक कलाक उलाटला असंल. मी गंग्याला घेऊन वसद काडतो आनी येतो बेगीन धुवाळवाडीत. आता माजा वय झाला. वसद लय खोल खणावा लागतो. त्ये माना आता सुधरत न्हाई. ह्ये पोरगं व्हईल तयार माज्या हाताबुडी. तुमी होवा फुडं. डंवसकऱ्याला पाणी पाजा. दुसरा काय खायला द्येव नकू. तुमी कुडवाळी खान्याला मरनार म्हणून बजावला. पोरगं वाचेल... काय भेव करु नका...''

बापलेक टाकोटाक औषध आणायला निघाले.सर्पदंशा वरचा कंद

दुव्हाळीजवळ चिखलवटीच्या भागात हमखास मिळायचा.भांब्याच्या खापर पणजापासून त्यांच्या घरात वैदगिरी पिढीजात चालत आलेली. धनगराचं घराणं आसमंतात प्रसिध्द. सर्पदंश, जलोदर, काळपुळी, दोषी ताप, नागीण, मुतखडा,भगंदर, कावीळ, बाळंतपणात अडलेल्या बाईला सुलभ प्रसुतीवर औषध, लहान मुलांचे गोवर,कांजिण्या,नाळगुत, डांग्या खोकला, हगवण असे आजार, त्याखेरीज जनावरांच्या आजारावर आणि विताना अडलेल्या जनावराची सुटका करणं... नाना आजारांवरची हुकमी औषध धनगर देई. सर्पदंशाचा रुग्ण तर भांब्या हमखास बरा करीत असे. सर्पदंशाचे अगदी अखेरच्या टप्प्यात गेलेले रुग्ण... हिरड्यातून रक्त यायला लागलं, श्वास कोंडायला लागला आणि आता आटोपला बाजार असे जीवनमृत्युच्या सीमेवरचे रुग्णही भांब्याने जगवलेले.दुव्हाळीजवळ गेल्यावर भांब्या नेहमीच्या जागेवर गेला.पाऊस उलगत येऊन कडधान्य पेरायचा तो हंगाम.औषधी कंदाच्या पात्यांना केसरे फुटून पार झालेली नि सुकलेल्या पात्या जमिनीवर पडलेल्या.पात्यांवरुन कंद कसा ओळखायचा ते पोराला दाखवून भांब्याने त्या ठिकाणी खणायला सांगितलं.

''गंग्या, ढोपरभर ख्वॉल खण म्हंजी कांद्याची हाडी उमग्येल. जरा सावद खण.हाडीला कुदलीचा ढका लागता उपेग न्हाई.'' गंग्या खणायला लागला. भांब्या न्हायला व्हाळात उतरला. आंघोळ झाल्यावर काष्टीचा फडका सोडून तो धुऊन पुन्हा काष्टी लावून तो व्हाळाबाहेर पडला. म्हातारा येईतो गंग्याने औषधी कंदाची हाडी खणून मोकळी ठेवलेली. म्हातारा खाली बसत म्हणाला,''जा तू पन आंग धुऊन घे. ह्या वसदाला पारोशा अंगान घडायचे न्हाई मंग गुण येईत न्हायी...''गंग्या अंग धुऊन आला.''आता मद भागातला येक कांदा घ्ये आनी बाकीची हडी माती लोटून बुजवून टाक नी वर खुणेसाठी तीन धोंडे मांड.पुन्ना कदी वखूत आला तर हुकमी वसद मिळते इथे. गीमात पात्या सुकून तुटून गेल्या की वसद सोदायला भारी पडते.''मुंड्याच्या खिशातला अडकित्ता काढून भांब्याने कंदाची साल तासून टाकली नि त्याच्या चार फोडी करुन त्या खिशात टाकल्या.

''गंग्या,सालपटा उचलून लांब टाकून द्ये. कदीपन वसद देताना ते वळकू येया नाय पायजे. मग्ये ओसदाचा गुण येईत न्हाय. तेचा नाव बी कंदी फोडायचा नाय. नी ही ईद्या गुरु क्येल्याशिवाय द्येयाची न्हाई. माज्या बापानं माना लई लोंबवले तेवा ही इद्या माना भेटली.'' बापलेक धुवाळवाडीकडे निघाले. गावथड जवळ आली. धारेवर हारीने काजूची झाडं लागली. त्याच्या खोडावरची वितभर साल भांब्याने काढून घेतली. साल काढलेल्या भागावर धुरळा थापून टाकला. सालीच्या बारीक पिंजोळ्या करुन घेतल्या.आता ती साल कुठल्या झाडीची आहे हे ओळखू आलं नसतं.

बापलेक राजा धुवाळ्याच्या घरी पोहचले तेव्हा राजावर विषाचा बराच अंमल चढलेला दिसला. भांब्याने पाटावरवंटा आणायला सांगितला. कंदाच्या फोडी चांगल्या ठेचून ठेचून त्याचा थलथलीत गलका केला. जुनेराचा वितभर तुकडा ओला करुन त्यावर कंदाचा गलका ठेवला. दंशकऱ्याच्या तोंडात बोट घालून त्याची जीभ अंगठ्याखाली धरली आणि त्याच्या घशातच रस पिळला. चमचा दीड चमचा रस पडला. मग चंचीतला लखलखीत चाकू काढून दंश झालेल्या जागी उभे आडवे छेद घेतले. थोडं रक्त वाहून गेल्यावर कंदाचा उरलेला चोथा जखमेवर चेपून फडक्याने बांधून टाकला. काजीच्या सालीचा वाटून वाटून थोडा रस काढला. तो रस दंशकऱ्याच्या कानशिलांना, छाती पोटाला चोळला. हात धुतले आणि भांब्या पान खायला बसला. घटकाभरात राजाला वांती झाली. ''आता ईख उतरले... आता भेव संपले. पोराला पानी पाजा आनी मिरची द्येवा चावायला.''

राजाला मिरची तिखट लागली. म्हणजे विष नक्की उतरलं याची खात्री झाली. माणसांनी सुटकेचा निःश्वास टाकला. धनगरानेआज्या पणज्याच्या वैदगिरीच्या गप्पा सुरु केल्या.भांब्याचा पणजा तरुण असताना वाघोटणला डाक बंगल्याचं काम सुरु होतं. कुणी इंग्रज अंमलदार ते काम बघायला घोड्यावर बसून आला. कातळावर पाय फसला नि घोडा जो आडवा झाला तो वर उठायलाच तयार होईना. आजूबाजूचे जाणकार आले. पण घोड्याची 'अवेदा' काय आहे याची परीक्षा होईना. मग कुणीतरी

गोवळातल्या इंज्या धनगराचं (भांब्याचा पणजा) नाव सांगितलं. कोतवाल धनगराला बोलवायला रवाना झाला. अंमलदाराने बोलावल्याची वर्दी ऐकून इंज्या हादरुन गेला. गाठ ब्रिटीश अंमलदाराशी होती. बरं तर बरं नाहीतर खडी फोडायला जेलात जायची पाळी होती. कोतवाल समक्ष आल्यामुळे न जाऊनही गती नव्हती. मूळवसाच्या पाया पडून इंज्या बाहेर पडला.

इंज्या जवळ जाताच घोडा फुर्रर्रऽऽफुर्रर्र करायला लागला. हातातला दांडा कातळावर खण् खण् आपटून इंज्याने घोड्याला जरा दबवलं आणि नीट परीक्षा केली.घोड्याचा उजवा खांद उतरलेला होता. चार कोंबडीची कवटं, हळद, तुरटी ही सामग्री मागवून घेतली. एका वाडग्यात अंडी फोडून त्या बलकात हळद, तुरटी टाकून चांगलं मिश्रण केलं. सात-आठ बापयांनी घोड्याला जाम धरलं.अंड्याचा बलक दुखीच्या खांद्यावर ओतून हाताने खांदा चांगला मळून नरम पडल्यावर इंज्याने घोड्याची टाप हातात धरली. त्याचा पाय ढोपरात दोन-तीन वेळा दुमडून सैल करुन लांब ताणून धरला.आपल्या खोटांनी घोड्याच्या पोटवळावर नेट देऊन घोड्याचा पाय नेटाने वर लोटला. त्याबरोबर खट्ट ऽऽ असा आवाज झाला.खांद्याचं हाड जागेवर बसलं आणि गड्यांना झिंजाडून जनावर ताड्कन उठून उभं राहिलं. खांद्याची सूज उतरण्यासाठी पाळंमुळं उगाळून लावायला दिली.गरम पाण्यात मीठ टाकून ते सांध्यावर ओतायला सांगितलं. अंमलदार खूश झाला. सायबाने त्याकाळी चांदीचे पंचवीस रुपये आणि उत्तम ठासाची बंदूक अशी ‘बक्षिसी’ इंज्याला दिली.

भांब्याची गप्पाष्टकं होईतो राजाला चांगला उतार पडला.‘‘तेला तिसऱ्या रोजाला बापू मिराशाकडून मंत्राचे पानी घाला. तवसर न्हायला देऊ नगा.पथ्य आंबाट, तिकाट, तेलकाट, वशाट खायाचे नाय. दोन रोज शित पन दाकवू नगा. फक्कस पेजेचा घोट नायतर आंबील द्येयाची.’’ बापलेक उठून घराकडे निघाले.वाटेत गंग्या म्हणाला,‘‘अरे म्हाताऱ्या, धुवाळ्याने शेरमापटे तांदूळ-नाचणे दुकून न्हाई घ्येिले.’’करवादून भांब्या म्हणाला,‘‘पोरा, ते कुलवाड्या जात लय हरामी. पन वैदगिरी ह्ये द्येवाचं काम.मानूस जगला

ते आपली बिदागी. माना माझ्या बापूसाने बजावला. कोन मानूस शेरमापटे खुशीन द्येईल तर घ्येयाचे. न्हाय देले तर रंजीस व्हऊ नकू. परपंचाची कालजी द्येवावर.त्येच्यावर भरोसा ठिवून आपून आपल्याच्यान व्हईल त्ये करावे. तू बी हे शबूद ध्येनात ठेव. पटत आसले तर शीक वैदगिरी. न्हाईपेक्षा माजी इद्या माज्यासंगे मातीत ग्येली तरी माना परवा न्हाई.पैशाची अट घालून ओसद द्येईल त्ये रांड कमाई... त्येचावर थुकतो म्यां...''

भांब्याने बापसाचा शब्द पाळून वैदगिरी केली म्हणून त्याचा हातगुण होता. ढोरांच्या बाबतीत तर ज्या घरच्या जनावरावर उपचार केले तिथं तर तो पाणीसुद्धा पीत नसे. मोबदला कुणी विचारलाच तर 'मोन गायत्री'च्या औषधाचा विक्रा केला तर त्याचं शेण जाईलगा माझ्या तोंडात..' असं तो सांगायचा. या असल्या व्यवहारामुळे मात्र त्याचा उदरनिर्वाह खुटू रुटू चालायचा.आजूबाजूला नाव मात्र मोठं झालेलं. वैद्यगिरीमुळे वेळी - अवेळी कुणीही कुठेही बोलवायला येई. शेतीची कामं रखडत, धड होता होईना. शेरडं मात्र दोन खंडी होती. स्वतःवैद्य असल्यामुळे त्याच्या शेरडांना कसला साथीच्या आजारांचा त्रास होत नसे. शेरडं चरवायला कायम ओलवस असलेला दुव्हाळीचा परिसर.

सणासुदीला मटणासाठी बोकड खपत. त्याचे बरे पैसे मिळायचे. म्हणून दोन वेळा नेमाने चूल पेटत असे इतकंच. वैदगिरी ही फुकट फौजदारी. एकतर माणूस प्रसंगात असायचं. अशावेळी देणंघेणं कुणाला सुचावं? आणि भांब्याला काही दिलं नाही तरी चालतं या लौकिकाचा पुरेपूर फायदा कुळवाड माळवाड घेत. काही घरंदाज-तालेवार घराणी मात्र मळणीच्या वेळी धनगरासाठी मण-अर्धा मण नाचणे-भात बाजूला काढत. सुगीच्या वेळी धनगर अशी मळणी गोळा करी. सुरुवातीला म्हाताऱ्याचं वागणं गंग्याला पटत नसे, पण बापसाबरोबर चार ठिकाणी फिरल्यावर गंग्याचे डोळे उघडले. सर्पदंश नाहीतर असाध्य आजाराने मृत्युशय्येवर पडलेल्या रुग्णाची स्थिती... त्याची अगतिकता पाहिल्यावर आपल्या औषधाने त्याला गुण येऊ दे.तो जगू दे.देणंघेणं गेलं खड्ड्यात हे गंग्यालाही पटलं. माणूस आजारातून बरा झाला की त्याने केलेली भलावण...

लोकांकडून मिळणारा आदर याचं मोल त्याला उमगलं.

बापाबरोबर फिरुन गंग्याने पुष्कळ औषधांची माहिती करुन घेतली. रोगाची पारख कशी करायची? लक्षणं कशी ओळखायची? कोणतं औषध कसं योजायचं? वेगवेगळ्या आजारपणाची पथ्यं कोणती? अशी वैद्यगिरीची माहिती घेऊन तो तरबेज होत चालला. भांब्या त्याला घेऊन वेळी अवेळी दुव्हाळी जवळ टेंबावर, देवराईत फिरुन यायचा. त्याचं कारणही तसंच होतं. काही औषधं चांदण्यात खणावी लागत. काही औषध शुक्र उगवल्यावर खणायची असत. काही दिवसा उजेडी, काही तिन्हीसांजेला, काही अमावस्या पौर्णिमेच्या दिवशी. त्याशिवाय पाळंमुळं एवढीच औषधं नव्हती. काही वनस्पतींची केवळ पाने, केवळ फुलं किंवा शेंगा, काहींच्या फळांची फक्त सालं किंवा आतलं बी एवढंच औषध असायचं. काही झाडं-वेली विशिष्ट मोसमात मिळणारी होती.

विशिष्ट रोगावरची औषधं फार दुर्मिळ. त्यांची नेमकी ठिकाणं माहीती करुन लक्षात ठेवावी लागत. काही औषधं समुद्राच्या भरती-सुकतीचे ताण बघून पैदा करायची असत. वैद्यगिरी म्हणजे सामान्य काम नाही हे गंग्याला पुरतं उमगलं, पण आपला पिढीजात व्यवसाय सुरु ठेवून घराण्याचा लौकीक चालवायचा या ईर्षेने गंग्या म्हाताऱ्याचा शब्द न् शब्द हृदयात साठवायचा. झोपेचा कितीही अंमल असला तरी सुद्धा उत्तररात्री म्हाताऱ्याची हाक कानात पडली की गंग्या तट्कन उठून बसे अन् बापलेक भ्रमंतीसाठी बाहेर पडत. काळोख्या रात्री सगळा परिसर एकदम अनोळखी वाटायचा. दिवसा उजेडी चटकन् उमगणाऱ्या वनस्पती काळोखात किंवा चांदण्यात सुद्धा उमगून काढणं कठीण कर्म व्हायचं. काळपुळीवर औषध असलेली वेल चांदण्यात बघितली की एकदम वेगळी दिसायची. हिरवी कंच पाने चांदण्यात चांदीसारखी चमचम करायची. वेळी अवेळी औषधं हुकमी शोधायची म्हणजे सगळा परिसर तोंडपाठ व्हायला हवा. म्हणूनच वेळ मिळेल त्या त्या वेळी म्हातारा पोराला बरोबर घेऊन रानोमाळ हिंडे.

कावीळ, परमा, सर्पदंशावरचं एक औषध, दोषी ताप अशा काही रोगांवरची औषधं 'मंत्रून' द्यायची अट असे. अन्यथा त्यांचा गुण येत नसे. गंग्याची बरीचशी तयारी झाली याची खात्री झाल्यावर भांब्याने त्याला मंत्र द्यायचं ठरवलं. हे मंत्र ग्रहणाच्या वेळी पाण्यात बुडून म्हटल्यावर सिद्ध होणारे असत. मंत्र जिथे घ्यायचा तो परिसरही शुद्ध असण्याची अट असे.त्या दृष्टीने दुव्हाळी जवळच्या पावणाईच्या देवळाचा परिसर चांगला होता. कोनशीचा टेप सुरु झाला की टेपाच्या उगवत आणि मावळत अशा दोन्ही अंगांनी दोन बारमाही पाण्याचे वहाळ वाहत येऊन एकत्र व्हायचे अन् तिथून पुढे एका धारेने गावदरी पार करुन दर्याला जाऊन मिळायचे. उन्हाळ्यात पाणी कमी होऊन टेपापासून दर्यापर्यंतचा भाग कोरडा पडायचा पण कोनशीच्या टेपापर्यंत जितवणी असायचं.

उगवतच्या वहाळाने हाकेएवढं अंतर चालून गेलं की, उंच दरड सुरु व्हायची. त्या दरडीवर वडा -पिंपळाचे पार लागायचे नि त्यांच्यापुढे पावणाईचं मंदिर. पावणाईचा सभा मंडप चांगला ऐसपैस. देवीचा गाभारा सभामंडपापेक्षा कमरभर उंचीवर.गाभाऱ्यात दोन हात औरस चौरस काळवत्री चबुतऱ्यावर मध्यभागी असलेली वरवंट्यासारखी हातभर उंच शिळा. तिच पावणाई! नवसकऱ्यांनी घातलेले सोन्याचे दागिने कायम देवीच्या अंगावर असायचे. एका बाजूला आड रानातलं देवीचं देऊळ, त्यात देवीच्या अंगावर शंभरापेक्षा अधिक सोन्याचे दागिने. कुठे पेटी नाही की कडीकुलूप नाही. रांधपाच्या भांड्यापासून तो दागिन्यांपर्यंत सगळं उघड्यावर. देवस्थान जागृत.नवसाला पावणारी म्हणून पावणाई.

पावणाईच्या उजव्या अंगाला व्हाळात मोठी कोंड...उन्हाळ्यातसुद्धा तुडुंब भरुन वाहणारी... ती जागा मंत्र घ्यायला एकदम नामी! ग्रहणाची वेळ धरुन भांब्या पोराला घेऊन तिथे आला. दोघंही आंघोळ करुन देवीच्या पाया पडले. देवीचे पुजारी भटवाडचे बापू मिराशी,दोघेही त्यांच्या पाया पडले.देवीला नारळ ठेवल्यावर बापूंनी गाऱ्हाणं घातलं आणि दोघेही ओल्या अंगाने पुन्हा कोंडीवर गेले. भांब्याने गंग्याच्या कानात तीन वेळा मंत्र

सांगितला. गंग्याने तो नीट लक्षात ठेवला. बारा अक्षरांचा तो मंत्र एका दमात सात वेळा असा सात खेपा पाण्यात बुडून म्हटल्यावर सिद्ध करायचा होता. दुसरा होता तो अठरा अक्षरांचा! हा मंत्र एका दमात नऊ वेळा असा नऊ आवर्तने करुन सिद्ध व्हायचा होता.

ग्रहण सुटण्यापूर्वी गंग्याचे मंत्र घेऊन झाले. आता कधी प्रसंग येईल त्यावेळी फक्त आंघोळ करुन एकदा मंत्र म्हटला की पुरेसं होणार होतं. मात्र मंत्राची पाळणूक म्हणजे मोठंच दिव्य! तेही म्हाताऱ्याने समजावून दिलं.जेवताना बोलायचं नाही, जेवताना कांडपाचा, जात्याचा, धुण्याचा, विटाळशी बाईचा आवाज कानावर आला तर ताट बाजूला सारुन तसंच उठायचं.अमावस्येला हजामत करायची नाही. हे मंत्र ज्या रोगांना वापरायचे अशा रोगाने गांजलेला रुग्ण भेटायला आला तरी भरल्या ताटावरुन उठायचं.मंत्रून द्यायची औषधं ओलेत्याने काढायची आणि मंत्रवायची. औषध नेऊन रुग्णाच्या स्वाधीन करेपर्यंत किंवा रुग्णाला औषध न्यायला आलेल्या इसमाला देईपर्यंत इराकतीला जायचं नाही. सगळ्या पाळणुकी गंग्याने ध्यानात घेतल्या. त्या सहज जमणाऱ्या होत्या, पण विटाळाशी बाईचा आवाज कसा ओळखायचा ही शंका त्याने विचारली. कोणतीही पाळणुकीला बाधा येणारी गोष्ट मांत्रिकाच्या लक्षात आली नाही तरी अशी गोष्ट घडल्यावर कानात खण्ण-खण्ण असा आवाज येईल, तो आला की मांत्रिकाने ओळखायचं.

बापलेक पुन्हा देवीच्या देवळात गेले. बापू मिराशी देवीला आंघोळ घालीत होता. देवीच्या पाया पडून दोघंही सभामंडपात बसले. पूजा करुन बापू बाहेर आले. म्हातारा हात जोडून त्यांना म्हणाला, ‘‘भटजीकाका, माज्या लेक आता वैद झाला. माजी सगळी इद्या द्येली तेका.’’बापू हसत म्हणाले, ‘‘ठीक झाले. तू आता म्हातारा झालास. तुजे डोळ्यांदेखत तुजा लेक वैदगिरीला लागला हे बरे झाले. देवीची कृपाचम्हणायास हवी.’’ म्हातारा म्हणाला, ‘‘काकानू, माना येक भविस् इचारायचं होते.’’

बापू देवीचे पुजारी.त्यांच्यावर देवीचं वारं होतं. देवीच्या गाभाऱ्यात

बसून ते सांगतील त्याची प्रचिती यायची असा लोकांचा गाढ विश्वास! बापू गाभाऱ्याकडे निघाले.म्हातारा मागोमाग जाऊन गाभाऱ्याच्या दारात टेकला. देवीच्या चबुतऱ्याजवळ बापू थोडा वेळ डोळे मिटून बसले. देवीचा संचार झाल्यावर ते म्हणाले, ‘‘आता विचार काय ते.’’‘‘गंग्याचं लग्न कधी होईल?सोरगत कुठल्या दिशेला शोधायची?’’ही विचारण भांब्याने केली. देवीची कुड बोलली, ‘‘गोवळाच्या उत्तरेला तरळा, नाधवडे ते गगनबावड्या पर्यंतचा टापू. तिथे होरा आहे.पोरगी कामाडी,देखणी मिळेल पण तिस पाच कन्या झाल्यावरच मुलाचा योग संभवेल.दुसरा होरा गोवळाच्या ईशान्येस कासार्डा, पियाळी,फोंडा ते पार राधानगरीपर्यंत दिसतो. पाव्हणा तालेवार पण पोरगी काळी. काम आंग मोडून करायची हौस नसेल. नांदायला जरा कुरकुर करील पण तिस दोन मुलगे होतील. मूळवस राजी करुन पावणाईस चोळी लुगड्याचा नवस केलास तर आडमेळं दूर होईल. कोणची सोरगत करायची ते तुझ्या खुशीवर. आजपासून अवसेपर्यंत काय शब्द काढायचा नाही.

अवसेनंतर प्रयत्न कर. महिन्याभरात काम यशावर जाईल. काम झालेवर नव्या जोड्यास देवीच्या पायावर आणून घाल.’’ म्हाताऱ्याने दुसरा होरा मनोमन नक्की केला. अवस उलटून दोन दिवस मागे पडले. धुवाळवाडीतले गाडीवाले फोंड्याचा बाजार करायचे. म्हाताऱ्याने त्यांच्या कानावर विषय घालून गंग्यासाठी सोरगत बघायला गळ घातली. दहा दिवसांनी फोंडा बाजार करुन परत येताना गाडीवाल्यांनी मागाडी आणली. राधानगरीजवळच्या विठ्या खराताची पोरगी त्यांना उमगलेली. म्हातारा, गंग्या, जावई भिक्या आणि नादातला सगेवाला असे चौघं राधानगरीला गेले. देवीने सांगितल्या प्रमाणे विठ्या खरात मोठा मालदार! धनगर असूनही दहा एकर शेती, चार जोते, नोकर चाकर असा मोठा बारदाना असलेला. हा तालेवर धनगर गंग्याला आपली पोरगी देणार नाही असं भांब्याच्या जावयाला वाटलं. आपली शंका त्याने सासऱ्याच्या कानात सांगितली. भांब्याने च्यक् च्यक् करत म्हटलं,‘‘ तू बगच आता. माना मोटा ईश्वास हाये. इथे शबूद वाया जाईत न्हायी...’’

कोण,काय, ते बोलणे झाल्यावर विठ्या खरात खुशीत आला. भांब्याची ख्याती त्याच्या ऐकीवात होती. त्याचा पोरगासुध्दा लेकीला शोभणारा...बापासारखा वैदगिरी करणारा म्हटल्यावर विठ्या राजी झाला. आत जाऊन घरवालीशी बोलून बाहेर आला.‘‘आमाला पसंत हाये तुमची सोयरीक.फोंडा बाजाराला तुमचा लई नाव घेतेत गा समदे गाडीवाले. तुम्हाला लई मान हाये लोकात. माझी बी योक आट व्हती. ल्येक देईन तर नामजद घराण्यात. आता म्हुरत काडूया, नी घेऊया बार उडवून.’’ भांब्याने मनोमन पावणाईला दंडवत घातला. जेवणं उरकून लग्नाची तीथ ठरवूनच मंडळी घराकडे निघाली. पाव्हण्यांना फोंड्यापर्यंत सोडण्यासाठी विठ्याने बैलगाडी जुंपली.

गंग्याचा संसार सुरु झाला.त्याची बायको भागी तालेवाराच्या घरात वाढलेली. गडी, पाहुणे यांनी घर भरलेलं.घराशेजारीच सगेवाले. गंग्याचा मांगर एकवशी, आडरानात. तिला मांगरात एकटं राहायला ‘भ्याव’ वाटायचं.म्हणून भांब्या मांगरात थांबायला लागला. त्याने फिरती बंद केली. वैदगिरीपण आता त्याला जमेना. कुणी जुनी ओळखीची माणसं अवचित यायची.गंग्या आतबाहेर असला की म्हाताऱ्याला भीड घालत. म्हातारा मग तरपासून सांगायचा, ‘‘वैदगिरी माजी कदवाच बंद झाली. मंतर - पाळनूक सगळे सोडले. माजा वय झाला.माना काय सुदरेना. पोराला ईद्या दिली. आता फकस घरच्या लक्षुमीला माजी राकान हाये कोनशातल्या काटी गत. माना आता पिडू नुको.’’

म्हाताऱ्याची फिरती बंद झाली खरी पण दिवसभर आराम करणं त्याच्या पचनी पडेना. त्याचं अन्न तुटत चाललं. तो एक वेळ जेवायचा ते सुध्दा किती? बचकाभर भात नायतर दोन कोर भाकरी. कधी कधी तर नुसतं शेरडाचं दूधच पिऊन ऱ्हायचा.लोट्यावर धारणाला टेकून डोळे मिटून पावणाईचं नाव घेत राहायचा.सुनेवर त्याचा भारी लोभ. आल्या गेल्याकडे तिचं तोंडभर कौतुक करीत राहायचा. तिच्या बापाच्या तालेवारीच्या गोष्टी ऐकवायचा. भागी म्हाताऱ्याचं जिवापाड करायची.

म्हातारा दिवसें दिवस आळायला लागला. थंडीचा मोसम सुरु झाला. एकदा कडक्याची थंडीची लाट आली त्यात भांब्या आटोपला. सगळी दुनिया म्हाताऱ्या वैद्याला मुठमाती द्यायला मांगराकडे जमली. आता पुन्हा भागी एकटी पडली, पण एकवशी राहायला आता ती सरावलेली, गंग्याच्या बिनकमाईच्या वैदगिरीबद्दल मात्र ती फडफडत राहायची.

गंग्या दिवस दिवस वैदगिरी करत घराबाहेर राहायचा.त्याच शेतीवाडीकडे दुर्लक्ष व्हायचं. भागीचा बापूस कुळवाड्यासारखा शेतीत राबायचा. घरात विपुल धान्य-धुन्य, मन मानेल तसं खायचं प्यायचं... नुसती चंगळ व्हायची. दादल्याकडे सोन्यासारखं कसब, हातगुणही चांगला. जरा व्यवहाराने वागला तर काटकसर ओढघस्त संपेल असं तिला वाटायचं. या गोष्टीवरुन ती कायम गंग्याचा जीव खायची. कुणी बारा बंदरचा माणूस वेळी - अवेळी मांगरावर येऊन थडकायचा. भागी त्याच्यावर करवादायची, ‘‘आता न्हाई येयाचा वैद... तो ग्येला चवळी पेराया. दोपारच्या वक्ताला यील ना घरी, तवा मागून घ्ये काय ती दवा. त्या पतूर बस गप्प तिथंच पावळीला... फुकाटची बैदा तिच्या मायला.’’

गंग्या दुपारी येईतो आडगावहून आलेल्या माणसाला कुठला थोप निघायल? तो अंदाजाने गंग्याला शोधत जायचा. गंग्या नांगरट थांबवून त्याला ‘वसद’ द्यायचा. काही वेळा  रोगी तपासून, त्याचं लक्षण- चाल चलन बघून औषध द्यायचं असे. मग गंग्या सरळ जोत सोडून घरी यायचा आणि त्या माणसाबरोबर चालू लागायचा. त्याचं जेवणखाणसुद्धा अवेळी व्हायचं. अन्न झाकून ठेवत भागी त्याची वाट बघत रहायची. ‘‘जेवण येळेला तरी येळेसरी घरी ऱ्हावाव म्हणतो म्या. मन ठ्येवून आपली शेती जित्राब करा नि मंग बसा फुकाटची वैदगिरी करीत...’’ ती गंग्याला सुनावायची. ‘‘रात ध्या कुट कुट हिंडत बसतायसा. हिकडं बक्कळ साप-किरडवं निगत्यात. माज्या जिवाला घोर लागून ऱ्हातो. मलाबी एकलीला हिंडायचं भ्याव लागतं की, तुमी बसा गावभर हिंडत आनी हिकडे साप-किरडाव डसून म्यां जातो की मरुन. वैदाची बायकु आसुदाबिगार मरुद्या.... मंग बसा की

बोंबलंत...''

गंग्या मागीलदारी गेला. धनसडीच्या बाजूला वेखंडाच्या कोंबऱ्या खणून चांगली ओंजळभर वेखंडाची कुडी काढली. ती उन्हात तापवून सुकवली. ''भाग्येऽऽ तुला साप किरडवाचा भेव वाटतो लई. तेच्यावर ह्यो रामबाण ओसद बग येकांडाचे. ह्या कुड्यानला दोरा बांधून चेपलीला, पायाला बांधून फिर बिनघोर. येक कुडे कडोसरीला खवून ठ्येव. ह्येच्या वासाला किरडू जवळ येयाला भिते. आम्ही रानामाळात रातदिवस फिरतावं... आमच्याबी पायातानाला येकांड बांदल्याले असते.'' मांगराच्या पाठी देवरण्यावरची वेलही तिला दाखवून ठेवली. विषारी जनावरावरचं ते औषध होतं. काय भावना झालीच तर वेलाची आठ-दहा पाने चावून चावून त्याचा गलका दंश झालेल्या जागेला चेपून धरायचा. उपचार होईपर्यंत असं दोन-तीन वेळा केलं की विष फाकत नसे. शिवाय मांगरात धारणाला बांधलेली शेंगही त्याने दाखविली. विष फारच भिनतंय असं वाटलं तर ती शेंग अर्धी झरवून पोटात घ्यायची.

माघात गंग्याचा सासरा विठ्या लेकीला आढाळायला आला. त्याला दम्याचा भारी त्रास. त्याच्यावरही त्याला औषध हवं होतं. गंग्याने दम्याची लक्षणं नीट विचारुन घेतली. ''हेच्यावर हुकमी इलाज हाये, पण तो बेस्तरवारी कारायला लागते. तुमाला त्या पावत चार रोज थांबायला लागनार.''सासरा उपचारासाठी लेकीकडे थांबला. गंग्याकडे येणारी माणसं तोंडभर स्तुती करायची गंग्याची, त्याला नावजायची. ''तुमचा जावाय म्हंजे द्येव मानूस. आमच्या भागात तेका लय मानतत. तेचो दवो खावन किती मानसांचो जीव वाचलोहा... तेचा हातगुन पन नावजतत लॉक.''सासरा फुलून जायचा. भागी मात्र चरफडायची.''बाबा, ह्ये समदं रिकामं मोटेपन गा. तोंडानं ग्वॉड बोलत्यात पन चिमटीभर दानं काय पदरात टाकत न्हाई. नुस्ती फुकाट फौजदारकी, शेतीचं काय धड निभंना ह्यांच्यान. कामाच्या धिबिडग्यानं लई कट्टाळले बग म्या.'' म्हातारा फक्त हसला. लेकीची कळ त्याला उमगली होती, पण जावाय करतो तेही गैर नाही असं त्याचंही मत

पडलं.

बेस्तरवारी पहाटेच गंग्याने सासऱ्याला उठवलं. दोघही न्हाऊन आले. गंग्याने सासऱ्याच्या उजव्या कानाच्या पाळीत शीर धरुन चांदीची तार टोचली आणि सुंकल्यासारखी पिळून ठेवली. गळ्यात गंड्याबरोबर बांधायला मुळ्या दिल्या. पथ्य विडी ओढायची नाही नि मटण खायचं नाही. सुंकलंसुद्धा फक्त वर्षभर कानात ठेवायचं होतं. जावयाने शीर धरुन टोचली त्याचवेळी छाती मोकळी झाल्याचं सासऱ्याला भासलं. दुसऱ्या दिवशी सासरा फोंडा बाजाराला जाणाऱ्या गाडीवाल्यांबरोबर निघून गेला. त्याच्या पुढच्या बाजारादिवशी त्याने भावकीतलं एक पोरगं लेकीकडे घरगडी म्हणून धाडलं. त्याच्यासोबत दोन जोंधळ्याची बुचडी, गुळाची ढेप, कसली कसली कडधान्ये, डाळ, लेकीला साडीचोळी, जावयाला मुंडी नि रुमाल, भुईमुगाच्या शेंगा... काय काय धाडलं. त्याचा दम्याचा त्रास आता बंद झाला.

सासऱ्याने घरगडी पाठवला खरा,पण त्याला काही तरी मजूरी द्यायला हवी होती, ती उचलून देणं कसं जमावं ही शंका गंग्याने बायकोला विचारली. पोरगा विठ्याच्या भागेल्याचा होता. त्याच्याकडे वर्षभर मजूरीला असलेल्या गड्यांमधला.त्याची मजूरी धान्याच्या रुपात द्यायची पद्धत असे.ती बाबा परभारे भागवणार होता.सासऱ्याच्या उपकाराने गंग्या कानकोंडा झाला, पण आता त्याच्या उरावरचा भार कमी झालेला.घरचा कामधंदा शिस्तीत व्हायला लागला. तरीही गंग्याच्या वैद्यगिरीबद्दलची भागीची पिरपिर कमी झाली नाही. औषधपाणी न्यायला आलेल्या माणसाकडून अगोदर बोली करुन गंग्याने मोबदला घ्यावा असं तिला वाटायचं, पण गंग्या काही ते मनावर घेईना. पाऊसकाळ आला. शेतीची कामं सुरु झाली. यावर्षी कायम पड टाकलेले भांगे जोताखाली आणायचे असा बेत भागीने योजला. सकाळीच भाकरी खाऊन गंग्या नि गडी जोत घेऊन गेले. भागी दुव्हाळी पर्यंत शेरडं लावून आली.त्यांच्यामागे राहावं लागत नसे. दोन कुत्री खांडाबरोबर राखणीला फिरायची. संध्याकाळी शिकवल्यासारखी शेरडं आडवून वाड्यापर्यंत आणायची. भागी मांगराकडे माघारी आली तर दारात

औषधकरी बसलेले. त्यांना टाळून भागी मागीलदारी गेली.

माणसं नजर ठेवूनच होती. कुणीतरी मागे जाऊन धनगरणीला हाक मारली. संर्पदंशाचा रुग्ण होता म्हणून गंग्याला न्यायला चार कोसांवरुन ते बापये आलेले. ते गंग्याची चौकशी करायला लागले. भागी त्यांना गंग्याचा ठाव ठिकाणा सांगायला राजी होईना. माणसांनी आर्जवं केली. दंशकऱ्याच्या जिवाशी गाठ आहे म्हणून विनवलं.‘‘तुमचा माणूस जगला काय म्येला काय… आमाला काय फरक पडतो? शेतीचा काम खोळंबल त्याचा काय? धनगराचा ज्यात तुमी धरतायसा काय? तेचा शेत पिकल तवाच च्यार गोटे मिळत्याल आमाला. की तुजा मानुस जगला म्हणून माज्या दादल्याला शेरभर रुपये देणार हाईंस का बुचड्यावाले…? दादला बसला रिकामी वैदगिरी करत आनी आमाला उपाशी मरायची वेळ आली की न्हाई? म्या बापाकडनं शेरमापटा आनला म्हणून रांदतोय दोन येळेला. माजी येळ थटली तर कोन माईचा लाल शेरमापटं टाकंल माझ्या पदरात. बोला की! तुमी दुसरा वैद सोदा. माजा दादला न्हाई यियाचा. नि म्यांबी त्येचा ठिकाना न्हाई सांगनार तुम्हास्नी…’’भागी अडून बसली.

माणसं रंजीस झाली. एक बापया बोलला,‘‘खरा हा तुजा दुकु, पण ही येळ कसली. सापाचा ईख उतरणारो दुसरो कोन वैद हा ह्या भागात? तू काय मागशी ता देव आमी, पण घोवाचो ठिकानो सांग ग्ये माज्ये आवशी.’’ नी तो भागीच्या पाया पडला.भागी खूश झाली. ‘‘आता ब्येस झालं बघा. दोन पायल्या तांदुळ आनि चांदीचं रुपायं दोन देशीला हित्त आनून? हाये कबूल?’’माणसांनी नाइलाजाने मान डोलावली. भागी ताठ शब्दांत म्हणाली, ‘‘नुसती मुंडी हालवशीला आनि मागनं फसवशीला. आयशीच्या कासट्याची शप्पथ खावा तरच ईस्वान ठेवीन म्यां…’’ माणसांनी शपथ घेतली तेव्हाच भागीचं समाधान झालं. तिने गंग्या कुठे भेटेल याच्या खाणाखुणा सांगितल्या, आपण तांदूळ नि रुपये मागितले हे दादल्याला सांगू नका.‘‘तुमी हून द्येवा त्येला’’ असंही बजावलं. माणसं गंग्याला शोधत गेली. गंग्या परभारेच औषध आणायला गेला.



दंशकऱ्याला औषध देऊन झालं. त्याला उतार पडला आणि गंग्या जायला निघाला.तेवढ्यात त्याला बोलवायला गेलेल्यांना आठवण झाली. आपण आयशीच्या कासट्याची शपथ खाल्लेली आहे.दंशकऱ्याच्या बापसाला त्यानी ही गोष्ट सांगितली. रुपये आता कुठून उभे करायचे ही पंचाईत होती. ते मागून पुढून द्यायचे. आत्ता तांदूळ बांधून द्यायचे असं ठरलं. दोन पायली तांदुळाची मोट त्यांनी गंग्याला आणून दिली. गंग्याला हा अनुभव नवीनच.

जिवावरचा प्रसंग आलेला असताना आपण असा मोबदला घेणं त्याला रुचेना. तो आढेवेढे घेऊ लागला. माणसांनी अतीच गळ घातली तेव्हा त्याला घेणंच भाग पडलं गंग्या मोटळं घेऊन येताना दिसल्यावर भागी हरखली.तिने घरात जाऊन तांदूळ ओतले नि रुपये शोधले.'बेन्यांनी फशिवलंच की... रुप्पय न्हाई देलं.' ती मनात म्हणाली.

दोन दिवसांनी दिवस उगवायच्या वेळेला दंशकऱ्याच्या घरातला माणूस मांगरावर आला. गंग्या तोंड धुवत होता. माणूस ओळखून तो म्हणाला, ''बरा हाये दंसकरी काय आजून तरास हाये?'' माणूस म्हणाला, ''तो बरो हा! उद्या त्येका मंत्राचा पानी घालूचा हा. तुका ह्या देवक् इलंय.'' मुंड्याच्या खिशातून दोन चांदीचे रुपये काढून त्याने गंग्याच्या हातात घातले.''छ्याछ्या! ह्ये काय नुको. तांदूळ देलास तेच म्वॉप झाले...''डोळ्यात पाणी आणून तो बापया म्हणाला, ''तू रागा जाव नुको आनी बायलेक हटकू नुको. तुका सोदूक बापये इले व्हते ना? तवा तुज्या बायलेन ही अट घतल्यान. इलेल्या बापयांक आवशीच्या कासट्याची शपथ घेवक् लावल्यान तवाच तुजो ठिकानो सांगल्यान. हे रुपाये घी नी आमका वचनासून मोकळे कर.'' आला माणूस तोंड फिरवून चालू पडला. काय करावं गंग्याला सुधरेना. त्याचं डोकंच भ्रमिष्ट झालं. तो तिरमिरीत घरात धावत गेला.


चुली समोर बसलेल्या भागीचा बुचडा धरुन तिला खेचत गंग्या म्हणाला,''त्या रोजी मान्सा डंवसकऱ्याक वसद घेयाला माज्या कडे इली...त्येंना तांदूळ नि रुपाये तू मागितलीस काय?''भागी तावाने म्हणाली,'' हां...म्या मागिटलं रुप्पय. वैदाला काय प्वॉट नसतंय? आनी तुला नसेल तर माला गरज हाय. माजा सौंसार अडलाया रुप्पायासाटी. येवडा जीव जगला दंवसकऱ्याचा आता तो कमवील की जलमभर बक्कळ रुप्पय, तुमी कामधंदा सोडून ग्येलास,तुमच्या कामाला येतेत काय ते माणसं. माला हवंत त्ये रुप्पय, द्यावा हकडं. ''कोपलेल्या गंग्याने रुपये बाहेर भिरकावून दिले आणि लाथा बुक्क्यांनी भागीला तुडवून काढलं. गडी सोडवायला मध्ये पडला त्यालाही चार तडाखे बसले. सैरभैर झालेला गंग्या

घराबाहेर पडला. तो तडक पावणाईच्या देवळाकडे निघाला.

भागीला आता क्षणभरही राहवेना. आयती लक्ष्मी चालून येण्याचा मार्ग तिने शोधून काढला पण नवऱ्याला दळिद्र्य आठवलं. ती गड्याला घेऊन रागाने बापाकडे राधानगरीला जायला निघाली. गड्याने मांगराचे दरवाजे झाकले. भागीला जावू नको म्हणून विनंत्या केल्या. निदान पाहुण्याला सांगून जाऊया असंही सुचवलं, पण भागीने त्याला चराचरा शिव्या घातल्या. नाइलाजाने गड्याला तिच्या सोबतीसाठी तरी निघावं लागलं. गंग्या गेला तो थेट पावणाईच्या देवळात जाऊन बसला. बापू मिराशी पूजा करुन बाहेर येत होते. गंग्याच्या चर्येवरुन काहीतरी बिनसलं आहे हे त्यांनी ताडलं. गंग्याला हटकल्यावर त्याने सगळा प्रकार सांगितला. बापू विचारी... धनगरणीची कळ त्यांनी ओळखली. लोक कामापुरते गोड बोलतात, भलावण करतात पण केवळ एवढ्यावर संसार चालत नाही. अतिरेक करु नये पण झाल्या कामाचा-कष्टांचा माफक मोबदला मिळावा अशी अपेक्षा धरणं यात तत्त्वतः काही गैर नाही. एखादा अडलानडला असेल त्याला द्याव मोफत औषध. अमूकच दे असाही अट्टाहास नसावा, पण वैदगिरी हे गंग्याच्या चरितार्थाचं साधन असल्यामुळे वाजवी मोबदला घ्यायला काहीच हरकत नाही ही गोष्ट त्यांनी निक्षून सांगितली.

''सर्वान् लक्ष्मीर्विशिष्यते...पैशाशिवाय सगळे फुकट आहे. तू कामधाम शेतीवर तुळशीचे पान ठेवून वैदगिरी करत फिरतोस पण तुझ्या उतवास काय धूर जात नाय. तुझंही चुकलंच. ज्याची उपत आहे त्यानेही फुकटात औषध न्यावं हे देवास पण आवडायचं नाय. त्याच्याकडून तू शेरमापटं घेतलंस तर ते काय पाप नाय व्हायचं.अरे, तुझी लक्षुमी ती! तिज आधी समजून सांगायचे. पुन्हा असे केलेन तर देयचे दोन रट्टे, पण तू तरी अतिरेकच केलास. जा! घरी जा! तिची आधी समजूत काढ नि ह्यापुढे मी सांगितले तसा वाग. मग भांडायचा प्रश्नच येयचा नाय.'' बापूंनी उपोद्‌घात केला.गंग्या खूप वेळ विचार करत मख्खासारखा बसून राहिला. घटकाभराने बापूंनी पुन्हा ढोसणी दिली तेव्हा उठून मांगराकडे निघाला.

गंग्या घरी पोचला. दार उघडून आत गेला. बराच वेळ वाट बघितली पण भागी किंवा गडी कुणाचाच पत्ता नाही. भागी रागावून माहेरी तर गेली नसेल ना? हा विचार त्याच्या मनात आला. मग त्याने आंघोळ करुन भात शिजत टाकला. चुलीजवळ टोपल्याखाली टोपात शेरडाचं दही दिसलं.भात शिजल्यावर अर्धा कुत्र्यांना राखून ठेवला नि अर्धा दही घालून मिठाच्या दाण्याबरोबर खाल्ला. जेवून उठल्यावर भागी गड्याला घेऊन बापसाकडे गेली की काय? याची चौकशी करावी म्हणून मांगर बंद करुन तो बाहेर पडला. फोंड्याकडे जाणारी वाट राणेवाडीतून गेलेली. त्याने राणेवाडीत चौकशी केली. भागी रडत भेकत चाललेली नि पाठून गडी! बघणारे भेटले. विषण्ण मनाने गंग्या घरी परतला. लोकांत हसं झालं. पाव्हणा भांडण करील... बापूंसारख्या विचारी माणसाने आपल्याला बोल लावला तिथे इतरांची काय कथा? त्याचं मन त्याला खायला लागलं.



संध्याकाळी दिवेलागणीच्या वेळेला साण्यातल्या दिव्यात कडूतेल घालून त्याने वात पेटवली.जेवणावर त्याची वांछाच नव्हती. रात्री उशिरापर्यंत तो विचार करत बसून राहिला. मध्यरात्रीच्या सुमारास ‘हुं हुं हुंऽऽहुं’ हुमण ओरडल्याचा आवाज आला. नीट वेध घेतल्यावर लक्षात आलं की हुमण त्याच्या मांगराच्या आढ्यावर बसूनच ओरडते आहे. रात्रीच्या नीरव शांततेत

हुमणाचं भयाण ओरडणं ऐकून आयुष्यात प्रथमच त्याचं काळीज थरकलं. औषधासाठी रात्री - बेरात्री रानावनात हिंडणारा टणक काळजाचा गंग्या पण आज मात्र बाहेर जाऊन हुमणाला हाकलायचं त्याला भेव वाटलं. त्यातच दिव्यातलं तेल संपून ज्योत विझली. गंग्याने उभी रात्र जागून काढली. हुमणाच्या ओरडण्याची संगती त्याला लागेना.



सकाळी सगळी शेरडं वाड्याबाहेर काढून गंग्या पावणाईच्या देवळात गेला.बापूंची पूजा नित्याप्रमाणे सुरु होती. ते पूजा उरकून बाहेर सभामंडपात आल्यावर काळजारलेल्या सुरात गंग्या त्यांना सांगू लागला, ‘‘बापू, काल मी हिकडं इलो आनी माजी बायकू निगून ग्येली बापसाकडे. हाल्लीच तिच्या बापसान त्यांच्या वाट्यातला पोरगा गडी म्हणून हकडे लावून देलान्. त्येला वांगड घ्येऊन भागी ग्येली की निगून... बापू, रातच्याला मांगराच्या आड्यावर बसून हुमान वरडाय लागले हुंऽ हुंऽऽ करत. माजे कालीजच थराकले वो... आता काय व्हते कुनाला दकल... का सत्यानाश व्हतो माजा हेचाच भेव माला!’’बापू हसत म्हणाले, ‘‘अरे! हुमण ओरडले आढ्यावर बसून त्यात एवढे कशास भ्यायास हवे. ते तसे बसून ओरडले हे

चांगल्याचेच मानतात. ज्या घरात बाईल माणूस गुरवार ऱ्हाते त्या घराच्या आढ्यावर बसून हुमण ती सूचना करते. आता तुज मुलगा होणार बघ. त्याच्या पाचवीच्या घुगऱ्या मातर हुमणासाठी बाहेर ठेवायस विसरु नको.''बापूंच्या बोलण्यावर गंग्याच्या शिरावरचा मोठा बोजा उतरला. ''पण बापू, आता वो काय उपेग. भागी ग्येली की तिच्या बापसाकडे...''

खो खो हसत बापू म्हणाले,''एवडी काळजी करायचे कारण नाय. दोन शाणेसुर्ते बापये घेऊन जा सासऱ्याकडे. आपली चुकी झाली म्हणून सांग. मग बघ भागी तुझे आदी येयस बाहेर पडत्ये की नाय. बायकांचा राग तितकाच. तू बिनघोर जा नी भागीस घेऊन ये. तू येईस्तर हिकडची येवस्ता बघायस तुझ्या बहिणीस ठेव आणून म्हंजे झाले.''गंग्या बापूच्या पाया पडला. बापूंनी सांगितल्याप्रमाणे सगळी योजना त्याने आखली. बहिणीकडे निरोप धाडला. संध्याकाळी बहीण नि तिचा नवरा दोघंही आले. मेव्हण्याला सोबत घेऊन गंग्या दुसऱ्या दिवशी राधानगरीला जायला निघाला.

भागी बापसाकडे गेली ती रडत भेकतच. नवऱ्याच्या माराचे वळ दाखवून ती म्हणाली, ''आता म्या हितंच ऱ्हातो. म्यां दादल्याकडे नांदाय जानार न्हाय.'' बाबा काहीच बोलला नाही. जेवणं झाल्यावर त्याने गड्याकडे सविस्तर विचारुन घेतलं. झाली गोष्ट त्याने खड्यान खडा सांगितली. त्यांचं बोलणं सुरु असतानाच आत बायकांची धावपळ सुरु झाली. विठ्याने घरात डोकावून चौकशी केली. भागीला वांत्या सुरु झालेल्या. तिची आई म्हणाली, ''तुमी काळजी करु नगासा. मी बगतो काय ते बयाजवार.'' विठ्याने गड्याकडे शिस्तीत सगळी चौकशी केली. घडलेल्या प्रकारात चूक भागीचीच आहे हे त्याला पटलं.जावयाने रागाच्या भरात इतकं मारायला नको होतं हे खरंच, पण भागीने त्याला असं करायला भाग पाडलं. नाहीतर देवासारखा गुणी जावई या थराला गेला नसता असंच त्याचं मत बनलं.

त्याने गड्याला चांगलं खडसावलं,''म्या म्हनतो भागीचं डोस्कं फिरलं, पन तू एवडा शाना हयेस ना? जावायाच्या माघारी म्हायेरी पळ काडाया त्वां

कशी फूस दिलीस गा? जरा सबुरी धराय काय तुजा बा मरत व्हता रे भाड्या? तुला पावण्याकडे कोनी ठिवला सांग... म्यां की भागीनं? ह्ये लय वंगाळ क्येल गा तुमी. उद्या पावणा माला बोल लावंल त्येला काय उत्तर करु म्यां?आता जा घरला! चार रोजान लावून घेतो तुला पावण्याकडे...''

गडी घरी गेला. विठ्याची पोरगी नवऱ्याकडून पळून माहेरला आली ही बातमी गावभर झालेली.विठ्याचे सगेवाले त्याला आढळायला आले. त्यांनी चौकशी केली. विठ्या धोरणाने म्हणाला,'' आता बोलायचा काय कप्पाळ...रांड येडं प्वॉर पिसं जावाय घावलं त्ये बी तसं... तशीच गत की वो... घोव बायलीचं भांडान झालं. घरात कोन वडील मानूस न्हाय.वैदगिरी करत कट्टाळून आल्याल पोरगं... ही बया लागली त्येचं डोस्क खायाला... मंग काय नी काय.....दिलं चार रट्टं ठिवून आनी ही बया कांगावा करत आली की घरला...''

विठ्याच्या गप्पा सुरु असताना त्याची बायको दारात डोकावली. ''आवंऽऽ आयकतासा न्हवं... भागीला वकाऱ्या व्हत्यात... ती पोटुशी हाय. काय भेव वाटायचं कारन न्हाय...''देवाला हात जोडत विठ्या म्हणाला, ''घेवच पावला म्हना की... आता कसला भांडान नी काय. जावायाचा बा ग्येला त्याला वरीस व्हईल की दोन हप्त्यांनी... म्हातारं सुनेच्या पोटी जलम घेतंय जनु... लय नामजद मानुस. फोंड्याच्या बाजारापतूर मानूस वळकतंय की त्येला... मोट्ठा वईद व्हता माजा ईवाय... साप डसून मरत्यालं मानूस वाचविलं की दवा घेवून. जावाय बी माजं लय गुणी. पान न्हाई, सुपारी न्हाई, इडीकाडी, दारु-गांज्या काई न्हाई. वशाट बी खाईत न्हाई... मोट्ठा मांत्रिक हाये त्यो. तेचा बी हातगुण नावाजातेत समद्या दुनियेत. इक्ती वर्सं म्यां मरत हुतो दम्यान पन नुसतं कान टोचून माजा दमा घालिवलाकी...'' जावयाच्या मोठेपणाच्या गप्पा सांगून विठ्याने चौकशीला आलेल्या माणसांना चांगलं चितपट केलं.

रानाचा पडित भाग खणून पिकाखाली आणायचं जोरदार काम

सुरु होतं. विठ्याचे पोरगे-पुतणे रानातच तळ ठोकून राहिलेले. त्यांची जेवणं-खाणं घरुन पोचवत. दोन-तीन रोजात ते काम आटपणार होतं. तो धिबिडगा उलगल्यावर लेकीला पोचवायला जायचे बेत भागीचा बाबा आणि माय मनातल्या मनात योजत होती.एकदम माणसांचा कालवा ऐकायला आला. भागीचा चुलतभाऊ इराण्णा चांगला दांडगादुंडगा गडी... त्याला दोन गड्यांनी उचलून आणून ओसरीवर ठेवलं. त्याच्या डाव्या पायाची दवणशीर धरुन साप डसला. पोटरीला घट्ट आवळून फडका बांधलेला! तरीही विष भिनून इराण्णाच्या तोंडातून फेस गळायला लागलेला. भागीला थोडीशी माहिती झालेली. धारदार सुरी घेऊन तिने दंश झालेल्या भागाजवळ छेद घेतले. रक्त वाहायला लागलं. त्या भागात सापाचं विष उतरायची दवा देणारा कुणी वैद्य नव्हता.

इराण्णाची बायको पोरं, आईबाप सगळ्यांनी रडून आकांत मांडला. इराण्णा आता वाचत नाही म्हणून त्याची बायको कपाळ फोडून घ्यायला लागली. इराण्णाच्या डोळ्यांवर झापड यायला लागलेली. कुणीतरी त्याला वांती होण्यासाठी मिठाचं पाणी पाजलं. त्याला वांती झाली, पण विष कुठलं उतरायला... आता आपला दादला असता तर इराण्णा वाचला असता असा विचार भागीच्या मनात आला न आला त्याचवेळी गंग्या नि त्याचा मेव्हणा येताना दिसले. भागी धावतच पुढे गेली,‘‘धनीऽऽ द्येवासारकं आलासा बगा. माजा भाव आता मराय लागलाय. त्येला मोठा साप डसला. कायतरी विलाज करा... पोटाला चार ल्येकरं हायती त्येच्या. शिकस्त करा पन त्येला उतारा पडू द्या...’’

गंग्या पायावर पाणी ओतून इराण्णासमोर येऊन बसला. दंशाची जागा निरखली.इराण्णाच्या पापण्या उघडून बघितल्या.तोंड उघडून जीभ बघितली.‘‘भाग्ये,मला आंगूळ कराया व्हयी. ताजी कळशी भरुन पानी द्ये बेगीन.’’ गंग्याने मुंड्याच्या खिशातून पाळामुळांचा जुडगा काढून नेमक्या औषधी मुळ्या बाजूला काढल्या.त्या हातातघेऊन बाहेर आला. डोईवर कळशी ओतली. हळू आवाजात मंत्र म्हटला आणि हातातली पाळं ठेचून

पाणी घालून त्यांचा चटणीसारखा गोळा बनवला. इराण्णाच्या पायाचा दंश झालेला भाग पाण्याने स्वच्छ धुऊन त्यावर तो गोळा ठेवला आणि कापडी पट्टी त्यावर बांधली. इराण्णाची नाडी धरुन तो वाट बघत राहिला. अर्ध्या कलाकात नाडीची चाल वाढली. सासऱ्याकडे बघून तो म्हणाला, ''मामा, आता भेव कमी झाला. आता चार-पाच घंटे ईख चडायचे न्हाई. आजून येक ओसद सोदून आनायला पडते. रानाची चांगली म्हायती असनारा गडी देवा माज्या सोबत. तुमच्या भागात ते ओसद सोदून आनतो मी. मी शिकस्त कोशीस करतो! येस देणारी पावनाई.दवंसकरी वाचला तर आमच्ये पावनाईला साडी चोळी न्हेसवा. हाये कबुल?''



सासरा घायकुतीला येऊन म्हणाला,''त्येची काय काळजी करु नगासा.साडी चोळी तर न्हेसवतंय. माझा इराण्णा वाचू दे.देवीला आकरा पुतळ्याची माळ घालतो नि तुमाला बी फेटा बांधतो की पर पोराला माज्या जगवा.'' जाणकार बापये घेऊन गंग्या औषध शोधायला गेला.

मध्यान्ह टळून गेल्यावर औषध उमगलं. गंग्याने सोबत्यांना बाजूला नेलं. त्यांना तिथे थांबवून तो मूळ जागेवर आला. वेल खणून पाळ मिळवलं. खणलेली जागा ठीकठाक करुन तो सोबत्यांपाशी आला. जवळ जवळ धावतच सगळ्यांनी घर गाठलं. गंग्याने अर्ध पाळ उगाळून ते पाण्यात मिसळून इराण्णाला पाजलं. थोड्या वेळातच त्याला भडाभड वांती झाली. त्याला पाणी पाजलं आणि मिरची खायला दिली. इराण्णा जरा सावध झालेला. मिरची त्याला तिखट लागली नाही.त्याने आणखी मिरची चावून खाल्ली.गंग्याने उरलेलं पाळ सगळं झरवून टाकलं. ते पाण्यात मिसळून पाजलं. इराण्णाला परत वांती झाली. या खेपेला मिरचीचं जरांस टोक चावल्या चावल्या इराण्णाला तिखटं झोंबलं.''

''ईख उतारले...पावणाई पावली.''म्हणत गंग्याने सुटकेचा सुस्कारा टाकला.आता त्याने गुळपाणी मागितलं. बचकभर गूळ खाऊन दोन तांबे पाणी घटाघटा प्यालं.संगळ्यांच्या जिवात जीव आला.इराण्णाची बायको गंग्याचे पाय धरुन म्हणाली, ''तुमी देवासारकं आला बगा आनी माजं कुक्कू वाचिवलं. माजं धर्मभाव झालासा की तुमी. तुमचं उपकार जल्मभर लक्ष्यात ठेवतो बगा म्या.'' गंग्या संकोचला.विठ्याच्या दारात सगळा गाव जमलेला. जो तो त्याच्या जावयाची तारीफ करायला लागला. पोरीला हाक मारुन विठ्या म्हणाला,''भाग्येऽऽजावाय माजं यवडी चाल मारुन आले हित्त. त्यास्नी आल्या आल्या पानी विचारायचं बी सुधरलं न्हाई मला. डबऱ्यात ग्येलं म्हन की माजं वय बी आनी शानपन बी. जा पावण्यास्नी भाकरी करुन वाड जा पट्किनी...''इराण्णाची बायको पुढे येत म्हणाली,''तुमाला डुवाळं लागल्यात. तुम्ही कशाला घ्येताय तरास? म्या धर्मभाव म्हनलं न्हवं की त्यास्नी. म्या करती की भाकऱ्या...''

गंग्या आणि त्याचा मेव्हणा भाकरी खाऊन पलंगावर येऊन बसले. अंगणात बाया बापड्यांची नुसती गर्दी झालेली. विठ्ठल तात्याचा वैद्य जावई बघायला मुद्दाम माणसं आलेली. एखादा म्हातारा विठ्याला बाजूला घेऊन विचारी,''तुजं जावाय कंचं म्हनायचं?''अभिमानाने जावया जवळ

त्याला नेऊन विठ्या दाखवी, ‘‘ह्ये जावायबापू... तकडं कोकनात असत्यात. सा पिड्या वैदकी चाल्लीया त्यांच्या घरान्यात. पाक फोंड्यापातूर समदं लोक वळकत्यात की त्यास्नं. अक्षी  द्येवमानूस बगा. किती मानसं मरनातून वाचिल्यात बगा ह्येनी. पन आबिमान म्हंशीला तर न्हाई.वसदाचा मोबदला म्हनून योक तांबडा पैका नाही घ्येनार. सगळ्यास्नं फुकाट वसद द्येतेत की. मांत्रिक बी हायती की, हिंत माला आडळाया म्हणून आल्यात. हितं काय आवशद की फिवशद... मंतर मारुन वाचिवला की आमच्या इराण्णाला आमच्या डोळ्यादेकत...’’

गावचे पाटील, कुलकर्णी एवढे तालेवार!वेळे काळेलाही कधी धनगराच्या घराकडे न फिरणारे,पण दिवेलागणीच्या सुमारास ते सुद्धा धनगराचा मांत्रिक जावई बघायला विठ्याच्या घरी येऊन गेले. दुसऱ्या दिवशी सास्वेने पुरणा वरणाचा स्वयंपाक करुन जावयाला वाढला. इराण्णाच्या बापाने पाच तोळ्याचं सोन्याचं कडं गंग्याच्या हातात घातलं आणि तो नको नको म्हणत असतानाही त्याच्या पायावर डोकं ठेवलं. जेवण झाल्यावर गंग्या सासऱ्याशी बोलत बसला. सासरा भागीबद्दल काही विचारीत अशी भीती त्याला वाटत होती, पण त्या विषयाचा काय तो सोक्षमोक्ष लावायला गंग्या अधीर झालेला. सासरा अलाण फलाण गप्पा सांगत राहिला. मग गंग्याच धीर करुन म्हणाला,‘‘भागी काय म्हनत हुती?’’

सासरा हसत म्हणाला,‘‘भागीन् कशाला सांगव लागते, झाली गोस्ट काय लपून ऱ्हाती? हथं आल्यापासून सारक्या वकाऱ्या व्हत्यात तिला.ती पोटुशी हाये. तुमचा बा जल्म घ्येतो वाटतं...’’ काय  बोलावं गंग्याला सुधरेना.‘‘इराण्णा आता सुदारला की त्येला तीन रोजानी कडु पान्याचे न्हावान घालायचे. मग पंदरा रोज तरी पथ्य सांभाळा. सांच्याला आमी निगतांव.’’ ‘‘योक दिवसात कंट्टाळलायसा म्हना की. आता आलायसा तर दोन रोज ऱ्हावा. परवाच्याला घालिवतो की फोंड्यापातूर.बाजाराला गाडी पाटवायची हाये नव्हं फोंड्याला. तुमी बी जावा म्हनं बसून...’’ सासरा म्हणाला. आता राहणं भागच होतं. गंग्याला भागीशी बोलायची संधीच

मिळेना. त्याने मेव्हण्याला विचारलं तर तो म्हणाला,''तेनी गुळनी धरली जनु...आपुन कस्याला ईषय काडा... त्येंच्या मनात काय राग दिसत न्हाई.''

तिसऱ्या दिवशी गंग्यानेच इराण्णाला कडू पाण्याचे न्हावण घातले. सासऱ्याने गंग्याला, मेव्हण्याला धोतर बंडी देऊन दोघांनाही फेटा बांधला. सास्वेने दहा वस्तू मोटल्या बांधून दिल्या. गाड्या जुंपून झाल्या. गंग्या, म्हेवणा, गडी बाहेर पडले. गंग्याची पावलं जड झालेली. मोटा गाडीत चढल्या. मेव्हणा, गडी दोघंही गाडीत चढले. 'येतो आमी' म्हणत हात जोडून गंग्या वळला मात्र... माणसं जोरजोरात हसायला लागली. सासरा बोलला, ''जावयबापू, अवो खुळे की काय तुमी? मुद्याची गोस्ट इसारलाय की तुमी. भागीला का हथंच सोडून जाताय... तिला बलवा की...'' गंग्या भागीला बोलवायला माघारी निघाला आणि भागीला घेऊन सासू येताना दिसली. गंग्या तोंडभर हसला. भागी गाडीत चढली आणि गाड्या सुटल्या. गंग्या विचार करत होता की, माणसं अशी अवचित का बरं हसली असावी?

# ५. अखेरचा पर्याय

क्षुधा - तृष्णा या उर्मीची पर्वाही न करता रुरूची पायपीट अहर्निश सुरू झाली . ईप्सित पूर्ण होईतो अन्य विचारही मनात येऊ द्यायचा नाही असा त्याचा पक्का निर्धार होता. पंचनद प्रांत पार करताच त्याला हिमगिरीचे दर्शन झाले. पार आभाळात विरत गेलेली उत्तुंग हिमिशखरे अिण क्षितिज भेदून त्या पलीकडे पोचणाऱ्या पर्वत मालिका, पार्श्वभूमीवर हे दृष्य अधिकच गूढ करणारे अवकाशातील सप्तरंगांचे विभ्रम. नजरेतही न सामावणारी ती अनंतता पाहिल्यावर आपली मार्गक्रमणा योग्य दिशेने असल्याची खात्री रुरूला पटली. गणनाची मानवी परिमाणे थिटी ठरावीत असा विस्तीर्ण हिमगिरी ! तो उल्लंघून त्या पलीकडे दिक्कालातील मृत्युलोक गाठण्याची रुरूची दुर्दम्य इच्छा!! ती तर मानवी कल्पनेतही न साकारणारी अतीत ठरण्याजोगी !!! आता मृत्युलोक गाठायला फारसा अवधी नाही या विचाराने तो उत्तेजीत झाला.

प्रमव्देवरील उत्कट प्रेमापोटी मानवी सामर्थ्याला न पेलणारे मूर्ख साहस तो करू धजावला होता. महर्षि स्थूलकेशींनी यशाची किंचिंत शाश्वतीही व्यक्त केली नव्हती.उलट असे दु:साहस न करण्याची स्पष्ट सूचना दिली. पण क्षुधा - तृष्णा या उर्मीची पर्वाही न करता रुरूची पायपीट

अहर्निश सुरू झाली . ईप्सित पूर्ण होईतो अन्य विचारही मनात येऊ द्यायचा नाही असा त्याचा पक्का निर्धार होता. पंचनद प्रांत पार करताच त्याला हिमगिरीचे दर्शन झाले. पार आभाळात विरत गेलेली उत्तुंग हिमिशखरे अिण क्षितिज भेदून त्या पलीकडे पोचणाऱ्या पर्वत मालिका, पार्श्वभूमीवर हे दृष्य अधिकच गूढ करणारे अवकाशातील सप्तरंगांचे विभ्रम.नजरेतही न मावणारी ती अनंतता पाहिल्यावर आपली मार्गक्रमणा योग्य दिशेने असल्याची खात्री रुरूला पटली. गणनाची मानवी परिमाणे थिटी ठरावीत असा विस्तीर्ण हिमगिरी! तो उल्लंघून त्या पलीकडे दिक्कालातील मृत्युलोक गाठण्याची रुरूची दुर्दम्य इच्छा!!ती तर मानवी कल्पनेतही न साकारणारी अतीत ठरण्याजोगी !!

महर्षि स्थूलकेशींची मानसकन्या हिला आपण वरले असून तिच्याशी विवाह करण्याचा निश्चय रूरूने आपल्या पित्याकडे व्यक्त केला.पुत्राच्या इच्छा पूर्तीसाठी महाराज प्रमती यानी स्थूलकेशींची भेट घेतली.महर्षिनी उपचार म्हणून प्रमव्दरेची संमती विचारली. अधोवदना प्रमव्दरेचे मधुर हास्य हीच संमती मानून त्यांनी विवाह निश्चिती केली. उत्तरा फाल्गुनी नक्षत्रावर प्रमव्दरा रुरू यांचा विवाहनिश्चित झाला. आता तर प्रमव्दरा अहर्निश रुरूच्या चिंतनात मग्न राहू लागली.तिची अन रूरूची दृष्टभेट झाली त्या स्थळी तर तिच्या एकसारख्या फेऱ्या होऊ लागल्या.विवाहाला केवळ तीन सप्ताहांचा अवधी होता. प्रात:काली सुस्नात होऊन प्रमव्दरा फुले वेचण्यासाठी बाहेर

पडली.रुरूच्या चिंतनात मग्न असलेल्या तिला मार्गातील तो विषारी भुजंग दिसलाच नाही.तिच्या लक्षात येण्यापूर्वीच भुजंगाने तिच्या टाचेत आपले विषदंत रूतवले. आर्त किंकाळी मारून प्रमव्दरा भूमीवर कोसळली.भुजंग एवढा विषारी होता की, सख्यांनी तिला उचलून कुटीत नेऊन ठेवले त्याच क्षणी तिची प्राणज्योत मालवली.

प्रमव्दरेच्या मृत्यूची दुर्वार्ता राजप्रासादी आली.विवाह सोहोळया निमित्त राजप्रासादाचे सुशोभन सुरू होते.त्या दुर्वार्तेने प्रासादावर अवकळा आली.रूरूच्या ऱ्हदयाचे जणू स्पंदनच क्षीण झाले. तसाच प्रासादाबाहेर पडून तो अश्वारूढ झाला. महर्षिंच्या कुटी समीप येताच अश्वावरून उडी मारून पाय उतार होत तो तीरासारखा कुटीत प्रवेश करता झाला.त्याची ऱ्हदयेश्वरी अविचल झालेली पाहून त्याचे भानच सुटले."प्रमव्दरे तुझी प्राप्ती हे माझ `ध्येय होते. तुझ्याविना माझे जीवन व्यर्थ आहे....."तिच्या मस्तकावर हात ठेऊन मग रूरूने ती भीषण प्रतिज्ञा उच्चारली."प्रमव्दरे तुझ्या प्राप्तीसाठी मी प्रत्यक्ष मृत्युलोकी जाईन.मृत्यु देवतेकडून तुझ्या जीवनाचे दान प्राप्त होई पर्यंत हा रूरू कोणत्याही देह भोगाच्या अधीन होणार नाही.तुझे जीवन प्राप्त झाले नाही तर मी अग्निकाष्ठ भक्षण करीन".रूरूची ही प्रतिज्ञा ऐकताच त्याच्या स्कंधावर थोपटीत महर्षि म्हणाले, "राजकुमार.... प्रतिज्ञा मागे घ्या. प्रमव्दरेचे दु:ख सहन करण्याचे मनोधैर्य माझ्याकडे आहे. परंतु सम्राट प्रमती

आणि महाराणी पुत्रशोक सहन करणार नाहीत. कुमार.... मुत्यू अटळ आहे. मृताला पुनार्जीवनाची प्राप्ती तर असंभव. ते शक्य असते तर माझे तप:सामर्थ्य मी पणाला लावले असते. प्रसंगी प्रमव्दरेसाठी माझे जीवनदानही मी केले असते. मुत्यू ही विधी योजना आहे. त्यामध्ये कालत्रयी बदल होत नसतो. म्हणून अशी शक्य न होणारी प्रतिज्ञा आपण करू नये.” मात्र निश्चयी रूरू आपल्या प्रतिज्ञेवर अटळ राहीला.



“महर्षि विधिलिखित अटळ असते. तव्दत माझा निर्धार सुद्धा अटळ आहे. प्रमव्दरेशिवाय जीवन ही कल्पना मी सहनच करू शकत नाही. एकतर प्रमव्दरेची प्राप्ती अथवा आत्मसमर्पण हे दोनच पर्याय माझ्या समोर आहेत. मला निर्वेध यश मिळण्यासाठी आपण आशीर्वाद द्यावेत!” असे म्हणुन रूरूने

महर्षिंच्या चरणाला  स्पर्श केला."महर्षि आता या क्षणीच मी मुत्युलोकाच्या दिशेने मार्गस्थ होत आहे. मी येईपर्यंत प्रमव्द्‌रेवर अग्निसंस्कार करू नये.मी षण्मासांचा वायदा करीत आहे. हा काल पूर्ण होण्यापूर्वी मी प्रमव्द्‌रेचे जीवनदान प्राप्त करून परत येईन. नच आलो तर माझ्यासह प्रमव्द्‌रेचे और्ध्वदेहीक करावे." निग्रही रूरू मार्गस्थ होण्यासाठी कुटीबाहेर पडत असता महर्षिंनी त्याला थांबविले. मृत्यु लोकापर्यंत पोहोचण्याचा मार्ग कथन करून एक भक्कम वेत्रकाष्ट त्यांनी रुरूला दिले. "मार्गामध्ये सांगाती म्हणून हा वेत्र निरंतर तुम्हा सोबत राहू द्या....आता निघा...यशस्वी व्हा!" रुरू निघून जाताच प्रमव्द्‌रेच्या सर्वांगाला दिव्य वनस्पतींचा रस चोपडुन तिचे कलेवर सुरक्षित रहाण्यासाठी मधाने भरलेल्या मृतिकापात्रात ठेवण्यात आले.

कस्तुरी मृगाच्या गंधाने पूर्व स्मृतीत गढून गेलेला रूरू भानावर आला. आता सर्वत्र अंधार असल्यामुळे मार्ग दिशा यांचे आकलन होत नव्हते. तो एका वृक्षातळी विश्रांती घेण्यासाठी बसला. पंच पंच उषःकाली तो पुनश्च मार्गस्थ झाला. अवघड चढणीचा मार्ग पूर्ण हिमाच्छादित असल्याने अतिबिकट होता. केवळ निर्धार आणि आत्मसंयमनाच्या बळावरच त्याने वेदनांवर काबू ठेवला होता. पाय रक्ताळले, तहान, भुकेमुळे गात्रे शुष्क झाली अन् चेतना क्षीण होत त्या अवघड मार्गात तो मूर्च्छित होऊन खाली पडला. रूरूला जागृती आली. तेव्हा आपले मस्तक एका वद्धाच्या मांडीवर असल्याचे त्याच्या लक्षात

आले. दिव्य देहाचा कौपिनधारी वृद्ध त्याच्या मस्तकावरून हळूवारपणे हात फिरवीत होता.

अकल्पितपणे रुरूच्या मुखातून शब्द उमटले, "तात, माझ्या अवघड अवस्थेत पित्याच्या वत्सलतेने आपण मला थोपटीत अहात म्हणून नकळत माझ्याकडून अयोग्य संबोधनउच्चारले गेले. वस्तुतःतुमचा पुत्र म्हणवुन घेण्याची माझी पात्रता नाही. या मूढाला क्षमा असावी."रूरूच्या मुखातून उमटलेल्या संबोधनाने भारावलेला तो वृद्ध म्हणाला, " कुमार तुझ्या सहजोद्गारांनी मी धन्य झालो. तुम्हा मानवांमध्ये माता-पिता ही नाती सर्वश्रेष्ठ आहेत. मला नकळत का होईना तू परमोच्च पितृस्थानी बसविले आहेस. आता मला सत्यकथन करणे भागच आहे.राजकुमार,मी एक कर्तव्य भ्रष्ट गंधर्व आहे. या अधमाला विश्वावस्तु ही उपाधी आहे. तुझी प्राणप्रिया प्रमव्दरा, तिचा जन्म माझ्या अन् मेनकेच्या संबंधातून झाला आहे. विषय सुखाच्या क्षणिक उन्मादाने धुंद होऊन आम्ही भलतीच चुक केली.विषयतृप्ती झाल्यावर शिक्षेच्या भीतीने आम्ही या गोष्टीची वाच्यता केली नाही.गर्भकाळ पूर्ण होईतो मेनका गुप्तरूपाने पृथ्विवरच राहीली.प्रसुत झाल्यावर ती नवजात कन्या महर्षि स्थूलकेशींच्या कुटीसमीप ठेऊन मेनका निघून गेली. कुमार, कर्तव्यच्युत झालेल्या या गंर्धवाला तात ही उपाधी शोभत नाही."

"कन्येच्या स्नेहबंधामुळे मी गुप्तरूपाने महर्षिंच्या आश्रमात प्रमव्दरेला डोळाभर पाहात असे. ती अल्पायुषी आहे.

याचे पूर्ण ज्ञान मला होते. तुम्ही परस्परांवर अनुरक्त झालात हे समजताच मुक अश्रू ढाळण्याशिवाय मी काहाही करू शकत नव्हतो. तिच्या निधनाने तू दुःखार्त होशील याची पूर्ण कल्पना मला होती. पण तिच्या प्रेमासाठी असे काही भलते... मानवी आवाक्याबाहेरचे साहस तू करशील याची मला कल्पनाच येऊ शकली नाही. तुझ्या या अवस्थेला मीच कारणीभूत आहे.....राजकुमार रूरू या पतिताला तू क्षमा कर." आता वृध्दाचे रूप त्यजून विश्वावस्तूने आपले गंधर्व रूप प्रकट केले. रूरूला आधार देऊन बसते केल्यावर त्या गंधर्वाने जवळच्या काष्ट पात्रातले पेय द्रोणात ओतून रुरूच्या मुखाकडे नेत म्हटले, "तुझ्या प्रतिज्ञेची मला माहिती आहे. तुझे व्रताचरण भंग करण्याचे पातक मी करणार नाही हा द्रव हविष्यान्नाच्या रसामध्ये कमलपुष्पातील मध मिसळून मी खास तयार केला आहे.हे जल नाही आणि अन्नही नाही.याच्या सेवनाने तुझ्या प्रतिज्ञेचा भंग होणार नाही. उलट चैतन्याची पुन:प्राप्ती होईल."

तो मधुर रस कंठात उतरताच रूरूच्या शरीरात चैतन्याची लाट उसळली. "काष्ट पात्रातील सगळा द्रव तू प्राशन कर. याच्या सेवनाने तुझी इप्सित पूर्ती होईपर्यंत तुला क्षुधा -तृष्णा यांची जाणीवही होणार नाही. अगर तुझ्या शरीरातील चैतन्याचा उर्जा संचयही क्षीण होणार नाही." रूरूचे द्रवपान पूर्ण झाल्यावर त्याने यक्षाच्या चरणी मस्तक टेकविले. "गंधर्वराज! आपल्या दर्शनाने मी पावन झालो आहे. मी दुर्बल होऊन या

अवघड स्थानी मूर्च्छित होऊन पडल्यामुळे माझी प्रतिज्ञा भंग झाली असती.पण आपण मला योग्यवेळी सहाय्य केलेल्या कृतीमुळे आपले पापक्षालन झाले आहे. आता माझे इच्छित कार्य पूर्ण होईल याची मला खात्री आहे.प्रमव्दरेची प्रीती आणि आपले आशीर्वाद या बळावर माझे सामर्थ्य आणि निश्चय कालत्रयी क्षीण होणार नाही."

रूरूच्या स्कंधावर प्रेमाने थोपटीत गंधर्व म्हणाला, "राजकुमार तुझी आणि प्रमव्दरेची प्रीती युगानुयुगे चिरंतन राहील. तुझ्या ईप्सित पूर्तीमध्ये कसलीही अडचण येणार नाही . यासाठी माझे सामर्थ्य मी तुझ्या हातातील या वेत्रामध्ये बद्ध करीत आहे. हा वेत्र दक्षिण हाती घेऊन तू माझे स्मरण केलेस की तीन वेळा तुला माझे सामर्थ्य वापरता येईल. गरज पडेल तेव्हा या बळाचा तू योजकतेने वापर कर. ईप्सित पूर्ण होताच संकल्पपूर्वक हा वेत्र मस्तकाला टेकवलास की माझे सामर्थ्य मला परत मिळेल. मात्र या गोष्टींची तू वाच्यता करू नकोस. अगदी आवर्श्यक तेव्हाच अन् तुझे सगळे उपाय हरतील तेव्हा चातुर्याने या तीन वरदानांचा वापर कर! जा. यशस्वी हो!" अन् विश्वावस्तु अदृष्य झाला.

स्तिमित झालेल्या रूरूने क्षणभर शांतपणे विचार केला. मृत्युलोकात पोचेपर्यंत वृथा कालापव्यय टाळण्यासाठी गंधर्वा कडून प्राप्त झालेले वरदान वापरण्याचे त्याने ठरविले. वेत्र दक्षिण हस्ती धारण करून मृत्युलोकापर्यंत जाण्याची इच्छा व्यक्त करून त्याने नेत्र मिटुन घेतले. क्षणभरातच "तुझी इच्छा

पूर्ण झाली आहे.” असे स्वर कानीपडताच त्याने डोळे उघडण्याचे प्रयत्न केले. पापण्या उघडायला त्याला अती कष्ट झाले. आता पायाखाली, वर, आजुबाजूला सर्वत्र धूसर कृष्ण रंगाचे साम्राज्य असून चहुबाजूनी अनंतापर्यंत अंधुक होत जाणाऱ्या आकाशगंगा दिसू लागल्या.

भूमी,जल,वायू,कोणतेहि माध्यम नसलेल्या त्या भिन्न अवकाशस्थ भिंतींमध्ये त्याचा श्वासोच्छवास पूर्ण बंद होउन ऱ्हृदयाचे स्पंदनही थांबवल्याचे जाणवले. भिन्न जाणीवांच्या पातळीवर त्याचे अस्तित्व जिवंत आहे. हे लक्षात येऊन त्याची मती गुंग झाली. देहाचे अनावर ओझे सांभाळताना तर त्याला अति कष्ट होऊ लागले. मस्तकाचा भार असह्य होउन मेंदूला झिणझिण्या आल्या. त्या असह्य शरीर मनस्थितीतही आपल्या इच्छित कार्याचे स्मरण होऊन रुरू सावरला.वेत्रावर आपला देहभार तोलीत तो मृत्युलोकात प्रवेश करण्याच्या मार्गाचे शोधन करू लागला.एकाग्र दृष्टीने निरखल्यावर धूसर पटा आडून पाहिल्या प्रमाणे समोरच्या दृष्याचा बोध त्याला होऊ लागला. जेमतेम एक व्यक्ती कसा तरी प्रवेश करू शकेल एवढ्या अरूंद प्रवेशव्दाराच्या चारही अंगांनी दृष्टीपोचेतो उंच अन् लांबवर अस्पष्ट होत जाणारी लोहसदृष्य तटबंदी दिसत होती. एखाद्या अजस्त्र जलचराने उघडलेल्या विकराल जबड्याप्रमाणे दिसणारे ते मृत्युलोकाचे प्रवेशव्दार..... अन् प्रवेश मार्गातून दिसणारा अंतर्भाग रक्तिम कृष्ण वर्णाने खोलवर गुढ होत गेलेला!

महद्कष्टाने एक एक पाऊल निग्रहाने उचलीत रुरू

प्रवेश व्दारा समीप पोचला. आता मात्र प्रवेश मार्ग चांगला प्रशस्त आणि भव्य असल्याचे त्याच्या लक्षात आले. निरखून पहाताना अति तणावामुळे बुबुळे नेत्रपटल फाडून बाहेर येतील की काय?असे भय वाटून त्याने पापण्या मिटून घेतल्या. काळजाचे पाणी करणारे सर्प फुत्कार ऐकून त्याने नेत्र उघडीत पाऊल मागे घेतले. " मूर्ख मानवा, असा अविचार करू नकोस. हा मृत्युलोक आहे. तुझा साक्षात काळ असणारा मी एकादश मुखी नागराज तुला दंश करण्यास अधीर झालो आहे." तप्त ताम्ररस कानात ओतावा अशा वेदना करीत नागराजाचे शब्द त्याच्या कर्णात घुसले.भिती पेक्षाही ते शब्द कर्णपटलावर आदळले असता जो आघात झाला, त्यामुळे झालेल्या असह्य वेदनानी रूरूचा चेहरा वेडावाकडा झाला. त्याच वेळी आलेल्या उग्र कुबट सडलेल्या रक्तमासांच्या दर्पामुळे त्याच्या पोटात ढवळून आले.

तो विस्फारित नेत्रांनी पाहू लागला.गुंजेसारख्या रक्तवर्णी नेत्रातून जणू अग्निजिव्हा प्रज्वलित होत असल्याप्रमाणे बावीस प्रखर नेत्रांनी पहात अतीनील दुधारी जिव्हांची लवलव करताना अणकुचीदार विषदन्त दाखविणाऱ्या त्या अकरा फणा असलेल्या नागराजाचे दर्शन होताच रुरू थिजून गेला. अति कष्टाने एक एक शब्द उच्चारताना छातीवर येणाऱ्या दडपणामुळे रूरूच्या घशात रक्ताचे लोट जमा होऊ लागले."नागराज! मी मृत्यु देवतेला भेटायला आलो आहे. माझ्या प्रियतमेच्या प्राणांची भिक्षा मला मागायची आहे. माझ्या प्रियेला आपल्या भूमिस्थित बांधवाने दंश केल्यामुळे तिला अकाली मृत्यु आला आहे.

नागराज! केवळ तीन सप्ताहानंतर आम्ही विवाहबद्ध होणार होतो. सुखाचा प्याला ओठाला लावण्यापूर्वीच विधीने माझे चैतन्यच जणू शोषून घेतले आहे. माझ्या जीवनाचे श्रेयच जणू हरवले आहे.

आजवर कोणी मानवाने केले नसेल असे धाडस करून मी इथे आलो आहे. कृपा करून मला मृत्यु लोकात प्रवेश करू द्या." अन् रक्ताच्या गुठळ्या थुंकून रूरूने घसा मोकळा केला.त्वेषाने फुत्कार सोडीत नागराज म्हणाला, "मूर्खा! माझ्या भूमिस्थित बांधवाने तुझ्या प्रियेवर अनुग्रहच केला आहे असे समज. यातनामयमानवजन्मातून ती मुक्त झाली आहे. तू सुद्धा असाच माझ्या कुणा बांधवाकडून अनुग्रहित हो! अन् मग खुशाल इकडे ये. तो पर्यंत इथे येऊ नकोस..... जा! परत जा! जड देह धारी आत्म्यांना इथे प्रवेश नसतो. माझा क्रोधाग्नी क्षणोक्षणी भडकत आहे. माझ्या व्दिविंशती विषदंतानी तुझ्या देहाला कडकडून चावे घेण्याची माझी लालसा तीव्र होण्यापूर्वी तू इथून चालता हो. मी इथे असेतो तुला जिवंतपणे मृत्युलोकांत प्रवेश करणे शक्य नाही." व्दारपाल नागराजाच्या या दर्पयुक्त भाषणाने रूरूचा स्फुल्लिंग जागृत झाला. आपल्या प्रेयसीचा करूण अंत करण्यास कारणीभूत ठरलेला भुजंग.... अन् इथे वाट अडवून बसणाराही त्याचाच बांधव...! रूरूच्या अंत:करणातील सूड भावना जागृत झाली. वेदनांचा त्याला पूर्ण विसर पडला.

"मृत्युलोकाच्या व्दाराचे रक्षण करणारा तू म्हणजे एक अतिसामान्य मतीहिन असे क्षूद्र सर्प रूप! हा दर्प- अहंकार सुद्धा तुला शोभत नाही. भूमीस्थित नागांपेक्षा तुला दहामुखे अधिक

आहेत पण ती सर्व निरर्थक आहेत. त्यांच्याकडे असणाऱ्या सामर्थ्याचा अंशमात्रसुद्धा तुझ्याकडे नाही. दुतोंडी गांडुळाने आपल्या दोन मुखांचा अभिमान मिरविणे जसे निरर्थक आहे. तव्दतच अकरा सर्पफणांबद्दल असलेला तुझा अभिमानही अती क्षूद्र आहे. तुझा हा दर्प नष्ट करण्याचे सामर्थ्य या देहधारी राजपुत्राच्या बलसंपन्न बाहुंमध्ये जरूर आहे. माझ्या हातीच्या या वेत्राने तुझ्या एकादश फणांचा चेंदा- मेंदा करीन. मग गलितगात्र झालेल्या तुझ्या देहावर उन्मत्त लत्ता प्रहार करून तुझे रक्तामांस पायदळी तुडवीत मी अभिमानाने मृत्युलोकी प्रवेश करीन. मूर्ख नागा! आता वेत्रप्रहार करणे सोडच पण मी तुझ्यावर थुंकणारसुद्धा नाही."त्वेषपूर्ण भाषणाने मुखात जमा झालेल्या रक्ताची चूळ नागराज्याच्या दिशेने थुंकून रूरू म्हणाला, "तुझी एकादश मुखे,ती धारण करणाऱ्या तुझ्या फणा सारे काही भ्रामक आहे. त्या पेक्षाही क्षुल्लक आहे तुझी मती. तुझ्या शून्य बुद्धीला तर गांडुळाची उपमा देणे म्हणजे त्याचा उपमर्द व्हावा.कारण त्याला निदान आत्म संरक्षणाची तरी बुद्धी असते.मूर्ख नागा!कथनाच्या ओघात तुझे अस्तित्व निरर्थक ठरावे असे सत्य तू अनवधानाने कथन केले आहेस. तू मृत्यृलोकात आहेस त्या अर्थी तुझे देहधारी अस्तित्व संभवत नाही. हे मला पुरते समजले आहे. ज्या व्दिविंशती विषदंतानी मला चावे घेण्याचे दर्पयुक्त भाषण तू केलेस ते तर हास्यास्पदच आहे.कारण मुळात तुझे अस्तित्व अशरिरी आहे !"

रूरू बेधडकपणे प्रवेशव्दरातून आत घुसला. अंतर्भागात

प्रवेश करताच संर्वांगावरील दडपण जरा कमी होऊन तो सैल झाला. प्रवेशव्दारातून धूसर वाटणारे अंतर्भागाचे दर्शनही भ्रामक असल्याचे त्याला जाणवले.अंतर्भागातील प्रकाश नेत्रांचा किंचित दाह करणारा पिवळसर तांबूस असला तरी सर्वकाही स्पष्ट दिसू लागले. कर्णरंध्रामध्ये निर्माण झालेला ठणका कमी झाला.अशरीर वेदना भोगणाऱ्यांच्या आर्त किंकाळ्या अस्पष्ट कां होईना आता ऐकू यायला लागल्या.लोळागोळा झालेली बोजड जिव्हा आता सफाईदारपणे सुकलेल्या ओठांवर फिरवता येऊ लागली. मुख्य म्हणजे सर्वांगावर जाणवणारा असह्य ताण कमी होऊन मुक्त हालचाल करता येऊ लागली. मृत्युलोकामध्ये अशरीर आत्म्यानांच प्रवेश कां दिला जातो हे रुरूला पुरते उमगले. चहूदिशांना नीट निरखल्यावर नजर पोचेतो भयाण पोकळी दिसत होती. मात्र चहूदिशांनी येणारे रस्ते एका विशिष्ट स्थानी एकत्र आल्याचा आभास निर्माण होत होता. मृत्यु देवतेचे स्थान तिथेच असावे असा अंदाज करून रुरू त्या दिशेने पुढे जाउ लागला.

छे!... या कराल मृत्यु दाढेतून सुटलेच पाहीजे! त्याने मागे वळून पाहिले धूसर झालेला प्रवेशमार्ग पाहाताच त्याला जरा हायसे वाटले!पण पृथ्वीवर परत जाऊन मोठ्या आशेने मार्ग प्रतीक्षा करणारे माता, पिता, महर्षि, प्रमव्दरेच्या सख्या, मित्र-आप्तजन याना काय सांगायचे? यशाचा अंतीम क्षण हाती आला असता कच खाऊन माघारी फिरणे यात कसला पुरुषार्थ आपण साधणार आहोत? अन् प्रमव्दरेवरील आपली असीम प्रीती, ती

सुद्धा सुखभोगाच्या कवचा आड राहिलेली एक आत्मनिष्ट लालसाच होती का? आपले हे भ्याड कृत्य म्हणजे प्रीती भावनेची दारूण वंचनाच म्हणावी लागेल. प्रमव्दरेच्या प्राणांची प्राप्ती करण्यामागे आपल्या एवढ्या विषयांध अपेक्षा होत्या तर मग इथवर यायचे कष्ट तरी आपण या देहाला कशाला दिले? रंग- रुपांच्या विभ्रमांनी प्रमव्दरेशी साम्य साधू शकणाऱ्या युवतींची आर्यावर्तामध्ये कमतरता नाही.किंबहुना तिच्यापेक्षाही दिव्य सौंदर्य लाभलेल्या युवती आपण पूर्वी पाहिल्या होत्या.

प्रमव्दरा भेटे पर्यंत कोणत्याही चारूगात्रींचे विभ्रम आपणाला मोह जालात अडकवू शकले नाहीत कारण प्रमव्दरेच्या सौंदर्यामध्ये कामुक उत्तानतेपेक्षाही आपल्या ऱ्हदयाला भिडली ती सोज्वळ सात्विकता! वारांगनांच्या भ्रुकुटी भंगाने चळायला आपण विषयांध नरपुंगव आहोत का? छे.... इथून परत जाण्याचा विचार हेच आपले पतन आहे. मृत्यु दंड भोगीत सुटकेच्या क्षणासाठी,जीवनासाठी आतुर असणारी खुद्द प्रमव्दरा... या पसाऱ्यातच कुठे तरी तिचा आत्मा असेल आपली प्रत्येक हालचाल तो निरखित असेल या जाणीवेने रूरू शरमिंदा झाला.प्रमव्दरेची आणि स्वत:चीही वंचना करून उफाळणाऱ्या जीवनाच्या उर्मींची त्याला शिसारीही आली. स्वत:च्याच रक्तमांसांची सडकी-कुजकट दुर्गंधी असह्य होउन एक आर्त किंकाळी त्याच्या मुखातून उमटली. मीनाक्षी मंदीरात वार्षिकोत्सवाच्या वेळी घुमणारा नगारे शहाजण्यांच्या दणाणणारा ध्वनी राजप्रासादावर धडकावा तव्दत त्याची किंकाळी चहूदिशा

भेदीत गेली. अंत:भागातला पिवळसर तांबूस रंग किंचित सौम्य झाला.स्वसामर्थ्याची जाणीव त्या क्षणी रूरूला झाली.

“मृत्युदेवते.....! सामोरी ये. तुझ्या निर्घृण कृत्याचा जाब विचारायला हा देहधारी रुरू पूर्ण सामर्थ्यानिशी तुझ्या साम्राज्यात आला आहे. आता छल कपटाचा आधार न घेता माझ्यासमोर प्रकट हो!” अशी बेभान आव्हानवाणी उच्चारताच समोरच्या भ्रम पटलाचा भेद झाला.उंच आसनावर बसलेली नीलवर्णाची बलदंड मृत्युदेवता तिच्या वैभवासह समोर दिसू लागली. अर्धवर्तुळावर पायऱ्या पायऱ्यांनी वर चढत गेलेल्या रत्नखचित सुवर्ण सिंहासनांवर मृत्युदेवता उत्थितावस्थेत विराजमान झाली होती. तिने पीतवर्णी बीभत्स नेत्र कटाक्ष रूरूकडे टाकण्यासाठी शांतपणे आपला चेहरा खाली वळवला. तिच्या कर्णभूषणातील श्वेतरंगी मण्यांमधून चमकलेल्या आभेने रूरूचे नेत्र दिपले. डोळ्यांवर वामहस्त आडोशासारखा धरुन तो मृत्यु देवतेचे अवलोकन करू लागला.

देवतेने बोटभर लांब केस असलेल्या उग्र भृकुटीमध्यात कुंकुमस्थानावर गलिच्छ मांसखंड चिकटवला होता. तुळतुळीत मस्तकामध्ये खोचल्या प्रमाणे लोंबणाऱ्या केसांच्या गलिच्छ पेळू स्कंधापर्यंत रुळत होत्या. त्या सावरण्यासाठी मानवी नेत्रांच्या बंधाचे अजागळ फेरे मस्तकाभोवती दिले होते. मस्तकाच्या मध्यातून दोन विरूप शिंगे वळणा–वळणांनीवर येत अणकुचीदार झाली होती. गळ्यात धारण केलेली मानवी लिंगांची माला नाभीस्थानांपर्यंत पोहोचली होती. मानवी हात स्कंधापासून

तोडून ते गुंफुन केलेले कटिवस्त्र देवतेने धारण केले होते. त्यावर मानवी कर्णमालेचे अस्ताव्यस्त वेढे दिले होते. या सर्वांवर कडी करीत तिच्या अस्तित्वाची दु:सह दुर्गंधी असह्य होउन रुरूने नाक दाबून धरले. हे असले रूप धारण करून मृत्युलोकी राहाण्यापेक्षा भूलोकी रहाणे स्वर्गसुखाच्याही पलीकडचे आहे असा विचार रूरूच्या मनात आला.

चबुतऱ्यावर देवतेच्या सिंहासनाशेजारी डाव्या उजव्या अंगाला बसलेल्या दोन कुरूप बेढब कृष्णवर्णाच्या स्त्रिया अधोमुख होऊन अनुक्रमे काळे व पांढरे वस्त्र विणण्यात गर्क झाल्या होत्या चबुतऱ्याच्या कडेला मृत्युदेवतेला साजेसे हिडीस रूपवर्णाचे आठ रक्षक हाती त्रिशूळ,पाश ही आयुधे धारण करून पूर्ण नग्नावस्थेत उभे होते.मृत्यु देवतेने बोलण्यासाठी तोंड उघडताच तिचे वराहदंत ओठांच्या कडांनी बाहेर आले. दिवाभीताच्या घुघुत्कारा प्रमाणे कर्णकटुस्वरात मृत्यु देवता म्हणाली,“मूर्ख मानवा, आजवर एकाही मानवाने न केले असे दंडनीय दु:साहस तू केले आहेस. या कृत्यामागचा तुझा हेतू तर कालत्रयी सिद्ध होणार नाही. मात्र वेदना द्यायला एक सदेह आत्मा माझ्या रक्षकांच्या मनरंजनासाठी उपलब्ध करून देण्याचे महत्कार्य तू केले आहेस. जरा चहूबाजूना नीट निरखुन पहा.....

रूरूने डाव्या बाजुला नजर वळविली. कुजुन सडणाऱ्या मानवी देहावशेषांवर पुंजक्या पुंजक्यांनी वळवळणारे सपुच्छ किडे दिसत होते.त्या कर्दमामध्ये लडबडलेला,त्यामधून बाहेर पडण्याची धडपड करणारा एक मध्यम वयीन नरदेह....आतडे

ढवळीत उमळुन आलेली वांती टाकीत रुरूने नेत्र मिटुन घेतले. हे सगळे भ्रामक आहे. असे स्वतःच्या मनाला बजावीत नेत्र उघडण्याचे धाडस न करताच रुरू बोलायला लागला. “मृत्युदेवते... तुझे गलिच्छ विभ्रम आता बंद कर. त्यांनी भ्रांत होऊन निघुन जाण्याएवढा मी दुर्बल नाही. पृथ्वीवरील एका सामर्थ्यवान राजघराण्याचा मी वारसदार असून  मिनाक्षीचा परम भक्त आहे.” अन् मग अकल्पित स्फुरण होऊन त्याने देवी करुणाष्टक म्हणायला सुरुवात केली. त्याच्या चित्तवृत्ती शांत झाल्या. आणि त्याने धैर्याने नेत्र उघडले. गीर्वाण भारतीचे ते शुद्ध सात्वीक स्वर असह्य होऊन मृत्युदेवतेसह सर्व रक्षकांनी दोन्ही हात ठेऊन कर्णेंद्रिये झाकून घेतली होती. करूणाष्टकाचे पठण पूर्ण होताच मृदु मधुर स्वरात रूरूने कथन सुरू केले.

“मृत्युदेवते! विधि योजनेनुसार माझा कधि मृत्यु व्हायचा असेल तेव्हा तो खुशाल होऊ दे.पण तोवर मला मृत्युचे भय दाखवण्याच्या फंदात तू पडू नकोस.देहघारी मानव सारे संकेत भंग करुन तुझ्या साम्राज्यात आला आहे. तू कधीही उपभोगली नाहीस, उपभोगू शकणार नाहीस अशी प्रीतीची,समर्पणाची भावना मला तुझ्या पर्यंत घेऊन आली. देवते आजवर मानवांचे प्राण हरण करण्याचे निंद्य कृत्य तू केले आहेस. विधि योजनेनुसार कां होईना? पण प्राण हरणाचे कठोर कर्तव्य बजावीत असताना कधितरी तुझ्या मनात उव्दिग्नता आली असेलच. तुझ्या आजवरच्या अन् या पुढे घडणाऱ्या या निंद्य कर्माचे परिमार्जन करायची दुर्मिळ संधी तुला मिळणार आहे.

कर्तव्य कठोर असलीस तरी तू सुद्धा एक देवताच आहेस. देवत्वाचे व्यवच्छेवक लक्षण असणारी करूणा तुझ्या अंतरी खचितच असणार.... हे देवते मला अनाथ एकाकी सोडून आलेली माझी प्रियतमा... तिचे जीवन तू मला परत दे अथवा मला मृत्युदंड देऊन माझ्या प्रियतमेचा अशरीर सहवास लाभण्याचे भाग्यव्दार तरी माझ्यासाठी उघड!"

विचारमग्न झालेली मृत्युदेवता सौम्य स्वरात म्हणाली, "मानवा.... माझ्या मातेची स्तुती गाऊन तू माझे बाल्य जागृत केले आहेस.तुझी व्यथा .... तुझा विरहदाह आता मला समजत आहे. मानवी प्राण हरण करण्याच्या माझ्या कठोर कर्तव्याची उव्दिग्नता आता मला आली आहे. पण माझ्याही काही मर्यादा आहेत. विधि संकेतानुसार जिवंत माणसाची चेतना हरण करून तिला मृत असल्याचे सामर्थ्य माझ्यापाशी जरुर आहे.परंतु जीवनदान द्यायला मात्र मी पूर्णपणे असमर्थ आहे. तसेच विधि योजनेपूर्वी मानवाचे प्राण हरण करण्याचे सामर्थ्यही माझ्याकडे नाही. तेव्हा तुझी कोणतीही इच्छा मी पूर्ण करू शकत नाही. मानवा तुझ्या श्रद्धायुक्त आर्त स्वरांनी अनावर झालेली माझी मातेविषयी ओढ, तिच्याच विविध रुपांपैकी एका रुपाच्या प्राप्ती साठी आर्त झालेली तुझी विवशता मी समजू शकतो. पण केवळ असमर्थता व्यक्त करण्यापलीकडे मला काहीच सुचेनासे झाले आहे. मानवा तू क्षूद्र- नगण्य आहेस. तरीही मी एक विनंती तुला करू इच्छितो. मघाशी उच्चारलेले ते मंगल स्तवन तू पुन्हा एकदा मला ऐकव." आलेली एक बहुमूल्य संधी तू दवडली

आहेस. मूर्खा मी बालस्वरूप असताना मला तुझी कर्णकुंडले, तुझ्या अनामिकेतील सुवर्णमुद्रा, तुझ्या गळ्यातील रत्नहार, कटीची रौप्य मेखला ...... निदान तुझ्या हातीचा वेत्र दंड...यांपैकी काहीही एक देऊ केले असतेस तरी प्रमव्दरेचे जीवनदान तुला मिळाले असते. पण हे संकेत समजण्याएवढी प्रगल्भता तुझ्याकडे नाही. हेतुपूर्तीची अपूर्व संधी तू गमावली आहेस. जा चालता हो!”

मान खाली घालून हताश मुद्रेने उभ्या असणाऱ्या रुरूविषयी अपार करूणा वाटुन मग मृत्युदेवता म्हणाली,“अरे मुला! विधिलिखित किती अटळ असते याचा प्रत्यय तुला खचितच आला असेल.तुझी निस्सीम प्रीती, समर्पण वृत्ती आणि स्वतंत्र विचार धारणा मला भावली. त्या पेक्षाही मिनाक्षी मातेबद्दलची तुझी अपार श्रद्धा प्रत्ययाला येताच तुझे कल्याण करण्यासाठीच मी बालरूप धारण केले.कोणत्याही मानवाला यापूर्वी मिळाले नव्हते अन् भविष्यात मिळण्याची शक्यता जवळजवळ नाही असे अकल्पित दान मी तुला देऊ केले होते. पण तुझ्या कपाळकरंट्या वृत्तीमुळेच तुला दारूण अपयश पदरी घेऊन माघारी जावे लागणार आहे. माझी कर्तव्य भावना आता जागृत होत असुन मी तुला शिक्षा देण्यापूर्वी तू मृत्युलोकाबाहेर पडावेस अशी माझी सक्त आज्ञा आहे.”देवतेच्या या शब्दांनी अक्षरश: उन्मळून गेलेल्या रुरूने तिच्या चरणांवर लोटांगण घातले.कठोर आत्मवंचना अन् निराशा यामुळे त्याच्या नेत्रांतून ओघळणाऱ्या अश्रूंनी त्याने देवतेचे पदक्षालन केले.

“मानवा! एकदा हाती आलेली संधी वाया घालवल्यामुळे मला तुझी घृणा आली आहे. तथापि मी अद्याप उग्ररुप धारण केलेले नाही. तू पश्चात्तापाने शुद्ध झाला आहेस. म्हणूनच केवळ तुला पुन्हा एकवार संधी द्यायचा माझा मनोदय आहे.अर्थात यावेळी ही संधी विना अट नसेल. तू आपली बुद्धी पूर्ण शाबूत ठेऊन ही संधी घेतलीस तर ठीकच अन्यथा तुझे जीवन म्हणजे यातना पर्व असेल. तुला प्रमव्दरेचे प्राण पाहीजे आहेत ना? मग त्याचे मोल तू काय देशिल?”देवतेने अशी पृच्छा केल्यावर रुरू म्हणाला,” देवते मी प्रमव्दरेच्या प्राणांचे मोल म्हणून माझा कोणताही शरीरावयव, एवढेच काय माझे पंचप्राणही तुला मोबदल्यादाखल देऊ शकेन. अर्थात हा माझा पर्याय तुला मान्य नसेल तर वेगळे काही मोल देण्याचा दुसरा पर्यायही मी शोधू न काढीन… तशी मुभा हे देवते तू मला दे.” सस्मित मुद्रेने मृत्यु देवता म्हणाली, “मूर्खा पुन्हा एकवार हाती आलेली संधी तू दवडतोस की काय अशी शंका मला वाटत होती. पण पूर्वानुभवाने शहाणा होऊन सावध कथन केल्यामुळे दुष्प्राप्य अशी ही संधी तू दवडली नाहीस इतकेच. पण तू देऊ केलेली भरपाई अयोग्य आहे.तुझे शरीरावयव घेऊन तुला पंगु करून मी तुला इच्छित गोष्ट दिली तर माझ्या वृत्तीला मालिन्य येईल.”

“मूढपामरा!तुझ्या प्राणांच्या मोबदल्यात प्रमव्दरेला जीवनदान म्हणजे तर शापच देणे होईल.तुम्ही मानवांनी

स्वतःच्या वृत्ती नुसार सत्व - रज - तम हे गुण देवतानाही चिकटवलेले असल्यामुळे तुझी  माझ्याकडे पाहाण्याची दृष्टी दूषित आहे. मूर्खा!..... सृजना एवढाच मृत्युही श्रेष्ठ आहे. तुझ्या भाषेत सांगायचे तर त्रिगुणांनी युक्त सामान्य देवतांपेक्षा माझी श्रेणी उच्च आहे. .स्वयंभु आदितत्वापासुन माझी निर्मीती झाली आहे. म्हणून तुझ्या अज्ञानाचा फायदा घेऊन दायित्व झटकून टाकण्याचा प्रमाद माझ्या हातून घडावयाचा नाही. तुला माझी ओळख पटली नाही हेच खरे. आता वेळ वाया न घालवता तुला दुसरा एखादा पर्याय सुचवायचा असेल तर तू जरुर सुचव. तत्पूर्वी ही दुसरी संधी घ्यायची की नाही.... याचा विचार तू करावास."

देवतेचे कथन पूर्ण झाले तरी रुरूला बोलायचे धाडस होईना.आपल्याला एकदा पुन्हा संधी देण्यामागे देवतेची काही कुटील  इच्छा असावी असा त्याचा ग्रह होऊ लागला.निराश होऊन रुरू  म्हणाला,"देवते एकीकडे माझ्यावर अनुकंपा करावयाचे नाटक  करीत असता तू पद्धतशीरपणे माझी वंचना चालविली आहेस असे मला वाटत आहे. तुम्ही देव मानवापेक्षा हीन,क्षुद्र अहात.ना  धड त्याला स्वयंप्रज्ञेने वागण्याचे स्वातंत्र्य बहाल करीत,ना त्याच्या विचारांचे नियंत्रण करित! तू जर त्रिगुणी देवतांपेक्षा श्रेष्ठ आहेस, तर मग मला काय पाहीजे अन् मी त्या बदली काय देऊ शकेन याचेही ज्ञान तुला आहेच. मग तू विचारावे मी सांगावे हे नाटक कशाला? आपण अनादी स्वयंभू आहोत असे तू मला भासवीत असलीस तरी तुझे नियंत्रण

करणारे तुझ्यापेक्षाही श्रेष्ठ असे वेगळेच काही तत्व अस्तित्वात नसेल कशावरुन? तसे असेल तर देवते ते तत्व कोणते? त्याच्याकडे कसे पोचायचे? बस्स एवढे मार्गदर्शन तू कर. तेवढे पुरेसे आहे. अर्थात हे माझे कथन म्हणजे तू मला देऊ केलेल्या संधीचा भाग नाही. देवते मला दुसरी संधी देण्याचे वचन तू दिलेले आहेस. त्यातून तुला मुक्त होऊ देण्याएवढा मी मूर्ख नाही.पण मानवाच्या मर्यादा तुला ज्ञात असतानाही निर्णय माझ्यावर सोपवू न तू माझी कुचंबणा केली आहेस. देवते..! तुझ्या बदलणाऱ्या रुपांविषयी मी पूर्ण अज्ञानी आहे. तू बालस्वरुपात असताना आपले ईप्सित साध्य करुन घ्यावयाचे चातुर्य मला साधले नाही. त्याबद्दल हे देवते तू मला दूषणही दिलेस. पण हा व्यवहार मानवी पातळीवरचाच झाला असता. एकतर तू मला फसवायचे अगर मी तुला फसवायचे. देवते असेच जर असेल तर मग चातुर्यात तू मला नक्कीच हरवशील. येन केन प्रकारेण तुला माझी वंचनाच करायची असेल तर हे देवते तू खुशाल कर.पण काहीही झाले तरी प्रमव्दरेचे प्राण परत घेतल्या शिवाय मी इथून जाणार नाही."

अस्फुट हास्य करीत मृत्यु देवता म्हणाली,"मूर्खा! तू कितीही शब्दच्छल केलास तरी माझ्या सामर्थ्याचे,माझ्या मर्यादांचे उल्लंघन मी कदापि करणार नाही.तुम्हा मानवांना स्वयंप्रज्ञा असल्यामुळे तुमचे संचित तुमच्या हाती आहे. परंतु भ्रामक कल्पनांचा पाठलाग करताना तुम्ही आपल्या प्रज्ञेचा वापरच करीत नाही.केवळ स्वतःच्या इच्छापूर्तीसाठी तू

प्रमव्दरेचे संचित बदलू पहात आहेस. त्यासाठी तू काय द्यावेस हे मी कसे सांगु ? माझे स्वच्छ मत असे आहे की तिच्या प्राप्तीची इच्छाच तू करू नयेस. विधियोजनेनुसार जे योग्य तेच झाले आहे. असे असूनही तुझी आर्तता पाहुन तुझी इच्छा पूर्ण करण्याची संधी मी एकवार तुला दिली आहे. मला तुझी वंचनाच करावयाची असती तर तू इथवर पोहोचू शकला नसताच. मूर्खा उच्च श्रेणीतील देवता कधीही असत्य, अर्धसत्य वा भ्रामक कथन करीत नसतास. त्यांचा शाप अथवा वर कधीही अस्थाई नसतो. मग तुझ्या सारखे अज्ञ त्याला वंचना म्हणोत. तसेच माझ्यापेक्षा काही वेगळे उच्च- श्रेष्ठ तत्व अस्तित्वात नाही. ती केवळ तुझ्या मूढ मनाची भ्रांती आहे. मी तुला निर्वाणीचे बजावीत आहे. एकतर विधि संकेता विरुद्ध जाण्याचा हट्ट तरी तू करू नकोस. अथवा तुझ्या ईप्सित पूर्तीसाठी योग्य मोबदला तरी तू दे. योग्यायोग्य विचार करायला तू पूर्णपणे स्वतंत्र आहेस."देवतेचे कथन ऐकुन रुरू पूर्णपणे निराश झाला. देवतेने देऊ केलेली दुसरी संधी मूर्खपणापाई हातची घालवून आयुष्य मातीमोल करुन घेण्यापेक्षा सर्वसंग परित्याग करुन विरक्त जीवन जगावे अशी त्याची धारणा होऊ लागली. त्याच वेळी यशप्राप्तीची संधी हाती आली असता तिच्याकडे पाठ करुन माघार घेणे सर्वथा अयोग्य आहे. हा विचारही त्याच्या मनात आला.

आपली भ्रांती दूर करण्यासाठी पूर्ण विचार करून त्याने आराध्य देवता मीनाक्षीला साकडे घातले.आपले मानसिक संतुलन ढळू नये यासाठी त्याने आंत्यंतिक श्रद्धेने पुन्हा एकदा

देवी करुणाष्टक मनात म्हटले. रुरुचे स्तवन सुरु असता मृत्युदेवतेच्या मुद्रेवर जागृत होणारे सात्विक भाव पाहिल्यावर त्याचे मनोधैर्य वाढले. स्तवन पूर्ण होताच तो निग्रहाने म्हणाला,“मृत्यूदेवते! प्रमव्दरेच्या प्राणदानाच्या मोबदल्यात श्रद्धायुक्त अंतःकरणाने मी तुझे पदवंदन करीत आहे. हे देवते माझी भ्रांती आता दूर झाली आहे. माझे आराध्य दैवत आणि तू दोघेही एकच आहात याचे ज्ञान आता मला झाले आहे.रुरुने देवतेला साष्टांग नमस्कार घालून तिच्या चरणावर मस्तक ठेवले.“रुरू! तू श्रद्धापूर्वक केलेले वंदन मला पावले आहे. त्याच्या बदल्यात प्रमव्दरेचे प्राण तुला खचितच परत मिळतील.....पण..... यामध्येही एक अडचण आहे.” देवतेचे उद्गार ऐकताच रुरुचे ओठ शुष्क झाले.”देवते! शेवटी तुम्ही देवता निष्ठुर असता हेच खरे. आपले स्वयंभूत्व अबाधित राखण्यासाठी तुम्ही कधि कसा पवित्रा बदलाल हे सांगता येत नाही. देवते माझा हेतू प्रांजळ असेल,प्रमव्दरेविषयी माझी भावना शुद्ध असेल तर विधिलिखीतही टळेल अशी माझी श्रद्धा आहे.देवते! कोणती अडचण आहे तर ते सांग.!”

मृत्युदेवता म्हणाली, “मूढा...स्वयंभु देवता तुम्हा मानवांच्या निष्ठा, श्रद्धा जरुर पारखतात.याचा अर्थ त्या निष्ठुर असतात असे नाही.माझी अडचण ऐक! जीवन समाप्ती एवढेच माझे कार्य आहे. तरीही तुझे धाडस आणि अढळ श्रद्धा पाहून विधिसंकेतात न बसणारे तुझे ईप्सित पूर्ण करण्याची संधी मी

तुला दिली आहे. मात्र हे करीत असता तुझी वंचना आणि माझ्या मर्यादांचा भंग होऊ नये याची दक्षता मी घेत आहे. परंतु तुझ्या मूढ मतिला एवढे तारतम्य सुचत नाही. म्हणूनच ज्या देवतेकडून वरदान मागायचे तिची निर्भर्त्सना करण्याचा तुझा प्रमाद मी पोटात घालीत आहे इतकेच. मूढा ! प्रमद्वरेचे केवळ प्राण मिळून तुझे ईप्सित कसे साध्य होईल? त्या योगे ती क्षणकाल सचेतन होईल इतकेच. तिला आयुष्य लाभायला हवे.तरच माझ्या अनुग्रहाला काही अर्थ उरेल.अन्यथा क्षणिक प्राणदान ही तुझी घोर वंचनाच ठरणार नाही का? प्रमव्दरेला आयुष्य लाभावे अशी काही भरपाई तू देऊ शकशील का? तसे असेल तर जरुर सांग." देवतेचे हे कथन ऐकल्यावर रुरुने किंचीत काळ विचार केला.मग मृत्युदेवतेला नमस्कार करुन तो म्हणाला," हे मृत्युदेवते! तुझी करुणा मी खरोखरच ओळखू शकलो नाही. तुझ्या स्वरुपाचे पूर्ण ज्ञान आता मला झाले आहे. मी यापूर्वी केलेले कथन हा माझा घोर प्रमाद आहे. हे मान्य करुन त्या पाप क्षालनार्थ हा माझा प्रणाम तू स्वीकार.!"

मृत्युदेवतेला साष्टांग नमस्कार करुन तिच्या चरणी लीन होऊन रुरुने देवी करुणाष्टकाचे पुरश्चरण केले.मग विनम्रपणे अधोमुख होऊन तो म्हणाला,"मृत्युदेवते! तू मला वरदान देऊ इच्छित आहेस हे खरे पण ते घेताना माझ्या मनात अद्याप रेंगळणाऱ्या शंकेचे निरसन तू करावेस अशी माझी विनंती आहे. माझे स्वत:चे किती आयुष्य उरले आहे ते तू मला सांग." शंका

निरसनाच्या नावाखाली रुरु आपल्याला अडचणीत टाकणारी पृच्छा तर करणार नाही ना? या विषयी जागरुक असलेली मृत्युदेवता म्हणाली, “रुरु ! तुझ्या मृत्युचा नेमका दिवस काही मी सांगू शकणार नाही. परंतु आयुर्मानाची संवत्सरे पाहिजे तर सांगेन.” मान डोलावित रुरु म्हणाला,“ सांग देवते! माझे आयुष्य किती उरले ते तर मला कळूदे!”रुरुची पृच्छा अगदी सामान्य आहे हे समजल्यामुळे गाफील झालेल्या मृत्यूदेवतेने त्याच्या आयुर्मानाची संवंत्सरे किती तो अंक उच्चारला.तो ऐकताच आपण आजपर्यंत जगलेला कालावधी वजा करावयास देवता विसरली आहे. हे रुरुने ओळखले पण वरकरणी तसे न भासविता त्याने खिन्न मुद्रा केली.

“देवते! प्रमव्दरेविना इतका दीर्घकाळ मला जीवन लाभावे यावर माझा विश्वासच बसत नाही.”मृत्युदेवता कठोर स्वरात उद्गारली,“रुरु येथे तुझ्या इच्छा अनिच्छेचा प्रश्नच येत नाही.तुझा विश्वास बसो न बसो! मी सांगितले ते त्रिकालाबाधित सत्य आहे.एवढे मात्र लक्षात ठेव.” त्यावर रुरु म्हणाला,“हे देवते, तू म्हणतेस त्या अर्थी ते सत्यच आहे. म्हणजे इतर मानवापेंक्षा मला खूपच आयुष्य लाभले म्हणायचे.मला एवढे दीर्घायुष्य बहाल करण्यात विधिची काय असेल?ही गोष्ट मला अगम्य आहे”रुरुच्या या बोलण्यावर मात्र मृत्युदेवता भांबावली.

अनवधानाने आपल्याकडून झालेली चूक देवतेच्या लक्षात आली.तिच्या मुद्रेवर बदलत जाणारे भाव रुरूने अचूक

टिपले. त्याच क्षणी तो निर्धाराने बोलू लागला."देवते! माझी वंचना होणार नाही. अन् तुझे वरदानही वाया जाणार नाही. असा पर्याय आता मला सुचला आहे.प्रमव्दरेला आयुष्य प्राप्त होण्यासाठी पर्यायी आयुष्यच मिळायला हवे. तर हे देवते माझे जे आयुष्य अद्याप शिल्लक आहे, असे काही क्षणापूर्वी तू मान्य केलेस, त्यातले निम्मे आयुष्य, प्रमव्दरेला मिळू दे! देवते तू असे मला वरदान दे!" वरदहस्त उंचावित मृत्युदेवता म्हणाली, "तथास्तु !

# ६. पाखरांची भाषा

नित्य नेमाप्रमाणे मूठभर तांदूळ अन् पाण्याचा गडवा घेऊन कमू देवरण्याकडे येताना दिसली. जांभळीच्या झाडावर बसून तिची वाट पहाणाऱ्या भोरडया - साळुंख्या, बुलबुल, दयाळ अन् देवरण्याच्या मुळाशी नाचणाऱ्या सातबायांनी पंखाचा फटर्र-फटर्र् फ ऽट् फटर्र् फऽट् आवाज काढीत कलकलाट सुरू केला. ती मोडण चढून वर येईपर्यंत थोप नसलेली पाखरं तिच्या डोक्याभोवती गिरक्या मारू लागली. मुठीतले तांदूळ देवरण्याच्या माथ्यावरील सप्पय तासलेल्या चिऱ्यावर टाकून पाण्याचं परळ भरता भरता मैत्रिणीशी बोलावं अशा थाटात कमू सांगायला लागली. ''सिर्रर 'सिक्क् च्यू... कुच्चू सीब्ब् च्युकर्र कुरर्र स्त्रकुर्कर्र सीस्स थ्य्रुक्क चिर्र... चिरिक्क चिक्रु सिर्सर् थ्रक थुर्रर्र त्रु रु रुर्क क्रू रिर्र सिर्बर्र स्त्राक्क सुर्रर्र स्त्रुर्कर्र इर्र थ्रक् चर्र चर्र '' **(आज भारी उशीर केला नं मी ? परळात थेंबभर सुद्धा ऱ्हायलेलं नसेल हे माहिती होतं मला...? पण मी तरी काय करु ? मी इकडे यायला बाहेर पडणार तेवढ्यात नवऱ्या मुलाचा भाचा नेमका पसंती कळवायला टपकला. मग मला थांबावंच लागलं. तुम्ही माझी वाट बघणार म्हणून माझी कोण उलघाल झाली म्हणू सांगू ... .!)**

पण कमूचं बोलणं ऐकायला पाखरांना कुठली सवड? ती आपली चक् चक् करीत तांदूळ मटकावायच्या नादात! चोची भरभरून परळातलं पाणी पिण्याऱ्या त्या चिमण्यांकडे डोळे भरून बघत असलेल्या कमूचा कंठ दाटून आला. आता माझं लग्न होणार ... तिकडे लांब होडावड्याला घर... मी गेल्यावर या माझ्या सख्यांचं कसं होणार? त्यांना नित्यनेमानं तांदूळ -पाणी कोण घालणार?छे...! नुसत्या कल्पनेनंच कमूला रडू फुटलं. कमूच्या भावना अचूक टिपून एका भोरडीनं ''थ्रिक्क स्सिर्र सीर्रर्र- स्त्रक्क-

स्त्रू स्त्रर्कर्र त्रीक स्त्रू सीर्रर्र''करीत ही वार्ता सांगितली मात्र. खाणं थांबवून भोरड्या चितागती झाल्या. साळुंक्या, सातभाई, हळद्या, दयाळ, सगळीच पाखरं स्तब्ध झाली. क्षणभरा पूर्वी खाण्यावर तुटून पडलेली ती पाखरंआता अंग फुलवून घुमारे काढीत हीव भरल्यासारखी थडथडायला लागली. घशातल्या घशात ब्रुभम्म... ग्रम्मम्म ग्रोम- गर्रर्म घुमवणाऱ्या साळुंक्यांना अन् सातभाईना कमूचं काय बिनसलं हेच कळेना,पण ती अतीव दुःख करतेय हे स्पंदन मात्र त्यांनी अचूक हेरलं!पाखरांनी खाणं थांबवलं म्हणताना कमूसुद्धा जरा बाचकली. त्यांची समजूत काढीत.म्हणाली, ध्रोम्म थ्रक्क सिमम्बमम्ब्र मोक्कस्त्र सर्रर्र र्र स्त्रस्स ''**(अग बायानो हे कधीतरी व्हायचंच होतं त्यात कसलं दुःख करायचं?)** त्रकस्स स्त्रू स्त्रू सीब्बस्स कर्रर्र सर्रर्भ ध्रोम्म **(मी काय तुमच्या जन्माला पुरले थोडीच? तुम्ही वाईट वाटून घेऊ नका.खा तुम्ही.)**

कमूनं कितीही समजावण्याचा प्रयत्न केला तरी पक्षी ढिम्म बधले नाहीत.त्यांनी खाणं टाकलं ते टाकलंच! अंधार पडत चालला म्हणून जड अंतःकरणाने कमू घराकडे वळली. रात्री तिला भूकच नव्हती. उगाच चार घास चिवडून ती पानावरून उठली.कमू झोपायची त्या खोलीच्या खिडकीबाहेरजास्वंदीच्या फांदीवर बसून रोज सकाळी दयाळ, बुलबुल गोड लकेरी छेडायचे परंतु दुसऱ्या दिवशी शिऽऽ श्शिऽऽऽ शिव्ह ऽऽ सिंह् शर्रर्र ऽऽ असे त्याचे करूण विलाप ऐकून कमू जागी झाली. ती भांबावून खिडकीत आली तर अंग झडझडवीत पिसं विस्कटून विद्रुप ओंगळ दिसणारा तिचा सगळा मित्रगणच जास्वंदीवर गोळा झालेला. भोरड्या, साळुंख्या, दयाळ, परटिणी, सातभाई, किकऱ्या, टिम्बुल्या, हळद्या अन् देवरण्याच्या हद्दीपलीकडे चुकून न येणाऱ्या बाया, गोविंदा नि भुरल्या असा सगळा ताफा जास्वंद, प्राजक्त यांच्या फांद्या फांद्यांवर दाटीवाटीनं बसलेला दिसला.मग गोंधळलेली कमू चूळही न भरता मागील दार उघडून बाहेर धावली.

''कमू ऽऽअगो सकाळी सकाळी तोंडसुद्धा न धुता आधी चिमण्यांच्या मागावर कुठे निघालीस?''स्वयंपाकघरातून मामी करवादली. प्राजक्ता खाली गेलेली कमू आपल्या सवंगड्यांना हात जोडीत विनवू लागली.

''सिर्रर्र ऽऽ सिर्रऽऽ सिर्र श्शिऽऽऽस्त्रकक्र सुर्रर्र र्रक्र क्रर्रर्र स्त्र स्त्र सिर्कक्क थ्रुक द्रुर्र मम्मर्र थ्रुर्क, स्त्रर्रर्र क्क्र''**(तुम्हांला कसं समजावू?तुम्ही फिरता किनई आपल्या जोडीदाराबरोबर? मला तसाच जोडीदारमिळणारै)** त्या आठवणीनं शहारलेली कमू पुढे म्हणाली,''स्त्रीक्क क्र क्र कर्रर्र ख्रम्म सीक्कक्क च्यु च्यु च्यरूर्रर्र चमम्म चक्रर्रर्र रर्मर्म र्रर्र इर्रर्म'' **(आता थोड्या दिवसांनी मी त्याच्या घरट्यात रहायला जाणारेय....आमच्या माणसांच्यात हे अस्सचं असतं.)** ''स्त्रिम्म म्र म्रर्रर्र थ्रम्ब कर्रर्र र्रर्क किरर्रम्म...च्रम्मम्म स्त्रुर्रर्र चिरिर्र र्रकर्र थ्रम्म मर्कर्र चम्मम्म क्वर्रर्र''**(तुम्हाला सोडून जोडीदाराबरोबर जायचं म्हणून काल मला वाईट वाटलं.मी गेल्यावर तुम्हाला खाणं पाणी कोणं घालील? पण खरं सांगू ? मला आवडला गं, माझा जोडीदार!)** कमू आनंदली तशी पाखरंही अंग झडझडवीत तरतरीत झाली. कमूकडे झेपावत दयाळानं गोड लकेर छेडली. प्राजक्तामागच्या आंब्यावरून कोकीळ खरबीला साद घालू लागला.पाखरं आनंदाने वेडीपाशी झाली. भिर्रर्र भिर्रर्र गिरक्या घेणाऱ्या पाखरांच्या जोड्या परस्परांशी दंगामस्ती करायला लागल्या.




पाखरांचा कलकलाट मामीला स्वयंपाक घरात ऐकू गेला. स्वतःशीच बडबडल्यागत मामी म्हणाली, '' निळावंतीचा हा नाद बरा नव्हे. न्हाती धुती पोर, उद्या सासर घरी हिचं असलं चळिंत्र बघून सासू नाव नाही का ठेवणार? नलू त्या कमीला जरा हाक मार गो.'' कमूची मामेबहीण नलू

मागीलदारी गेली अन् पाखरे भिरी भिरी उडून गेली. कमू मग नाईलाजानं घरात आली. कमरेवर हात ठेवून कमूच्या पुढ्यात उभी राहिलेली मामी कडक लक्ष्मीच्या आवेशात म्हणाली ,''कमेऽ गधड्ये ऽऽ आता तरी तोंड विसळ अणि चहा घटाळायला ये आत ! बुरशी कुठली. कोण उच्छाद मेला सकाळीच त्या पाखरांचा ! तू दिसायचीच खोटी मेल्यांना !''

काहीही न बोलता राखुंडी हातावर घेऊन कमू तोंड धुवायला गेली. मामीचं आपलं हे नेहमीचंच! निराधार कमूला घेऊन मामा पेंडखळ्यात आला तेव्हासुध्दा मामीनं असंच नाक मुरडलन! सिलीपाटाच्या धंद्यात मरणाची उधारी तुंबली म्हणून आधीच मामा जेरीला आलेला. झाडावाल्याचं देणं रखडलं... झाडांची तोड थांबली नि मोठीच पंचाईत होऊन बसली.आपली तीनं पोरं आणि त्यात हे एक नवीन खाणारं तोंड वाढलं म्हणून रंजीस झालेली मामी ! पण कमू आली... दुसऱ्याच दिवशी मागिलदारी पाखरांना चोरून तांदुळाच्या कण्या टाकण्याचा, पाखरांना प्यायला म्हणून फुटक्या परळात पाणी भरुन ठेवण्याचा कमूचा चळ सुरू झाला. मग दोनच दिवसांनी ... पाच वर्षाचे थकलेले उधारीचे सातशे रूपये घेऊन ... ज्यांची मामानं आशाच सोडलेली... अमीन चिच्या सकाळी सकाळीच दाराशी आला.गेला दीडेक महिना देणेकऱ्यांची तोंड चुकवायला घरात लपून राहिलेला मामा नोटा खिशात टाकून घराबाहेर पडला...नि त्यानंतर त्याचा जम बसायला लागला.लक्षात येण्यासारखी सुस्थिती येत गेली. कमू पोर पायगुणाची म्हणून मामा तिचे लाड करायचा. कमी मुठी भरभरून तांदूळ न्हेऊन चिमण्यांना घालायची.तिकडे मामीही कानाडोळा करायची. तिचा स्वभाव जरा ताठ होता.पण कमूशी वागताना आपल्या पोरांपेक्षा दुजाभाव मात्र ती करीत नसे !

नवीन घर..नवीन गाव..अनोळखी माणसं... मामाकडे कमूचा जीव काय रमेना! बाबा तिला अंधुकसे आठवायचे पण आईची आठवण येऊन तिला सारखं रडू यायचं!लोकांच्या घरात रडायचं तरी चोरी.मग मागिलदारी प्राजक्ताखाली एकवशी जागा गाठून कमू रडत बसायची. ती

अशी रडत असताना समोर बसलेली एक गुबगुबीत अंगाची ‘सातबाया’ तिला दिसली. विटलेला मुकटा नेसलेली आईच आली असावी असा भास कमूला झाला.मग धावत जाऊन घरातून चिमटीभर तांदळाच्या कण्या आणून तिने टाकल्या सातबाया चुट्टु चुट्टु कण्या टिपायला लागली. तिचे बाकीचे भाईबंदही पटापटा उतरले. तेव्हा पासून मग कमूची  नि त्यांची गट्टीच जमली. हळू हळू आणखीही कोण  कोण पाखरं तिथे उतरायला लागली. कण्या अन् परळात हुकमी पाणी मिळतं हे लक्षात आल्यावर पाखरं नेमाने यायला लागली.



कण्या टिपण्याऱ्या,परळात भुर्रर भुर्रर ‘पंख फडफडवीत आंघोळ करण्याऱ्या पाखंराची मजा बघीत कमूचा जीव रमायला लागला. तिचा निर्मळ भाव ओळखून पाखरं न बिचकता तिच्या आशीपाशी वावरायची. आपल्या भाषेत चुक्क-चुर्रर करीत काही बाही बोलायची. गाण्याच्या गोड लकेरी छेडून कमूला रिझवायची. सुरूवातीला सगळीच पाखरं सारखी वाटायची. पण सरावा सरावानं प्रत्येक पक्ष्याची स्वतंत्र ओळख कमूला पटायला लागली. त्याची मजा बघायच्या नादात तल्लीन झालेली कमू हळू हळू त्यांच्या सारखे स्वर काढायचा प्रयत्न करू लागली. खूप सराव केल्यानंतर त्यांचे स्वर तिला जमायला लागले.त्यांना हाका कशा मारायच्या, खाऊ खायला या म्हणून कसं सांगायचं ? हे आपोआप उमगत गेलं. एकदा तिनं टाकलेले सगळे तांदूळ

पाखरांनी टिपून घेतले. अन् नेमकी त्याच वेळी भूकेजलेली एक साळुंकी गयावया करीत खाणं मागू लागली. कमू तांदूळ आणायला घरात धावली.

तांदळाची मूठ भरून ती वळणार तर मामी समोर उभी. ‘‘कम्ये ऽऽ गधड्ये, अगो आत्ता एवढ्यात मूठ भरून तांदूळ नेले होतेस ना?’’ कमू गयावया करीत रडवेल्या सुरात म्हणाली, ‘‘हो न्हेले होते ना तांदूळ! पण मामी कित्ती कित्ती पाखरं जमतात! सगळे तांदूळ संपले अन् एक सांळुकी भुकावून आली.मला तांदूळ घाल म्हणाली.’’तशी डोळे वटारीत मामी ओरडली,‘‘अस्स काय? सांळुकी तांदूळ घाल म्हणाली वाटतं! तुला चिमण्यांची भाषा आणिक कधीपासून कळायला लागली? निरागसपणे कमू उतरली, ‘‘अगं मामी ऽऽ सगळ नाय कळत ! त्यांना आनंद झाला,की वाईट वाटलं? भूक लागली ...तहान लागली म्हणून पाणी हवय हे त्यांच्या ओरडण्यावरून बरोबर समजतं मला. मी दिसले ना की येऽऽग कमू असं त्या म्हणतात ते सुद्धा कळतं मला! तुझी शप्पत!!’’ तशी फाड्कन तिच्या कानफटात लगावीत मामी म्हणाली, ‘‘ हद्द ग बाई तुझ्या अगोचरीपणाची. माणसाचा स्पर्श झाला तर त्या जातभाईला टोचून-टोचून मारणारी पाखरांची निर्दयी जात! त्या पाखरांची बोली, निळावंतीची भाषा तुला कळायला लागली ना तर वाट्टोळं होईलं आयुष्याचं.... खबरदार पुन्हा त्या पाखरांच्या नादात ऱ्हायलीस तर ... काय ते तांदूळ घाल नी मुकाट्याने तश्शी परत ये. आम्हांला नकोहेत त्या पाखरांच्या अभद्र भाषा...’’

तेवढ्यात देवपूजेवरून उठून मामा आला,‘‘कमूऽऽ तू घाल जा चिमण्यांना तांदूळ नी बैस त्यांच्याशी गप्पा मारीत’’ कमू पळाली. मग मामीवर डाफरत तो म्हणाला, ‘‘तीन पोरांची आईस तू! त्या लहान पोरीच्या काय तोंडाला लागतेस. कसली निळावंतीची भाषा नी कसलं काय, अश्राप लेकरू ते! त्याला काय कळतंय ... आईची आठवण न काढता कुठे तरी मन रमवत्येय् झालं! ’’

पण त्या प्रसंगापासून कमू मात्र भलतीच सावध झाली. संध्याकाळी शाळेतून आल्यावर ही गोष्ट तिने सातबायांना सांगितली. तशी त्या दुःखाने

आळपत, पंख फाकून जमिनीवर गोल गोल लोळण घ्यायला लागल्या. कमू पुढे झाली. एका चिमणीला अलगद उचलून छातीशी कवटाळलं. ''मामीचं ओरडणं मी थोडचं ऐकणारेय... ? आमच्या मराठीच्या बाई आहेत ना? त्यांनी उलट सांगितलं की ज्याच्या मनात पाप नसतं अशाच माणसांजवळ पाखरं जातात. मी शिकेन तुमची भाषा.''चिमण्यांना तांदूळ पाणी ठेवायला, त्यांना भेटायला दौड्यापासून दूर  निवांत अशी जागा कमू हेरायला लागली. फणसाच्या मागे असलेलं मोडण चढून जरा पुढे गेलं की आगराच्या पार टोकाला एक जांभ्या दगडाचं गळाभर उंचीचं देवरणं होतं. चांगली सुरक्षित, मोठ्या माणसांच्या नजरेपासून दूर निवांत जागा. जवळ जांभळीची, काजूची, आंब्याची झाडं! चिमण्यांना पण ही नवीन जागा पसंत पडली. आता कमू पाखरांना तांदूळ, पाणी ठेवायला त्या देवरण्यापाशी जायला लागली.जवळपास माणसाचा हासभास नाही...आता कमू तिथे बसल्यावर पाखरं तिच्या अंगा-खांद्यावर बागडायची.

कमू शाळेत जायची, पण तिचा जीव काही तिथे रमत नसे. कामासाठी गावात कुठे कुठे फिरताना, शाळेत जाता येताना कमू पाखरं शोधीत रहायची. कधी कधी तिचे सवंगडी भेटायचे. कमू अशी अवचित येताना दिसली अन् नजरेच्या टप्प्यात कोणी मनुष्य नसला तर पाखरं तिच्या भोवती गिरक्या मारीत तिच्या खांद्यावर, हातावर बसायची. गोड गोड गाणी म्हणायची. एकदा जोग काकूंकडे मामीचा कायसा निरोप सांगायला कमू निघालेली. मळ्यातून जाताना वाटेत भोरड्यांचा गलका चाललेला दिसला.त्या आपल्याच कळपातल्या एका भोरडीला टोचताना दिसल्या. कमू धावत पुढे झाली. ओळख असूनही भोरड्यांनी तिची दखल घेतली नाही. तिच्याकडे दुर्लक्ष करून त्या आपल्या ओरडणाऱ्या  भोरडीच्या अंगावर त्वेषाने बोचण्यात मग्न. जखमी झालेल्या भोरडीला कमूनं उचलूनं घेतलं तर चिडलेल्या भोरड्यांनी तिच्या हातावर चोची मारल्या. कळपातली एक म्हातारी भोरडी कमूला म्हणाली, ''मार.. मार तिला! तिला आता मरायलाच हवं. धड उडायला सुद्धा येत नाहीय् तिला. आता कशाला ती जिवंत

रहायला हवी...मार तिला.''



कमू भोरडीला ओंजळीत सांभाळून धावत सुटली. भोरडया तिच्या पाठलागावर येत ओरडत राहिल्या, ''मार तिला ... मार ...मार तिला ... मार'' जखमी भोरडीला घेऊन कमू घरी आली. मामीची नजर चूकवून तिने घराच्या बाजूला असलेल्या लाकडांच्या बलाटात भोरडीला सुरक्षित ठेवलं. तिला पाणी पाजलं. पण रात्री जेवण वेळेला ती भोरडी आ वासून गतप्राण झाली. आपल्या जखमी भाईबंदाला मदत करायची त्याऐवजी बाकीच्या भोरड्या तिच्या जीवावर का उठल्या ? एरवी शांत गरीब असलेली ती पाखरं ... ती अशी उफराटी का बनली हे काही कमूला समजलं नाही.दुसऱ्या

दिवशी तांदूळ पाणी घेऊन ती देवरण्याजवळ गेली. तिथे आलेल्या सातभाईंना तिने विचारलं तर ते म्हणाले,''तसा मुळी पक्षांचा कायदाच आहे. ज्या पाखरांच्या पंखातलं बळ संपलं,जे क्षीण झालं त्याला मुळी बाकीच्या भाईबंदांनी मारायचंच असतं !''

पाखरांच्या दुनियेत हरपून गेलेल्या कमूला आता त्यांची भाषा बरीचशी समजायला लागली. त्यांचे शीळ घालण्याचे प्रकार, शीळेची तीव्रता, स्वर यावरून त्यांच्या भाव भावना ओळखण्याचं कसब तिला चागलंच अवगत झालं. शब्दापेक्षाही मनातले भाव अचूक ओळखणाऱ्या हुषार पक्ष्यांचं तिला भारी नवल वाटायचं. काही कारणामुळे कमू रागावलेली - चिडलेली असायची. अशा वेळी पाखरं तिच्या जवळ जायला बिचकायची. अशा वेळी तिनं जास्त विनवण्या केल्या तर जवळ येण्याऐवजी पाखरं उलटी घाबरून दूर उडून जायची. त्यांच्याकडे जाताना मन मोकळं-साफ असावं लागतं. एवढंच नव्हे, ती जवळपास वावरत असताना एखादा वाईट दुष्ट विचार मनात आला तरी पक्षांना ते नेमकं समजायचं... मग ती घाबरुन भुर्रर भुर्रर दूर उडायची. नित्य भेटणाऱ्या काही थव्यांमध्ये एखादं पाखरु कमी झालेलं दिसायचं. अशा वेळी विचारलं तर ''ते मेलं'' असं पाखरं बिनदिक्कत सांगायची. काही वेळा नव्यानं उडायला शिकलेली पाखरांची पिल्लं घोळक्यात मिसळायला बघायची. त्यावेळी त्या पिल्लाच्या जातीवर्णातले पक्षी त्यांच्यावर हल्ला करुन त्यांना पिटाळून लावायचे. नव्याने तिथे आलेली पाखरं कमूजवळ यायला बिचकायची. काही वेळा इतर पाखरं कमूजवळ वावरताना बघितल्यावर नवीन आलेली पाखरं चिर्रर - चिर्रर करीत घाबरून दूर उडून जायची.

त्या दिवशी कमू अंथरूणात उठून बसल्या बसल्या दयाळ पाखराचं प्रणय गीत अवचितपणे कानात पडलं. पांघरूण बाजूला टाकून कमू पळतच मागिलदारी गेली. विहिरीजवळच्या नागचाफ्यावर गाणारा नर तिला दिसला. कमूला बघताच तिच्या डोक्याभोवती गिरक्या मारीत तो म्हणाला, ''कमू अगं गम्मतच आहे ! आता माझी मादी अंडी घालणारेय् ... '' कमू विस्यमयानं

पहात राहिली. खूप निरखून निरखून तिनं बघितलं तरी दयाळाचं घरटं काही तिला दिसेना. ‘‘अजून नाही ना दिसलं आमचं घरटं’’ नर म्हणाला. एवढ्यात मादीची गोड लकेर ऐकू आली अन् जमिनीपासून उंचावर एका डहाळीच्या बेचक्यात पानांच्या झुबक्याआड दडलेलं घरटं दिसलं. ‘‘अय्या... कधी गं बांधलंत हे घरटं ? किती छान आहे...’’ कमू म्हणाली. पंख पसरून घरट्यात गोल गोल फिरून ते सारखं केल्यावर मादी तिच्याजवळ आली.

‘‘कसलं छानं अन् काय ! हा नर एवढा आडमुठ्ठा ... आत मऊ कापसाचं अस्तर न घालताच घरटं पुरं झालं म्हणून नाचतोय!’’ मादीची प्रतिक्रिया ऐकल्यावर खजिल झालेला नर दूर उडून गेला. कमू कुतुहलानं विचारू लागली, ‘‘पण काय गं ? अंडी घालायची वेळ आली हे तुम्हाला अचूक कळतं कसं ? अन् तोवर तुमचं घरट पूर्ण कसं होतं ? कमालचं आहे की गं !’’ कमूच्या अचरटपणाची  कीव करीत मादी म्हणाली, ‘‘मीच तर अंडी घालणार, मग मला न कळायला काय झालं?’’ आपल्या गळ्याखाली पोटवळाचा भाग चोचीने दाखवित ती म्हणाली, जवळ दहा दिवस अगोदर इथे जरा जड जड वाटायला लागतं. मग नराला घरटं बांधायची सूचना द्यायची. आमचा अंदाज कध्धि चुकत नाही. अंडी घालायची वेळ येईपर्यंत घरटं अचुक पुरं होतंच!’’ तेवढ्यात चोचीत सावरीच्या म्हाताऱ्या पकडून नर आला. चार पाच खेपा मारून घरट्यात अंथरायला पुरेल एवढा कापूस त्याने गोळा केला.

कमूला आता एक नवीन छंद लागला. दयाळाची पिल्लं अंडयातून बाहेर आली का हे बघायला ती सारख्या खेपा घालीत रहायची. पिल्लं बाहेर येण्यापूर्वी एक दिवस अगोदर मादी तिला म्हणाली,‘‘उद्या बाहेर पडतील बघ माझी बाळं.’’दुसऱ्या दिवशी अंड्याच्या कपच्या चोचीत घेऊन जाणारी मादी तिला दिसली. भुकेमुळे चोची वासून माना लांब करणारी तीन पिल्लं दिसली.अंड्यांच्या कपच्या घरट्याजवळ पडलेल्या दिसल्या तर शत्रूला सुगावा लागतो.एवढंच नव्हे तर पिल्लं मोठी होऊन उडायला लागेपर्यंत त्यांची ‘शी’सुद्धा चोचीत धरून लांब नेऊन टाकावी लागते.ही नवीन माहिती

मादीनं तिला सांगितली. तसेच पिल्लं मोठी होईपर्यंत कमूने घरट्या जवळ यायचं नाही.सारखं सारखं घरट्याकडे टक लावून बघायचं नाही, बोट करून निर्देश करायचा नाही. शत्रूला घरट्याचा सुगावा लागेल. कावळे, भारद्वाज हे दुष्ट पक्षी बारक्या पक्षांची अंडी -पिल्लं मटकावतात असंही तिने सांगितले.

कमूला आश्चर्य वाटलं. कावळयांचा दुष्टपणा तिला माहिती होता. पण भारद्वाज ! '' भारद्वाजाला तर आम्ही माणसं पवित्र मानतो. त्याचं दर्शन होणं हे आम्ही चागलं समजतो.'' कमू म्हणाली. त्यावर मादी फणकाऱ्यानं बोलली, ''एक नंबरचा दुष्ट असतो तो. लाल डोळ्यांचा राक्षस, तुम्ही माना त्याला पवित्र, पण त्याचं दर्शन झालं की आमच्या मात्र छातीत धडकी भरते.'' कमू खूप दक्षता घेऊन दयाळाच्या घरट्याचं निरीक्षण करायची. पिल्लं मोठी व्हायला लागली. त्यांची भूक वाढू लागली. त्यांना खाऊ आणून घालण्यात नर मादीचा संपूर्ण दिवस जायला लागला. कमूच्या हे लक्षात आल्यावर तिने नागचाफ्याच्या झाडाजवळच थोडे तांदूळ घातले. ''मी इथेच घालीन तांदूळ, चांगले भरपूर घालीन. तुमच्या खेपा वाचतील अन् बाळानाही पोटभर खाऊ मिळेल.''

नर मादी दोघांनीही नागचाफ्याजवळचे सगळे तांदूळ वेचून खाल्ले. मादी म्हणाली, ''कमू तुला अगदीच कसं गं कळत नाही. तू इथे तांदूळ घातलेस तर ते बघून इतर पक्षी इथे येतील. त्यांना आमच्या घरट्याचा सुगावा लागेल. मग नर म्हणाला, ''आणि हे बघ! बाळांना काही आम्ही तांदूळ नाही भरवणार.''कमू म्हणाली, ''का? त्यांना चावता येणार नाही? तर मग मी शिजवलेला भात घातले ना मऊ - मऊ ...''मादी फणकारत म्हणाली, ''काही नको भात...! तांदूळ भात हे काही आमचं नेहमीचं खाणं नाही. अळ्या, कीटक, फळं हे आमचं खाद्य. आपलं नेहमीच खाणं काय आहे ते बाळांना नको का कळायला? अन् मोठी झाल्यावर ती काय इथे रहाणार आहेत तुझे तांदूळ खायला? ती जातील दुसऱ्या भागात तिथे त्यांना रोज कसे मिळतील तांदूळ ?''

दयाळाची पिल्लं उडायला शिकण्याचा दिवस उजाडला. देवरण्याजवळ तांदूळ पाणी ठेऊन येताना घरट्याबाहेर पडून थरथरत डहाळीवर बसलेली तीन गोजिरवाणी पिल्लं तिला दिसली. नर मादी त्यांना पंख पसरून झेप घ्यायला सांगत होते.अन् भेदरलेली पिल्लं फांदी गच्च आवळून आढेवेढे घेत होती. शेवटी रागावलेल्या नर मादींनी आपल्या चोचींनीत्यांच्यावर प्रहार करायला सुरूवात केली.चोचीचा मार चुकवण्याच्या गडबडीत तीनही पिल्लं डहाळीवरून घसरली. ती जमिनीवर आदळणार म्हणून कमू घाबरली. पण खाली पडता पडता पंख पसरल्यावर ती आपोआप उडायला लागली. दोन पिल्लं दूर झेपावत निघाली.नर मादी त्यांच्या मागोमाग गेले. एक पिल्लू मात्र अशक्त होतं ते थोडसं उडून जवळच्या दुसऱ्या फांदीवर पंख मुडपून बसलं. खूप वेळानं नरमादी नागचाफ्याकडे परत आली. ‘‘हे काय? तुमची पिल्लं कुठे आहेत?’’ कमूनं विचारलं. मादी म्हणली, ‘‘ती गेली.’’ त्यांना दूर आमच्या प्रदेशाबाहेर हाकलून आम्ही परत आलो. तेवढ्यात अद्यापि फांदीवर असलेलं तिसरं पिल्लू मादीला दिसलं.ती रागाने त्याला टोचायला लागली. घाबरलेलं ते अशक्त पिल्लू काही केल्या चाळवेना. मादीच्या चोचीचे प्रहार सहन न होऊन ते चिर्रर चिर्रर असं आळपायला लागलं.कमू कळवळ्यानं म्हणाली.‘‘ए, राहू देना त्याला आणखी एक दोन दिवस, बिचारं अशक्त आहे.त्याला दोन दिवस खाऊ पिऊ घाल. मग आपोआप उडेल ते. अशानं मरेल ना ते !’’

नर रागाने म्हणाला, मरू दे मेला तर ! हा ऐतखाऊ, अजून घरट्याची उब सोडून जाऊ इच्छित नाही. कोण आयतं खायला घालणार याला ? याचे सोबती कधीच दूर गेले. अन् हा आयतोबा आमच्याच प्रदेशात हक्क गाजवायला पहातोय.’’ अन् त्यानेही पिल्लावर जोरात चोची मारायला सुरूवात केली. कमूला निर्दयी नर मादीचं कृत्य पाहवेना. ‘‘कमाल आहे की रे तुमची. तुमचं बाळच ना ते ? राहू दे ना त्याला इथे रहायचं तर.’’ मादी रागाने म्हणाली, ‘‘तुला नाही समजायचे आमचे कायदे! पिल्लं मोठी झाली, उडायला लागली की ते आमचे शत्रू बनतात. हा इथे राहिला तर उद्या

माझ्यावरही हक्क गाजवायला बघेल. ते काही नाही, जाऊ दे याला इथून.'' आता नर- मादी  दोघेही त्याला टोचायला लागले. घायाळ झालेलं पिल्लू फांदीवरून खाली कोसळलं. ''मरू दे त्याला'' म्हणत नर मादी उडून गेली.

कमूने त्याला अलगद उचललं अन् एका फांदीवर ठेवलं. त्या पिल्लाला घरी नेण्याची अनिवार इच्छा तिला होऊ लागली. पण मामीला समजलं तर ती गहजब करील याची भीती  तिला वाटली. दुसरं म्हणजे पक्षांचे अद्‌भुत कायदे थोडे थोडे तिला समजू लागले होते. आपण या पिल्लाला आश्रय दिला तर ते पक्षांना कितपत आवडेल ही सुद्धा शंकाच होती. अशी किती निराधार पिल्लं असतील. सगळ्यांनाच कोण आसरा देणार? शेवटी त्याच्या नशिबात असेल ते चुकणार नाही हे उमजण्या एवढी कमू आता प्रौढ झाली होती. म्हणून मन घट्ट करून ती घरी गेली.

पाखरांच्या संगतीत त्यांच्या भाषा, त्यांचे अद्‌भुत कायदे याचं ज्ञान कमूला झालं होतं. प्रत्येक पाखराची त्याच्या जातीवर्गाप्रमाणे भाषा वेगळी असते.मात्र राग व्यक्त करणं, खाद्य -पाणी दिसलं की सूचना करणं, शत्रूची चाहूल लागणं अशा वेळी मात्र त्यांचे संकेत समानच असतात हे तिच्या लक्षात आलं. दुपारच्या वेळी माजघरात झोपलेली असताना शत्रूची चाहूल लागल्याचे संकेत देणारं साळुंक्यांचं भयकारी ओरडणं कमूच्या कानांत पडलं.कमू गडबडीने मागील दारी गेली. प्राजक्ताप्रमाणे फणसावर उंच फांद्यांमध्ये असलेल्या बिळात साळुंक्या अंडी घालायच्या.त्या फणसावर एक पिवळं धम्मक आघेलं (धामण) चढताना दिसलं. साळुंक्यानी त्याला पाहून एकच गिल्ला केला. ते वर जायला लागलं तस तशा साळुंख्या अधिकच ओरडायला लागल्या. त्या झेप घेऊन आधेल्याच्या अंगावर चोचीचे प्रहार करू लागल्या. पण त्यांच्या हल्लाला न जुमानता आधेलं  नेटाने वर जाऊ लागलं. आता मात्र कमू घाबरली अन् तिनं मामाला हाक मारली.

कमूची ओरड ऐकून मामा धावतच आले.फणसावर साळुंक्यांची अंडी- पिल्लं खायला चढणारं आधेलं त्यांनी बघितलं. थोडा वेळ विचार करुन त्यांनी एक लांबलचक चिव्याची काठी घेतली. तिच्या टोकाला

दोरीने कोयती बांधली अन् धोतराचा काचा मारुन ते फणसावर चढले. तो पर्यंत आधेलं फांदीवरच्या बिळापर्यंत पोहोचलं. अन् त्याने बिळात तोंड घातलं.बिळातल्या त्याने गिळलेल्या अंड्याचा फुगीर भाग त्याच्या वेटोळ्यातून मागे मागे सरकताना दिसू लागला. मामांनी आधेल्याच्या वेटोळ्यात कोयती खुपसून काठी जोराने खाली ओढली. त्याबरोबर अर्धवट अंग चिरलेलं आधेलं धप्पकन खाली जमिनीवर पडलं. खाली उतरल्यावर त्याला पूर्ण मारून मामानी ते अजस्त्र धूड कुंपणाबाहेर भिरकावून दिलं. जिची अंडी खाल्ली होती ती साळुंकी बिचारी अंग फुलवून हुडहुड्या घालीत राहिली.

जेमतेम मार्क मिळवून कमू फायनल पास झाली. पुढे शिकायला तिने नकार दिला. मग कुणी जास्त आग्रहपण केला नाही. आता पुरा दिवस पाखरांच्या मागे रहायला तिला फुरसत मिळाली. कमू मन लावून त्यांची भाषा आत्मसात करू लागली. त्यांची भाषा मर्यादित ध्वनी, नेमके शब्द असलेली. त्यांच्यासारखे स्वर काढणे तर भारी अवघड. खूप प्रयत्न केल्यावर दात घट्ट आवळून एक नाकपुडी बंद करून जीभ घशात ओढून घेतल्यावर पाखरांसारखे स्वर काढता येतात हे तंत्र तिला उमगलं. त्यांची गाणी मात्र तिला सफाईदारपणे म्हणायला जमेनात. हळूहळू साळुंक्या, भोरड्या, दयाळ, सातभाई, बुलबुल अशा पुष्कळ पक्षी जातीची बोली तिला अवगत झाली. तिचं दिवस दिवस पाखरांमध्ये रमणं, शीळा घालणं असल्या अघोचरी नादिष्ट चाळ्यांबद्दल मामी तिची तासडमपट्टी करायची. तेवढ्यापुरती कमू गंभीर व्हायची.

पेंडखळ्यात कार्तिक्या दशमीपासून पौर्णिमेपर्यंत गाव देवाचा उत्सव व्हायचा.सहा दिवस कीर्तन, प्रवचनं व्हायची. कमू आता मोठी म्हणून मामी तिला आपल्या सोबतीला कीर्तनाला न्यायची. कीर्तनकार बुवानी पक्षी तीर्थाची कथा सांगितली. कमूला भारी आवडली ती कथा. पाखरांबद्दल सुद्धा किती अद्‌भुत माहिती सांगितली. पक्ष्यांची भाषा निळावंतीच्या पोथीत आहे. पण ती पोथी कुणाला मिळत नाही. चुकून एखाद्या माणसाला ती पोथी

मिळाली न् त्यानं पक्षांची भाषा शिकली तर त्या माणसाचा निर्वंश होतो असं बुवा म्हणाले. हे ऐकून मात्र कमू घाबरली. दुसऱ्या दिवशी तांदूळ घालायला गेल्यावर तिने साळुंक्यांना त्याबद्दल विचारलं. त्यांना काही सांगता येईना. पण त्या प्रदेशातला पाखरांचा नायक असलेला पिंगळा नक्की माहिती देईल असं त्या म्हणाल्या. पिंगळ्याचं ओरडणं कमूनं ऐकलेलं होतं. पहाटे पिंगळा ओरडताना ऐकून भीती वाटायची म्हणून त्याची भेट घ्यायला कमू तयार होईना.

पिंगळ्यांचा आवाज ऐकला की तिच्या अंगावर काटा यायचा. तो भीतीदायक दुष्ट पक्षी असावा असा तिचा समज! पण साळुंक्या, भोरड्या या तिच्या मैत्रिणीनी सांगितलेली माहिती एकदम वेगळी होती. पिंगळा हा अत्यंत हुषार अन् बुद्धिमान पक्षी असून पक्षी जगतात त्याचं आदराचं स्थान असल्याचं त्यांनी सांगितलं.तेव्हा मात्र त्याला भेटायला कमू तयार झाली.दोन दिवसानंतर संध्याकाळच्या वेळेला पिंगळा आला. देवरण्या जवळच्या जांभळीच्या झाडाखाली कमू त्याला भेटायला गेली. कीर्तनकार बुवांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे का?असा प्रश्न तिने विचारला. पाखरांची भाषा जाणणाऱ्या माणसांचा निर्वंश होतो ही गोष्ट पूर्णतः खोटी आहे असं पिंगळा म्हणाला.उलट कमूचं मन निर्मळ आहे, ती भाग्यवान आहे, म्हणून ही अद्‌भुत विद्या तिला प्राप्त झाल्याचं त्याने सांगितलं.

पक्ष्यांच्या आजवरच्या इतिहासात मानवाचे पक्ष्यांशी इतके जिव्हाळ्याचे संबंध असल्याची उदाहरणं अगदी थोडी असल्याचं तो म्हणाला. माणसं ही धूर्त, दगाबाज असल्यानं पक्षी त्यांच्यावर विश्वास ठेवीत नाहीत. एवढचं नव्हे तर माणसाचा जरा स्पर्श झाला तरी पाखरांना विटाळ होतो. पाखरं निरुपद्रवी असली तरी मनुष्य त्यांच्याशी क्रूरपणाने वागतो. त्याने आजपर्यंत पक्षीवर्गाची अपरिमित हानी केली आहे. म्हणून आपल्याला प्राप्त झालेल्या या अद्‌भुत विद्येची माहिती कमूनं चुकूनही दुसऱ्या कुणाही माणसाला सांगू नये. ही विद्या दुसऱ्या माणसाला शिकवू नये. कारण दुसरा मनुष्य त्याचा गैरवापर करुन पक्षांना त्रास देईल तर मात्र पाखरांचा शाप तिला बाधेल.

पाखरं दुर्बल असली तरी माणसाचं नशिब बदलण्याचं सामर्थ्य त्यांना निसर्गाने दिलेलं आहे. म्हणून अजाणतेपणाने झालेला संकेतभंग सुद्धा कमू अन् पाखरं दोघांच्याही दृष्टीने घातक असल्याचं पिंगळा म्हणाला.

पक्षी आणि माणूस यांची विश्व भिन्न असल्याने दोघांनीही आपल्या मर्यादेत रहाणं हिताचं आहे असं सांगून कमूचं भवितव्य उज्वल आहे, तिने पाखरांवर जी माया केली त्याचं फळ तिला मिळेल असं भाकित सांगून पिंगळा सांगून निघून गेला. पिंगळ्याने सांगितलेल्या गोष्टीमुळे कमूच्या मनावरचं दडपण दूर झालं. तसंच आपलं आणि पक्ष्यांचं नातं कुणाच्या लक्षात येऊ नये याकडे कटाक्ष ठेवायचा निर्धार तिने केला. पक्ष्यांना तांदूळ पाणी घातल्यावर नेहमीप्रमाणे तासन्तास त्यांच्याशी गप्पा मारीत रहाणं तिने बंद केलं. परमेश्वराने आपल्याला दिलेला हा अतीव आनंदाचा ठेवा आपल्या हातून घालवायचा नाही, असा सूज्ञ विचार करून ती संयमाने वागू लागली. घरच्या कामाधंद्यात लक्ष घालू लागली. तिचा पाखरांचा नाद कमी झाला हे मामीच्याही लक्षात आलं

कमू लग्नाला झाली. आता तिच्यासाठी एखादं चांगलसं स्थळ बघायला हवं अशा चर्चा घरात व्हायला लागल्या. तेव्हा तिच्या भाव विश्वालाच तडा गेला. पक्ष्यांच्या विश्वात रमून गेलेल्या कमूला पक्ष्यांना सोडून नवऱ्याकडे रहायला जायचं हा विचारसुद्धा पटेना. टिपण जुळतं असा निरोप होडावड्याच्या गोडबोल्यांकडून आला. कमूला दाखवायला न्यायचा बेत ठरला त्या दिवशी तर तिची कोण उलाघाल झाली. पण मनुष्य म्हणून हा भोग अटळ आहे. 'मला लग्न करायचं नाही' असं कमू सांगती तर अनेक तर्क-कुतर्क शंका निघाल्या असत्या. कदाचित तिचं गुपित फुटलं असतं. म्हणून मामा मामी सांगतील ते निमूटपणे ऐकायचं, देवाच्या मनात असेल तसं होईल ! आपलं भवितव्य उज्ज्वल आहे, हे पिंगळ्याचं भाकित खोटं ठरणार नाही हा विचार तिने केला.

मामा - मामीबरोबर कमू होडावड्याला जाऊन आली. मामांनी तिच्यासाठी योजलेला नवरा मुलगा शांत, सालस होता. कमूला तो आवडला.

चार दिवसांनी हे स्थळ पसंत असल्याचा निरोप आला. त्या दिवशी मात्र कमू सैरभैर झाली. तिच्या बदललेल्या मनःस्थितीचा किती विपरीत परिणाम पाखरांवर झाला याचा अनुभव आल्यावर कमू शहाणी झाली. पक्षी अन् माणूस दोघांनीही आपल्या मर्यादेत रहावं हे पिंगळ्याचं मत किती योग्य आहे हे तिला आता पटू लागलं. त्यांच्या विश्वातलं आपलं अस्तित्व लोप पावल्याची विषण्णता पाखरांना होऊ नये अशा बेतानंसावधपणे हे माया पाश तोडायचा निश्चय तिने केला.

कमूचं लग्न मामांच्या दारातच लागणार होतं.मांडव घालणं, रूखवत, पाहुणे या सगळ्या घणाघोरात कमू मात्र अलिप्तच ऱ्हायली. आपण हे घर सोडून गेलो, पाखरांना आपण दिसलो नाही की त्यांची काय अवस्था होईल हा विचारसुद्धा तिला करवेना. लग्न दोन दिवसांवर आलेलं असताना नित्यनेमा प्रमाणे तांदूळ पाणी ठेवायला कमू देवरण्या पाशी गेली. तांदूळ ठेवताना तिच्या मनात आलं... आजची ही खेप आपली शेवटची. उद्या वऱ्हाडी आले की, आपल्याला घराबाहेर पडता नाही यायचं! न राहवून तांदूळ वेचणाऱ्या भोरड्या, साळुंक्या, सातभाईंना तिने म्हटलं, ‘‘बायानो उद्या काय मी इकडे येणार नाही. परवा तर मी माझ्या जोडीदाराबरोबर त्याच्या घरट्यात रहायला जाणार. मग तर आपली भेटच नाही होणार!’’ तिचा बांध फुटला. कितीही संयम घातला तरी तिला भावना आवरल्या नाहीत.

आपली स्थिती पाहून पाखरं कलकलाट सुरू करतील अशी तिची अपेक्षा! परंतु त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही. त्यांचा अनपेक्षित प्रतिसाद पाहून सर्द झालेली कमू रडणं आवरून म्हणाली, ‘‘का गं बायानो, मी तुम्हांला आता दिसणार नाही याचं वाईट नाही वाटलं तुम्हांला?’’तशी गोड लकेर छेडीत भोरडी म्हणाली, ‘‘त्यात कसलं वाईट वाटायचं? तुला तुझ्या जोडीदारा बरोबर जायलाच हवं! आता तुझी माणसं तुला या प्रदेशात राहू देतीलच कशी? मग कमू म्हणाली, ‘‘मी गेले की तुम्हाला पाणी-तांदूळ कोण देणार? याची काळजी नाही वाटत तुम्हांला? रोज माझ्या यायच्या वेळेला तुम्ही वाट नाही बघणार माझी? तुम्हांला आठवण नाही

येणार माझी?'' शांतपणे साळुंकी म्हणाली, ''तू तर जाणार! मग तुझी वाट कशाला बघायची? अन् तुझी आठवण तरी कशाला काढायची आम्ही? तांदूळ पाणी मिळायचं बंद झालं की आम्ही मुळी येणारच नाही इथे! आम्ही जाऊ दुसरीकडे खाणं शोधायला.''


पाखरांचं हे रूप, त्यांचे विचार कमूला नवीन होते. अपेक्षाभंग झालेली कमू पक्ष्यांकडे पाठ फिरवून घराकडे निघाली. चिमण्यांची उत्तर ऐकून ती एवढी खट्टू झाली की तिचं रडू मुळी बंदच झालं. रात्री तिला धड जेवणसुद्धागेलं नाही.अंथरूणावर पडून विचार करीत असताना चिमण्यांच्या उत्तरा मागचं रहस्य तिला अकल्पितपणे उलगडलं. पाखरं प्रेमळ असली तरी भावनाविवश नसतात. पिल्लं सक्षम होईपर्यंत जीवाचं रान करणारी पक्षीण... ते पिल्लू स्वतःच्या पंखावर उडू लागलं की पुढे त्याचं काय होईल याचा विचारही करीत नाही. ही त्यांची भावना शून्यता नव्हे... हा असतो त्यांचा संयम, सारासार विवेक अन् स्वतंत्र बाणा! आपल्या मर्यादा त्यांना पूर्णार्थाने ज्ञात असतात. म्हणूनच अल्पशा त्यांच्या आयुष्यात निर्भेळ आनंदाचे क्षण पाखरं जगू शकतात. त्यांच्या सहवासातून मिळालेला हा विचार अंतरी साठवीतच कमू निद्राधीन झाली.



लग्नसोहळा पार पडला अन् मामा मामीच्या पाया पडून निघण्याचा

क्षण आल्यावर मात्र तिला दुःखावेग अनावर झाला. मामीला मिठी मारून हुंदके देत कमू म्हणाली, ''मामी तू अन् मामा, दोघांनी माझं खूप केलंत. आई- वडिलांची उणीव मला भासू नाही दिलीत.आईच्या मायेला पारखी होऊन मी इथे आले. जगण्याचा अर्थ पक्षी मित्रांनी मला शिकवला अन् जगण्याचं बळही दिलं. मामी मी गेले तरी रोज न चुकता मूठभर तांदूळ न् पाणी माझ्या पाखरांसाठी ठेवशील ना गं?''तिला कुरवाळीत मामी म्हणाली, ''अगो! तू सांगण्यापूर्वीच तुझा वसा पुढे सुरू ठेवायचा असं मी ठरवलंय.आज एवढी गडबड, पण पहाटेच तुझ्या पाखरांसाठी पसाभर बुंदी अन् पाणी देवरण्याजवळ ठेवून आले मी.''बुंदी अन् पाणी देवरण्याजवळ ठेवून आले मी.''

''कमू तू आलीस अन् तुझ्या पायगुणामुळे आमच्या संसारावर आलेलं अरिष्ट टळलं. पाखरांना दाणापाणी ठेवायचा तुझा नेम सुरू  झाला अन् त्यांचा दुवा मिळून या घरात लक्ष्मीची पावलं उमटली. लहानपणी तुझं चळिंत्र बघून मी मारलं सुद्धा तुला! पण तुझ्या व्रताचं फळ मिळालं म्हणून आज माझ्या घरात समाधान नांदतेय् हे मला पुरतं उमगलं. तू मुठी भरूभरून तांदूळ घालायचीस पाखरांना ते का मला समजतं नव्हतं? पण तुझ्या व्रताच्या आड मी आले नाही. तू निर्धास्त मनानं सासरी जा ! अन् हे बघ, गोडबोल्यांच्या घरामागे मोठा पार बांधलेला आहे. त्यावर उंबराचं झाड आहे हिरवंगार... तिथे खूप पाखरं जमलेली दिसली मला. त्या उंबराखाली पाखरांसाठी तांदूळ अन् पाणी ठेवायचा प्रघात तू सासरी गेल्यावर सुरू कर. मी अनुभवाचे बोल सांगत्येय... त्या अश्राप पक्ष्यांचा दुवा मिळाला तर तुला सुद्धा आयुष्यात कधी काही कमी नाही पडायचं... !



# ७. परीस मेळो

घाटी चढल्यावर शेवटच्या मोडणाला रात्या आंब्याखाली तानू देवळी दम खायला थांबला. बानघाटी म्हणजे मोडणा मोडणानी वर गेलेली जीवघेणी चढण. त्यात पावसाने चढणीचे दगड बुळबुळीत झालेले. सड्यावर यायला जवळची वाट म्हणून तानू या घाटीने आला.दम जिरल्यावर तो पुन्हा चालीला लागला. धारेपर्यंत आल्यावर घाटी संपली आणि सड्याची सपाटी सुरू झाली. धारेपासून पाच कोस औरस चौरस टापू म्हणजे नुसती सडावळ! कुडा, आंजण, पंचकोळी, उक्षी अशा गोड्या आणि करंदी, तोरणी, वाघेरी अशा काटेऱ्या झाळी नी अधून मधून चुकार एखादे वड, पिपंळ, सात्विण, किंजळ, कुंबया, काजरा असले झाड. चुकार थोडेसे गवत बाकी सगळा सडा ओसाड! पाच गावांच्या सीमा या सड्यावर एकमेकींना भिडलेल्या. सडा सुरू झाला अन् तानू निरखीत चालला.पावसाळी पाण्याच्या व्हावटी सोडून उंच भागात साठवलेली सकेर दिसेल तिथे तर तो बारकाईने बघायचा. पायाने सकेरीचे ढीग विस्कटून बघायचा. बुधा कातकऱ्याने सांगितल्याप्रमाणे अशा सकेरीच्या ढिगोळ्यातच टिटाटवळी अंडी घायालची. तिच्या अंड्याचा रंग सकेरीतल्या गोट्यांसारख, निरखून बघितल्याशिवाय तिची अंडी उमगू यायची नाहीत. पाच सहा ढिगोळ्या परतून आल्या आणि तानूच्या उजवी कडच्या झाडकळीतून टिटाटवळी उठली. टिव् टिटिव् टिटिटँव् टिटिटँव् अशी आळप झाली. तानूच्या डोक्यावर घिरट्या घालायला लागली. तानू चपळाई करुन उजवीकडे वळला. तो मनोमन हरखला.

झाळीच्या तिन्ही अंगाला सकेर साठून उंच वरंडे झालेले. तिथे उकिडवा बसून तो शोधू लागला. सगळी सकेर अरतून-परतून झाली. पण अंडी उमगली नाही. तानू कंटाळला तिथेच सकेरीवर पाय सोडून बसला, आडड्डित्ता काढून सुपारी कातरायला लागला.मघाशी उठलेल्या आळप

अजून सुरूच! आता तिच्या जोडीला दुसरी टिटाटवळी आली. दोघीनी ओरडून ओरडून असा सकनात घातला की तानूचे डोके भणभणायला लागले. एक टिटवी मध्येच लांबच्या एका सकेरीच्या ढिगोळीवर उतरली. कुशी पडून पंख फडफडवीत, ती गोल गोल फिरू लागली. पान खाता खाता तानू लक्ष ठेवून ऱ्हायलेला. ढिगोळीवर लोळणारी टिटवी मरणार की काय अशी शंका तानूला वाटली. कदाचित ती लोळण मारते त्याच्या आसपास तिची अंडी तर नसतील ना? असाही तर्क त्याने केला.



तानू टिटवीच्या रोखाने निघाला आता टिटवी हालचाल करायची बंद करून निपचित पडून ऱ्हायली. तानू टिटवीपासून वावभर अंतरावर गेला मात्र...मेल्यागत गप्प झालेली टिटवी टिट्यॅंव ऽऽ टिटिट्यॅंव करीत भुर्रकन उडाली.''बांजिंदी, माका हूल मारुन देकयल्यान्'' तानू वैतागत म्हणाला, त्या जागेला शोधूनही अंडी मिळाली नाहीत. आता पुनःश्च टिटवीने दुसऱ्या ढिगोळीवर लोळण मारली. या खेपेला मात्र तानू चकला नाही. आता कुठून कुठून आणखी चार-पाच टिटाटवळ्या तिथे आल्या. तानू अंडी शोधून

शोधून हैराण झाला. मध्यान्ह टळून गेली. पोटात भुकेचा डोंब उसळला. अख्खा सडाभर टिटाटवळ्यांची नुसती आळप चाललेली. चार बाजूनी ढग जमून अंधारून आले. पावसाचे चिन्ह दिसू लागल्यावर मात्र नाऊमेद झालेला तानू माघारी निघाला. तानू धारेला अगदी घाटीच्या तोंडाशी येईपर्यंत टिटव्या त्याच्या मागावर आल्या.

बेड्यातून आत पाय टाकताच घरात चाललेल्या हसण्या खिदळण्याचा आवाज तानूच्या कानावर आला. बैठकीच्या खोलीत बिछायतीवर दाजी पोलीसवाला रूबाबात बसलेला. पान खाऊन लालीलाल झालेले दात दाखवित निर्लज्जपणे फिदी फिदी हसत फुला त्याला खेटून बसलेली. त्यांच्या अंगावरून तानू मागीलदारी गेला. रांधपाच्या होवरीकडून वाटपाच्या शिजवणाचा खमंग वास आला. झटझट पाय धुऊन तानू आत आला. दाजी मुक्कामाला असला की मागच्या पडवीतल्या साण्यात हुकमी बाटली ठेवलेली असायची. उभ्या उभ्या चार घोट तोंडात ओतून तानू चुलीकडे निघाला. चुलीतली लाकडे बाहेर ओढून तिथेच बाजूला पाटावर टेकलेल्या मायकडे त्याने जेवणाची मागणी केली.''दुनियेची नर्कड तुडौन इलस माज्या पुताऽऽ? बस आता. भैणीच्या कमायवर सोन्याचो घास खावक कसो अगदी येळेर टपाकलं रे ऽऽ? येरे ऽऽ माझ्या कावळ्या....''

निरुद्योगी तानूला माय नेहमीच असे खडसवायची. तानू वैतागाने बडबडला, ''शिंदळकी करण्यापक्षी फिरलेला काय वायट्. येकदा माका तोडगो गवसॉने मगे बघच तू चल... जेवक वाड आदी.''ह्याच्या तोंडाला लागण्यात अर्थ नाही हे ओळखून मायने ताट वाढून त्याच्या पुढ्यात ठेवले. तानू तडस लागेपर्यंत जेवला. जेवण झाल्यावर बचकाभर सुपाऱ्या नी पानांची चवड चंचीत भरून तो बाहेर पडला. दाजी आला की दोन दिवस डिंबी देऊन रहायचा. आता घरात राहण्यात अर्थ नव्हता. तानू देवळाकडे निघाला. घरी असे अैरे गैरे जमले की तो नेहमीच देवळाजवळची धर्मशाळा गाठायचा. फुलाचा छिनालपणा त्याला बिलकूल आवडत नसे, पण मायचीच तिला फूस,असले नारे बंद करायला घरामध्ये खंबीर कर्ता पुरूष असावा लागतो, तो मुळी होताच कुठे?

तानू आणि फुला यांच्या बापाचा खुद्द मायलाच पत्ता नव्हता त्यांचेच कशाला.त्यांच्या शेजारी हारीने असलेली चारही घरे अशी बेवारशी बिन बापयांची! देवाचे सेवेकरी या नावाखाली सगळ्या गावाचीच सेवा त्यांच्या कपाळी लिहिलेली, त्या चारपाच घरात मिळून तानू आणि गोकूळ हे दोनच बापये, गोकुळ तानूपेक्षा मोठा.तो मुंबईत म्हणून गेला तो तिकडेच...देवाच्या सेवेत रूजू होईपर्यंत दोन वेळच्या अन्नाची भ्रांत पडायची म्हणून तर फुलाला देवाच्या सेवेत लावयाचा निर्णय मायने घेतला. नेमका त्याचवेळी दाजी पोलिसवाला मुंबईची नोकरी सोडून गावात रहायला आलेला, त्याच्या दोन बायका. एक लग्नाची आणि दुसरी मुंबईची कोणी पारशीण!! सक्तीच्या लष्कर भरतीत जवान दाजीला मामलेदाराने लष्करात भरती केला. तो आफ्रिका, ब्रम्हदेश असा सात समुद्रापार कुठे कुठे फिरला.पुढे युद्धात पुढच्या मांडीला बंदुकीची गोळी लागली म्हणून त्याला मुंबईला परत पाठविण्यात आले, गोळीची जखम बरी झाल्यावर तो पोलिसात दाखल झाला.

त्यावेळी पोलिस पाटलाच्या मुलीशी त्याने लग्न केले.त्याची बायको शेतीसाठी गावीच रहायची. दाजीने मुंबईत खोली घेतली. त्याच्या बिऱ्हाडासमोरच पारशी बाबाजीची सोन्या चांदीची पेढी होती.दाजी त्याच्या पेढीवर बसायचा. त्या पारशाची तरणी पोरगी दाजीवर फिदा झाली. पुढे स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळच्या धुमश्चक्रीत पारशी बाबाजीचा मुडदा पडला, नि पोरी सकट पारशाची इष्टेट दाजीच्या कबजात आली. मुंबईची पेढी विकून नोकरीचा राजीनामा देऊन पारशिणीसकट दाजी कायमचा गावात रहायला आला. गांगेश्वराकडे चक्कर मारताना गंगू देवळिणीच्या फुलावर त्याची नजर पडली. खरेतर त्यावेळी देवळ्यांच्या पोरी लग्न कार्य करून संसाराकडे वळायला लागलेल्या. पण पैशाच्या आशेने गंगूनेच पोरीला देवाच्या सेवेत रूजू करायचा घाट घातला. दाजी पोलिसवाल्याने पुढाकार घेऊन सगळा बेत पार पाडला.गोठ,तोडे, बिल्वर, चिंचपेटी असे ओझेभर दागिने घालून फुला देवाच्या सेवेत रूजू झाली.

तिचा आवाज मुळातच गोड! गंगूने स्वतः तिला नाचाचे धडे

दिलेले.गांगेश्वराच्या उत्सवात पायात मानाचे चांदीचे तोडे घालून फुला पालखी पुढे नाचली. चार - सहा गावचे बापये फुलाचा नाच बघण्यासाठी उत्सवाला जमले. घरी कायमचीच बिछायत घातलेली. रोज गाणे बजावणे व्हायचे. पंचक्रोशीतले वतनदार, सावकार, फुलाच्या घरासमोर लाळ गाळीत रहायचे. तानूला हे रंग ढंग अजिबात पसंत नव्हते. तो करवादला की माय उलट त्याचीच खावड काढायची.''ह्यो मेलो झडगो कोलो सांगणार, भिक मागाची अक्कल नाय. तुका कामधंदो न करता दोन टायम् सोन्याचो घास मिळताहा तो सुकान खा नी गप ऱ्हव... सगळी दुनिया फुलाच्या नादात कशी पागल व्हयत बगच तू...! मायचे भाकीत खरेच ठरलेले...!

खाण्या-पिण्याची चंगळ असली तरी लोकात उघड उघड होणारी टिंगल, कुचेष्ठा तानूला सहन व्हायची नाही. पण लोकांना तरी कसा नी का बोल लावायचा..? फुला काय फक्त गाणे बजावणे एवढ्या वरच थांबली होती?दीड- दोन महिन्यांनी बुधा कातकरी नाहीतर त्याची बायको जानी कसली कसली पाळे मुळे घेऊनयायची मायकडे,ती कशाला? या सगळ्यातून बाहेर पडावे असे तानूला फार वाटायचे. पण अंगभर कष्ट करायचे वावडे. शिक्षण जेमतेम अक्षर ओळखीपुरते झालेले ! नोकरी मिळणारी नव्हती आणि धंदा काय करावा ते सुचत नव्हते.

कळत्या वयापासून गांगेश्वराच्या देवळात कौल प्रसाद घ्यायला येणारे लोक तानूला दिसत. कसले आडमेळे आले, म्हस दूध देत नाय, मुंबयवाल्याचे पैसे आले नाय, सोरगत मिळत नाय, घरातला शीकपन कमी होयत् नाय... नाना प्रश्न घेऊन लोक कौल घ्यायला यायचे. भल्या गुरव उजवे, डावे कौल मागायचा, लोकांना गुण यायचा. काही रिकामटेकडे दिवसभर देवळात बसून रहायचे. बाबल्या सुतार त्यातलाच. तो कायम देवळात पडून रहायचा. पुढे त्याच्या केसात 'जट' उगवली. अवसे पौर्णिमेला तो घुमायला लागला. तीन महिन्यात डोईतली जट चांगली दोन बोट जाड जोऊन लोंबायला लागली. मग बाबल्या उतारे, तोडगे सांगायला लागला. अल्पावधीच 'जट्या सुतार' म्हणून त्याची प्रसिद्धी झाली. आठवड्यातला

सोमवार, गुरुवार, शनिवार त्याच्याकडे माणसांची रीघ लागायची.

कोणी म्हणे जट्या सुताराकडे गांगेश्वराचे सत्त्व जागृत झाले. त्याचा मुळवस-मूळ भूमका त्याला वश झाली.काही असो, जट्या वदेल त्याची प्रचिती यायला लागली. त्याची विभूत लावल्यावर आडमेळे दूर व्हायला लागले. गांगोच्या देवळातले कौल प्रसाद जवळ जवळ बंद पडत चालले.फुलाची शेस भरायचा दिवससुध्दा जट्या सुताराने नेमून दिलेला, फुलाला बरकत आली. माय दर गुरुवारी तांदूळ,नारळ, सव्वा रुपया जट्याकडे मांडावर धाडायला लागली. एका गुरुवारी तानू ते घेऊन जट्याकडे गेला. जट्या आंग धरुन घुमत असलेला. समोर माणसांची गर्दी, पण गर्दीतसुध्दा देवळणीचा तानू दिसताच जट्याने समोरची माणसे बाजूला केली. ‘‘माजा लेकरु मांडार इलाहा... तेचो मान आदी! चल रे देवळ्या सामनी ये...!’’

नारळ, तांदूळ, पैसे चौरंगासमोर ठेवून तानू भक्तीभावाने जटया पुढे वाकला, त्याच्या पायावर डोके ठेवून म्हणाला, ‘‘जट्या बाबा... माका बरकत येयना नाय... आवशी भैणीच्या जीवार खांवक् माजा मन घेयत नाय. माजा नशिब उगडात असो कायतरी तोडगो सांग द्येवा..’’ त्याच्या कपाळावर विभूत टेकवून जट्या म्हणाला, ‘‘लेकरा... तुजा नशिब उगाडतला, पन तू असो टोणगो, आपले हातीन घात करशी. सोयन ऱ्हवल, हुबलाकपान कमी केलस तर हातीत माती घरशी तेचा सोना जायत... मूळ वसाचो नारळ काडून पूजेक लाय... चाळ्याक नारळाचा फळ, म्हारवसाक कोंबो देवन् राजी कर... मगे तुका परीस मेळतलोहा. कसा व्हयत, कदी व्हयत तेची फोड ह्या थळार होणार नाय... झाली, तुका उमागणार नाय... हुळगेपान करु नुको... दुसऱ्या थळार खुलासो मागू नुको! तसा करशील तर गुण जायत. सांगतलो शब्द, दिला वचान याद कर... ह्या थळाक, विसरा नुको...’’ तानू सर्द झाला. जट्याचे शब्द हृदयात साठवीतच तो माघारी फिरला.

तानूचे जसे भाग्यच उजळले. लोखंडाचे सोने करणारा परीस... तो परीस एकद्याचा मिळाला की बस्स...!रावणासारखी सोन्याची लंका वसवीन...

तो मनोराज्यात मश्गुल झाला. त्याला रोज स्वप्ने पडायची. त्याच्या स्वप्नात कोणी दाढीवालाबाबा- फकीर यायचा. मनशीळा सारखा एक खडा त्याच्या हाती देऊन म्हणायचा,‘‘हा परीस घे याचा नीट वापर कर नी लोखंडाचे सोने करुन तुझे दुर्भाग्य बदल.’’

पहिला भर ओसरल्यावर तानू शांतपणे विचार करु लागला. ह्या फाटक्या गावात परीस कसा नी कुठे मिळणार! तो काय हवेत तरंगत येऊन आपोआप हातात थोडाच पडेल? आपणही आपल्याकडून प्रयत्न करायला हवेत. शोध चौकश्या करायला हव्यात. एकदा वाटे जट्याने उगाच काहीतरी भगल सांगितली झाले. पण लगेच त्याचे मन सांगे,फसवायचे असेल तर अमूक कर, अमक्या ठिकाणी खणलेस तर गुप्त धन मिळेल असे सांगून त्याने वाटेला लावले असते. परीस मिळेल असेच का सांगितले? बरे मला अमूक दिलेस तर तुझे काम होईल असेही बापड्याने कुठे सांगितले ? भल्या भल्यांना त्याची सामक्षा पटली म्हणून तर माणसांची गर्दी होते ना त्याच्याकडे! आपले नशीब फळफळणार आहे. शेवटी संपत्ती नशिबात असावी लागते. कोण कुठचा दाजी मर्गज... पण नशिबात होते म्हणून तो सात समुद्रापार जाऊन आलाच ना ? धनदांडग्या पारशाची नक्षत्रासारखी पोर नेमकी दाजीवरव फिदा झाली ना ?


मोठ्या भाग्याने आपले नशिब उघडणार आहे. मिळूदेच मला परीस! जट्याला टोलेजंग वाडा देईन बांधून.तो मनसुबे रची. ही वार्ता मायच्या कानावर गेली.पोराचे खुळेचार बघून एक दिवस ती कडाडली, ‘‘तान्या म्येला तू उकिरडो फुकनारो गाडाव..’’फुलाच्या रुपान तुज्या घरातच परीसच इलेलो हा. तेचो नीट सांबाळ केल्लस तरी सोन्याच्या राशीर बसशीत.. पन मेल्या तुजी गतच खोटी... त्या जट्यान काय सांगल्यान तेचो अर्थ नीट लाय... कायतरी हात पाय हालय... सोदो खावन् खावन् चरबेलोहा, त्या जट्यान् सांगल्यान नि ह्यो कावळो चल्लो गरुड होवक्...! मायचे सांगणे तानू थोडेच मनावर घेणार?पण आता मात्र परीस मिळवायचा त्याला जसा ध्यासच लागला. भेटेल त्याच्याजवळ तो चौकशी करायचा. गावातला अण्णा

जोशी जाणता, भविष्य सांगायचा, पुराण सांगायचा, देवादिकांच्या पोथ्या त्याने वाचलेल्या. तानू त्याला भेटला परीस कुठे मिळेल याची चौकशी केली. जोशी बुवा म्हणाले, ''आता पुराणात आहेत वर्णने...अशान् असा म्हणून परीस असतो. तो लोखंडास लावला की लोखंडाचे सोने होते म्हणतात. पण देखला कोणी? मी इतकी वरसे केसरी दिखील वाचतो पण कोणास परीस मिळाल्याचे माजे वाचनात नाय. आता एक गोष्ट खरी, मिळालाच कोणास परीस तर माणूस काय आपल्या तोंडान सांगेल थोडेच ? भेटणारा प्रत्येकजण हे सांगे. परीस आहे हे सगळ्यांना दखल, पण मिळतो कुठे ? शोधायचा कसा? हे कोणालाच सांगता येईना.''

तानूच्या चौकशीतून बुधा कातकरीही सुटला नाय. पाळे मुळे द्यायला तो मायकडे आला तेव्हा त्याला गाठून तातूने विचारले, खूप आठवण करुन मान डोलावीत बुधा म्हणाला, ''हा हा माला हाये ठावं. म्हंजे तसा डोल्यान् बगलेला नाय मी पण माज्या म्हाताऱ्यांन माला सांगितला ते आटवला बग..सड्या माळावर टिटाटवळी ऱ्हाते. सड्यावर पान्याच्या व्हावटी जवळ सकेर ऱ्हातो ना साट होऊन... तर ते सकेर मदीमिरगावाच्या येळेला टिटाटवळी अंडी घालणार... तेच्या अंडीचा रंगबी सकेरी सारखाच ऱ्हायेल ना, माणूस जवळसून चालत गेला तरी तेला पत्या लागाचा नायी. रानामाळाला फिरुन आमची नदर बनलेली ऱ्हायते पक्की. त्येच्या अंड्यावर तिला सारखे काळे टिपशे ऱ्हायतेत.त्येच्यावरसुन वळकू येतो कातकऱ्याला.''

ती आंडी नदरे पडायलाबी भाग्य लागतो. ज्ये माणसाच्या नजरेला पडला तेचा कायतरी काम व्हयेलच. अशी वदंता हाये लोकात. तर तेची पिल्ली आंडी फोडून भायेर पडती. आशी पिल्ली नदरे पडली पोर्णिमेचे रोजाला काय मंग सूर्य मावळतीला पिल्लीच्या तंगड्याला तारेत गुंतवून सोडायचा,मंग टिटाटवळी ते बघल्यावर तंगड्याची तार सोडवायला बघणार, त्येच्या चोचीला लोखंडची तार तुटायला जमते नाय, तवा आबाळात चंद्रम उगवल्यावर टिटाटवळी परीस आनायला जातो. त्येला परीसाचा ठिकाणा उज्जू म्हायती ऱ्हातेना ! टिटाटवळी परीस हानून तारेला टेकवनार, मंग तार

सोन्याची बनती. ते नरम ऱ्हायते ना? मंग पाखरु परीस चोचीतून बाजूला ठेवतो आनि सोन्याची तार तोडते. ते वक्ती परीस धरायला भेटते पग...



बुधाने सांगितलेली अद्‌भूत माहिती ऐकून तानू थक्क झाला. त्याला पानसुपारी देत तो म्हणाला,''च्यामारी तुमी. तुका एवढा म्हायत तर तूच परीस मेळवायचो की नाय !''आपल्याच थोबाडीत मारुन घेत बुधाम्हणला,''छ्या छ्या आमी रानचा लेकरु, येळेला लांडी लबाडी करनार. भिक मांगुन ऱ्हानार..पन असला वंगाळ काम नाय करेल कातकरी. पोटासाठी देवाच्या करनीत ढवला ढवल करायचाम्हणजे मोठा पाप ऱ्हायते ना. आसा परीस मिळवला तर ते टिटवीचा बी आनि परीस धरेल मानुसाचा बी वस खंडते ना माझे बापा. ते टिटाटवळी बी लई हुशार...तेचा काम झाला काय टिटवी परीस जितून आणला तिथे पुन्ना न्हेऊन टाकते. विनाकष्टाची मिळकत खोटी रे माझे द्येवा. तशी बुद्या धरली तर मानुसचा बी सैनात होयेल!'' फाटक्या कातकऱ्याने तानूला जशी दिव्य दृष्टी दिली.

आता काहीही करुन टिटवीचे ठिव हुडकायचे, तिच्या अंड्यातून पिल्लू कधी येते यावर नजर ठेवायची आणि परीस मिळवायचा असे तानूने ठरविले. आपल्या नशिबातच परीस मिळेल असे लिहिलेले आहे. आपण थोडेसे प्रयत्न केले तरी पुरे! पाऊसकाळ सुरु होण्याची तो आतुरतेने वाट बघायला

लागला. मिरगाची शितडी पडली आणि चौथ्याच दिवशी तानू टिटाटवळीची ठिवे शोधायला बाहेर पडला. पण पुरी विरड वाया गेली. अवेळी जाग आल्यावर धर्मशाळेत बसल्या बसल्या तानूची योजना सुरु झाली. निवतीच्या सड्यावर त्याला टिटव्या दिसल्या. म्हंणजे त्यांची बसल त्या ठिकाणी असणार यात शंकाच नव्हती. तानू सकेर निरखीत निघाला त्या अर्थी तो अंडी शोधतोय हे हुशार टिटव्यांनी अचूक ओळखले. म्हणून तर त्यांनी कुयेल घातली होती. हे सगळे आठवल्यावर बुधा कातकऱ्याच्या सांगण्यात नक्कीच तथ्य आहे अशी खुणगाठ तानूने बांधली.

संध्याकाळभर धर्मशाळेत लोळून दिवेलागणीच्या वेळेला तानू घराकडे वळला.दाजीच्या जोडीला भाऊ खोत,बाजी सावंत,भिकू देसाई अशी मातब्बर मंडळी बिछायतीवर बसून फुलाच्या गाण्यात धुंद झालेली. माय उंबऱ्यातच पाय सोडून टेकलेली. तानू मागिलदाराने घरात शिरला! मायची ठेवरेवीची ट्रंक उघडून पाच रूपये काढले साण्यात दाजीसाठी ठेवलेली बाटली निम्मी घशात ओतून त्यात पाणी ओतून ठेऊन तानू चोरपावल्यांनी बाहेर पडला. दुपारी उशिरा जेवल्यामुळे पोट दब्बच होते. त्यातही गरज पडलीच तर खिशात पाच रूपये होते. चव्हाट्यापासून फेरी मारून रात्री उशीरा तानू धर्मशाळेत येऊन पडला.''

पहाटे पहिल्या कोंबड्यालाच त्याला जाग झाली. बाहेर ठोम पाऊस सुरू झालेला. पावळीच्या पाण्याची चूळ भरून त्याने पान खाल्ले. कडकडून भूक लागलेली पण उजाडेपर्यंत थांबणे भाग होते. मग दिवसभरातल्या कामाची आखणी करीत बसला. पायाखाली दिसण्या इतपत उजाडले. तानूने तडक तारकराचे हॉटेल गाठले. म्हातारा बाबू तारकर अजून उठलेला नव्हता म्हणून तो हॉटेलच्या पायरी वरच टेकला. घटकाभराने हॉटेलाची कवाडी उघडली. ''कोन् तानू देवळी मां ऽऽ भूतूर बाकड्यावर बस'' असे म्हणत बाबू आत गेला. चुलीत विस्तव पेटवून चहाचे आधण ठेवले.नारळाची कापे,शेव आणि चांगला दोन कप चहा पिऊन तानू उठला आणि त्याने पुनश्च बानघाटीची वाट धरली. घाटी वेंघून तानू धारेवर आला. एवढ्यात

टिटिव टिटिट्यँव करीत टिटवीने त्याला हेरल्याची सलामी दिली. तानूचा शोध सुरू झाला.



दुपारपर्यंत सकेर हुडकीत हुडकीत निवतीच्या सड्याची पुरी उगवतीची बाजू पार करून तानू ओंम्बळीच्या शिवेपर्यंत पोचला.ओंम्बळीला त्याची मावस बहीण घरठाव करून राहिलेली.तानू जेवण वेळेला तिच्याघरी पोचला. जेवण करून त्याने पुन्हा सडा गाठला.आता मावळत्या बाजूने जात बानघाटी गाठायचा बेत त्याने योजला. तानू फिरताना दिसल्यावर पुनश्च टिटव्यांची कुयेल सुरू झाली. सकेरीच्या ढिगोळ्या शोधीत शोधीत काळोख पडताना तानू बानघाटीत पोचला.तो घाटीला लागल्यावर त्याच्या मागावर आलेल्या टिटव्या पाठी फिरल्या. दिवसभर पायपीट करून टिटवीची अंडी काही त्याला उमगली नाहीत.

पंधरवडाभरात निवतीच्या सड्याबरोबर आजूबाजूच्या गावातले सडे, रान, माळ तानूने पिंजून काढले. डोके चालवून त्याने ढोरे राखायला जाणाऱ्या पोरांशी संधान बांधले.आमिषही दाखविले.चार दिवसानी घाड्याचा पोरगा दामू टिटवीच्या अंड्याची मागाडी काढून आला.त्या ठिकाणावर

पोचेपर्यंत पार संध्याकाळ झाली. राखणे वाट बघून कंटाळले. रागाने अंडी फोडून निघून गेले. तानू टिटवीच्या ठिवाजवळ गेला तर टिटिव करीत नरमादी तिथून उठली अन् फोडून टाकलेल्या अंड्याच्या कपच्या बघून तानूने कपाळावर हात मारून घेतला.

तानू नाराज झाला खरा, पण सड्यावर सकेरीत टिटाटवळीची अंडी मिळतात ही गोष्ट सत्य असल्याची खात्री त्याला पटली. त्यानंतर पुन्हा पंधरावडाभर तो सड्या माळावर हिंडला पण अंडी काही दिसली नाहीत. पुरा उन्हाळा संपला मिरग जवळ यायला लागला, तानू धर्मशाळेत झोपलेला असताना चोचीत चम चम करणारा परीस घेऊन गवळदेवाकडे च्या झाळीशी येणारी टिटवी दिसली अन् तानू झोपेतून खड्कन उठून बसला.बाहेर मृगाचा पाऊस सुरु झालेला.तानू स्वप्नाचा अर्थ लावण्यात दंग झाला. चोचीत परीस धरलेली टिटाटवळी दिसली आणि जाग आली तर नेमका पाऊस सुरू... झऱ्याचा अर्थ या पावसाळ्यात परीस नक्की मिळणार.

सकाळी उठून तानू घरी गेला.ह्या मिरगातकाही करून टिटवीची बसल शोधायचीच असा चंग त्याने मनोमन बांधलेला. मनात योजना तयार झालेली,मात्र त्यासाठी थोडी रक्कम हवी होती. पैशाची लालूच दाखवून बुधालाच हे काम करायला लावायचे असे त्याने योजले. त्याने घरात पाय ठेवला तर माय नी फुला यांचे कडाक्याचे भांडण जुंपलेले.‘‘तू दर खेपेक माका अवशद घेवक् लावतस... माका लय तरास व्हता. आता ह्या खेपक् मी तुजा आयकनार नाय... काय ता व्हव ने’’ फुला तरपासून म्हणाली.‘‘एकदा अडाकल मग कोन कुत्रो दुकु येवचो नाय ... मी दुनया बगीतलली हा... ’’ माय बोलली.

‘‘माजा गाणा आयकोक खैसून खैसून ल्वॉक येतत बगतस ना तू.....?’’ फुलाने विचारले. दोन्ही हात ओवाळीत म्हातारी येंगडावून म्हणाली, मोटी ग्ये बाय माजी गाणारीण. भंगो तुजा गाणा. ल्वॉक काय तुजा गाणा आयकोक येतत काय गो मसण्ये? तेवड्यावर भागला आस्ता तर तुका अवशद घेवची येळच इलि नसती.’’ मायने शोध शोध शोधले पण पाळे -

मुळे कुठे गायब झालेली. तानूला जवळ बोलावून माय हणाली, ‘‘बाबा माजो तो... जा... जा... बुदा कातकऱ्याक बोलायलय म्हनान सांग. त्येका वांगडा घ्येवनच ये...जा...’’ मायने सहा रूपये काढून तानूच्या हातावर ठेवले. तानू निघाला बुधाचे खोपटे बंद होते. कातकऱ्याचा ठिकाण कोण कसा सांगणार? त्याने गावात दोघा चौघांकडे निरोप ठेवला.दुसऱ्या दिवशी भिणभिणताना बुधा हजर झाला.

मायला भेटून आल्यावर त्याला तानूने हाक मारली.बुधा तानूजवळ येऊन बसला.खणखणीत पाच रूपये बुधासमोर ठेऊन टिटवीच्या अंड्यांचा माग काढायची गळ तानूने त्याला घातली.उभ्या हयातीत त्याने आखबंद रूपयाही हातात धरलेला नव्हता. रूपयाची पाच नाणी हातात घेऊन बुधाने खणखण वाजवली नी तोंडाने च्यक् च्यक् करीत तो म्हणाला, भाऊ, एवडा काम आपल्याच्यान नाय जामनार.म्हनशील तर पाच रूपयासाठी जिता ढाण्या वाग बांदून तुज्या म्होरी टाकेल पर टिटाटवळ्याचा ठिकाना दावायचा पाप नोका कराला सांगू माज्ये बापा... हे नाद लय वंगाळ. तू बी या खोटेगतीच्या मागे लागू नको... टिटाटवलीचा ञअंडी म्हन, पिल्ली म्हन दिसायचे परतेकाच्या नसिबात लागते.

आमी कातकरी अशे कंगाल ऱ्हाईल पण द्येवाच्या धरमा इरूद्ध कंचा काम न्हाई करेल. झाडावरचा मदाचा पोला आमी काडते तर त्ये वखताला आमी तेच्यातला मद ऱ्हायेल तेवढा हिस्सा काटून घेईल पन समदा पोला काडून त्याईच्या ल्येकरांचा विद्वास नाय करेल. कंदी धुमरान करून माशीला पलवून लावते आमी, तरीबी येकादी दुसरी माशी ऱ्हायते ना पोल्याजवळ ती डंवस करतो ना आमाला .... पर खुन्नस मदे तेचा सगला पोला जाळत नाई आम्ही कातोडी. असला वंगाळ काम पैसे दिऊन करून घियाला बगते तू? तूजा काम माला नोको, तुमी पयशाला आबरू इकनार, आनी पाच रूपयाला कातकरीचा इमान इकत घिवाले बगते का रे सावकारा......? बराच वेळ बुधा गुढ्यात मान घालून बसून राहिला. मग उठला आणि हात जोडीत निघून गेला.

पावसाळा उलगत चालला पण टिटवीची अंडी पिल्ले याचा मागमूसही तानूला लागला नाही. शिकस्त करून हरलेला तानू सोमवार धरून जट्याकडे गेला. पाच रूपये पुढ्यात ठेऊन त्याने हटकले, जट्या बाबा आजून काय माजा नशिब उगडत नाय... नी तुजा वचन फळाक येयना नाय. त्याला पुढे बोलू न देता त्याच्या कपाळावर विभूत टेकीत जट्या म्हणाला, ''जरा दम खा... तू कितीव हुळाकलस तरी त्येका ज्ये वक्ती द्येवचा आसात त्येवाच तुज्या हातीत पडताला हा... ल्येकरा इश्वास ठेव. ह्या जट्याचा वचन खोटा झाला तर ही बट कापून टाकीन नी ह्या थळ बंद करीन... जा तुजा काम व्हतलाहा...!'' तानू बाहेर पडला खरा पण त्याचे समाधान झालेले नव्हते. जट्याचा होरा चुकायचा नाय खरा पण, काम आधी कसे होईल ह्याचा उलगडा त्याला होत नसावा असा संशय तानूला आला.

या बाबतीत दुसऱ्या थळावर चौकशी करू नये असा इशारा जट्याने दिलेला असला तरी तानू भलताच अधीर झाला. त्याने सगळी गोष्ट भल्या गुरवाच्या कानी घातली. भल्या गिऱ्हायकाच्या शोधात. तो धोरणाने म्हणाला. ह्या बग तानू! जट्याकडे झाल्यावर गांगेश्वराचांच सत्व आसा. म्हंजे गांगोचो कौल घ्येवक कायच हरकत नाय. भल्याने सांगणे करून गांगोच्या पिंडीवर गोटे डसवले.देव कौल धरीना ! ह्या आडमेळा आसात्... ती भागवनी करुक हवी...म्हारतीचा देना भागौक व्हया....सबबी सांगून भल्याने तानूला तीस रूपयाला गंडा घातला. दिशेने वहात उगमापर्यंत येतात असे बुधा बोलला होता. प्रवाहा विरूध्द वहात येताना परीस झीजून नाहिसे होतात असे त्याने म्हटले तरी चूकुन माकून एखादा तरी परीस डाळी एवढाका असेना उगमापर्यत पोचला असणारच...तसा प्रयत्न करायला काय हरकतआहे.?असे त्याच्या मनाने घेतले.एक नवा उद्योग त्याने आरंभला. उन्हाळ्यात कोरड्या पडलेल्या व्हावटींच्या उगमापर्यंत जाऊन तिथली सकेर तो ढवळी. नेहमीच्या खड्यापेक्षा जरा वेगळा रंग असणारे पिवळसर, काळपट, पांढुरके खडे बाजूला जमा करी, एक एक दगड कोयत्यावर टेकून बघी. गावातल्या पाच सहा व्हावट्यांच्या उगमाजवळ परीस शोधण्यात त्याने कित्येक दिवस घालवले.

पुरा उन्हाळी मोसम संपून पाऊसकाळ सुरू झाला. आठवडाभर टिटावळ्याची अंडी शोधून कंटाळल्यावर त्याने वेगळी युक्ती लढवली. कवडे पकडायच्या फासक्या सड्यावरच्या सकेरीच्या ढिगोळ्यांजवळ लावल्या. दुसरे दिवशी तो शोध घ्यायला गेला. दोन तीन टिटावळ्या तरी हमखास फारलेल्या असतील अशी त्याची खात्री! पण टिटव्या भलत्या चतुर. तानू दिवसा फासक्या लावीत असताना त्या त्याच्या डोक्यावर फिरट्या घालीत होत्या हे तानू विसरला. एकही टिटवी फारली नव्हती. तानू भलताच चिडला.

फुलाकरवी रदबदली करून त्याने दाजीची ठासाची बंदुक हस्तगत केली. सगळा सरंजाम गोळा करून त्याने सडा गाठला. तानु धारेवर गेल्यापासून टिटव्या घिरट्या घालू लागल्या. पण नेम धरून बार टाकीपर्यंत टिटवी ठरेना.एक झाळ गाठून तिच्या मुळाशी तानू बसला.खूप वेळ वाट बघितल्यावर त्याच्या समोरच एका ढिगोळीवर टिटवीची जोडी उतरली. मादी पंख पसरून गोल रिंगण घ्यायला लागली. तो मोका साधून मादीसमोर शांत उभ्या राहिलेल्या नरावर बंदुकीची माशी रोखून तानूने चाप ओढला. नर जागच्या जागी चोच वासून उताणा झाला. मादी टिट्यांव टिट्यांव असा भीषण सुर काढीत उडाली. तिचा आवाज ऐकून लांब उडणाऱ्या टिटव्या सुद्धा सावध झाल्या. सड्यावर कुयेल घालणाऱ्या सगळ्या टिटव्या एकदम नाहिशा झाल्या.

तानूने मेलेले पाखरू उचलले, रागाने त्याची पिसे उपटून टाकली. कोयत्याने तुकडे तुकडे करून तो घरी आला. संध्याकाळी बाटलीभर दारु पिऊन न जेवताच तो धर्मशाळेत झोपला. सकाळी घराकडून बोंबाबोंब ऐकायला आली. गडबडीने उठून तानू घराकडे धावला. फुला माय दोघीही उर बडून रडत होत्या. फुलाचा तबलेवाला साथीदार सदु कासार... तबल्याची साथ करता करता त्याने फुलाशी सुत जमविलेले... अलिकडे तो वस्तीला फुलाकडेच असायचा. फुलाच्या मायची ठेवरेक त्याला उज्जू माहिती. रात्री निजानिज झाल्यावर दोघीच्याही ट्रंकाची कुलुपे उघडून आतले दागिने, उंची कपडे हे सगळे घेऊन तो पळून गेला. फुलाच्या अंगावरचे एक दोन

डाग तेवढे राहिले.

अकल्पितपणे भलते अरिष्ट आले. सगळा गाव जमा झाला, दाजी पोलीसवाला तावातावात सांगू लागला,''मिया,पोलीस आंसय्...खंय जाता कासारडो बगूया...पाताळात दडॉन ऱ्हवलो तरी खनून काडतलंय त्येका...''त्याच्या वल्गना वायफळ आहेत हे लोकांना पूर्ण माहिती. पण तोंडावर कोण कशाला बोलतो! आडमार्गाने मिळवलेली कमाई आडमार्गाने गेली असे म्हणत जो-तो निघून गेला. फुला मायच्या गळ्यात पडून धाय मोकलून रडली. माय मोकळे करायचे औषध घ्यायला लावील म्हणून फुला गेले चार महिने तिला फसवीत होती. पण सगळी कमाई वाऱ्यावर गेली. म्हणताना फुलाने हाय खाल्ली. खरी गोष्ट तिने मायच्या कानावर घातली. कोपाला येऊन मायेने फुलाचे थोबाड फोडले. मग झाली गोष्ट निस्तरण्याच्या उद्योगाला लागली. दिवस खूप झालेले...कातकऱ्याच्या औषधाने निभणारी गोष्ट राहिली नव्हती. मायने नाऊ धनगर आणि त्याची बायको दोघांनाही बोलावून घेतले. काम अवघड. जोखमदारीचे...गुपचूप उरकायला हवे.... नाऊ नि त्याची बायको चार दिवस ठाण मांडून राहिली.

तानूला काही सुचेना. रात्र रात्र त्याला नीज पडेना. दारुसुद्धा त्याला चढेनाशी झालेली. दोन रात्री सलग जाग्रणे करुन त्याचे डोके भ्रमिष्ट झाले. तशात फुलाच्या निस्तरणीसाठी त्याला नाऊबरोबर जावे लागले. खड्डा बुजवून आल्यावर ते चित्र त्याच्या डोळ्यापुढून जाईना. जट्याने भाकीत केले काय नि हे भलतेच झाले काय... परीस मेळणे दूर, उलट होते तेच हातचे गेले... नको ते पाप कर्म करावे लागले. तानू तिरमिरीसरशी उठला. त्याने तडक जट्याचे घर गाठले. आज बुधवार... आडवार असल्यामुळे जेवणखाण करुन जट्या ओटीवर लोळत पडलेला.

पायताण हातात घेऊनच तानू त्याच्या समोर उभा राहिला.''काय रे सुतारड्या... लोकाच्या जीवार खावन् खावन् आरा सारको लोळत पडतस काय रे ...तुझी चरबी मिया झडयतय्...'' हातातल्या पायताणाने त्याने जट्याला फटकावायला सुरुवात केली! जट्याच्य घरातल्या माणसांनी

बोंबाबोंब केली. शेजारचे झिलगे धावले. दोघा दांडग्यांनी कव घालून तानूला बाजूला केले. जट्या शांतपणे म्हणाला, ''तानू तू काय तरी चुकी क्येलं आसशी माजो सबून खोटो जावचो नाय...'' तानू उसळून म्हणाला, ''माज्यो व्हानो खल्लंस तरी तुजी शिवकळा उतरली नाय् रे सोद्या? परीस मेळात म्हनान माका हुलीवर घातलस्... तीन साल मी येडो-पिसो होऊन परीस सोदतय्... भंगलो तुजो सबूद...''जट्या शांतपणे म्हणाला, ''त्या कळेत मिया काय सांगलंय ता आता मानूस कळेत माका आटावना नाय. तुका बरा भोगाने अशीच माझी विच्छा! जग दुनिया परचित घ्येवन ग्येली. तुका परचित व्हयी ना...? मिळात्... माजा सत्व पणाक लायन नि तुका परीस देकवीन.''

''ह्यो म्येलो बारगो परीस देकवनारो... ही पुरणिम उलगोन जावने. तवसर माका नाय मिळाली सामक्षा तर तुका जितो ठेवणार नाय.'' तानू तणतणत घरी निघाला. आता तो कायमच दारु पिऊन धर्मशाळेत लोळत रहायचा. कधी जेवायला घरी जायचा. कधी दारुच्या नशेत उपाशीच झोपायचा. मायने त्याचा फंदच सोडलेला. तो जगला  मेला तरी तिला पर्वा नव्हती. पण फुलाची तिला काळजी वाटायची. फुलाला उठून बसण्याचे त्राण राहिले नाही. खाण्यावरची वासनाच उडाली. मायने कोणाला तरी जट्याकडे विभूत आणायला पाठवले. गेलेला माणूस विभूत न  घेता परत आला, चार दिवस जट्या कुठे बेपत्ता झालेला आहे असे तो म्हणाला.

पौर्णिमा उजाडली. तानू भानावर आला.जट्या काय प्रचिती दाखवणार याचा घोर त्याला लागला. त्या दिवशी तो  दारु प्याला नाही. संध्याकाळी कोणाकडून तरी त्याला वार्ता कळली... चार-पाच दिवस जट्या कुठे बेपत्ता झाला आहे. बहुतेक आपल्या भीतीमुळे तो कुठेतरी लपून राहिला असेल. आठ-पंधरा दिवसांनी येईल बाहेर असे तानूला वाटले. रात्री तानूला भूक लागली म्हणून तो घरी गेला. माय फुलाच्या उशाशी बसून राहिलेली. ती बसल्या जागेवरुनच म्हणाली, ''आज फुलाचा शीकपान जादा झालाहा... टोपात पेज रांधलेली हा ती घे नि उद्या तळकटात जावन्

बुधाक घेवन् ये. फुलाची परिस्थिती तेका सांग, मगे तो सोयन् काय ती वषदा वांगडान हाडतलो.''

मध्यरात्रीपर्यंत तानू जागाच होता. त्यानंतर मात्र त्याचा डोळा लागला. त्याला झोपेत कोणीतरी ढोसले. तो खाड्कन उठून बसला. हातात माडाची चुडती घेऊन थरथरणारा जट्या पिशागती सारखा वाटला. तानूच्या अंगाला घाम फुटला. ''तानू तुका परचित होयी ना? ही घे...'' चुडतीच्या उजेडात उजवा हात पुढे करीत जट्या म्हणाला. काठीच्या चिमट्यात मनशीळा सारखा एक खडा चमचमला. ''ह्यो परीस बग... तुजी आडकती काड भायर नी परतेक्ष सामक्षा घी...!'' जट्या कडाडला. तानूने बंडीच्या खिशातून आडकित्ता काढून समोर ठेवला. आडकित्त्याच्या पात्यावर जट्याने परीस टेकवलासा करुन बाजूला घेतला. आडकित्त्याच्या पात्याच्या धारेकडचा अर्धवट भाग पिवळसर दिसू लागला. तानूने खिशातले सुपारीचे खांड काढून कातरायचा प्रयत्न केला. सोन्यात परिवर्तन झालेला धारेचा नरम भाग वळला.

जट्याचे पाय धरीत तानू म्हणाला, ''जट्या बाबा मिया चुकलय. तुझ्या सत्त्वाची परचित माका पटली. मी तुज्यारइस्वास ठेवलो नाय... लेकराक माफी कर... माझा वायट करु नको...'' तानू गर्भगळीत होऊ लटालटा कापू लागला. ''मिया तुजा भाकीत सांगला तीच चूक झाली. मिया काय सांगलय् तेचो अर्थ तुका उमागलो नाय. तुज्या कर्माची फळा तू भोगशीत... तुज्या नादाक् लागॉन मिया इरेसरीक पडलय ती माजा सत्त्व गमावन बसलय... माजा देवपान आता खल्लास झाला...! तुजो कसो इद्वास होता तेची परचित आता घेशीतच...! तुजा चांगला वायट् करनारो मी कोन? तुझा तूच क्येलस... तुजा तूच भोगशील...'' जट्या निघून गेला... थोड्या वेळातच ठोम पाऊस सुरु झाला. तानूला उठून उभे रहायचेही त्राण उरले नाही.

भिणभिणताना मायची बोंब ऐकू आली. पावसात भिजतच तानू घराकडे धावला. तानू समोर दिसताच माय फाटलेल्या आवाजात म्हणाली, ''तानू... फुला ग्येला रेऽऽ मी रातभर जाग्या रवलय... पैलो कोंबडो झालो

नि माका जरा नीज इली आनि फुलान माका फसयल्यान रेऽऽ'' मायने हंबरडा फोडला. आता तानूही बोंब मारुन रडायला लागला. त्यांची ओरड ऐकून शेजारी धावले. देवळ्याची फुला वारली ही बातमी वाऱ्यासारखी पसरली.

फुलाची तिरडी घेऊन बापये चालू लागले.तानू मडके हातात घेऊन निघालेला.फुलाला अग्नि देऊनआल्यावर कोणीतरी विहिरीजवळच चार कळश्या तानूच्या डोक्यावर ओतल्या. ओलेल्यानेच तानू घरात गेला. कोरडा फडका घेऊन डोके पुसता पुसता एका एकी त्याच्या अंगात कसला संचार झाला न कळे !नेसण सोडून थयथयाट करीत''माका परीस मेळ्ळो माका परीस मेळ्ळो !'' अशी बोंब मारीत त्याने खुटीला अडकवलेली बंडी हातात घेतली. तिचा बोळा करुन छातीशी धरीत ''ह्यो बगा परीस... माका परीस मेळ्ळो... घरातलो किलेस गेलो नी माका परीस मेळ्ळो''... असे ओरडत बेभान होऊन तो रस्त्याने धावत सुटला.



# ८. अळवावरचं पाणी

अन् धुंदीच्या त्याक्षणी सुधानं प्रमोदला लग्नाचं वचन दिलं. बेल्ट पॉकेटमधून पॉलिथीन सॅक काढून प्रमोद म्हणाला,"या प्रसंगाची आठवण म्हणून ही छोटीशी गिफ्ट...' अधीर झालेल्या सुधानं सॅक उघडली. सोन्याच्या चमकी शिवाय अन्य दागिना आयुष्यात न घातलेली सुधा... टॉप्समधले लखलखणारे हिरे ती विस्फारीत नेत्रांनी पहातच राहिली. अनवधनाने ती बोलून गेली, "खूप कॉस्टली आहेत हे टॉप्स. केवढ्याला मिळाले?"प्रमोद बेफिकिरीने म्हणाला, "ओन्ली सेव्हन थाऊजंडस... तू नक्की होय म्हणशील याची खात्री होती मला..."

सात हजार हा आकडा ऐकूनच सुधा हवेत तरंगायला लागली. त्या मूडमध्येच ती होस्टेलवरआली. रूम पार्टनर्स मेसवर गेल्या.सुधा आरशासमोर उभी राहिली अन् टॉप्स कानात घालून स्वतःच्या छबीकडे मनसैंक्त पाहून घेतलं.रात्री तिच्या स्वप्नात सळसळणारी रेशमी वस्त्र, चकचकीत गाड्या, आलिशान बंगले, दागिन्यांनी खचाखच भरलेलं कपाट हेच दिसत राहिलं.परीक्षा पार पडली आणि प्रमोदनं फोन केला म्हणून न्यायला त्याचे मम्मी डॅडी आले. प्रमोदनं सुधाची त्यांच्याशी ओळख करून दिली. गर्भश्रीमंतीची तुकतुकी असलेले पॉलिश्ड बोलणारे त्याचे आई बाबा सुधाला खूप आवडले.

"प्रमोद तुझी चॉईस सुपरस्टिशस आहे." डॅडींनी निःसंकोच पणे प्रतिक्रिया नोंदवली. सोज्वळ, सात्विक सुधा मम्मीलासुद्धा खूप आवडली. सुधाला जवळ घेऊन मम्मीनं तिच्या केसांवरून हात फिरवला.'हॉलीडे होम' या महागड्या हॉटेलमध्ये सगळ्यांनी लंच घेतला. मम्मी-डॅडी टॅक्सी करून कोणा ओळखीच्या गृहस्थांकडे गेले. प्रमोद नि सुधा त्यांच्या कॉन्टेसामधून फिरायला गेले. चार वाजता प्रमोदनं तिला कॉलेजसमोर ड्रॉप केलं. सुधा उतरली तर समोर प्रिन्सिपॉल डॉ.दाणी येत आहेत. सुधाकडे पाहून मंदस्मित

करीत ते निघून गेले.

प्रमोद सुधापेक्षा एक वर्ष सिनियर. सुधा मेडिकल कॉलेजमध्ये जॉईन झाली. त्या दिवशी नवीन बॅचसाठी स्वागत समारंभ झाला. आर. एम.ओ.नी सगळ्यांचं स्वागतकेलं. मग प्रत्येकानं आपला परिचय करून दिला. सुधाचा टर्न आला. 'सुधा दामोदर गोखले.... एस. एच. केळकर कॉलेज देवगड, पी.सी.बी. नाइन्टी टू परसेंट.' एन्टरन्स एक्झाम९५परसेंट. तिचा ॲपिअरन्स बघून ती मध्यमवर्गीय कुटुंबातली असावी. हायेस्ट स्कोअरमुळेच फ्रीशीप मिळवून मेडिकलला आलेली असणार हे सगळ्यांनी ओळखलेलं... तरीही तिचे मार्कस् ऐकून सगळे चकित झाले. पिवळसर गौरवर्ण, तेजस्वी डोळे, धारदार नाक, लांबसडक केस,अत्यंत साधी वेशभूषा असलेली 'काकूबाई' छाप सुधा प्रमोदला त्याचक्षणी आवडली. काहीही करून ही पोरगी कटवीन असा पणच त्याने केलेला.फायनल इयर सुरू होऊन दोन महिने उलटले तरी कामचलाऊ चार दोन वाक्यांची देवाण-घेवाण यापुढे काही त्याची मजल जाऊ शकली नव्हती.

अर्थात सगळ्यांशी विशिष्ट अंतर राखून फटकून वागणारी सुधा प्रमोदशी ऑकेजनल कां होईना दोन चार वाक्य बोलायची ही सुद्धा मोठी जमेची बाजूच प्रमोदला वाटायची. तिच्या वागण्या बोलण्याचं सूक्ष्म निरीक्षण करून प्रमोदनं आपली वागण्याची स्ट्रॅटेजी फिक्स केलेली. श्रीमंतीचं प्रदर्शन,बेताल वागणं,बेमुर्वतखोर बोलणं आणि डीम परफॉर्मन्स या गोष्टी सुधाच्या प्राप्तीमध्ये हर्डल्स ठरतील हे त्याने ओळखलं.मग जाणीवपूर्वक आपलं वागणं कंट्रोल करून मित्रांच्या घोळक्यापासून तो दूर रहायला लागला.नियमित अभ्यास करून चांगला स्कोअर करायचा हे त्याने ॲसेट ठेवलं.तिचा जास्तीत जास्त सहवास लायब्ररीत मिळणार हे ओळखून तो सुद्धा लेक्चर्स,प्रॅक्टीकल्स झाल्यावर कायम लायब्ररीत रहायचा.त्याच्या या वागण्यामुळे इतरांपेक्षा प्रमोदबद्दल सुधाच्या मनातही सॉफ्ट कॉर्नर निर्माण होत गेला.पण त्याच्या लक्षात येईल असं आपल्या भावनांचं प्रदर्शन करणं मात्र तिने कटाक्षाने टाळलेलं.

एकतर ज्या ओढ-घस्तीची परिस्थिती असलेल्या कुटुंबात ती वाढली त्या तुलनेत प्रमोद हा तिला दुष्प्राप्यच वाटायचा. दादरसारख्या हार्ट ऑफ बॉम्बे एरियात त्याच्या डॅडींचं स्वतःचं हॉस्पिटल आहे.प्रमोद त्यांचा एकुलता एक मुलगा, ही माहिती तिला मैत्रिणींकडून समजली. या उलट तिचे बाबा मुटाटसारख्या आड खेड्यात राहणारे प्राथमिक शिक्षक. मातीच्या भिंती असलेलं छोटेखानी घर.शेती कुळकायद्यात गेल्यामुळे नोकरी हेच चरितार्थाचं एकमेव साधन, सुधासह चार मुलं! संस्कार, बुद्धी, चारित्र्य, सौंदर्य हे मुलीचे विशेष सगळ्यांना अपेक्षित असतात हे सत्य, पण लग्नाच्या बाजारात केवळ एवढ्या गोष्टी एनकॅश करता येत नाहीत, हे सुधानं पक्कओळखलेल. म्हणूनचं प्रमोदशी रिलेशन्स डेव्हलप न करण्याकडे तिचा कटाक्ष असायचा. हुषारी आणि कष्ट या बळावर एम.बी.बी.एस. पूर्ण करायचं हे तिनं आपलं ॲसेट मानलेलं.

दोन पंजाबी ड्रेस आणि दोन गाऊन्स यावर दोन वर्षे तिने पार पाडली.सुरूवातीला रूम पार्टनर्स तिची कुचेष्टा करायच्या.तिच्याशी फटकून वागायच्या.फर्स्ट सेमिस्टरचा रिझल्ट डिक्लेअर झाल्यावर मात्र त्या नरम पडल्या. सुधाचं कॅलिबर त्यांनी ओळखलं. आयडिअल स्टुंडटचं ॲवॉर्ड सलग दोन वर्ष सुधालाच मिळालं. कल्चरल ॲक्टिव्हीटीजमध्ये ती माफक भाग घ्यायची. मीरेची भजनं तालासुरात गोड आवाजात म्हणायची. वॉल पेपरला महिन्यातून एखादं तरी आर्टिकल द्यायची. लेक्चर सुरू असताना जीवाचा कान करून ती ऐकायची. तिच्या लेक्चर नोटस् हा सगळ्यांच्याच कौतुकाचा विषय असायचा. कधी वर्गात गडबड झाली की लेक्चरर्स म्हणायचे की,'सुधासारखे स्टुडंटस् आहेत म्हणून काही शिकवावं असं वाटतं. अन्यथा सगळी खोगीर भरती आहे. '

ञ्सुधा लायब्ररीतून बाहेर पडली. तिच्या मागोमाग प्रमोद सुद्धा निघाला, ''सुधा आज एवढी गडबड झाली की, सकाळी स्नॅक्स राहोच पण साधा चहासुद्धा घ्यायला मिळाला नाही. चल मस्तपैकी कॉफी घेऊ या.'' प्रमोदनं मोठंच डेअरिंग केलं. सुधाला नाही म्हणणं जमलं नाही. पण होकार देतानासुद्धा स्वाभिमानी सुधाने अट घातली, ''बिल मी देणार, तरच येईन

मी.'' दोघंही कँटीनमध्ये सेफ कॉर्नर बघून बसली. प्रमोदने वेटरला स्नॅक्सची ऑर्डर दिली. दोघांच्या प्रॅक्टिकल स्टडी अशा गप्पा रंगल्या. वेटरने कॉफीचे दोन कप ठेऊन बिल लिहायला घेतलं. पन्नासची नोट त्याच्या हातात कोंबून प्रमोदनं चुटकी वाजवली. वेटर निघून गेला. ''प्रमोद मी आधी सांगितलं होतं ना...'' सुधा रूष्ट सुरात बोलली. तिला अर्ध्यावर तोडीतच प्रमोद म्हणाला, ''सुधा मला काय एवढा कंगाल समजलीस? तुझ्याबरोबर कॉफी पिण्यावरून बेटिंग केलं असतं तर सहजपणे हजारभर रूपये कमावले असते मी. अर्थात तशी ॲपॉरच्युनिटी अजून आहे म्हणा. म्हणूनच पुराव्यासाठी बिल मला हवयं ...''

''गेली दोन वर्षे मी तुझं वागणं पाहतोय. सगळे डिटेल्स मला कळलेले आहेत. सुधा तू ज्या परिस्थितीत आहेस ना ती परिस्थिती मी भोगलेली नाही हे खरं असलं तरी माझे डॅडी त्याही पेक्षा कदान्न स्थितीत वाढलेले आहेत. तुला निदान तुझ्या बाबांचा तरी आधार आहे. डॅडींनी संगमेश्वरला माधुकरी मागितली. मिरजेला देवीच्या देवळाजवळ धर्मशाळेत राहून ते शिकले. तिथलं आवार झाडण्यापासून देवस्थानातील पडतील ती कामं सांभाळून त्यांनी मेडिकलचा कोर्स पूर्ण केला, या गोष्टींचा मला अभिमान आहे. तू माझं वागणं बघितलं असशीलच. श्रीमंतीला शोभणारे कोणते फंद मी कधी केल्याचं तुझ्या कानावर तरी आलयं का? फर्स्ट इयरला असताना मी जरा छानशोकीत रहायचो. पण तू या कॉलेजला आलीस. तुझं वागणं बघितलं आणि माझ्या डोळ्यात चांगलं अंजन पडलं.''

''सुधा तुला कदाचित पटणार नाही पण तुला आदर्श मानून माझं वर्तन, वृत्ती कंट्रोल केली मी. माझी विनंती मानून तू कॉफी घ्यायला आलीस हा ऑनर समजतो मी.''वेटर उरलेले पैसे द्यायला आला. ''ठेव माझ्याकडची टीप म्हणून'' प्रमोद म्हणाला. ''सुधा तुलागिल्टी वाटत असेल तर बिलाचे अठ्ठावीस रूपये तू दे...मी घेईन ते...तुझ्या समाधानासाठी तरी मला ते घेतलेच पाहिजेत. माझ्या मूर्खपणामुळे तुला नाहक भुर्दंड पडला. मला ही रक्कम म्हणजे कचरा आहे. पण त्याचं मोल मला ओळखता येत

नाही असं नव्हे. दिवसभर हमाली केली तर मुश्किलीने एवढी रक्कम कमवता येईल हे मला ठाऊक आहे. त्याही पेक्षा आता तू ज्या क्रिटीकल पोझीशनमध्ये आहेस, त्याचा विचार करता मी तुला केवढ्यातरी खड्डयात उतरवलं... माझ्या चोचल्यांसाठी.... ही जाणीव माझं मन खातं राहिल. पण यापुढे डोसा आणि कॉफी या वस्तूंना आयुष्यात स्पर्श करणार नाही मी. चल दे बिलाचे पैसे.'' प्रमोद उठायला लागला.

प्रमोदला बसण्याची खूण करीत सुधा म्हणाली, ''सॉरी हं प्रमोद... तुला ओळखण्यात मी चूक केली. आय एम रिअली व्हेरी सॉरीऽऽ ... पण इथे वावरताना विशेषतः माझ्या गर्भ श्रीमंत रूम पार्टनर्स, त्याचं वागणं, त्यांचे विचार यामुळे श्रीमंतांच्या मुलांकडे पहायची माझी दृष्टी बदललीयं. होस्टेलवरच्या मुलींनी सुरूवाती सुरूवातीला माझी केलेली कुचेष्टा, माझ्या परफॉर्मन्सची त्यांना वाटणारी जेलसी, त्यांचं श्रीमंतीचं प्रदर्शन अन् बेपर्वा वृत्ती, त्यांचा एवढा उबग आलाय ना मला....'' तिचे डोळे भरून आले अन् तिच्यानं पुढे बोलवेना. ती रूमालानं डोळे टिपीत राहिली. थोड्या वेळाने दोघंही उठून गेली. त्या दिवसापासूनमात्र प्रमोद- सुधाची रिलेशन्स डेव्हलप झाली.अधून मधून फिरणं,तास तास गप्पा मारणं हे नित्याचंच झालं. प्रमोदची टर्म संपत आली. लेक्चर्स बंद झाली.

प्रमोद- सुधा दिवस दिवस लायब्ररीत बसून परीक्षेच्या तयारीला लागली.सलग पाच-सहा दिवस अभ्यास करून डोकं आऊट व्हायची वेळ आली. त्यावेळी कुठेतरी फिरायला जाऊया असं प्रमोदनं सुचवलं. आजच्या खेपेलासुधाला स्पष्ट विचारायचं असं त्याने आधी पासूनच ठरवलेलं.पंधरा दिवसांपूर्वीच त्याने टॉप्स खरेदी करून ठेवलेले.पण संधीच मिळत नव्हती. फिरायला जाताना प्रमोदवर भलतच दडपण आलेलं.''सुधा आपण शंकराच्या देवळात जाऊया.'' त्याने सुचवलं.दोघंही दर्शन घेऊन बाहेर पडली अन् देवळासमोरच्या पाराखाली निवांत जागा बघून बसली.जुजबी गप्पा झाल्या आणि प्रमोदने धीर करून म्हटलं,''सुधाऽऽआता परीक्षा झाली की मी निघून जाणार. पुन्हा कधी भेटू न भेटू. रागावणार नसलीस तर एक

विचारायचं आहे.''सुधाने फक्त मान डोलावली.तिच्याकडे पहाणं टाळीत प्रमोद म्हणाला, 'आय विश टु मॅरी यू.''

सुधाने काहीच उत्तरं दिलं नाही. ''सुधा तू डिस्टर्ब होऊ नकोस. परीक्षा झाल्यावर सवडीनं, शांतपणे विचार कर. तू काही प्लॅन्स केले असशील त्यात माझ्यासाठी बदलही करू नकोस. तुझ्यावर कौटुंबिक जबाबदारी आहे, ती पूर्ण करणं तुझं कर्तव्यच आहे. पण आज ना उद्या तुला हा निर्णय घ्यावाच लागेल, तोपर्यंत मी थांबेन. फक्त तुझा होकार मला कळला तरी पुरे.''सुधा कदाचित उठून जाईल... नंतर विचार करून सांगेन असं म्हणेल अशी त्याची अपेक्षा.पण सुधा थोडा वेळ विचार करून म्हणाली,''मला फार मोठी संधी नियतीनं देऊ केली आहे. पण माझ्यावरच्या जबाबदारीची तुला कल्पना नाही. माझी तीन भावंडं अजून शिकायची आहेत. आईबाबांनी माझ्यासाठी किती खस्ता काढल्यात. त्यांचं ही ऋण मला फेडायच आहे.''

''प्रमोद, हे सगळं पूर्ण व्हायला किती वेळ लागेल ते कसं सांगावं? तू तोपर्यंत थांब असं मी कुठच्या तोडानं सांगू? शिवाय तुझे आईवडील ... त्यांच्या काही अपेक्षा असतीलच की.''प्रमोद म्हणाला, ''तुझ्या टर्म्स पूर्ण झाल्या की तू स्वतंत्र व्यवसाय सुरू करू शकशील. स्वतःच्या हिमतीवर तुझं अर्निंग सुरू होईल. तू कोणावरही अवलंबवून नसणार आहेस. माझ्या मम्मी डॅडींचा या संदर्भात काडीमात्र विरोध होणार नाही याची मला खात्री आहे. मुलीच्या बापाकडून हुंडा उकळून हॉस्पिटल बांधायचं ही आमची वृत्ती नाही अन् तशी गरजही नाही. तू कबूल असशील तर तुझी अर्थिक चिंता याक्षणी मी दूर करेन. कसलंही ऑब्लिगेशन न ठेवता. तुझा कधी निर्णय होईल तेव्हा मला सांग. मी वाट पाहीन तोपर्यंत. आय प्रॉमिस..'' आता मात्र सुधाला त्याचा अधिक अंत पाहवेना. तिने प्रमोदला लग्नाचं वचन दिलं. दोघंही रिलॅक्स मूडमध्ये परत गेली. त्यानंतर दोघांच्या भेटीगाठी होत. मनमोकळेपणी बोलणंही व्हायचं. पेपर्स संपल्यानंतर त्यांनी पुढची प्लॅन्ससुद्धा आखली.

प्रमोदचे मम्मी-डॅडी भेटल्यावर तर सुधाच्या सगळ्याच शंका दूर झाल्या. प्रमोद आधी म्हणाला होता तेच डॅडींनीही सांगितलं.मम्मीसुद्धा म्हणाली की, मुलगी सत्शील हवी, प्रमोदला शोभणारी हवी,तेवढीच तिची अट होती. देणं-घेणं ह्या त्यांच्या अपेक्षाच नाहीत. ''तुझ्या कुटुंबाचा विचार करता असला हलकटपणा आम्ही करणार नाही,'' असं मम्मी डॅडी दोघांनीही निक्षून सांगितलं. मम्मींनी तिला पंजाबी ड्रेस आणि पर्स भेट दिली. प्रमोदचे डॅडी म्हणाले,'' तू आपल्या आई बाबांना या गोष्टीची कल्पना दे. जरूर तर मी ही त्यांची भेट घ्यायला येईन. तुझ्या टर्म्स पूर्ण होऊ देत. अन् हे बघ आता तू आमची आहेस. तुला कधीही कसली गरज भासली तरी निःसंकोच कळव. आम्ही पैशावर प्रेम करीत नाही.'' सुधाने रूमवर जाऊन ड्रेसचा बॉक्स उघडला. गुलाबी रंगाचा महागडा असा तो ड्रेस...एवढा उंची ड्रेस तिला आयुष्यात प्रथमच मिळालेला.तिनं पर्स उघडली. आत पाच हजार रूपयांच बंडल आणि प्रमोदची चिठ्ठी मिळाली.

'तू मला प्रॉमिस केलंस त्या क्षणापासून तुझी जबाबदारी माझ्यावर आहे असं मी मानतो. आतापर्यंत खूप हलाखीत दिवस काढलेस तू. इथून पुढे तरी तुला आर्थिक चणचण भासणार नाही याची खबरदारी मी घेईन. तुझ्या बाबांवरचा भार जरा कमी होईल याचं समाधान मला वाटेल. आता आमच्या कुटुंबियातच आम्ही तुझं स्थान गृहित धरतो. समक्ष धाडस झालं नाही म्हणून पर्समध्ये पैसे, चिठ्ठी ठेवली. तुझ्या आईबाबांची परवानगी मिळाली की जरूर कळव. मी गाडी घेऊन तुझ्या घरी येईन.'' सुधाच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. आपली आजवरची तपश्चर्याच जणू फळाला आली असं तिला वाटलं.

टर्म पूर्ण करून सुधा घरी जायला बाहेर पडली. रातराणी सकाळी सहा- साडेसहा पर्यंत तरळ्याला पोचली असती. तिथून पुढे मुटाटपर्यंत जेमतेम तासाभराचाच प्रवास. गाडीत रात्रभर तिच्या मनात प्रमोदचेच विषय सुरू. गाडीत अजिबात गर्दी नव्हती. टू सीटवर ती एकटीच होती. तरीही संपूर्ण प्रवासभर तिला झोपच आली नाही. सकाळी सहा वाजताच गाडी तरळ्याला पोहोचली. पिशवी, पर्स सुटकेस घेऊन सुधा स्टॅण्डवर उरतली.

घरी जाणारी गाडी यायला अजून तासभर अवकाश होता. सुधाने आज पहिल्यांदाच पेपर घेतला. पेपर वाचतानाही तिचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. तिला आपलं घर, आई बाबा दिसायला लागले. ही गोष्ट आईबाबांना कशी सांगायची याची मनात जुळणी सुरू झाली.आता मात्र तिला अनंत अडचणी दिसू लागल्या.

विजयदूर्ग गाडी लागली. सुधा गाडीत बसली. तिकिट काढून झालं आणि पुन्हा विचारांची आवर्तन सुरू झाली. तत्वनिष्ठ जीवन जगणारे स्वाभिमानी बाबा... शिक्षण पूर्ण करण्यापूर्वीच आपण प्रेमप्रकरणात गुंतलो हे त्यांना कितपत रूचेल?आईसुद्धा त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून चालणारी. प्रेमविवाह ही कल्पनाच मुळात त्यांना रूचणं अवघड आहे. ऐपत नसतानाही पोटाला चिमटा काढून सुधाला डॉक्टर करू पहणारे आईबाबा... त्यांना अंधारात ठेवून त्यांच्याअनुमतीची पर्वाही न करता आपण वचन दिलं प्रमोदला.ही त्यांना प्रतारणा वाटली तर? श्रीमंत पैसेवाल्यांबद्दलचा आजवरचा अनुभव काही चांगला नव्हता.अशा लोकांबद्दल सूक्ष्म अढी, तिरस्काराची भावना त्यांच्या मनात असायची.संपत्तीमुळे माणसाला मद येतो.दुसऱ्याच्या भावनांची तो पर्वा करीत नाही हे त्यांचं ठाम मत. महत्वाची अडचण म्हणजे प्रमोद चित्तपावन नव्हता. तो होता देवरूखे या पोटशाखेतला.हे बाबांना मान्य होणं शक्यचं नव्हतं. आपण मात्र प्रमोदला सांगून बसलोय की, आई- बाबांची परवानगी मिळाली की कळवीन, नि तू त्यांना भेटायला ये.पण हे साध्य होणं अवघड आहे असंच तिला वाटायला लागलं.

सुधा घरी पोहोचली तेव्हा तिचा चेहरा पार उतरलेला डोळे खोल गेलेले दीर्घ मुदतीच्या आजारातून उठलेल्या माणसाप्रमाणे तिची रयाच गेलेली!‘सुधा अभ्यासाचा भारी ताण पडलेला दिसतोय तुला.त्यात रात्रभराचा प्रवास. तोंड किती उतरलंय बघा पोरीचं.’ आई म्हणाली. बाबा बोलले, ‘‘सुधा आंघोळ करून घे. गरम-गरम आटवल खा आणि तू जरा झोप काढ. अभ्यासाचा केवढा ताण असतो याची कल्पना आहे मला. आता सुट्टीत चांगला आराम कर आणि पालवी धर.’’ सुधा आंघोळीला गेली. बहिणींनी

तिची बॅग उघडली. आतला भारी ड्रेस बघून त्या वरमल्याच. बॅग बंद करून त्या बाहेर गेल्या. सुधा आंघोळ करून आली. आटवल खाऊन ती माजघरात झोपली. सुधाला येऊन चार दिवस झाले तरी ती मोकळेपणी वागेना. सतत दडपणाखाली असल्यासारखी वावरायची. भावंडांशी गप्पा, दंगामस्ती नाही, गाणी म्हणणं नाही. आवारात फिरून येणं नाही. एवढंच काय झोपाळ्यावर बसून झोके घ्यायची तिला भारी आवड. पण ती झोपाळ्याकडे फिरकली सुद्धा नाही. तरीही काही गंभीर कारण असेल असं मात्र तिच्या आई बाबांना वाटलं नाही.

खूप दिवस अभ्यासाच्या ओझ्याखाली ती कंटाळलेली असणार. हळूहळू रूळेल असचं त्यांना वाटलं.भावंडं,बाबा बाहेर गेलेले, घरात ती अन् आई तशा दोघीच. तो मोका साधून आईकडे आपलं मन मोकळं करायचं सुधानं ठरवलं. ‘‘आई तू रागावणार नसशील तर एक गोष्ट सांगायची आहे तुला.’’ तिच्या डोक्यावर मायेने हात फिरवीत आई म्हणाली ,‘‘हं ऽऽ नाही रागावणारं. काय ते मोळकेपणाने सांग.’’आईच्या नजरेला नजर न देता सुधानं प्रमोद बद्दल सगळं सांगितलं. आपण दिलेलं लग्नाचं वचन, त्याच्या मम्मी डॅडींची भेट, त्यांच्याशी झालेलं बोलणं, कोर्स पूर्ण झाल्यावर लग्न करायचं, देण्या घेण्यावरून अडवणूक होणार नाही, आपल्या कमाईतून भावंडांना शिक्षणासाठी मदत करण्याचा बेत.सुधा सविस्तर सगळं सांगत सुटली. आई नुसती हुं ऽऽ हुं ऽऽ करीत राहिलेली. सुधाचं बोलून झालं. आईनं कसलीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. आता मात्र सुधाला रहावलं नाही. आईचे हात हातात घेत सुधानं विचारलं, ‘‘आई तुला पसंत नाही कां हे? माझं काही चुकलं का ? बोल ना गं आई ऽऽ’’

आईच्या घशात हुंदका दाटून आलेला पण रडू दाबीत आवंढा घोटून ती म्हणाली, ‘‘ह्यांचा स्वभाव तुला माहिती आहेच. अजून शिक्षण पूर्ण व्हायचं आहे अन् मध्येच हे काय करून बसलीस पोरी. जरा थांबली असतीस तर फार फार बरं झालं असतं. व्हायचं ते झालं. मी ह्यांच्या कानावर घालते. त्यांना समजवण्याची होईल तेवढी शिकस्त करते.’’ आता मात्र सुधा रडायलाच लागली. तिला थोपटीत आई म्हणाली, ‘‘जा

तोंड धू. मुलं येण्याची वेळ झाली. तिन्ही सांजेच्या वेळी असं रडू नये. हे सुद्धा येतील इतक्यात. रडणं आवर आता. तोंड धू आणि देवाचं काही म्हण बघूऽऽजा.''

रात्री सगळ्यांची जेवणं झाली. मुलं अंथरूणावर आडवी झाली. आई बाबा झोपळ्यावर बसलेली. मध्यरात्रीपर्यंत त्यांचं दबक्या आवाजात बोलणं सुरू असलेलं सुधाला कळत होतं. काय बोलतात ते मात्र ऐकू येत नव्हतं. आता बाबा आपल्याला हाक मारतील,तडातडा बोलतील, जाब विचारतील असं त्याचं बोलणं सूरू असल्यापासूनच सुधाला वाटत राहिलं. पण तसं काही झालं नाही. बहुतेक बाबांची समजूत पडली असावी. त्यांना पटलेलं असावं असा अंदाज करीत सुधा झोपली. सकाळी खूप उशीरा तिला जाग आली. तोंड धुऊन ती स्वयंपाक घरात गेली. तिची चाहूल लागताच चुलीपुढे बसलेल्या आईनं मागे वळून बघितलं.तिचा चेहरा भकास झालेला. एका रात्रीत एवढी अवकळा तिच्या तोंडावर आली की आई चक्क म्हातारी दिसू लागली. सुधा दूध प्यायली आणि कप विसळून ठेऊन झोपळ्यावर जाऊन बसली.

दहाच्या सुमाराला बाबा आले. टोपी खुटीला अडकवून शर्ट काढला आणि पाय धुवायला न्हाणीघराकडे गेले. सुधाकडे त्यांनी बघितलं सुद्धा नाही. पाय धुऊन आल्यावर ते स्वयंपाक घरात गेले.''सुधा जरा आत ये. अरूण तू बाहेर झोपाळ्यावरच बसून रहा. मला सुधाशी महत्वाचं बोलायचं आहे.कुणी आलंच तर मला कळव.'' सुधा स्वयंपाकघरात जाऊन बाबांसमोर उभी राहिली. ''सुधा तो पाट घे नी बैस. काल रात्री हिने मला सगळं काही सांगितलं.तू त्या मुलाला लग्नाचं वचन दिलसं ना? सुधाने 'हुं' म्हटलं.''त्याने तुला वचन दिलयं ना ? ''सुधा परत हुं म्हणाली.''त्यांच्या आईवडिलांशी ही तुमचं बोलणं झालेलं आहे. त्यांना पसंत आहे म्हणजे सगळं ठरल्यात जमा आहे. तू मोठी आहेस. आता कायद्यानेही सज्ञान झाली आहेस. तू सुविद्य आहेस. आपलं बरं- वाईट तुला कळंत म्हणून तर तू हा निर्णय घेतलास. ठीक आहे.''

आईनं चहाचा कप पुढ्यात ठेवला. चहा पिऊन झाल्यावर

बाबा पुढे बोलायला लागले, ‘‘सगळं काही परभारे ठरवून तुम्ही मोकळी झालात त्या अर्थी आता आम्ही हो - नाही म्हणण्याचा प्रश्नच येत नाही. म्हटलं तरी ते निरर्थकच आहे. मोठी गडगंज पार्टी आहे. मी कुठला त्यांच्या पासंगाला पुरणार? डॉक्टर होणारी मुलगी, दिसायला सुंदर, त्यांना जसं घबाडच मिळालं. पैसेवाली माणसं पूर्ण फायदा बघून मगच निर्णय घेतात.त्यांची प्रत्येक गोष्ट पैशाच्या जोरावर कशी योजनाबद्ध आणि पद्धतशीर होत असते. ते असू दे! मुलगा देवरूखा आहे. मी स्थळ शोधलं असतं तर देवरुखा, कऱ्हाडा कधीच पत्करला नसता, पण ठीक आहे. मुलगा ब्राह्मण आहे हे सुद्धा काही कमी नाही. तूच पसंत केलास म्हटल्यावर आम्ही आक्षेप घेणारे कोण ?’’आईला राहवेना ती म्हणाली, ‘‘सुधा, तुझं काय वय होत चाललं होत म्हणून आमचा विचारही न करता तू परस्पर निर्णय घ्यावास? की आमच्यावर तुझा विश्वास नाही. आम्ही का तुझं अकल्याण केलं असतं ? लग्न न करताच वाढू दिली असती? तिला पुढे बोलवेना. तिने डोळ्यांना पदर लावला.

बाबा म्हणाले, ‘‘तू रडू नकोस.सुधाचा निर्णय आता झालेला आहे. आता ते उगाळण्यात आणि बोल लावण्यात काही अर्थ नाही. आपण आई-बाप आहोत ना तिचे ? मग मान अपमान आपणच गिळायला पाहिजे. त्रयस्थाच्या दृष्टीने बघितलं तर सुधाने ठरवलं त्यात तसं वावगं काय आहे? आम्ही तिला काय मोठी फुलात धरली आहे? दोन वर्षात नवीन ड्रेससुद्धा आम्हांला तिच्यासाठी शिवता आला नाही. तिच्या बरोबरीची मुलं मी बघितली आहेत. ते आता राहू दे. सुधा तू ठरवलंस म्हणजे ते आम्ही मान्य केलं असा अर्थ नव्हे. आम्ही आडकाठी नाही करणार तुला, पण मी माझ्या हाताने देवरूख्याला मुलगी नाही द्यायचो आणि हे बघ मुलाकडच्यांनी कितीही सांगितलं की त्यांच्या काही अपेक्षा नाहीत तरीही लग्न हा व्यवहार इतका सरळ होत नसतो.अगोदर असंच सांगायचं असतं. मग ठरावाच्या वेळी कुणी काका, मामा,आप्त, मित्र उपटतो.तो रीत शिकवतो. हळु हळू एक एक गोष्ट पुढे येते. मुलीच्याबापाला नाही म्हणणं शक्यच होत नाही. मान - पान, हुंडा हे टाळलं तरी लग्न करून देणं ही तरी नैतिक जबाबदारी

रहाते. मी ती मानतो. मुलीच्या बापाचं ते कर्तव्यच आहे. पण सुधा आता ह्या वेळेला अगदी शंभर माणसांचा खर्च झेपवून कार्य करून देणंही माझ्या अवाक्या बाहेर आहे.'

सुधा धीर करून म्हणाली, ''बाबा, या बाबतीत बोलणं झालयं आमचं. कोर्स पूर्ण होईपर्यंत लग्न करायचं नाही असं प्रमोदचे डॅडीही म्हणाले. मला सुद्धा ते योग्य वाटत नाही. बाबा मी शपथ घेऊन सांगते. पूर्ण कोर्स होईपर्यंत पाहिजे तर आम्ही एकमेकांना भेटणार सुद्धा नाही. मी प्रमोदच्या डॅडींना इकडे बोलावून घेते. ते नक्की येतील. नाहीतर आपण त्यांच्याकडे जाऊया. त्यांच्याशी बोलूया. फार मोठ्या मनाची माणसं आहेत ती. एकदा त्यांचं तुमचं बोलणं झालं ना की तुमचे सगळे गैरसमज दूर होतील अशी माझी खात्री आहे. इथे काय परिस्थिती आहे ते का मला समजत नाही? खर्चाची तोंडमिळवणी करताना तुमची, आईची काय परवड होत असेल हे कळतंय ना मला. मला निदान तुमचा तरी आधार आहे. मी तिकडे निश्चिंत राहू शकते. ज्यांना कोणाचाच आधार नाही. त्यांची काय अवस्था होते हे मी बघितलेलं आहे.''

''सुधा आता स्पष्टच सांगतो. तुला डॉक्टरकी शिकायला मी पाठवली. माझींही काही धोरणं होती .... योजना होत्या.... आता कुठे तुला एकविसावं वर्ष लागलं .मागची एक - दोन भावंडे रांगेला लागतील असे माझे मनसुबे होते.... सुनिता यंदा एफ.वाय.ला आहे.तिला शहात्तर टक्के मार्क्स आहेत. अरूण बारावी होईल . तो सुद्धा ऐंशीच्या खाली येणार नाही. मंजु दहावीत गेली......सुधा तू फक्त पंचविशी पर्यंत थांबली असतीस तरी सगळं कुटुंब शून्यातून वर आलं असतं...जाऊ दे! शेवटी कन्या हे परक्याचं धन ... तुझा मार्ग तुला मोकळा आहे. पण आणाभाका झालेल्या असताना लग्न लांबवणं मात्र मला अजिबात मान्य नाही. ''कामातुराणाम् न भयम् न लज्जा ... तू एवढी सोज्वळ असतीस तर आई - बापाला अंधारात ठेवून वचन देण्याएवढं धारिष्ठ्य तुला झालंच नसतं. तुझे संस्कार तुला वाह्यात वागायला द्यायचे नाहीत हे खरं पण कधी ? तू त्या फंदातच पडली नसतीस तर! तरच ठीक होतं....! इथून पुढे तशी खात्री देण्याचं धाडस

कोणता मुलीचा बाप करील?''

''सुधा, त्यांनी मोठा धूर्त डाव टाकलेला आहे. आताच लग्न करून पुढच्या वर्ष दीड वर्षाचा खर्च कोणता व्यवहारी मनुष्य बोकांडी मारून घेईल?सुधा प्रमोदचे मम्मी -डॅडी वाईट कशाला असतील? ते चांगलेच असणार.....तसा मनुष्य कोणताच वाईट नसतो. मुळात तो तसा वाईट नसतोच मुळी ,मी हे तत्त्वतः मान्य करतो.पण वाईट असतात त्याचे विचार आणि कृती .... आणि ह्या गोष्टीसुध्दा शेवटी परिस्थिती सापेक्षच असतात ना ? प्रमोदचे आई -बाप म्हणून, तुझे सासू-सासरे म्हणून ते चांगले असतीलही. पण व्याही - विहीण म्हणून ते कितपत चांगले वागतात हे वेळ येईल तेव्हाच... अनुभवा अंतीच पटेल. आताच्या परिस्थितीत तशी खात्री देण्याचे धाडस कोण करील? करावे तरी का म्हणून ? काही गोष्टींच्या बाबतीत झाकली मूठच बरी असते. घटना कशीही असो, चांगली वाईट... ती घडून जाते पण मागे पडसाद उठतात.या संबंधामध्ये तसे ते उठू नयेत अशी दक्षता मी घेणार आहे.''

''सुधा, समुद्र मंथनातून अमृताबरोबर विषही बाहेर आलं देवांना ते पचवावंही लागलं. घटना आता सुरू झाली आहे. तिचे परिणामही आता अटळ आहेत. ते उभयपक्षी भोगावे लागणार आहेत. सूज्ञ पावले टाकून त्यांची तीव्रता तरी कमी होईल. कटूता आलीच तरी तिचे वेगळे असते. कालांतराने तरी परस्परांची बाजू परस्परांना पटेल अन् संबंध स्वच्छ, निर्लेप होतीलही. पण ते आता याक्षणी घडणे अशक्यचं . बी रूजत घालताना ते सद्‌भावनेने घातले आहे. त्याचे फळ वाईट कसे येईल? तू सुविद्य आहेस. तू चांगल्या हेतूनेच हा निर्णय घेतला आहेस तेव्हा तो योग्यच असणार. पण ते केवळ तुमच्या पुरतेच. तुम्हा उभयंताना या क्षणी परिस्थिती लवचिक आहे. माझी कुवत नाही म्हटल्यावर प्रमोद बापाच्या नकळत कदाचित मला पैसेही देईल. त्याच्या जीवावर पैशाचे सोंग आणून मला आपले दैन्य कदाचित झाकताही येईल.पण सुधा, तो माझा तत्व निष्ठेचा,निस्पृहतेचा पराभव असेल. माझे असे कृत्य ही प्रमोदच्या आई- बाबांची माझ्याकडून झालेली प्रतारणा असेल.''

‘‘कदाचित निस्पृहपणे काही देऊ नका.लग्न खर्चाप्रीत्यर्थ मी मदत करीन अस त्याचे वडीलही म्हणतील. पण म्हणून मी ते मान्य करणे हे भूषणावह ठरेल का? सुधा ऐश्वर्य भोगणाऱ्या माणसालामुळातच दैन्यावस्थेची कल्पना कशी यावी? आलीच तरी किती तीव्रते पर्यंत ही सुद्धा कल्पने पलिकडचीच गोष्ट आहे. मी शिक्षक आहे. माझ्या मिळकतीची मोजदाद केली तर आज मितीला मी अमूक एवढी रक्कम बाळगून असणार असा अंदाज कोणीही करेल. तसा करणे इष्टही ठरते. पण वस्तुस्थिती काय आहे हे ती प्रत्यक्ष भोगणाऱ्या तुम्हां मुलानांच ज्ञात असणार. मात्र खर्चाचा विचार करताना श्रीमंत माणसं चांगला कल्पनाविलासलढवतात. सामधाम परिस्थितीतल्या माणसांना काटकरीची सवय असते. त्यांच्या गरजा कमी असतात. असं निर्लज्ज समर्थन द्यायलाही ती कचरत नाहीत. सुधा, कदाचित तुझ्या सासुसासऱ्यांनी न जाणो... माझ्या परिस्थिती बद्दल तसं त्रैराशिक मांडलं तर त्याचं काय चुकलं?.

‘‘सुधा, मी त्यांना वाईट म्हणत नाही.पण साकल्याने विचार कर.माझी लग्न करून देण्याइतकी ऐपत असूनही मी परिस्थितीचा, त्यांच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेतोय असा ग्रह त्यांनी करून घेतला तर? ही गोष्ट कदाचित ते कधीही बोलूनही दाखविणार नाहीत पण माझ्याकडे पाहताना त्यांची नजर स्वच्छ नसेल हे निर्विवाद.सुधा आताच्या परिस्थितीतून काहीही चांगलं निष्पन्न होणार नाही हे नक्की. मग तूच सांग. विपरित परिणामांची शक्यता दिसत असतानाही मी हात दाखवून अवलक्षण केल्यासारखी त्यांची भेट घ्यावी. अन् प्रचिती पहावी.असं तू आता सांगू धजावशील का? नाही सुधा, ते शक्य नाही.आम्ही परस्परांना न भेटण्यातच सगळ्या गोष्टी भरल्या राहतील. चांगलेपणा, वाईटपणा राहू दे. निदान परस्परांची मतं, दृष्टीकोन निर्विकल्प तरी राहतील.’’

‘‘सुधा, आम्ही पूर्ण विचार करून निर्णय घेतलाय तो नीट ऐक. तुम्ही रजिस्टर लग्न करा. तुला मणी- वाटी म्हणून मंगळसूत्रा साठी तोळाभर तरी सोनं आम्ही देऊ. हिने जीव-जीव म्हणून तोळाभर सोनं गाठीशी ठेवलेलं आहे. ते आम्ही पुढे करू. तेवढंही नाही केलं तर अधर्म घडेल.माझ्या हातून.

मणी - वाटी घातली नाही तर मुलीचा बाप जावयाच्या ऋणात राहतो असं धर्मशास्त्र आहे.हे ऋण मी ठेवणार नाही .तुझं शिक्षण पूर्ण होइतोपर्यंतचा दीड वर्षाचा खर्च ...पूर्वी झालेल्या खर्चाच्या अंदाजाने तो सोळाशे रूपयापर्यंत जाईल, तो मी देणार आहे.तसेच लग्नखर्च म्हणून पाचशे रूपयेपर्यंत मला झेपतील तेही मी देईन.येत्या दोन-तीन दिवसांत तशी तजवीज होईल.शिक्षक बँकेकडे कर्जासाठी अर्ज दिलाय मी. तुम्ही रजिस्टर लग्न करा.आम्ही कुणीही लग्नाला येणार नाही.तू आजच सविस्तर प्रमोदला पत्र लिही.त्याला स्पष्ट लिही. शक्य तितक्या लवकर लग्न व्हायला हवं.''

''सुधा, मी सांगतोय ते पूर्ण विचार करून. त्यात काडीमात्र बदल होणार नाही. जर प्रमोदकडून प्रतिसाद आला नाही तर मात्र तुला पुढच्या वर्षी मेडिकल कॉलेजला जायला मिळणार नाही. शिक्षण थांबवून इथेच रहावं लागेल. प्रमोद तुझा स्वीकारकरीपर्यंत... तस्मात लग्नही करायचं नाही अन् शिक्षण थांबवून इथेही रहायचं नाही असा तुझा निर्णय असेल तर तुझा मार्ग तुला मोकळा आहे. अगदी या क्षणीसुध्दा तू घर सोडून जाऊ शकतेस. अर्थात बाप म्हणून जबाबदारी मी टाळणार नाही. सोनं, रक्कम जे मी बोललो ते घेऊन जा.'' बाबा उठून उभे राहिले. सगळ्यांना बजावलं, ''सगळ्यांनी एक लक्षात ठेवा. झाल्या प्रकाराची वाच्यता चर्वित चर्वणं करायची नाहीत. लग्नापर्यंत गोष्टी येतील तेव्हा लोकांना काय सांगायचे ते पाहू.'' बाबा बाहेरजाऊन झोपाळ्यावर बसले.

दुपारची जेवणं झाली.पानावरून उठताना बाबा म्हणाले,''सुधा संध्याकाळपर्यंत पत्र लिही. उद्या अरूण तरळ्याला जाऊन तिथल्या पोस्टातून ते रजिस्टर करील. उगाच गावभर बभ्रा नको. प्रमोदला तू सुध्दा कळव की, पत्रावर त्याने आपलं नाव लिहू नये.'' संध्याकाळी सुधाने पत्र लिहून पूर्ण केलं. अन् बाबांच्या हातात दिलं. बाबांनी ते वाचताच पाकीटात घालून पाकीट चिकवून टाकलं. दुसऱ्या दिवशी अरूण पत्र रजिस्टर करून आला. त्यानंतर आठ-दहा दिवस गेले. या काळात आई, भावंड तिच्याशी कारणापुरतं बोलत. बाबा तर तिच्याकडे पहाणंसुध्दा टाळत. दहाव्या दिवशी प्रमोदचं पत्र आलं. सुधानं ते आईकडें आणि आईनं ते बाबांकडे दिलं.

लगेचच लग्न करायला त्यांची हरकत नव्हती. मात्र तत्पूर्वी बाबांनी मम्मी -डॅडींची भेट घ्यावी. पाहिजे तर ती दोघं बाबांना भेटायला येतील असं कळवलेलं होत त्या पत्रात. बाबांनी पत्र वाचून सुधाकडे दिलं. सुधानं पत्र वाचलं.

बाबा म्हणाले, ''त्यांना भेटायची माझी इच्छा नाही. त्यामागे माझा काय हेतू आहे तो मी यापूर्वीच सांगितलाय तुला. रजिस्टर लग्नाऐवजी वैदिक पद्धतीने लग्न लावून द्या असं कदाचित ते म्हणतील. त्यांच्याकडे परिस्थितीची रड करून त्यांच्याकडे खर्च कसा मागू मी? तुझा निर्णय मुळातच पूर्णतः माझ्या इच्छेविरूद्ध आहे. असं असताना मनात किंतू ठेऊन तोंडदेखलं नाटक करणंही माझ्याच्याने होणार नाही. तेही एकवेळी केलं असतं मी... पण माझे हात तोकडे पडताहेत गं सुधा ! आता या परिस्थितीत तोंड वेंगाडण्याशिवाय त्यांच्यापुढे मला काही बोलता यायचं नाही. अस्थाई निर्णय घेऊन मला भलत्याच धर्मसंकटात टाकलंस ग पोरी.'' अगतिक झालेले बाबा... परिस्थितीशी टक्कर देतानाही ताठ कण्याने रहाणारा तो निग्रही माणूस स्थळ काळाचं भान सोडून रडू लागला.बाबांचे पाय धरीत सुधा ओक्साबोक्शी रडू लागली. ''बाबा खरचं माझं चुकलं. माझं कर्तव्य, माझी जबाबदारी कशाचंही भान न ठेवता मी मोहाला बळी पडले. माझ्या निर्णयाचे किती दूरगामी परिणाम होतील याचा विचार करण्याचंही तारतम्य मला राहिलं नाही. निर्णय घेण्यापूर्वी निदान आईला तरी विश्वासात घेणं हे माझं कर्तव्यच होतं. बाबा माझ्या चुकीचं प्रायश्चित मला घेऊ द्या. मी अविवाहित रहायचं ठरवलयं. देवाच्या साक्षीने मी तशी शपथ घेईन.''

सुधाला जवळ घेऊन थोपटीत बाबा म्हणाले,''थांब पोरी थांब... असा अविवेकी निर्णय घेऊ नकोस. वचनभंगाचं पाप प्रायश्चितानं धुतलं जात नाही. तुम्ही पोरं अशीच खुळी असता. आधी मोहाला बळी पडून चूक करायची अन् मागाहून तिचं परिमार्जन करण्यासाठी दुसरी चींक करायची. लग्न म्हणजे काय पोरखेळ वाटला तुला? वाटतं काय तुला ? वाटलं की ठरवलं, वाटलं की मोडलं? या जन्मजन्मांच्या गाठी असतात. म्हणूनच या बाबतीतले निर्णय साकल्यानं दूरगामी दृष्टीने घ्यायचे असतात.

समजलं?''

''तू प्रमोदशी संबंध तोडलेस, अविवाहित राहिलीस म्हणजे काय बाबांच्या लौकिकात भर पडेल असं वाटतं तुला? आता मी सांगतो ते ऐक. तेच तुझ्या भल्याचं आहे. प्रमोदला पत्र लिही. म्हणावं माझा निर्णयच बाबांना मान्य नाही. तस्मात ते मम्मी - डॅडींना भेटणं अथवा मम्मी डॅडींनी त्यांना भेटणं आता असंभव आहे. आता रजिस्टर लग्नाशिवाय दुसरा पर्याय मला दिसत नाही. तू, मम्मी, डॅडी यांनी या संदर्भात प्रतिसाद दिलात नाही तर शिक्षण बंद करून मला कायमचं घरी बसावं लागेल. याविवाह संदर्भात एकही गोष्ट त्यांच्या तत्वात बसणारी नसल्यामुळे मला माझा मार्ग मोकळा आहे असा निर्णय त्यांनी दिलेला आहे. अमुक अमुक दिवशी विजयदुर्ग - मुंबई गाडीनं मी येत आहे. शक्यतो त्याच दिवशी विवाह विधी पार पडावा अशी व्यवस्था कर. ''



''सुधा, आणखी एक गोष्ट लक्षात ठेव. सगळया गोष्टी माझ्या मनाविरूद्ध असल्यामुळे याक्षणी तरी तुला क्षमा करण्याच्या मनःस्थितीत मी

नाही. तशी अपेक्षाही तू करू नकोस. पूर्ण विचार केलास तर माझं म्हणणं तुलाही पटावं. सगळं काही तुझ्या मनासारखं होऊ दे.अर्थात आता माहेर हा विषय तुझ्यापुरता संपलाय हे ही लक्षात ठेव.'' डोळ्याला पदर लावीत आई म्हणाली,''हे काहीही म्हणू देत सुधा, तसं एखादा दिवस तुला यावंस वाटलं आणि तू आलीस तरी चालेल. पण सध्यादोन तीन वर्ष तरी तुझ्या नवऱ्याला मात्र इकडं आणू नकोस. कितीही झालं तरी तो जावई आहे या घरचा. त्याची नीट संभावना नको का करायला? आताच आम्ही गळ्यापर्यंत बुडालोय. मनात ढीग आहे पण नन्नाजी हवेत ना? आणि ध्यानात ठेव, तुझी पडती बाजू आहे. मनाविरुद्ध झालं काही तरी तोंड उघडायचं नसतं. शेवटी केलेलं दिसत नाही पण बोललेलं रहातं नी तेच हयातभर पुरतं.''

बाबा म्हणाले,''काही झालं तरी पाण्याची धार काठीनं तोडता येत नाही. थोडे दिवस पडसाद उमटतात नी विरूनही जातात.उद्या तुझी भावंड मोठी झाली की त्यांना रूचतील,पटतील तसे त्यांचे संबंध राहतील. तोपर्यंत माझी सत्ताही संपलेली असेल.अन् हे बघ माझे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेतच.त्याबाबतीत तरी उदंड श्रीमंती आहे माझ्याकडे. किती झालं तरी शेवटी मी तुझा बाप आहे. मी सांगतो त्या मार्गानेच तुझ्या चुकीचं परिमार्जन होईल. तेच तुझं प्रायश्चित आहे असं समजून तू सामोरी जा. सोन्याचा कस सुद्धा अग्निपरीक्षा दिल्यावरच सिद्ध होतो ना?'

# ९. पिंगळ्याची भाक

महिम्न, त्रिसूपर्ण, पुरुषसूक्त पुरे झाले आणि पुर्षा बाळंभटाकडे जायचा बंद झाला. नेहमीप्रमाणे सकाळीच उठून संधा घ्यायला म्हणून तो साळसूदाप्रमाणे घराबाहेर पडायचा. पण बाळंभटाकडे न जाता थेट बंदर गाठायचा. बंदराजवळ सातवाहनाच्या काळातली पडझड झालेली गढी होती. तिथे दिवसभर गावातली उनाड पोरे हुदू घालायची. बेदाद वाढलेल्या वडा-पिंपळाच्या झाडांवर सूरपारंब्या खेळायची. कुणी हत्ती तलावात पोहायची. भुकेच्या आगीला चिंचा,आवळे,बोरे, चिकणे, भोकरे, ओवळदोडे, आंबे असला रानमेवा आलटून पालटून चाखतायायचा. गावात कोणाचेही पोर घरात नसले की ते हुकमी गढीत असणार हे मुळी ठरलेले गणित! दोन वेळच्या अन्नाची भ्रांत सोडवायच्या उद्योगात गळ्यापर्यंत बुडालेल्या माई दीक्षितीणीला पोराकडे लक्ष द्यायला सवड तरी कुठली व्हायला?

बाळंभटजीनी पुर्षाची लक्षणे कधीच ओळखली होती. कोणाचा धाक नसलेले हे निब्बर पोर वेदविद्या काय कर्माची शिकणार? हे भाकीत त्यांनी पत्नीकडे कधीच वर्तवलेले. पण माई अगदीच हाता पाया पडली म्हणून अन् महिन्यातल्या अडचणीच्या दिवसात निरोपा सरशी येऊन माई दोन वेळेला अन्न रांधून जायची. कधी सणसूद, श्राद्ध-महाळ अशा वेळी करा सवरायला यायची. बरे अमुकच मोबदला हवा अशीही माईची अट नसायची. तिचे करणे कर्तूक चांगले, राहणे निर्मळ आणि मुख्य म्हणजे तोंडाने फटाफटा नाही. यामुळे बाळंभटणीचे तिच्यासाठी अडायचे. हे ओळखूनच बाळंभट धोरणाने म्हणाला,‘‘पाठव, पुर्षाला, बघू या आरेखतो का! मलाही जरा मदत होईल. शिकला सवरला तर भिक्षुकी करुन पोट भरील. नीट शिकला तर त्याचे कल्याणच होईल. बघू काय होते...’’

पुर्षा भिक्षुकी शिकायला बाळंभटाकडे जाऊ लागला. तिथे गेल्यावर शेणगोठा.गुरे सड्यावर लावून येणे, देवपूजा, कधी नारळ पाडून दे, बंदरा वरुन जिन्नस आणून दे असल्या कामात त्याची विरड जायची.भटजी भिक्षुकीसाठी लांब गावाना जायचे.पुर्षा येऊ लागल्यावर,बाळंभटजींना मिळकतीची पडशी वहायला हुकमी चाकरमिळाला. बरे मुंज झालेला ब्राह्मणाचा मुलगा म्हणून यजमान इतर ब्राह्मणांबरोबर पै-पैसा त्याच्याही हातावर घालीत. हे सगळे सांभाळून सवड मिळेल तसे भटजी त्याला काही बाही शिकवित. पुर्षासुद्धा विशेष तोशीस लावून न घेता जमेल तसा शिकवलेला भाग मुखोद्‌गत करी. सलग पाच-सहा वर्षे भटजींकडे खेष्ट्या मारुन फक्त महिम्न, त्रिसूपर्ण, पुरुषसूक्त आणि ब्रह्मकर्मे इथपर्यंतच त्याची मजल गेली. या गोष्टींचा भिक्षुकीसाठी फारसा उपयोग नव्हता.



लग्न,मुंज,वास्तुशांत,गृहमख,श्राद्ध-पक्षादि विधी ही भिक्षुकीतली चलनी नाणी... पुरुषसूक्त झाल्यावर पुर्षाने म्हटले देखील, ‘‘गुरुजी, आता मला धर्मकृत्ये शिकवा. म्हणजे संथा सांभाळून मला भिक्षुकीही करता येईल.’’ पण हे शिकवले की पुर्षा कमाईला लागेल. फक्त संथा घेण्यापुरता

येणार नी ढुंगणाला पाय लावूनजाणार ‘‘कधी ..काय.. नी कसे शिकवायचे ते ठरलेले असते. तुझी वाणी अजून संस्कारित व्हायला हवी. रुद्र, श्रीसूक्त, देवे झाले की मग विधी एकेक सुरु करुया. पुरुषसूक्त झाले म्हणजे षोडषोपचार पूजा काय तुला अडायची नाय. तेव्हा आधी रुद्र घेऊया.’’ पुर्षा आता रंजिस आला. घरी माईपुढे त्याने तोंड सोडले. ‘‘बाळंभट मला राबवून घ्यायला सवकला आहे. घरचे राडे उपसायला फुकटचा नोकर मिळालाहेना... तो बरीच मुदत टिकायला हवा. म्हणून वेळकाढूपणा करुन ते लोंबवताहेत मला.’’

माई करवादली.‘‘मी हाता-पाया पडून तुझे लोढणे अडकवले त्यांच्या गळ्यात. विद्या घ्यायची म्हणजे गुरुची सेवा नको का करायला? एवढा त्रिखंडाचा स्वामी कृष्ण परमात्मा... पणत्याने सुद्धा सांदिपनीच्या आश्रमात गुरे वळली, लाकडे फोडली. नी तू कोण एवढा तालेवार लागून गेलास रे टिक्कोजी? जलमण्यापूर्वी बापसाला उलथून घातलेस. भिकू मास्तराच्या शाळेत घातला तर चार वरसात दोन यत्ता काय पुऱ्या करवेनात तुला... मीही अशी रांडमुंड वनवाशी बाई. हाडाची काडे करुन संसार रेटत्येय्. तू मार्गी लागशील, कमाई करुन माझे पांग फेडशील म्हणून आला दिवस दाढेत आवळा धरुन ढकलत्येय्...! नि तुला काय अशी वेठबिगारी करायला लागत्ये रे सोकाजीरावा?दुपारी पंक्तीला बसून पोटभर हादडतोस की नाय बाळंभटजींकडे?... अधे मध्ये पै-पैसा का होईना त्यांच्या पुण्याईवरच मिळतो ना तुला? पुर्षा रे, माणसान् प्रवाह पतित होऊन दिवस काढावे. लोहपिष्ट पचवायला शिकावे. आमचे अण्णा म्हणत, चणे खावे लोखंडाचे तेव्हा ब्रह्मपदी नाचे.’’

तू जरा धीरधर.आपला पडता काळ आहे. थोडी कळ सोस. मग सगळे मार्गी लागेल. अरे रुद्र आला की श्रावणातल्या चार सोमवारी तुला थारा मिळणार नाही. एवढी एकादष्ण्यांची कामे मिळतील.’’ पुर्षाला गप्प राहणे भाग पडले. तो मुकाटपणे भटजींकडे जात राहिला. त्याने चंग बांधून सहा महिन्यात रुद्र पुरा केला नि ‘‘आता धर्मकृत्ये सुरु करा.’’ असा

भटजींच्या पाठी लकडा लावला. पण ते काय गम लागू देईनात. तेव्हा मात्र पुर्षा हताश झाला. त्यांचे हात पाय चालताहेत तोवर ते आपल्याला रखडवणार हे पुर्षाने ओळखले. एक दिवशी मनाचा हिय्या करुन त्याने सरळ गढी गाठली. सुरुवातील एक -दोन दिवस मोकळ्या अंगाने रांबाडपणा करणे त्याला गोड वाटले. पण गढीतल्या वडावर सूर पारंब्या खेळायचे , विटी दांडूत रमायचे त्याचे वय राहिले नव्हते. मगत्या पोरांची संगत सोडून गढीतल्या भवानीच्या देवळात, कधी मारुतीच्या देवळात तो बसून रहायला लागला. मारुतीच्या देवळात रमल सांगणाऱ्या बैराग्याची मजा बघीत त्याचा दिवस मजेत जायचा. आरशावर काजळाच्या बोटांनी चित्रविचित्र आकृत्या काढून बैरागी प्रश्नकर्त्यांना काहीबाही तोडगे, उतारे सांगायचा.

नारळ,भाताचे मुटकुळे उतरुन काढ,लिंबू कापून तीन तिठ्यावर पींर,असे काही तोडगे तो आलेल्या माणसाला सांगायचा. अडचण सांगायला आलेला मनुष्य समोर बसला की त्याच्या चेहऱ्याकडे बैरागी टक लावून बघायचा. मग आरसा स्वच्छ पुसून त्याच्या हाती द्यायचा अन् काजळात बोटे बुडवून आरशावर काहीबाही रेघोट्या काढायचा.आरशात बघीत असलेला मनुष्य कोण कुठला त्याच्या घराजवळच्या खाणाखुण इत्थंभूत सांगून त्याची अडचण काय आहे, कसले आडमेळे आहे. त्यावर काय उपाय करायला हवा हे फडाफड बोलायचा. काही वेळा विभूत मंत्रून द्यायचा, कधी नारळ मंत्रून द्यायचा, कधी लिंबू गुलाल द्यायचा. माणसे त्याच्या पाया पडत. एक पाट मांडून त्यावर पणती, नारळ ठेवून गोसावी त्याच्यासमोर बसलेला असायचा. माणसे त्या पाटावर तांदूळ, नारळ, पै-पैसा,चवली-पावली यथाशक्ती ठेवीत.

आपणही बैराग्याला आपली नड सांगावी. आपल्याला कुठे शेर मिळेल का? हे विचारावे असे त्याच्या मनात यायचे.पणत याची गोसाव्याशी एवढी घसण झालेली नव्हती. रमल बघायला येणाऱ्यांना नारळ, लिंबू, उद, तेल आणून दे अशी सटरफटर कामे पुर्षा तत्परतेने करायचा. हळू हळू तो देवळात जाऊन टेकला की गोसावी हसून ‘या’ म्हणायचा. मग एक दिवस

बैरागी एकटा असलेला गाठून पुर्षा धीर करुन पुढे सरला. आपली कर्मकहाणी सांगून या परिस्थितीतून बाहेर पडायचा उपाय त्याने विचारला. बैराग्याने काजळात बोटे बुडवून आरशावर काही आकृत्या काढल्या. थोडा वेळ टक लावून बघितले नि बोलू लागला.‘‘येत्या तीन रोजात तुला कायमचा शेर मिळणार आहे. मारुतीला नारळ ठेव नि एकभुक्त राहून अकरा शनिवार धरीन असा नवस बोल. भाग्य आपल्या पायांनी चालत येऊन तुझा दरवाजा ठोठावील.’’ पुर्षा निर्धास्त झाला. मारुती पुढे नारळ ठेऊन अकरा शनिवार उपास धरायचा संकल्प त्याने केला.

पुर्षा बाळंभटजीकडे जायचा बंद होऊन दहा दिवस मागे पडले. गोडबोल्यांकडे डिंकाचे लाडू करुन द्यायला माई गेलेली. सहज गप्पांच्या ओघात विषय निघाला. पुर्षा गेले आठ-नऊ दिवस कायम बंदरावर नाहीतर गढीत बसून असतो. संध्याकाळ झाली की मुकाट घरी जातो ही बातमी आऊ गोडबोलणीन सांगितलीन्. माई एकदम तग्रवग्र होऊन फटाके फोडायला लागली. तशी आऊ तिला समजावीत म्हणाली, ‘‘माईऽऽ पुर्षाचे चुकले खरे पण बाळंभट देखील लुच्चा आहे. पोराला सटरफटर शिकवलेसे करुन पोटावरी राबवून घेतो. इतक्या वर्षात काय राशी घातल्यान् शिकवून हे कधी विचारुन तरी घेतलेस का पुर्षाला? आपले हित अनहित न कळण्याएवढा पुर्षा आता लहान नाही ऱ्हायला. कुठेतरी चिकटवा त्याला. अरे हो... बरें आठवले मला... शांताभाऊ गोडशांना भवानीच्या पूजेसाठी नि घरच्या देवांच्या पूजेसाठी ब्राह्मण ठेवायचा आहे असे ‘हे’ म्हणाले दोन दिवसांपूर्वी. देवीच्या पूजेचे वर्षासन आहे खंडीभर भाताचे.शिवाय नवरात्रात केवढी कमाई... एवढे सांभाळलेन् पुर्षान तरी तुमची जिगजिग कमी होईल. पोरही मार्गी लागेल.’’

लाडू वळून झाले.माई हात धींवून बाहेर पडली.ती तडक बंदरावर आली.तिला कुणी पोराने पुर्षा मारुतीच्या देवळात असल्याची खबर दिलीन. माई तरातरा मारुतीच्या देवळाकडे निघाली. माई देवळाच्या प्रवेश दारासमोर आली. अन् बळाणीवर टेकलेला पुर्षा हडबडून उठला.आता माईच्या तोंडाचा

पट्टा सुरु होईल...काही विचार न करता ती आपली भोसड काढणार या विचाराने त्याच्या पोटात गोळा आला. पुर्षा समोर उभा राहताच ''इथे भेटलास हे नशीब. चल माझ्या मागून...'' एवढे बोलून माई तोंड फिरवून चालू लागली. काही आक्रस्ताळेपणा न करता माईने एवढ्यावरच भागवले म्हणताना पुर्षा मान खाली घालून निघाला. नुकतीच वेसण टोचल्यामुळे नरम पडलेल्या बांगर पाड्यासारखा तो माईच्या मागून चालू लागला. मागे वळूनही न बघता माईने थेट शांताभाऊ गोडशांचे घर गाठले.

''या माई... अरे व्वा! पुरुषोत्तम का हा? बैस रे मुला.'' तक्क्यावर रेलून बसलेल्या शांताभाऊंनी त्याचे तोंडभर स्वागत केले. पुर्षा वरमून ओसरीवर खांबाच्या मुळाशी टेकला. माई तडक स्वयंपाकघरात जाऊन गोडशीणीसमोर उभी राहिली. गोडशीण थोरा-मोठ्याकडची, सासरी तर गजांत लक्ष्मीचे वैभव तिच्या पायाशी! पण तिला संपत्तीची अक्कड नव्हती. बाईपणा करुन अब्रूदार जगणाऱ्या माईचा तिला भारी पुळका. माईने पाणीसुद्धा न घेता अशान् असे सविस्तर तिच्या कानावर घातले. माईचे बोलणे ऐकल्यावर कसलाही आडपडदा न ठेवता मोकळ्या मनाने गोडशीण म्हणाली,''हात्तिच्या! एवढेच ना? ह्यांना तरी हल्ली पेढीच्या कामापुढे देवदेवतार्जनालाही फुरसद मिळत नाही. देवीचे वर्षासन आहे खरे पण आम्हाला तरी काय कमी आहे? कुणा गरजवंताचा चरितार्थ तरी चालेल. झालेच तर घरच्या पूजेअर्चेतूनही त्यांना जरा सुटका मिळेल. पेढीवरच्या कामालासुद्धा कुणी विश्वासू ब्राह्मण मनुष्य मिळतो का? हे बघताहेत. म्हटलेत तर पुरुषोत्तमचा विचार कधीचा माझ्या डोक्यात आलाहे. पण म्हटले आपण होऊन कसे विचारावे?''

''म्हंजे तसे विचारण्यात गैर काही नाही. पण तो बाळंभटजीं कडे भिक्षुकी शिखतोहे.त्याला काढायचा तिथून म्हणजे भटजी आणखी खार खाणार आमच्यावर! आता तुम्ही विषय चाळवलात हे बरीक ब्येश झाले. मी घालत्ये त्यांच्या कानावर. आता जेवणवेळ झालीहे. कधी नव्हे त्या तुम्ही आल्याहात तर घासभर खाल्ल्याशिवाय मी बरी जाऊ देईन तुम्हाला. आता

जेवूनच जा.'' कसनुसं हसत माई म्हणाली, ''अहो वैनीबाई पण... नाही म्हणजे पुर्षादेखील आलाहे. आम्ही जाऊ घरी. उद्याकडे खेप करीन. तवर शांताभाऊंना विचारुन ठेवा. मी निघते आता.'' माईचा भिडस्त स्वाभिमानी स्वभाव ओळखून गोडशीणीचे काळीज भरुन आले.''अहो माई... तुमची दिखिल कमालच म्हणत्ये मी! मुलगा बाहेर थांबलाय हे कळले असते तर अगोदर त्याला पाणी तरी विचारले असते की! आणि काय हो माईऽऽ मुलगा नि तुम्ही दोघे आहात म्हणून का जेवायला रहायचे टाळताहात तुम्ही. धन्य तुमचीसुद्धा! मागच्या खेपी बाळंपणात आईच्या मायेने केलेत माझे... त्याची जाणीव आहे हो मला.''

गोडशीणीने पुर्षाला हाक मारली.त्याच्यासाठी पाट मांडून वाटीतून लाडू नि पाण्याच्या गडवा ठेवला. तिच्या आतिथ्याने माई भारावून गेली. कुणाचे असे फुकट खाणे तिच्या रक्तातच नव्हते.''काय चटणी बा वाटायची असली तर सांगा. चटकन् तेवढी वाटून टाकीन. नाय तरी जेवण होईपर्यंत रिकामे बसून अशी काय चरबी वाढणारेय् माझी. काय करासवरायचे असले तर सांगा. शांताभाऊंना आमसोलाची चटणी आवडते. आज आल्येच आहे करीन की! मी पाय धुवून येत्ये तंवर तिळ-जिरे काढून ठेवा.''माई पाय धुवायला गेली सुद्धा. गोडशीण नको नको म्हणत असतानाही पाट मांडून ती वाढप करायला सरसावली.''आज मी आहे वाढायला तर तुम्ही अगोदरच बसा कशा.'' तशी गोडशीण म्हणाली, ''माई आपण दोघीजणी मग बसू. हे जेवायला बसले की यांच्या कानावर घालीन म्हणत्ये विषय. हे काय, नाही म्हणायचे नाहीत. तुम्ही मात्र एक करा, ह्यांनी तुमची अपेक्षा काय म्हणून विचारले तर अमुकच म्हणून सांगू नका. किंबहुना देण्या-घेण्याची काय अपेक्षा नाही. मुलगा जरा रांगेला लागला म्हणजे पुरे असे म्हणा.''

''माई कोणाचे कष्ट फुकटावारी घेणे ह्यांच्या स्वभावातच नाही. तसे ते हिशोबी आहेत खरे पण तुम्ही त्यांच्यावरच सोपवलेत तर त्यांनाही जरा बरे वाटेल. अहो दुसऱ्याच्या पोटात रिगल्याशिवाय आतड्याला पीळ कसा हो पडावा? एवढे घर भरुन दार वहातेय् आमचे... अगदीच कन्नी कटवायची

भाषा हे करायचे नाहीतच, पण त्यातही मी आहे ना खंबीर? फक्त त्यांच्या तोंडून रुकार येऊ दे मग पुढे कसे करायचे माझ्याकडे लागले.'' माई निर्धास्त झाली अन् तिने मान डोलावली. पुर्षा आणि शांताभाऊ जेवायला बसले. पहिला भात संपल्यावर वाढप करताना गोडशीणीने अशान् असे म्हणून सगळा विषय बेतास बात शब्दात नवऱ्याच्या कानावर घातला. शांताभाऊ मान डोलवीत म्हणाले,''ठीक आहे.कुणाला तरी गळ घालण्यापेक्षा पुरुषोत्तम करीत असेल तर चांगलेच की. देवीची, आमच्या घरची देवपूजाही करील आणि पेढीवर हिशोब - ठिशोब, वसुली ही कामे सुद्धा करता येतील की त्याला, मुलगा नेकीचा आहे, माईंच्या संस्कारात वाढलेला आहे...हे सोन्याहून पिवळे झाले की. देवीच्या पूजेचे वर्षासन आहे.ते खंडीभर भात मिळेल. नवरात्रात थोडे - बहुत उत्पन्न होते, तेही मिळेल. आता आमच्या घरची देवपूजा आणि पेढीवरचे काम याच्या मोबदल्याची काय अपेक्षा आहे ते सांगा हो माई! माणसाने व्यवहाराला कसे रोखठोक असावे. मी व्यापारी मनुष्य... स्नेहसंबंध सुद्धा ताजव्यात टाकून तोलून मापून घेणारा.''

''माई, माणूस जोडताना विचार करावा. पैसा जोडण्यापेक्षा तोडतो अधिक म्हणून स्पष्ट बोलतो. नाहीतर तुम्ही घरच्यासारख्या की हो आम्हाला. मागच्या खेपी रक्तानात्याचे मनुष्य काय करील अशा मायेने तुम्ही केलेत हिचे, मोबदल्याची अपेक्षाही न करता! तुमच्यासाठी काही करता आले तर माझे भाग्यच समजेन मी. कसल्याही कौटुंबिक व्यवहारात ही कधी अक्षरसुद्धा बोलत नाही. हिने आपण होऊन तुमचा विषय माझ्या कानावर घातला यात काय ते समजलो मी.पुरुषोत्तम या क्षणापासून राहू दे! फक्त तुमच्या अपेक्षा निःसंकोच सांगा.त्या पूर्ण करायची माझी इच्छा आहे.'' माईंनी गोडशीणीने पढवले होते त्याप्रमाणे उत्तर दिलेच आणखी पुस्ती जोडली.'देवीचे वर्षासन हेच बक्कळ झाले. आम्ही दोन माणसे खाऊन खाऊन खाणार किती? किती मिळाले म्हणजे माणूस पुरे म्हणेल? पूजेचे अवघे चार घटकांचे काम.हिशोब-ठिशोब ठेवायचे काम आधी तो दोन वर्षे शिकू दे.मग तुम्ही विचार करा नि काय ते ठरवा.अमूकच द्या असे माझ्या तोंडून कधी

यायचे नाही.''

माईचे बोलणे सुरु असता घास घेण्याचे विसरुन शांताभाऊ ऐकतच राहिले, ''माई तुमची मात्र धन्य आहे हो. तुमचा एवढा विश्वास आहे माझ्यावर हे ऐकूनच मी धन्य झालो. खूप तालेवार बघितले मी पण तुमचा नमुना काही वेगळाच आहे. घरच्या पूजेचे वर्षाकाठी पंचवीस रुपये आणि पेढीवरच्या कामाचा महिना दहा रुपये देऊ आम्ही. मुलाला पूर्ण दिवसभर गुंतवणूक आहे. उद्या लग्न कार्य होणार. त्याचा योगक्षेम भागेल एवढी कमाई त्याला व्हायलाच हवी. याखेरीज कधीही वेळे गरजेला तुम्ही शब्द टाका. माझी उपत आहे तोपर्यंत परत केव्हा द्याल हे शब्द माझ्या तोंडून यायचे नाहीत. माई अन्नावर बसून मी हे सांगतोय्...'' त्यांचे बोलणे ऐकूनच माईचे पोट भरले.बाळंभटाकडे जाणे बंद करुन आपल्याला काहीही कल्पना न देता पुर्षा रिकामटेकडा हिंडू लागला हे ऐकल्यावर त्यांच्या पायाखालची भुईच सरकली होती.आपण त्याला हुडकीत बंदर पालथे घालून गढीवर जातो काय...गोडशीणीकडे शब्द टाकतो काय नि अकल्पितपणे आपले भाग्य फळफळते काय...माई अचंबा करीत राहिल्या.

पुर्षा गोडशांच्या पेढीवर रुजू झाला. सकाळीच आंघोळ करुन तो बाहेर पडायचा.सोवळे नेसून गढीवर जाऊन देवीची आणि येता येता मारुतीची पूजाही करायचा. मग गोडशांच्या देवाची पूजा.त्यांची पूजा उरकून त्याने कपडे घातलेन की,गोडशीण काकूंची हाक यायची. लाडू, गोडाचे पोहे, सांजा काही ना काही खाणे आणिग्लासभर गरम दूध तयारच असायचे.खाणे उरकून तो पेढीवर पोहोचला की हळूहळू गिऱ्हाईकांची वर्दळ सुरु व्हायची.हे काम म्हणजे जशी राजाची गादी असेच त्याला वाटायचे.तो मन लावून काम करायचा. दुपारी जेऊन तो लगेच घराबाहेर पडायचा. पेढी उघडेपर्यंत मारुतीच्या देवळाकडे चक्कर मारायचा.बैराग्याचे शब्द अकल्पितपणे सत्य ठरले...त्याला जन्माचा शेर मिळाला होता.या जाणीवेने तो रोज न चुकता बैराग्याला हाक मारुन यायचा. त्याची बैराग्याशी घसण वाढू लागली.

बैरागी काय काय अद्‌भुत गोष्टी सांगायचा. खूप दूर त्याचे घर.. प्लेगात त्याचे आई- बाप वारले तेव्हा त्याचे वय अवघे चार वर्षांचे. चुलत्याने त्याला सांभाळले खरे पण त्याची बायको महाखाष्ट! आई- बापावेगळ्या या पोराचे ती भलते छळ करायची. धड दोन वेळचे अन्नसुद्धा मिळायची भ्रांत. कशीबशी दोन-तीन वर्षे गेली. गावातल्या शास्त्रीबुवांनी आपल्या मुलाबरोबर त्याची धर्ममुंज लावली. मुंजीनंतर आठवडाभराने असेल...काहीतरी सांडलवंड झाली म्हणून चुलतीने त्याला बेदम मार दिला. काविलता रसरशीत तापवून त्याच्या उजव्या मनगटावर ढाणी ओढली. वेदनांनी कळवळत तिचा हात झिंजाडून तो भयाने धावत सुटला. कोणी शोध घ्यायला मागूनयेईल म्हणून तो तीन दिवस कुत्र्यासारखा धावत राहिला.अन्न पाण्याविना धावून धावून तो उरी फुटला आणि भर दुपारी उन्हाच्या कडावर चक्कर येऊन पायवाटेतच कोसळला.तो जागा झाला तेव्हा कोणी कफनीधारी साधू त्याच्या जवळ बसलेला होता.

तो साधूबरोबर दहा-बारा वर्षे वेगवेगळ्या भागात फिरत राहिला. मंत्रतंत्र, मुद्रासामुद्रिक,सर्पविद्या यामध्ये तो पारंगत झाला. मग एक दिवशी फिरस्ता साधू त्याला म्हणाला,‘‘तू आता जा! जगायला आवश्यक एवढी शिदोरी मी तुला दिलीय. ती सत्कारणी लाव. सुखाने जगायचे असेल तर एक गोष्ट लक्षात ठेव, स्त्रियांच्या मोहात चुकूनही पडू नकोस. मिळालेल्या विद्येचा सत्कारणी वापर केलास तर तुझ्या दोन वेळच्या अन्नाची सोय मारुतीराया करील.’’ बैरागी मग पाय नेतील तिकडे जात राहिला. या भटकंतीत एका हठयोग्याशी त्याची गाठ पडली. नदीच्या प्रवाहात उभे राहून काही साधना सुरु असताना त्याची समाधी लागली. त्या अवस्थेत तो किती काळ होता देव जाणे. तो जागृतीत आला तेव्हा सर्वांगाचा दाह होत होता. तो कसाबसा काठावर आला.संपूर्ण शरीरावर माशांनी लचके तोडून नेल्यामुळे झालेल्या जखमांनी विव्हळत असताना बैराग्याची त्याच्याशी गाठ पडली.

बैरागी तीन महिने त्याची सेवा करीत राहिला. पुढची चार-पाच वर्षे तो हठयोग्यासोबत कुठकुठच्या मुलूखात फिरला. पिचपिच्या डोळ्यांच्या,

बायकांप्रमाणे वेणी घालणाऱ्या लोकांचा प्रदेश, पक्षी पकडून त्यांना शिकवून त्यांची विक्री करुन चरितार्थ चालविणाऱ्या जाड ओठांच्या काळ्याकभिन्न लोकांचा प्रदेश, जारण-मारण, वशीकरण आणि काळी जादू करणाऱ्या लोकांचा प्रदेश. नजर पोचेतो वाळूचे पर्वतप्राय ढीग पसरलेला रखरखीत वैराण प्रदेश. त्या प्रदेशात फिरताना तर उंटांचा कारवान घेऊन जाणाऱ्या धिप्पाड लुटारुंनी त्या दोघांना पकडून साखळदंडाने जखडून टाकले. त्यांच्या तांड्यात जखडबंद केलेले कितीतरी पुरुष आणि स्त्रियाही होत्या. ती बहुधा गुलामांची विक्री करणारी टोळी असावी. सप्ताहभर ते बंदी म्हणून राहिले. मार्गात एका नगराजवळ कारवान थांबला. कैद केलेल्या जथ्यातल्या काही स्त्रियांना घेऊन टोळीतले लुटारु नगरात गेले. फक्त चार पहारेकरी पहारा देत थांबलेले. हठयोग्याने ती संधी साधून योगसामर्थ्याने साखळदंड तोडून सुटका करुन घेतली.



मदिरेच्या नशेत बहोश झालेल्या चारही रक्षकांचा शिरच्छेद करुन

हठयोग्याने सगळ्या बंदींना मुक्त केले. त्यानंतर दोघांची पुन्हा भ्रमंती सुरु झाली. हठयोग्या बरोबरच्या भटकंतीत बैराग्याने रमल विद्या शिकून घेतली.आता बैरागी तारुण्याने मुसमुसलेला होता. बंदीवान काळात त्याचा स्त्रियांशी संपर्क आला आणि देहभोगाची अनिवार लालसा उचंबळून येऊ लागली. हठयोग्याचा मार्ग आणि आपला मार्ग भिन्न आहे हे ओळखून बैराग्याने त्याची संगत सोडली. दिशाहीन भ्रमंतीत बैरागी अखेर या गावंढ्या गावात स्थिर झाला. ''मी काही जीवनाचा तिटकारा आल्यामुळे या मार्गाला वळलेलो नाही. सर्वसामान्या प्रमाणे घर प्रपंचाची अतीव ओढ माझ्या मनात आहे. माझे नाव गाव सगळे पुसले आहे अन् हे भणंगासारखे बेवारशी जिणे माझ्या नशिबी आले आहे.'' बैरागी उद्विग्नतेने सांगायचा

त्याच्याकडे असलेल्या अद्भूत विद्या, लोकांना आणि खुद्द पुर्षाला त्याच्याविषयी असलेला आदर या पार्श्वभूमीवर संसारसुखासाठी आसुसलेल्या बैराग्याची त्याला कीव यायची. असला अद्भुताचा साठा आपल्याकडे असता तर आपण त्रिखंडावर राज्य केले असते असे तो म्हणायचा. पुर्षाच्या अपरिपक्व, अनुभवशून्य वाक्ताडनावर हसत बैरागी म्हणे, ''आईच्या का असेना मायेचे पांघरुण तुझ्या भाग्यात आहे. आता तर तुझ्या चरितार्थाचीही सोय झालीय्. पण मी मात्र एवढे सामर्थ्य असूनही भणंगच राहणार. माझ्याकडच्या विद्या, अद्भुत सिद्धी माझ्या स्वतःच्या उपयोगाच्या नाहीत. त्यांचा फायदा असलाच तर तो इतरांना आहे.माझे स्वतःचे भविष्य बघायचा प्रयत्न केला तर आरशात फक्त काजळाने माखलेला अवकाश दिसतो; माझे प्रतिबिंब सुद्धा दिसत नाही. माझ्या दोन्ही गुरुंनी मला सिद्धी दिल्या त्या ही अट घालून...मोबदल्याची पृच्छा सुद्धा मी करावयाची नाही असे बंधन आहे. मी सांगितलेले रमल तुझ्या प्रत्यंतराला आले. पण मी? इतक्या लोकांच्या अडचणी निवारण करुनही मला केवळ एकदा पोटभर जेवता येईल इतकीच तुटपुंजी प्राप्ती आहे माझी. म्हणून रोज रात्री मी जेवतो, दिवसभर उपाशीच बसून असतो की मी...''

बैराग्या कडची गूढ विद्या मात्र मती गुंग करणारी होती. मी मी

म्हणाणाऱ्या लोकांनी त्याला अजमावयाचा प्रयत्न केला पण त्यांचाही संदेह दूर झाला. त्याची ख्याती इतकी दूरवर पसरली की, लांबून माणसे यायची. अलिकडे तर माणसांची वर्दळ फारच वाढली. आपली पाळी येईतो माणसांना विरड विरड तिष्ठत बसावे लागायचे. गर्दी वाढली तसा रोख ठोक व्यवहारही सुरु झाला. एखादा सावकार गडी कडोसरीचा राणी छाप चांदीचा रुपया सरसावीत पुढे जायचा. ऐऱ्या गैऱ्यांना बाजूला सारुन तो बैराग्यापुढे मस्तक टेकवून चांदीचा रुपया खण्णकन् पाटावर ठेवायचा. मग त्याचे काम आधी व्हायचे. दूरवरुन येणारी माणसे वेळ मोडू नये म्हणून सर्रास या प्रकारचा अवलंब करु लागली अन् बैराग्याला चांगली प्राप्ती व्हायला लागली. आता धर्मशाळे ऐवजी तो सरदार बागव्यांच्या घरामागे बखळीत रहायला लागला.

कुठे मयत झाले, पाऊस -वादळ येणार, असली भाकितेही बैरागी अचूक सांगायचा. त्याचे प्रत्यंतर पुर्षाने कैकवेळा घेतलेले. एकदा तर मंदिरा समोरच्या उंच कदंब वृक्षावर एक समुद्र गरूड येर्वींन झेपावत येऊन बसला अन् त्याचे चित्कार सुरु झाले. त्याचे आवाज ऐकून बैराग्याने आरशात रमल बघितले अन् पुर्षाला म्हटले,“जा....सांग जा तुझ्या मालकाला..... गढीच्या दक्षिणेकडे समुद्रात माल भरुन येणारे एक अगदी तारु बुडायच्या बेतात आहे. वेळेवर पोचलात तर तारवा वरची माणसे तरी वाचतील. तारु वाचविणे कठीण आहे......” पुर्षा तत्क्षणी धाव मारीत गेला. बैराग्याचे सांगणे ऐकल्यावर कसलीही शंका न बाळगता शांताभाऊ बंदरात आले अन् चार मचवे मदती साठी रवाना केले. मचवे गढीला वळसा घालून सुसाट वेगाने दक्षिणेकडे निघाले. ते घटना स्थळी पोहचेपर्यंत जहाज निम्मे बुडत आले होते. जहाजावरुन उड्या टाकून पोहत किनाऱ्यावर यायचा प्रयत्न करणारी माणसे... ती मात्र वाचली. तिघे बेपत्ता झाले पण एकोणीस लोकांचे प्राण वाचले. बैराग्याने सांगितलेले रमल अचूक होते. मदूराईहून सामान भरुन गोडशांच्या पेढीवर पोचवायला निघालेले ते जहाज होते.

शांताभाऊंनी बैराग्याच्या पायावर डोके ठेवले. रोज दोन वेळचा

शिधा गोडशांच्या पेढीवरुन बैराग्याला पोच होऊ लागला. आता तो मारुतीच्या देवळात बसायचा बंद झाला.झुळझुळीत धोतर नेसून तो बखळीतच बसायचा.जानू बागवे कायम त्याच्या जवळ बसून रहायचा. बागवे फक्त नावाचेच सरदार राहिलेले... त्याच्या बापजाद्यांनी चंगी भंगीपणात संपत्तीची माती केली. जानुच्या बापसाने तर घरातली भांडी - कुंडी सुद्धा विकली. अन्नान्न दशा असली तरी सरदारकीचा पीळ मात्र कायम होता. स्वतःला क्षत्रिय खानदानी म्हणवणारे बागवे! वाड्याचा अर्धा भाग कोसळलेला... इनामतीची मळ्यातली सुपीक जमीन पण ती खंडाने दिलेली... कशीतरी दोन वेळेला चूल पेटायची इतकेच.बैराग्याला नारळ- तांदूळ भरपूर मिळायला लागलेले. तो जानूच्या मार्फत असल्या वस्तू आडगिऱ्हाईकी विकून पैसा करायला लागला. जानूचाही हात ओला व्हायला लागला.

एक दिवस संध्याकाळचा जानू शांताभाऊंना भेटला. त्याला पाचशे रुपयांची नड होती. त्याच्यासारख्याला एवढे रुपये कसेद्यायचे? चाळीस एकराच्या मळ्याची प्रॉमिसरी नोट लिहून देऊन जानूने रुपये उचलले. दोन दिवसांनी त्याच्या वाड्याच्या पडलेल्या भागाची साफ सफाई सुरु झाली. कोसळलेल्या भिंतीच्या दगड मातीचे ढीग उपसायला सुरुवात झाली. बिऱ्हाड गोठ्यात हलवून वाड्याचा शाबूत असलेला भागही पाडायचे काम सुरु झाले. आठवडाभरात भिंती पाडून पुऱ्या झाल्या. लोक आश्चर्य करायला लागले. कालपर्यंत उधाऱ्या उसनवाऱ्या करणाऱ्या जानू बागव्याने हे भलतेच काय आरंभले. चौकशी करणाऱ्याला वाडा नवीन बांधणार म्हणून जानू सांगे. बागव्याला विनाशकाले विपरीत बुद्धी आठवली असे लोक म्हणायला लागले. सोन्यासारखा मळा गहाण टाकून त्याने रक्कम उभी केलीन् ही वार्ता गुप्त राहिली नाही. आता बागव्या देशोधडीला लागणार अशा चर्चा सुरु झाल्या. अकस्मातपणे काम बंद झाले अन् जानूही कुठे गडप झाला.

काम बंद का झाले? जानू कुठे गेला? घरातले कोणीच माणूस काही गम लागू देईना. कोणाला काहीच तर्क करता येईना. पाऊण महिना उलटत आला. बागव्याचा विषय मागे पडला. अकस्मात मलबारी लाकूड सामान

भरलेला कोठ्या शिडे उतरुन बंदरात नांगरला गेला. करवतकाठी धोतर, बाराबंदी, डोईला ऐजबाज फेटा, पाच बोटात पाच अंगठ्या घालून वळणदार लाकडी मुठीची गुप्ती बसवलेली काठी हातात धरुन जानू बागवे झोकात बंदरावर उतरला. तो आला आणि बागव्यांकडे जशी दिवाळीच सुरु झाली. वाड्याचे काम सुरु झाले. बंदरावरुन ताजी फडफडीत मासळी बागव्याच्या वाड्यावर जायला लागली. शांताभाऊंचे रुपये सव्याज फेडून बागव्याने गहाणखताची प्रॉमिसरी नोटपरत घेतली. बैरागी बखळ सोडून बाहेर पडला. आपल्या दोन पेट्यांना भक्कम कुलूपे लावून त्याने त्या धर्मशाळेत हलवल्या.

कसे कोण जाणे पण बागव्याला वाड्याचा चौथरा खणताना अमाप गुप्तधन मिळाल्याची वार्ता षट्कर्णी झाली. त्याला बैराग्यानेच ते शोधून दिले याविषयी शंकाच नव्हती. बागव्याच्या भाग्योदयाचे इंगित कळल्यावर पुर्षाचा जीव मात्र चुरचुरला. त्यानेही मनाशी काही बेत पक्का केला. घरामागल्या मोकळ्या पडवीची भिंत बांधून घेतली आणि बैराग्याला तिथे राहण्याची त्याने गळ घातली. तोही लगेच तयार झाला. त्याने पुर्षाच्या पडवीत सामान हलविले. एक-दोन दिवसांनी मिळकतीतले थोडे तांदूळ, एक नारळ त्याने माईला दिला. त्याचे जानवे, देवदेवतार्जन आणि पुर्षाला त्याच्या भविष्याची आलेली प्रचिती... माईने त्या दिवसापासून त्याचे पान वाढून द्यायला सुरुवात केली. आता पुर्षाच्या घरी माणसांची वर्दळ वाढली. पुर्षा तर पेढीवरुन आला की, कायम बैराग्यासमोरच तळ ठोकून रहायचा. रात्र-रात्र त्यांच्या गोष्टी चालायच्या. गोष्टींच्या ओघातच एकदा बैराग्याने जानू बागव्याचे बिंग फोडले.

बैरागी जानूच्या घरामागे बखळीत रहायला लागला त्या नंतरची अवस... उजाडत्या अवसेला पहाटे दुसरा कोंबडा आरवला नी बखळी मागच्या फणसावरुन पिंगळ्याची भाक झाली. घुघुर्र ऽऽ घुम्म्ऽऽ घुघुर्र ऽऽ पिंगळ्याची भाक कानावर पडली अन् बैरागी ताडकन उठला नी दरवाजा जवळ उभा राहून वेध घ्यायला लागला. अर्ध्या घटकेतच त्याने दुसरी भाक दिली घुघुर्रऽऽऽ घुम्म....घुम्म् ऽऽ घुम्म्. त्याक्षणी बैरागी दार

उघडून बाहेर पडला. शांत वातावरणात दाराचा कर्रर ऽऽ कुर्रर ऽऽ आवाज झाला तसा पिंगळा पंख फडकावित फणसावरुन उडाला. संधी प्रकाशात बैराग्याने तो अचूक टेहेळला. आता तर शंकाच मिटली. एखाद्या ठिकाणी गुप्तधन असले तर त्या ठिकाणच्या दक्षिणेकडे बसून मार्गशीर्षातल्या अमावस्येला पिंगळा भाकणूक करतो. त्याची भाकणूक, त्याचे संकेत माणसाला अगम्य असतात तरीही आपण बसलेले ठिकाण कोणाला कळू नये ही सावधगिरी पिंगळा घेतो. म्हणूनच दाराचा आवाज ऐकून तो उडाला. नाहीतर त्याच ठिकाणाहून तो तिसऱ्यांचा भाक देतो.

उजाडल्यानंतर बैराग्याने नेमक्या खाणाखुणा शोधल्या. बखळी समोरच्या वाड्याच्या कोसळलेल्या पडवीच्या भिंतीच्या मुळाशी शिवलिंगाच्या शाळुंखेसारख्या आकाराचे मुख असलेले जिवंत वारुळ दिसले.वारुळापासून पूर्व आणि ईशान्य यांच्यामध्ये अकरा हात अंतरावर गुप्तधन मिळणार हे त्याने ओळखले.रमल बघितल्यावर ते धन जानूच्या पूर्वजाने ठेवलेले असल्याचेही समजले. त्याची प्राप्ती जानूला होण्यात काही अडचण नव्हती. गुप्तधनाची राखण करणारा भुजंग त्रयस्थ व्यक्तीला त्या धनाला हात लावू देत नाही. जानूच्या बाबतीत राखणदाराचा प्रश्न उद्‌भवणार नव्हता. पूर्ण शहानिशा झाल्यावर त्याने जानूला घोळात घ्यायची सुरुवात केली. जानूचे भाग्य फळफळणार त्याचबरोबर आपला हेतू साध्य करण्याची आशा त्याच्या मनात मूळ धरु लागली.

अलीकडे मंत्र-तंत्र रमल हे मार्ग सोडून लग्नकार्य करुन संसार थाटावा असे त्याला वाटायचे. हे भणंगाचे जिणे त्याला जड झालेले. पण संसार थाटायचा म्हणजे घरदार बांधायला हवे. कायम चरितार्थ चालेल एवढी पुंजी जमवायला हवी. धनप्राप्तीचे अनंत मार्ग त्याला माहिती होते पण त्याला स्वतःसाठी ते वापरता येण्याजोगे नव्हते. तसे मुळी त्याच्या गुरुंनीच बंधन घातलेले... पण स्वेच्छेने कुणी दिले तर मात्र स्विकारण्याची मुभा होती. अर्थात थेट तशी पृच्छा सौदेबाजी सुद्धा त्याला करुन चालणार नव्हते. म्हणून बैरागी मोठ्या अडचणीत सापडला. खूप विचार करुन तो जानूला

खेळवायला लागला. गुप्तधन मिळणार म्हणताना जानू हरखला... अन्नान्न दशा असलेला जानू ... ''धनाचा ठिकाणा सांगा. तो शोधण्यासाठी वाटेल तेवढा खर्च आपण करु'' असे तो म्हणायचा... बैराग्यापुढे लोटांगणे घालायचा पण धन मिळाले तर अमूक देईन असे त्याच्या तोंडून येईना त्यामुळे बैराग्याची सुद्धा पंचाईत झाली.

पाच-सहा दिवस या घोळाष्टकात गेले अन् अचानक जानूला कशी काय उपरती झाली कोण जाणे! बैराग्याचे पाय धरुन तो म्हणाला, ''मला जे काय मिळेल त्यातील निम्मी वाटणी मी तुमच्या पायावर अर्पण करीन. आता माझा अंत बघू नका. माझ्या वाडवडिलांची आण घेऊन मी वचन देतो... मी दिला शब्द खरा करीन.'' हे ऐकल्यावर बैराग्याचे समाधान झाले. धनाचा ठावठिकाणा शोधण्यासाठी त्याने चार दिवसांची मुदत घेतली. हुरळलेल्या जानूला पुरते लोंबवल्यावर त्याने गुह्य उघड केले. धन किती आहे, त्याचे नेमके ठिकाण... हा तलास लावण्यासाठी आपल्याला किती त्रास झाला सगळे रंगवून रंगवून सांगितले. सारे ऐकून घेतल्यावर जानूने पुन्हा एकदा गळ्याची चामडी चिमटीत धरुन प्राप्तीतला निम्मा वाटा देण्याचे वचन दिले. बैरागी निर्धास्त झाला. गुप्त धनाची नेमकी जागा, ते कसे हस्तगत करायचे ह्याचा बेत दोघांनी ठरवला. जानू तयारीला लागला. चौथरा मोकळा करुन झाल्यावर बैराग्याने सांगितल्या जागी खणती घेतली. बैराग्याची वाचा खरी झाली. अमाप संपत्ती ताब्यात मिळाल्यावर मात्र जानूची नियती फिरली. परागंदा झालेला जानू अवतीर्ण झाल्यावर सगळ्या माणसांना घेऊन तो बैराग्याच्या पाया पडला. ''तुमच्या आशीर्वादाने माझे भाग्य उजळले असे म्हणून अर्ध्यातोळ्याचे सोन्याचे वळे त्याने बैराग्याच्या पायाशी ठेवले.

''पुरुषोत्तमा... लक्ष्मीचा मोह हा असा आहे. तिच्या दर्शनाने मी - मी म्हणणाऱ्यांचीही नियत बदलायला वेळ लागत नाही.'' बैराग्याने दीर्घ उसासा सोडला. सत्याचे विदारक दर्शन बैराग्याला झाले होते. अर्थात चरफडण्या पलिकडे तो काही करु शकत नव्हता. त्याचे हात बांधलेले होते ना... त्याच्या अलौकिक सिद्धी जानूच्या हिकमती मतलबापुढे थिट्या पडल्या!

सगळे ऐकून पुर्षा अवाक् झाला. हा बैरागी म्हणजे धनप्राप्तीचे अमोघ भांडारच आहे की... शांताभाऊंकडे मगजमारी करीत पै-पैसा जोडीत राहण्यापेक्षा या बैराग्याला वश करुन जन्माची ददात मिटेल असे डबोले आपण मिळवायला हवे हा विचार त्याच्या मनात चमकून गेला. आता खाणे-जेवणे, काम-धंदा यात त्याचे चित्तच रमेना. त्याची हुन्नर क्षीण झाली. आपण मारे जिवाचा आटापिटा करुन सगळा तेगार सांभाळायचा पण लोण्याचा गोळा मात्र शांताभाऊ मटकावणार... रक्ताचे पाणी मी करणार नी पुंजी शांताभाऊंची वाढणार... हे नि असले विचार त्याचे काळीज जाळू लागले.

कितीही उदार झाला तरी शांताभाऊ म्हणजे पक्का व्यापारी! स्नेहसंबंधसुद्धा ताजव्यात टाकून तोलून मापून जोखणारी; कवडी कवडी जोडणारी महाचिक्कट अवलाद...बरीच मुदत तंगलेली, जवळ जवळ बुडित म्हणून तुळशीपत्र सोडलेली त्यांची किती येणी मी खेटे घाल घालून,अक्कल हुशारीने वसूल करुन आणली! पण शांताभाऊला काही असे म्हणवले नाही की, बाबा रे, तू होतास म्हणून हे येणे वसूल झाले.म्हणून त्यातले निम्मे... ते ही राहो पण अशा कामप्रीत्यर्थ चवली पावलीसुद्धा बक्षिसी म्हणून देणे ते कटाक्षाने टाळायचे. म्हातारी गेल्याचे दुःख नाही... काळ सोकावता कामा नये असे त्यांचे तत्त्व! हळू हळू माणसाच्या अपेक्षा वाढत जातात. मग त्याची बुद्धी फिरते. बक्षिसी हा जणू आपला हक्कच वाटतो चाकराला... अशा माणसाची नियत कधी कशी फिरेल याचा भरवसा देता येत नाही. म्हणून चकाच्या बाहेर तांबडा पैसा कधी कुणाच्या हाताला न लावणे बरे!!

त्यांची ही रोकडी व्यापारी नीती हळूहळू पुर्षाला उलगडायला लागली अन् त्याला मनस्वी घृणा वाटू लागली. देवीचे वर्षासन त्यांनी पुर्षाला दिले खरे पण त्याबरोबर नवरात्र उत्सवाचा खर्चही त्याच्या अंगावरच टाकलेला होता. वर्षासनाचे एक चतुर्थांश उत्पन्न त्या खर्चालाच लागायचे... म्हणजे खाते पोते बरोबर. अंग मेहनत सुटायची इतकेच. हे

विचार मूळ धरु लागले आणि पुर्षाची पहिली हुन्नर कणाकणाने कमी व्हायला लागली. त्याच्यातला हा बदल शांताभाऊंनी हेरला नसता तरच नवल! त्याचे हे औदासिन्य प्रौढपणाच्या उंबरठ्यावर पाय ठेवताना वयपरत्वे येणारे असावे... लग्नकार्य झाले की गाडे रांगेला लागेल असा विचार शांताभाऊंनी केला. त्यादृष्टीने स्नेहीसोबत्यांकडे त्यांची विचारणा सुरु झाली . पुर्षा मात्र अंतर्यामी पेटून उठला. आपली अलिप्तता लक्षात येऊनही शांताभाऊ दुर्लक्ष करतात त्याअर्थी त्यांच्या लेखी आपण कवडीमोल आहोत, असा ग्रह त्याने करुन घेतला.

बैराग्याच्या मागे पुर्षाने धोशाच लावला. त्याच्या कृपेने गुप्तधन मिळावे यासाठी काळीज गहाण टाकायचीही आपली तयारी आहे. प्राप्तीतला बारा आणे हिस्सा बैराग्याच्या पायाशी अर्पण करु असे तो काकुळतीलायेऊन सांगायचा.पण बैरागी मात्र गम लागू देईना. जानुच्या अनुभवावरुन त्याला चांगली अद्दल घडलेली. पुर्षाच्या बाबतीत तो दक्षता घेणार होता. तसा काही उपाय सुचेपर्यंत पुर्षाने कितीही आणाभाका घेतल्या तरी तो बधणार नव्हता. तसा एक जालीम उपाय त्याच्याकडे होतासुद्धा...! रक्ताचे वचन घेतले असते तर पुर्षा फिरुन पडायला धजावला नसता. पण तसे त्याला सुचवायचे म्हणजे मोबदल्याची अपेक्षा केल्यासारखे होणार अन् गुरुचे वचन मोडणार... म्हणजे त्याची विद्या फळाला येणार नाही! हा तिढा कसा सोडवायचा?यावर विचार करण्यात बैराग्याने कैक रात्री वाया घालवल्या. आपले चातुर्य-हुशारी पुरती पणाला लावली. पुर्षा आपण होऊन कचाट्यात सापडेल असा जमालगोटा पर्याय खूप विचाराअंती बैराग्याला सुचला.

नेहमीप्रमाणे रात्री जेवण झाल्यावर पुर्षा बैराग्याशी गोष्टी मारायला बसला. गुप्तधन मिळवून देण्यासाठी काही उपाय, तोडगा सुचविण्याची त्याने बैराग्याला विनंती केली. तसेच धन मिळाल्यावर प्राप्तीतला बारा आणे हिस्सा बैराग्याला द्यायची देवाच्या साक्षीने शपथ घ्यायची तयारी दर्शविली. सावरुन बसत बैरागी म्हणाला,''पुरुषोत्तमा मी तुला एक बोधकथा सांगणार

आहे. त्यातला शब्दन् शब्द लक्षपूर्वक ऐक; नीट विचार कर आणि काय तो बोध घे. तुझ्या एकाही शंकेचे उत्तर मी सांगणार नाही.तसेच इतःपर गुप्तधन प्राप्तीच्या संदर्भात तुझ्याशी शब्दानेही चर्चा करणार नाही. गोष्ट नीट ऐकलीस तर खरे मर्म तुझ्या ध्यानात येईल. त्याप्रमाणे वागलास तर तुझे दैन्य संपले म्हणून समज.'' अन् बैराग्याचे कथन सुरु झाले.

''एका गावात दोन मित्र रहात होते.शिक्षण बेताचे अन् परिस्थिती हलाखीची. चरितार्थासाठी दोघांनी मिळून काही व्यवसाय सुरु करावा असे त्यांनी ठरविले. पण कोणता व्यवसाय करायचा हे ठरेना. मग सल्ला घेण्यासाठी ते एका गोसाव्याकडे गेले. गोसाव्याने दोघांच्याही हस्तरेषा निरखून बघितल्या. थोडा वेळ विचार केल्यावर तो म्हणाला, ''तुमच्यापैकी एकाकडे भाग्य आहे अन् दुसऱ्याकडे बुध्दी आहे.कोणताही व्यवसाय यशस्वी होण्यासाठी हे दोनही गुण एकसमयावच्छेदे करुन असावे लागतात. तुम्ही एकमताने राहिलेत, एकदिलाने काम केलेत तर माती विकूनसुध्दा गडगंज इस्टेट मिळवाल. मात्र तुमचे यश हे दोघांच्याही गुणांचे संमिश्र फलित आहे याचा विसर पडू देऊ नका. दोघांपैकी कुणा एकाची बुध्दी फिरली तर मात्र तुम्ही खड्ड्यात जाल.'' असे होऊ नये यासाठी काही उपाय सुचविण्याची विनंती दोन्ही मित्रांनी गोसाव्याला केली. त्यावर गोसावी म्हणाला, ''आहे... तसा जालीम उपाय आहे. अमावस्येच्या रात्री स्मशानात जायचे. चिता रचण्याच्या स्थानाजवळ दक्षिणेला त्रिकोणाकृती काढायची. आपल्या तर्जनीला छेद देऊन रक्ताचे तीन थेंब त्या त्रिकोणाकृतीवर पाडून वचन द्यायचे. आपण जिवंत असेपर्यंत वचन भंग करणार नाही. वचन भंग झालाच तर आपल्या शरीरातील रक्ताच्या थेंबाथेंबावर वेताळाची सत्ता राहील.''

''तुम्ही दोघांनीही असे रक्ताचे वचन द्या अन् मगच भागीदारीत कोणताही व्यवसाय सुरु करा. लक्ष्मी तुमच्या पायाशी लोळण घेईल.''गोसाव्याचे बोलणे ऐकल्यावर बुध्दिवान मित्र म्हणाला,''गोसावीबाबा, तुम्ही सांगितलेत तसे वचन एकट्या भाग्यवान मित्राने दिले तरी पुरेसे आहे. कारण व्यवसायाचे यश भाग्यावरच अवलंबून असते.''त्यावर हसून गोसावी

म्हणाला,''तू इथेच बोललास ते बरे झाले. बिचाऱ्या भाग्यवंताची फसवणूक होणार नाही.खरेतर रक्ताचे वचन बुद्धिवंताने म्हणजे तूच द्यायला हवे. कारण भाग्य बुद्धीच्याबळावरच उघडते अन् भाग्य काही कधी फिरत नाही...फिरते ती बुद्धी... म्हणजे फसवणूक होण्याची शक्यता तुझ्याकडूनच आहे. तेव्हा तूच रक्ताचे वचन घे...तेवढे पुरेसेआहे.'' गोसाव्याने सांगितल्याप्रमाणे वचनबद्ध होऊन त्या मित्रांनी धंदा सुरु केला आणि अमाप संपत्ती मिळविली.

बैराग्याची गोष्ट ऐकल्यावर त्यातले मर्म पुर्षाला अचूक उमगले.जानूने मतलब साधल्यावर बैराग्याच्या हातावर वाटाण्याच्या अक्षता ठेवल्या...तसे आपल्या बाबतीतही होईल अशी शंका बैराग्याला वाटत आहे...अन् म्हणूनच द्रव्यप्राप्तीचा तोडगा तो आपल्याला सांगत नाही हे पुर्षाला पुरते उमगले. त्याच्या पायावर डोके ठेऊन पुर्षा म्हणाला,''तुमच्या कृपेने मला धन मिळाले तर त्यातला पाऊण हिस्सा मी तुम्हाला देईन असे रक्ताचे वचन द्यायला मी तयार आहे.येत्या अमावस्येलाच मी तसे वचन देईन.मला या दारिद्र्यातून बाहेर पडायचे आहे. आपला मतलब साधल्यावर जानूने तुम्हाला फसवले, तसे कृत्य माझ्याच्याने होणार नाही. माझी बुद्धी अशी नतद्रष्ट नाही. स्वार्थासाठी मी उपकारकर्त्या विरुद्ध फिरुन पडायचो नाही. मी रक्ताचे वचन दिल्यावर तरी तुमची खात्री पटेल ना?'' बैरागी शांतपणे म्हणाला, '' ते बघू अमावस्येच्या दिवशी...''

अमावस्या उजाडली. संध्याकाळी लोकांची वर्दळ कमी झाल्यावर पुर्षा बैराग्यासोबत स्मशानात गेला. सरणाच्या जागेपाशी दक्षिणेला त्रिकोणाकृती काढून पुर्षाने तर्जनीचा छेद घेऊन रक्ताचे तीन थेंब त्रिकोणात गळवले. त्याचक्षणी घुबडांचा भीषण घुघुत्कार ऐकू आला.पिशाच्च शक्ती जागृत झाल्याची ती खूण बैराग्याने ओळखली. पुर्षा काय वचन घेतो हे ऐकण्यासाठी त्याचे प्राण कानांत एकटवले.घुबडांचे आवाज ऐकल्यावर पुर्षा चरकला.मनावर ताबा ठेऊन त्याने वचन उच्चारायला सुरुवात केली. ''मला गुप्तधन प्राप्तीचा मार्ग जो कुणी सांगेल त्या माझ्या उपकारकर्त्याला

मिळालेल्या धनातला...'' मोक्याच्या क्षणी पुर्षा किंचितकाळ थांबला. ऐनवेळी त्याच्या बुध्दीने पलटी खाल्ली. कल्पनेतसुध्दा पाऊण हिस्सा सोडायचे जीवावर येऊन तो म्हणाला, ''मिळालेल्या धनातला निम्मे हिस्सा मी स्वेच्छेने देईन. हे माझे रक्ताचे वचन आहे. माझ्याकडून वचन भंग झाला तर माझ्या शरीरातल्या रक्ताच्या थेंबाथेंबावर वेताळाची सत्ता राहील.''

पुर्षाने ऐन वेळी पाऊण हिश्श्याऐवजी अर्धा हे शब्द उच्चारतात बैराग्याने आपला अधरोष्ट एवढ्या जोरात चावला की त्याचे पुढचे दोन दात ओठात घुसून रक्त फुटले. ''आपण एवढी खबरदारी घेतली म्हणून ठीक अन्यथा हा पुर्षा सुध्दा जानूसारखा उलटला असता. ठीक आहे... अर्धा तर अर्धा हिस्सा.'' बैरागी निश्चिंत झाला. दोघेही काही न बोलता परतीच्या वाटेला लागले. बऱ्याच वेळाने पुर्षा म्हणाला, ''घुबडांचे आवाज ऐकून मी एवढा चरकलो की मला कायच सुधरेना... अनवधानाने पाऊण ऐवजी निम्मे हिस्सा असे शब्द माझ्या तोंडून गेले.'' बैराग्याने पुर्षाच्या नजरेला नजर भिडवताच पुर्षा थबकून खाली बघायला लागला. ''काही हरकत नाही.'' बैरागी बोलला. ''जे माझ्या प्राक्तनात आहे तेवढेच पुरे म्हणायचे. तू रक्ताचे वचन दिले आहेस, एवढे मात्र पक्के ध्यानात ठेव आणि तेवढे निभावून ने म्हणजे झाले... त्यात काही बदल झाला तर किती भीषण परिणाम होतील याची तुला कल्पनासुध्दा करता येणार नाही...''

त्याच रात्री धन मिळवायचा उपाय बैराग्याने पुर्षाला कथन केला.मार्गशीर्ष अमावस्येच्या दिवशी, उजाडल्या प्रहरी पिंगळा भाक देतो. तो भाक देईल त्याच्या दक्षिणेकडे शोध घ्यायचा. मुंग्याचे जिवंत वारुळ असलेल्या ठिकाणी खणायचे. खणती सुरु झाल्यावर त्या धनाचा राखणदार सर्प येईल. त्याला मंत्राने बंधन घालायचे. अन् मग धन ताब्यात घ्यायचे. या कामात बैरागी काही मदत करायला समर्थ नव्हता. सर्प बंधनाचा मंत्र पुर्षानेच शिकायला हवा होता अन् धन मिळेपर्यंत पाळणूक करुन तो टिकवायला हवा होता. तसेच पिंगळ्याची भाक नेमकी कुठे होईल त्याचेही ज्ञान रमल बघून होणार नव्हते. त्यासाठी अमावास्येपूर्वी तीन -चार दिवस

पिंगळ्याची बसल शोधून काढायला हवी होती. तो ढोलीतून बाहेर पडून कोणत्या दिशेला उडत गेला, कुठे बसून त्याने भाक दिली हे नेमके माहिती करुन घ्यायचे म्हणजे सोपे नव्हते.

''गुप्त धन मिळवायचे मार्ग असे दुस्तर आहेत. अर्थात मी या क्षेत्रातला पूर्ण ज्ञानी असल्यामुळे तुला कष्ट करुन का होईना... यशाची खात्री आहे. मार्गशीर्ष अमावास्येला अद्याप दहा महिने अवधी आहे. तोपर्यंत काही प्रभावी उपाय मी शोधून काढीन.'' बैरागी पुर्षाला धीर देत म्हणाला. पुर्षा निर्धास्त झाला. दोन महिन्यानंतर आलेल्या ग्रहणाच्या दिवशी बैराग्याने पुर्षाला सर्पबंधन मंत्र शिकविला. पुर्षाने मंत्र सिध्द केला. मंत्राची पाळणूक तो कसोशीने करु लागला. जेवणाच्या वेळी काही निर्बंध पाळणे फार गरजेचे होते. म्हणून मंत्र घेतल्याची गोष्ट त्याच्या आईच्या कानावर घालावी लागली. माई डाफरत म्हणाली, ''आपल्याला काय करायचे आहेत मंत्र नी फंत्र... आपले काम बरे आपण बरे... असल्या नष्टचर्याच्या मागे शहाण्या माणसाने लागू नये. झाले हे ठीक पण यापुढे आणखी कसल्या अघोचरी गोष्टींच्या मागे लागू नकोस.''

मार्गशीर्ष अमावस्या आठ दिवसांवर आली. बैराग्याने पिंगळ्याची बसल शोधून काढली होती. गढीजवळ सोनारांच्या घरामागे हाकेच्या अंतरावर गच्च राई होती.त्या राईत एका जुनाट आंब्याच्या झाडावर फांदीत खूप ढोली होत्या.त्यातल्या एका ढोलीत पिंगळा शिरताना बैराग्याने बघितला. पुर्षाला त्याने ती ढोल दाखविली. अमावस्येच्या आदल्या रात्री झाडावर चढून पिंगळ्याला ढोलीत बसलेला असताना पकडायचे.त्याला वाटाण्याएवढी अफूची गोळी घालायची अन् अफू चढल्यावर पुन्हा ढोलीत टाकून यायचे.उजाडताना पिंगळ्याला जाग येईल. अफूचा अंमल चढल्यामुळे माणसाचा पायरव त्याला कळणार नाही.त्यामुळे त्याच्या पाठलगावर जाणे सोईचे ठरेल.आपल्या मागावर माणसे आहेत हे कळले तर कदाचित पिंगळ्याने भाकच घातली नसती म्हणून बैराग्याने हा खबरदारीचा उपाय पुर्षाला सांगितला.

अवसेच्या आदल्या रात्री पुर्षा नी बैरागी पिंगळ्याच्या ढोलीपासून जवळच दबा धरुन बसले. सूर्यास्ताच्या वेळी फडफड आवाज करीत पिंगळा ढोली जवळ उतरला.थोडा वेळ गेल्यावर पुर्षा पुढे झाला.कसब पणाला लावून तो आंब्यावर चढला आणि पिंगळ्याची ढोल गाठून चौपदरी फडका गुंडाळून ढोलीत हात घातला.पिंगळ्याला ढोलीबाहेर काढून अफूची गोळी त्याच्या चोचीत घालून चोच मिटून धरली. थोड्याच वेळात अफूचा अंमल चढून पिंगळ्याची फडफड बंद झाल्यावर त्याला ढोलीत टाकून पुर्षा खाली उतरला. दोघेही घरी आले. रात्री कोणालाच झोप लागली नाही. पहिला कोंबडा आरवला त्यासरशी पुर्षा नी बैरागी दोघेही सोनाराच्या घराच्या दिशेने निघाले. राईत शिरुन आंब्यापासून जवळच्याच झाडाखाली दोघेही दबा धरुन बसले. दुसरा कोंबडा झाला अन् थोड्याच वेळात फडफडाट करीत पिंगळा ढोलीबाहेर आला. पंख झटकीत मान वेळावून चहू दिशांनी वेध घेतल्यावर पिंगळ्याने झेप घेतली. अफूच्या अंमलामुळे त्याला सफाईदार झेपावणे जमत नव्हते. कासराभर अंतर गेल्यावर विसाव्या साठी टेकत टेकत गढीतल्या हत्ती टाक्याजवळ चाफ्याच्या झाडावर बसून त्याने पहिली भाक दिली. त्याच्या मागावर गेलेला पुर्षा जागच्या जागी थबकला. त्याला हाताला धरुन खाली बसण्याची खूण बैराग्याने केली. बैरागी चाफ्यावर बसून भाक देणाऱ्या पिंगळ्याकडे एकटक बघत राहिला.

थोड्या वेळाने पंख फडफडावित पिंगळा उडाला. चाफ्याच्या झाडा भोवती रिंगण मारुन पुन्हा मूळ जागी बसल्यावर त्याने दुसरी भाक दिली. पुर्षाचा खांदा दाबीत बैरागी म्हणाला, ‘‘काम फत्ते झाले. चाफ्याच्या दक्षिणेला पंचवीस वाव अंतरावर जिवंत मुंग्यांचे वारुळ असेल त्या ठिकाणी गुप्त धन असणार.’’ बैराग्याचे बोलणे संपत असता तिसरी भाक देऊन पिंगळा उडाला आणि गोल गोल रिंगण घालीत चाफ्यापासून काही अंतरावर जमिनीवर उतरला. बैरागी नी पुर्षा त्या दिशेने निघाले. चाफ्याच्या डाव्या अंगाला पंख फडकवीत जमिनीवर लोळणाऱ्या पिंगळ्याच्या दिशेने ते जात असताना क्षीण आवाजात भाक देऊन पिंगळा चोच वासून नि चेष्ट

झाला. पुर्षाने धावतच पुढे जात पंख धरुन पाखरु वर उचलले... जमिनीवर मुंग्यांचे जिवंत वारुळ त्याला दिसले. पुर्षाच्या मागून आलेला बैरागी घोगऱ्या आवाजात म्हणाला,''पुरुषोत्तमा.. तुझ्यासारखा भाग्यवान तूच. बहात्तर शांताभाऊ कनवटीला लावता येतील एवढा अमाप द्रव्याचा साठा या क्षणी तुझ्या पायाशी आहे. या मसलतील बापड्या पाखराला मात्र जीव गमवावा लागला. अफूच्या नशेत संकेत भंग केल्याचे प्रायश्चित्त त्याला भोगावे लागले.''

दोघे घरी पोहोचले तेव्हा माई त्यांची वाटच बघित होती. पुर्षा मान खाली घालून आत गेला. अमावस्येला पेढी बंद असायची. पुर्षाला कडकडून भूक लागलेली.''माईऽ मी अंग धुवून देवीची पूजा करुन येतो तोवर चांगला चुपचुपीत शिरा कर गोडाचा.'' देवीची पूजा करुन आल्यावर सोवळ्याचा पिळा मांडवीवर टाकून धोतर पालटीपर्यंत गरम शिऱ्याची ताटली माईने त्याच्या पुढ्यात ठेवली. शिरा खाऊन झाल्यावर खळखळून चूळ भरुन हात टिपीत खुंटीवरचा सदरा-टोपी घेत पुर्षा म्हणाला, ''माई मी जरा बंदरावर फिरुन येतो.'' सदरा घालून तो जायला वळणार एवढ्यात लगालगा बाहेर येत माई म्हणाली, ''थांब! जरा टेक इथेच. मला काही विचारायचे आहे. तुझे त्या बैराग्याच्या नादी लागून कसले उपद्व्याप चालले आहेत ते स्पष्ट सांग. तुमचे बोलणे काय चालते ते मी आईकलेले आहे... माझ्याशी लपवालपवी, छक्केपंजे करशील तर याद राख, माझ्या रक्ताची शप्पथ आहे तुला...''

पुर्षा वरमला. त्याचा बेत पार पडला होता. कधीतरी तिला कळणारच होते असा विचार करुन अति पाल्हाळ न लावता त्याने मुद्द्याची गोष्ट, गुप्त तपशील तेवढा वगळून सांगून टाकली. त्यावर सुस्कारा सोडून माई म्हणाली, ''तू आता जाणता बापया झालास.... काय करावे, करु नये तुला सांगणे सुद्धा चुकीचे. सांगितलेच तरी तू कितपत जुमानशील,ते श्रीहरी जाणे....ऱ्हाववत नाही म्हणून बोलायचे एवढेच.मी अशी आडव्या सुडक्याची बाई माणूस. तू पोटात असतानाच बापूस मेला तुझा! बाळंत झाल्यावर महिन्याच्या आतच चार भांडी नी दोन मण भात

ठेऊन मला वेगळी टाकलेनी...घरात पिडा नको माझी म्हणून परोस हे दोन खण मला दिलेनी.चार घरचे कामधंदे करुन तुला एवढा मोठा केला... माझे तरुण वय. पैसाच मिळवायचा असता तर छिनालपणा करुन मिळवला असता की बक्कळ.गाव आहे तिथे सोद्यांचा काय तुटवडा...?''

''पण मला अब्रू मोलाची वाटली.पोटालाचिमटा घेऊन उपास काढले मी ....पण कुण्णा कुण्णाचे आभार नाही घेतले. स्वाभिमान शून्य जिणे ... जळो जिणे लाजिरवाणे हे ब्रीद जपले मी ... कुणाचे फुकट खायचे म्हणजे त्याच्या नर्कात लोळण्यासारखे हिडीस वाटते मला. तू तर असला निच्चड ! धड शाळा पुरी केली नाहीस की त्या बाळंभटा कडून वेद विद्याही नाही घेता आली तुला... पण माझी काळजी देवाला... गोडश्यांकडे जल्माचा शेर तुला मिळवून दिलान् त्या ईश्वराने... गोडशीण तर भाऊ मानत्ये तुला... तुझे काम, तुझी हुन्नर बघून वर्षभरात दहाचा पंधरा रुपये पगार केलेनी शांताभाऊंनी... देवीचा उत्सव खरेतर वर्षासनातून करायचा अशी बोली होती. पण कसलीही वाच्यता न करता उत्सवाला पुरेल इतका शिधा-जिन्नस गोडशीण देत्ये. तुला म्हायती नसेल, पण शाळेतल्या मास्तराला फंड कापून महिन्याला अकरा रुपये सहा आणे पगार मिळतो. तुझी सगळी मिळकत साठवून ठेवली ती काल मोजली मी... साडेपाचशेत तीन रुपये कमी भरले.''

''गावात एवढे तालेवार आहेत. चार जणांकडे जा नी प्रचिती बघ हवी तर... चार-पाच घरे सोडली तर एक तरी हरीचा लाल पन्नास रुपये तरी रोख मोजून दाखवतो का बघ जरा! पैसा म्हणजे सर्वस्व नव्हे. किती मिळाले म्हणजे माणूस समाधानी होईल? याला उत्तर नाही. कष्ट करुन मिळते तेच खाऊन सरेना तुला. असे असताना कोणाच्या हपापाचे गुप्तधन मिळवून श्रीमंत व्हायचे नष्टचर्य तुला सुचावे हा म्हणजे कहरच आहे कहर! फुकटच्या पैशाला यश नसते आणि संपत्तीच्या जोरावर सुख मिळत नसते. फुकटची संपत्ती मिळाल्यावर तो जानु बागवा दिवसभर दारवेच्या नशेत तर्रर होऊन नायकिणी नाचवतो, हे... हेच सुख असे वाटत असेल तुला, तर खुशाल जा वाटेल त्या मार्गाला. जलमण्या आधीच माझा पोर उलथला म्हणेन मी... ही

काय तुझ्या बापजाद्याची इस्टेट नव्हे की तुझे भाग्य तुझ्या खाटल्यावर सोन्याच्या मोहरा हगले असेही नव्हे. अवचिन्ह मार्गाने जाऊन मिळविलेली नष्ट संपत्ती... ती काही लक्ष्मी नव्हे... पिशागत आहे... ती खा नी निस्तर मग हयात भर...''

''तुझ्या पापात मी वाटेकरी व्हायची नाही. हलकट मार्गाने मिळवलेली संपत्ती तू घरात आणशील त्या दिवसापासून मी पुन्हा बाईपण करुन कष्टाच्या कमाईवर मिळेल ते खाईन.इतःपर तुझा मार्ग तुला मोकळा आहे. कपाळ पुसकी असले तरी मी सुद्धा पतिव्रता आहे. कोणाचे वाईट चिंतिले नाही की पापाचरण केले नाही. तू माझ्या उदरात माझ्या रक्तावर पोसलास...पिशागती मार्गाला जायचे हा तुझा पिंड नाही की पापाचे अन्न आजवर तुझ्या पोटात गेलेले नाही. त्या परमेश्वराला लाज असली तर तोच वाचवील तुला! मोहाला बळी पडून बुद्धी फिरलीय तुझी...तुझे विचार बदलले आहेत...तू ताळ्यावर यावास हीच इच्छा करीन मी. तरुण वयामुळे तुझे चित्त थाऱ्यावर नाही, कामधंद्यात तुझे लक्ष नाही असे शांताभाऊंनाही वाटले. म्हणून तुझ्या लग्नाच्या खटपटीत आहेत ते... पण तुझे नशीब बदलणे त्यांच्याहाती थोडेच आहे? जा... झाले माझे बोलून...!''डोळ्यातून टिपूसही न काढता माई आत गेली.

चार दिवस उलटले. काळवे पडायच्या वेळी बैरागी नी पुर्षा वारुळाजवळ खणून बघायला गेले. सगळीकडे सामसूम झालेले. आसमंतात चिटपाखरु सुद्धा नव्हते. धोतर वर खोचून कुदळ उचलित पुर्षा सज्ज झाला. दोन घावातच त्याने वारुळ खणून काढले... अकस्मात काय झाले कोण जाणे! बाळंभटाच्या ओसरीवर बसून घोकलेली त्रिसुपर्णातील ऋचा 'तस्यात ते हरयः सप्ततीरे स्वधां दुहानाऽ अमृतस्य धाराम्' पुर्षाच्या कानात घुमायला लागली. शांत सोज्वळ शांताभाऊ, गोडशीण... आणि तुझी बुद्धी फिरलीय म्हणून तोंड फिरवून जाणारी माई त्याला समोर दिसायला लागली. चोच वासून मेलेल्या पिंगळ्याची सडकी दुर्गंधी वाऱ्याच्या झोताबरोबर आली अन् पुर्षाच्या पोटात ढवळून आले. कुदळ टाकून पुर्षा म्हणाला, ''मला नको ही

संपत्ती... माझा हिस्सा खुशीने सोडून वचनातून मोकळा होतो आहे मी ...!''



पुर्षा असे काही करील हे बैराग्याला अपेक्षितच नव्हते. हां कदाचित सोन्याच्या मोहोरानी शिगोशीग भरलेले हंडे बघितले की कबूल केलेली अर्धी वाटणीसुद्धा द्यायचे तो नाकारील असे बैराग्याला वाटले होते... पण हे अघटितच झाले. त्याचा मार्ग आता निर्वेध झाला. अधीर झालेला बैरागी पुढे सरसावला. कुदळ उचलून त्याने भसाभसा टेव घ्यायला सुरुवात केली. दोन हात औरस खणती झाल्यावर तिथली माती बाजूलाओढून त्याने जरा दम खाल्ला. मग पुन्हा कुदळ उचलून दोन घाव मारले तोच घळई

पडल्याप्रमाणे भाग आत आरला जात मोकळे बीळ दिसू लागले. फुस्स्ऽऽ फुस्स् असे फुत्कार ऐकू येताच बैरागी मागे सरकला. बिळातून काळा कुळकुळीत भुजंग बाहेर येऊन फणा पसरीत डोलू लागला. ''तू येणार हे माहित होते मला...'' बैरागी हसत म्हणाला आणि त्याला बंधन घालण्यासाठी मंत्र आठवू लागला... ''ऱ्ही क्लीं...'' पण त्यापुढे एक अक्षरही बैराग्याला आठवेना... डोक्याला ताण देऊन त्याने शिकस्त केली पण सर्पबंध मंत्र आठवेल तर हराम! आता मात्र सगळा परिसर गोल गोल फिरु लागल्याचा भास बैराग्याला झाला. फणा उभारलेल्या भुजंगाने ''हिस्सऽऽ हिस्स'' असे काळजाचा थरकाप उडविणारे फुत्कार टाकले. त्यासरशी कुदळ उगारुन चार पावले मागे येत बैराग्याने तोंड फिरवले अन् हताश होऊन तो परतीच्या मार्गाला लागला.

# १०. स्वयं भगवान उवाच

तीक्ष्ण नजरेने सावज हेरीत, सावध पावले टाकीत व्याध फिरत होता.बाणाच्या पल्ल्याबाहेर एका प्रचंड वृक्षाच्या बुंध्याआडून मश्गाचे मुख दिसताच व्याध थांबला.थोडा वेळ वाट पाहूनही मृग पुढे येण्याचे चिन्ह दिसेना.व्याध दबकत-दबकत मृगाच्या दिशेने पुढे निघाला.लक्ष्य बाणाच्या टप्प्यात येताच तो थांबला. मनमुराद चरुन तृप्त झालेला तो मृग वृक्षतळी बसून रवंथ करीत असावा,या गोष्टीचा अंदाज व्याधाला आला. आता वेळ घालवून चालणार नाही. मृग पुढे येईल अन् त्याच्या हृदयाचा वेध घेता येईल ही शक्यताच आता संभवत नव्हती. व्याधाने पाठीवरच्या भात्यातून एक विषमुख बाण काढून धनुष्यावर सिद्ध केला. मृग मुखाचा अचूक वेध घेत त्याने प्रत्यंचा आकर्ण खेचली. धनुष्यातून बाण सुटणार एवढयात गर्द वृक्षराजीत लपलेल्या कुणा बलशाली वानराचा काळीज थरकवणारा बुभुःक्कार निनादला. मात्र त्या भीषण बुभुःक्कराचा यत्किंचितही परिणाम आयुष्यभर मृगया केलेल्या त्या व्याधावर झाला नाही . त्याचे चित्त विचलित झाले नाही. प्रचंड वेगाने सरसरत गेलेल्या बाणाने लक्ष्याचा अचूक वेध घेतला. अन्...

हृदय विंधित जाणारी आर्त मानवी किंकाळी कानावर आली.बाणाचा नेम चुकून,अरण्यात फिरणाऱ्या कुणा मानवाचा वेध त्याने घेतला असेल हे संभवत नव्हते.वृक्षाआड दिसले ते खात्रीने मृगमुख आहे याविषयी शंका नव्हती.मग आर्त मानवी किंकाळी कशी काय ऐकू आली? की लक्ष्यवेध झालेला मृग एखादा मानवी राक्षस तर नसेल? खूप वर्षांपूर्वी प्रभू रामांनी असाच सुवर्णमृगाचा वेध घेतला होता पण प्रत्यक्षात

तो सुवर्णमृग नसून कुणी मायावी राक्षस होता म्हणे... तसे तर नसेल? घाबरलेला व्याध झटकन जवळच्या गर्द झुडुपात शिरुन तिथेच मुरुन राहिला. खरा काय प्रकार आहे, याचा उलगडा होईपर्यंत गप्प राहावयाचे असा निर्णय त्याने घेतला.

धप्पकन उडी मारुन श्रीकृष्णाच्या सन्मुख उभा राहत दोन्ही कर जोडून मारुतीरायाने आर्त साद घातली, “प्रभूऽऽ” वेदना सहन करण्यासाठीदंतपंक्तींमध्ये अधरोष्ठ घट्ट दाबून धरलेल्या प्रभूनीं नेत्र उघडले. पायात रुतलेला बाण खेचून काढण्यासाठी सिद्ध झालेल्या हनुमंताला कृष्णाने दक्षिण हस्त उंचावित ‘थांब’ अशी खूण केली.“प्रभूऽऽ हा बाण विषयुक्त आहे. हा वेळीच काढून काही वनौषधी जखमेवर लावायला हव्यात. नाहीतर...” परिणामांचे कथन करण्याचे धाडसही न झालेल्या त्या कपिश्रेष्ठाच्या नेत्रातून टप् टप् अश्रुबिंदू ओघळले. शांत स्वरात कृष्ण उद्गारले, “हे बलभीमा ! त्या बाणाला आपले काम करु द्या.तुमच्याउपचारांनी कदाचित या वेळी काळ विन्मुचा माघारी जाईलही.पण रामभक्ता....माझे प्रारब्ध,गांधारी मातेचा शाप,सारे काही अटळ आहे. सांप्रतच्या प्रसंगापेक्षाही भीषण रुप धारण करुन ते माझ्या जीवनात समोर ठाकेल. मला काही तुझ्यासारखे चिरंजीवित्व लाभलेले नाही.”

“यादवराया, गीता सांगणाऱ्या विश्वपालकाच्या मुखी ही भाषा शोभत नाही.जनन-मरण या कल्पना तुम्हासारख्या सर्वेषांच्या बाबतीत सापेक्षच असतात नाही का? आणि प्रारब्ध ते तर तुमच्याच हाती असते. तरीही प्रभुऽऽ हा विषयुक्त बाण धारण करुन पंचतत्त्वरुप देहाला आपण का बरे पीडा देता? बाणाच्या वेदना दूर करावयाची उपाययोजना मला करु द्या, प्रभु, किंवा काही अद्भुत लीला दाखविण्याचा आपली चतुर योजना तर नाही ना? रामरुपा, मला तर असेच वाटत

आहे कारण आपले संपूर्ण जीवनच अशा अद्भुत लीलांनी भरलेले आहे. ”



हनुमंताच्या कथनावर कोणतीही प्रतीक्रिया व्यक्त करणं टाळून श्रीकृष्णानी फक्त क्षीण स्मित केले.“राम भक्ता, एका महान युगाचा अस्त पाहणारा तू खरोखरच भाग्यवंत आहेस. तुझी नम्रता, तुझे मार्दव केवळ अतुलनीय आहे. प्रारब्ध माझ्या हाती असते, ईच्छेनुसार ते बदलता आले असतेतर... आंजनेयाऽऽ, अर्जुनाला कार्यप्रवण करण्यासाठी सारे कौशल्य पणाला लावून गीतेचे बोधामृत पाजायची तरी काय गरज होती? दुष्टमती कौरवांची युद्धपिपासू वृत्ती नसती

का बदलता आली... अन् मग कौरवांचा निःपात झाला म्हणून गांधारी मातेने उच्चारलेली ती महाभयंकर शापवाणी तरी टळली असती. इतके दूर तरी कशाला जा... नुकताच माझ्या डोळ्यांसमोर घडलेला यादववीरांचा संहार... तो तरी मी कशाला घडू दिला असता? लोकनाथा, माझे नावच कृष्ण असल्यामुळे अगदी दूरान्वयानेही ज्या घटनेशी माझा संबंध पोचतो ती प्रत्येक घटना कृष्णालीलाच ठरावी यात आश्चर्य ते कसले?"

"यदुराया, वंदन असो." अकस्मात अवतीर्ण झालेले वेदविव्यासम्हणाले,"गोपसख्या,नुकत्याच घडलेल्या या घटनेमुळे हिमगिरीवर समाधिस्थ असता मला जागृती आली. तुझे चरित्र,तुझ्या लीला जनसामान्यांना प्रेरणादायी ठराव्यात अशा आहेत. कुरुक्षेत्रावर घडलेला तो घनघोर संग्राम, तू कथन केलेली मानवी धर्माची सारस्वरुप गीता...हे सारे काही शब्दबद्ध करण्याच्या मनस्वी प्रेरणेमुळे मी समाधिस्थ होऊन चिंतन करीत होतो. काही घटनांमागील कार्यकारणभाव आकलन करण्यास माझी अल्पमती अपुरी पडली. त्यांचे निराकरण प्रत्यक्ष तुमच्याकडून करुन घ्यावे असे मी योजिले होते. तथापि इतक्या अकल्पितपणे आपला अवतार समाप्त होईल अशी शंकासुद्धा मला आली नव्हती. एवढ्यातच काही क्षणांपूर्वी घडलेल्या घटनेमुळे मी विचलित झालो. आपली भेट झाली नाही तर, माझ्या नियोजित कार्यात न्यून राहील म्हणून मधुसूदना, या अवघड क्षणी आपल्याला कष्ट देण्याचे पातक माझ्या हातून घडत आहे. यदुवरा क्षमा करा."

व्यासांचे कथन ऐकून भयग्रस्त हनुमान म्हणाला, "महर्षी अवचितपणे समाधिभंग झाल्यामुळे आपले भान हरपले असावे यदुवंशीयांचा पूर्णपणे नाश झाला आहे बलरामाचीही अवतार समाप्ती झाली आहे, सिंधुसागरात उभारलेली द्वारका

तो ग्रासू पाहत आहे, अशा अवघड परिस्थितीत व्दारकास्थित नारीवर्ग, बालके यांना अनाथ करुन देहत्याग करण्याएवढे प्रभू श्रीकृष्ण खचितच निष्ठूर नाहीत.कोणा व्याधाने चुकून सोडलेल्या विषयुक्त बाणाचे निमित्त होऊन मृत्यू यावा एवढे कृष्णाचे सामर्थ्य दुर्बल-क्षीण कसे बरे होईल? या नटखट भुलभुलय्याच्या लीला का तुम्हांला ज्ञात नाहीत? महर्षी ! कृष्णलीलांचे एक नवे गारुड पाहण्याचे भाग्य आज आम्हांस लाभत आहे.पूतना वध, कंस दर्पशमन, विचक्रदहन, त्रिपुरासुर दमन, गोवर्धन उच्चाटन, हंसडिंभक निर्दालन अशा किती कृष्णलीला वर्णाव्या? हा सर्वसाक्षी परमात्मा एका यःकश्चित बाणाने मृत होईल अशी शक्यता तरी आपण गृहीत कशी धरलीत या गोष्टीचे मला अतीव आश्चर्य वाटत आहे."

हनुमंताच्या कथनाने प्रसन्नचित्त झालेल्या कृष्णांना वंदनांचा क्षणकाल विसर पडून त्यांनी मंद हास्य केले." का हसलास रे,माधवा?"व्यासांनी पृच्छा केली."ब्रह्मर्षी..हनुमंता सारख्या त्रिकालज्ञानी चिरंजिवाने असे बालिश तर्कट रचले तर हसू नये तर करावे तरी काय? प्रभु श्रीरामांसारख्या अवतारी पुरुषात्तमांचा अंत पाहिलेला हा बुद्धिमंत ! कृष्णपर्व कधीतरी संपणार एवढा साधा-सोपा विचारही याला सुचू नये...? अरे कपिश्रेष्ठा,एका अतिसामान्य गोपबालाला देवदेवतांच्या पंक्तीत बसविण्याचा तुझा खटाटोप व्यर्थ आहे. माझ्या पावलाचा वेध घेणारा हा विषबाण तू काय सामान्य समजलास? साक्षात बादरायणांची वाणी मिथ्या होईल अशी शंका तरी तुला कशी यावी? गांधारी मातेचा शाप तो काय व्यर्थ होईल? यदुवंशीयांचा निःपात,बलरामांची अवतार समाप्ती या सगळ्या घटना काय सुचवतात...?"

प्रसन्न हास्य करीत हनुमंत उद्‌गारला, "सर्वेश्वरा, तुझ्या चेष्टा का या मर्कटाला ज्ञात नाहीत? बंदिशालेत तुझा

जन्म झाला त्याचवेळी प्रभुरामांचा नव्याने अवतार झाल्याचे संवेदन मला झाले. त्यानंतरचे तुझे कार्य, धर्मप्रस्थापनेची तुझी तळमळ ही का मला ज्ञात नाही? तुझ्या प्रत्येक कृतीत तुझ्या अलौकिकत्वाचे दर्शन मला झाले. तुझ्या प्रत्येक लीलेमध्ये मला तर प्रभुरामांचा साक्षात्कार झाला रे गोपाला .किंकर्तव्य विमूढ पार्थाला युद्धप्रवण करण्यासाठी तू उपदेशिलेली गीतास्त्रस्त्र.! अरे रामराया... अर्जुना एवढाच तादात्म्य पावून मी सुद्धा तिचे श्रवण केले आहे.'परित्राणाय साधुनां' या वचनात तर आपल्या अवतारकार्याची स्पष्ट कबुलीचराघवाऽऽ तू दिलीस. आता या प्रसंगी जी लीला तुम्ही दाखवू इच्छिता ती पाहण्याचे भाग्य कदाचित माझ्या भाळी नसेलही. तसे असेल तर यदुराया स्पष्ट सांग! मी क्षणार्धात इथून अदृष्य होतो पण माझी दिशाभूल करुन माझी वंचना तुम्ही करु पाहत असाल तर कृष्णराया, तुम्हाला पुरुन उरण्याएवढ हा कपी खचितच नटखट आहे."

मारुतीच्या कथनातून होणारी निःस्सीम भक्ती जाणवलेले व्यासही विचलित झाले.दुःखार्त स्वरात ते उद्गारले, रामदूता ! तुझी ही ईशनिष्ठा पाहता यापुढे तुझा उल्लेख श्रेष्ठ वैष्णव म्हणून होवो ! तू पुण्यवंत आहेस म्हणूनच योगेश्वरांचे अंत्यदर्शन घेण्याचे भाग्य तुला लाभले आहे.एका अर्थाने ही कृष्णलीलाच आहे. कपिवरा, व्दापारयुगाचा अंत आता समीप आला आहे. हा गोपाल अंशावतार आहे हे तुझे कथन सत्य आहे. तरीही अवतार समाप्ती ही सुद्धा स्वाभाविकच नव्हे काय? एका यःकश्चित व्याधाने सोडलेल्या ह्या बाणाला हे श्रेय मिळावे यामागे काहीतरी खास कार्यकारणभाव असावा. तसे असेल तर माधवा त्याचे स्पष्टीकरण तूच कर !" रक्तस्त्रावाने क्लांत झालेल्या कृष्णांच्या नेत्रांवर महानिद्रेची झापड येऊ लागलेली दिसताच व्यासांनी आपल्या कमंडलूतील जलाचे सिंचन कृष्णाच्या मुखावर केले.

“ हे चिरंजीवांनो... मी पुनश्च एकदा पूर्वकथित वाक्य दुरुक्त करीत आहे.मी एक अतिसामान्य गोपालक आहे. देवत्वाचा अंशही या कृष्णाकडे नाही.या व्दापारयुगात असुर निर्दालन कार्य करणारा मी काही एकटाच वीर नाही. भीमार्जुन, बलराम किती नावे घ्यावीत?सामान्य गोपालकांमध्ये मी वाढलो तरीही अस्त्रविद्या, शस्त्रविद्या यांचे ज्ञान मी प्राप्त केले. धनुष्यबाण,खड्ग,गदा,परिघ, शूल यांच्या पेक्षाही दिव्य असे चक्र मी सिद्ध केले, हे सत्य आहे. त्याच्यायोगे उद्दंड राक्षसांचा वध, जो अन्य अस्त्र शस्त्रांनी संभवत नव्हता तो मी चक्राने केला.काही प्रसंगी प्रतिस्पर्ध्याला हतबल करण्या साठी, त्याच्यावर प्रभाव टाकण्यासाठी मी साक्षात ईश्वर आहे असे कथनही केले.मात्र ते केवळ लाक्षणिक अर्थानेच घ्यावयाचे आहे. त्यामुळेच कदाचित माझ्या पराक्रमांना तुम्ही दैवी सामर्थ्याचे परिमाण देत असाल. कपिश्रेष्ठा, ज्या गीतेचा दाखला तू देतोस ती गीता म्हणजे गुरु सांदिपनींच्या मुखातून श्रवण केलेल्या श्रेष्ठ धर्मतत्त्वांचे प्रक्षिप्त रुपच आहे आणि कपिवरा... तो उपदेश मी मोहपाशात गुंतलेल्या मूढ अर्जुनाला केला, तुला नव्हे!”

“माया मोहाच्या अतिआहारी जाऊन पार्थाचा सारासार विवेकच नष्ट झाला. लाक्षागृह दहन, द्रौपदीची विटंबना, वनवास, अज्ञातवास किती प्रसंग वर्णावेत? दुर्योधन दुःशासनादी दुष्ट कौरवांचे अनन्वित अत्याचार सहन करुनही ऐन युद्धप्रसंगी पार्थाचे बंधुप्रेम उफाळून आले. केवळ षंढाला शोभावे असे त्याचे भीरुतापूर्ण कथन ऐकून मला अती क्रोध आला. धर्माचे केवळ सार मी जाणिले आहे. तरीही दुराचाराचे प्राबल्य होणार या शंकेने माझे हृदय व्याकुळ झाले. माझ्याकडे काही दैवी सामर्थ्य असते, विधि लिखित बदलण्या एवढे कर्तेपण माझ्याकडे असते, तर हे चिरंजीवांनो

षंढ अर्जुनासह साऱ्या कौरवसेनेला मी त्याच क्षणी भस्मसात केले असते. पार्थाची मनधरणी करण्याचे सव्यापसव्य मी खचितच केले नसते.”

“अवघड कसोटीच्या त्या क्षणी सारे विश्वच जणू माझ्या भोवती गरगर फिरु लागले. उदंड पाशवी वृत्ती माझ्याकडे पाहून खदखदा हसत आहेत असे मला वाटू लागले. हतवीर्य झालेल्या पार्थाला केवळ त्याच्या क्षात्रसुलभ कर्तव्याची जाणीव करुन देणे पुरेसे होणार नव्हते. त्याच्या प्रत्येक भ्रांतीचे खंडन धर्माचरणी अर्जुनाला केवळ धर्मतत्त्वांच्या आधारे केले तरच पटले असते. हे मला पुरते उमगले. माझ्या प्रगल्भ बुद्धितेजाचा अभिमान त्या क्षणी गळून पडला.महर्षी,...प्रगाढ शिष्योत्तमा पेक्षा मूढमती अनुयायी पत्करला असे म्हणण्याची पाळी माझ्यावर आली. माझ्या शर्करावगुंठित उपदेशरुप गुटिका कंठात उतरल्या तरीही अर्जुनांचे मनोमालिन्य पूर्णांशाने दूर झाले नव्हते याचे प्रत्यंतर युद्धसमाप्तीपर्यंत मला सातत्याने येत राहिले. माझ्या विद्वत्प्रचुर शब्दांनी अर्जुन संमोहित झाला. श्रवणाने ज्ञात झालेली श्रेष्ठ मानवी मूल्ये मी माझ्या खास शैलीत अशी काही वर्णने केली आहेत की, माझ्या बुद्धिवैभवाने अर्जुन दिपून गेला. गीतेमध्ये माझे शब्दलाघव जरुर आहेत, माझे अनुभवसिद्ध तत्त्वज्ञानही आहे. परंतु हे चिरंजीवांनो, मी प्रतिपादिलेली शाश्वत मूल्ये हे माझे चिंतन आहे असे सांगण्याएवढा मी अहंकारी नाही. मी धर्मरक्षक जरुर आहे पण मानवी जीवनधर्माची मूल्ये सिद्ध करण्याएवढा द्रष्टा मी नाही.”

“त्या भटकंतीतच पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या गर्द वृक्षराजीच्या आड असलेले एक भू- अंतर्गत विवर माझ्या दृष्टोत्पत्तीस आले. अतिवृष्टी होत असताना अकस्मात मला त्या पर्वतस्थित विवराची आठवण झाली.

मेघांच्या कर्णकर्कश गर्जना आणि विजांचे थैमान यामुळे नखशिखांत हादरलेले माझे सवंगडी! आपण काय करीत आहोत, कुठे जात आहोत याचे भानही त्यांना उरले नाही. त्या विवरामध्ये सुरक्षित निवारा मिळाला तरीही त्यांची भीती कमी होईना, कारण मी माझ्या सामर्थ्याने गोवर्धन उचलून माझ्या करांगुलीवर तोलून धरला आहे असे कथन केले होते. मला सहाय्य करण्यासाठी माझ्या सवंगड्यांनी आपल्या हातातील काठ्यांनी आधार दिला. त्या प्रलयंकारी पर्जन्यामुळे पर्वतावरून वाहणाऱ्या जलप्रपातांनी अनेक शिलाखंड आणि मृत्तिकांच्या राशी विवराच्या मुखाशी साचविल्या. कपिवरा, पर्जन्य थांबल्यावर विवराच्या मुखातून आम्ही कसेतरी बाहेर पडलो पण त्यानंतर मात्र विवराचे मुख पूर्णपणे गाडले गेले, अन् प्रवेशमार्ग बंद झाला मेघांच्या  कर्णकर्कश गर्जना आणि विजांचे थैमान यामुळे नखशिखांत हादरलेले माझे सवंगडी! त्यानाही वास्तवाचे भान नव्हते.

"प्रचलित शस्त्रांमध्ये चक्र अदभुत आहे हे खरेच. इतर कोणतेही शस्त्र वीराच्या हातातून सुटले की, त्याचा त्यावरील ताबा सुटतो.उलट सुदर्शनचक्र कार्य पूर्ण झाल्यावर पुन्हा फेकणाऱ्याकडे माघारी येते. चक्राचे वजन, त्याचे तीक्ष्ण दात, चक्राची फेक आणि हवेतून अद्भूत ध्वनी काढीत गरगरत त्याने केलेला लक्ष्यवेध ! कोणताही वीर अचंबित व्हावा अशीच ही किमया आहे.पुराणकथा श्रवणातून मला चक्र सिद्ध करावयाची स्फूर्ती मिळाली. माझ्या आयुष्याचे ध्येय मानून मी ते सिद्ध केले. त्याचा कौशल्याने वापर करण्यावर प्रभुत्व मी मिळवीले. शस्त्रबलापेक्षाही पराक्रमाला अद्भुताची जोड दिली तर सामान्य मनुष्य चटकन वश होतो. मग शस्त्रवापर करण्याची गरज उरत नाही, हे मी अनुभवाने जाणले. सामर्थ्याचा प्रत्यक्ष वापर करुन नरसंहार करण्यापेक्षा त्याचा

नुसता धाक निर्माण करुन प्रतिस्पर्ध्याला गलितगात्र करावयाचे ही माझी नीती आहे. ही नीती एवढी यशस्वी झाली की, दुर्योधनासारख्या दुर्मती वीराने सुद्धा मला उघड–उघड विरोध करण्याचे धारिष्ट्य दाखवले नाही."

"बादरायण! वस्त्रहरणामध्येही माझी कसलीही अद्‍भुत किमया नाही. द्यूतप्रसंगी मी उपस्थित असतो तर मात्र पुढचा अनर्थटळला असता.मी द्यूत निपुणनाही.तरीही कपट द्यूतामध्ये शकुनीला हार पत्करायला लावण्याचे कौशल्य माझ्याकडे खचितच होते. फाशांचे वजन, त्याच्यावरील चिन्हे यांचे अचूक अवलोकन करुन इष्ट दान मिळण्यासाठी ते कोणत्या प्रकारे टाकले पाहिजेत हे मी चुटकीसरशी अवगत केले असते. सुदर्शनचक्र फेक करण्यामधले माझे कौशल्य द्यूतामध्ये वापरुन मी शकुनीला हार पत्करायला लावली असती पण वस्त्रहरण प्रसंगातून द्रौपदी बचावली ती केवळ तिच्या पातिव्रत्याच्या तेजाने! सभास्थित दुर्योधन, कर्ण, दुःशासन हे दुरात्मे वगळता अन्य वीरांनी तर आपेले नेत्र मिटूनच घेतले होते."

"भरसभेमध्ये कटीवस्त्राच्या निरीला त्या अधमाने स्पर्श करताच द्रौपदीच्या नेत्रामध्ये खदिरांगार जागृत झाला. तिच्या नेत्रकटा़क्षामुळे ते दुष्ट अक्षरशः दिपून गेले. अन् मग आपण एकामागून एक अशी तिची वस्त्रे सोडीत आहोत असा आभास दुःशासनाच्या मनात निर्माण झाला.पतिव्रता अनसूयेच्या नेत्रसामर्थ्याने महाप्रतापी देवतांनी जिथे मदनाचा त्याग करुन बालवृत्ती धारण केली तिथे दुःशासनाचा काय पाड? कपिश्रेष्ठा, मोठ्या वल्गना करणारा तो लंकेश! पण ताब्यात आलेल्या सीतामाईला स्पर्शही करण्याचे धारिष्ट्य त्याला होऊ नये एवढे पातिव्रत्याचे तेज दाहक असते. द्रौपदीचे पातिव्रत्य मैथिली अनसूया,यांच्याच तोडीचे आहे. अर्थात एक गोष्ट मात्र निर्विवाद सत्य आहे. त्या अवघड क्षणी, याज्ञसेनीला माझ्या

स्मरणामुळे धैर्य आले, तिचे मनोबल वाढले, पण त्याचे श्रेय मी कसे घेऊ ? रामनाम लिहिलेली शिला सागरात तरंगली पण साक्षात रामांनी स्वहस्ते टाकलेली शिलामात्र बुडाली.या घटने मागे श्रद्धा-निष्ठायांचे जे अधिष्ठान आहे; तेच परिमाण द्रौपदी वस्त्रहरणाला लावणे अधिक सयुक्तिक ठरावे."

"माझ्याविश्वरुपदर्शनामध्येही सामान्य मतीला न उलगडणारे असेच रहस्य आहे. श्रेष्ठ हो, पार्थाची कर्तव्यपराङ्मुखता हा सद्धर्माचा, सद्वर्तनाचा पराभव होता.तो कृष्णनीतीचा पराभव ठरला असता. मी स्वतः युद्धपिपासु नाही; परंतु अधर्मचारणाने सत्ता काबूत ठेवणाऱ्या कौवरवांना नष्ट करणे हा शेवटचा आणि एकमेव पर्याय होता.हे चिरंजीवांनो! धर्म ही विचार प्रणाली म्हणजे एक श्रेष्ठ नीती आहे.प्रदीर्घ वैचारिक मंथनातून द्रष्ट्यांनी साध्य केलेले ते नवनीत आहे. सश्रद्ध, सुसंस्कारित मनुष्य सहसा धर्मसंकेतांचे उल्लंघन करु धजावत नाही तो त्यामुळेच! त्या अवघड क्षणी हे रहस्य माझ्या अंतर्मनात उलगडले.धर्मनिष्ठ पार्थाला त्याची युद्ध पराङ्मुखता ही धर्माची पायमल्ली आहे, उलट युद्धप्रवणता हा श्रेष्ठ धर्म आहे याची जाणीव करुन द्यायला हवी हे मी अचूक ओळखले!"

"वेदविव्यास,मी मनःपूर्वक कबुली देत आहे कि. पार्थाला युद्धप्रवण करण्यासाठी मला माझ्या विचारमंथनातून स्फुरलेली घटिते मी निःशंक मनाने श्रेष्ठ धर्ममूल्ये म्हणून प्रतिपादिली. कदाचित वेदप्रणीत धर्माची ती व्यवच्छेदक लक्षणे असतीलही.धर्म जर धारण करणारा असेल, ती मानवाची श्रेष्ठ जीवनप्रणाली असेल तर,जीवनाच्या विविध टप्प्यांमध्ये अचूक दिशादर्शन होईल असे अर्थनिष्कासन माणसाने केले पाहिजे. केवळ या आणि एवढ्याच तर्काच्या आधारे मी केवळ स्वानुभवाने ठरविलेली नीती जी जीवनाभिमुख आहे,तीच धर्मसंकेत म्हणून पार्थाला विषद केली. परंतु धर्मतत्त्वांचे सखोल

ज्ञान श्रवण, अध्ययन यांद्वारे मी पूर्वी कधीही केले नव्हते. वेदांचे समग्र वाचन करण्याएवढे स्थैर्य आणि अवधी तरी मला कुठे मिळावा?”

“हे महात्म्यांनो, हा माझा विनय नव्हे. त्याच प्रमाणे श्रेष्ठ धर्मतत्त्वांचा अपलाप करण्याचा प्रमादही मी केला नाही. ***‘सम्यक संकलजः कामो’*** हा धर्माधार मला ज्ञात आहे.माझ्या सगळया जाणीवा माझ्या वाणीत एकवटल्यामुळे असेल, कदाचित कथनामागे असलेला माझा सम्यक् संकल्प कारणीभूत झाला असेल. कदाचित कथनामागे असलेला माझा सम्यक् संकल्प कारणीभूत झाला असेल. पण माझ्या कथनाचा ईष्ट परिणाम पार्थावर होत आहे हे लक्षात आल्याकर मात्र माझा आत्मविश्वास दुणावला. माझ्या कथनाशी पार्थ एवढा तद्रूप झाला की,माझ्या कथनानुसारअपेक्षित दृश्य त्याच्या अंतःचक्षूंना दिसू लागले.हे बुद्धिमंतांनो, ही तर मानसशास्त्राची किमया आहे; ही संमोहनावस्था आहे. माझ्या विश्वरुपदर्शना मागचे रहस्य हेच होते! रणांगणस्थित शत्रूंचा निःपात एकट्याने करण्या एवढे सामर्थ्य माझ्याकडे असते तर गीता सांगण्याचा, कुटिल नीतीने भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करुन विजय प्राप्त करण्याचा कालापव्यय करणारा उपद्व्याप मी कशाला केला असता?”

प्रदीर्घ कथनाने थकलेल्या श्रीकृष्णांनी मागे रेलत आपले मस्तक वृक्षराजाच्या बुंध्यावर टेकीत क्षणभर नेत्र मिटून घेतले.थोडावेळ कुणीच काही बोललेनाही.किंचित विश्रामानंतर कृष्णानी नेत्र उगडले अन् हनुमंत बोलू लागला, “हे यदुराया, तुझे आत्म कथन ऐकून काही शंकांचे परिमार्जन झाले. तथापि आपली अनुमती असेल तर थोडी पृच्छा करावी म्हणतो.”कृष्ण उतरले,“अवश्य विचार,कपिश्रेष्ठा,तू तर चिरंजीव आहेस. भविष्यात कृष्णचरित्रा विषयी काही शंका

उपस्थित झाल्या तर त्यांचे निरसन तू करु शकशील. तसेच तुझे शंका निरसन करताना व्यासांच्या मनातील काही विकल्पांचेही निराकरण संभवते”.

“पुरुषोत्तमा! प्रभुरामांचे एकपत्नीव्रत पाहता तुला वाटणारी स्त्री सहवासाची ओढ. तुझा नारीवर्ग आणि त्यांच्या समवेत चाललेली तुझी कामचेष्टिते...एकाच वेळी अनेक स्त्रियांशी रत होण्यामध्ये तुला असलेले स्वारस्य... प्रभु क्षमा करा पण तुमच्या चरित्रातील हे पर्व मला सतत खटकत राहिले आहे.” हनुमंताने स्पष्ट शब्दांत आपली नाराजी व्यक्त केली सस्मित मुद्रेने कृष्ण उद्गारले, “अरे ब्रह्मचारी कपिश्रेष्ठा! माझ्या या लीलांविषयी तुझ्याच काय पण बहुत जनांच्या मनात बहुत विकल्प असावेत.तू स्वतः निर्लेप आहेस म्हणून स्पष्टपणे पृच्छा करण्याचे धाडस तू केलेस एवढच!” श्रीकृष्णांनी व्यासांकडे नेत्रकटाक्ष टाकताच वेदव्यास अधोमुख होऊन वामपादाच्या अंगुष्ठाने भूमी उकरु लागले. “हे ब्रह्मचारीन्! तुझी पृच्छा अर्धवट आहे. अनेक स्त्रियांशी रत होऊनही मी स्वतःला ब्रह्मचारी म्हणविण्याचे धारिष्ट्य कसे काय करतो? ही तुझी मूलगामी शंका आहे!”

“कपिवरा! नरदेहामध्ये अमंगल, अशुध्द धटक तर कायमच स्थित आहेत,मलमूत्र स्वेद, श्लेष्म, कफादि बाह्यात्कारी दिसणारे अमंगल घटक तर आहेतच पण शरीरांतर्गत स्थित असलेले दृष्टीला बाह्यात्कारी न दिसणारे कितीतरीअंतःस्त्राव शरीरांतर्गत स्थित आहेत.त्यांचे उच्चारण केले तरीही स्नान शुध्दीची प्रेरणा व्हावी. मनुष्याची चेतना असेपर्यंत हे अमंगल घटक त्याचे ठायी असतातच. किंबहुना मानवाची व्यवच्छेदक लक्षणे जी सांगितली आहेत त्यामध्येच त्यांचे स्थान आहे. तरीही देवकृत्याला आरंभ करताना षडंगन्यासाने केलेली बाह्यशुध्दी पुरेशी असते हा तर शास्त्रार्थ

आहे ना? कपिवरा श्रद्धापूर्वक आवाहन करुन साक्षात परमनिधान समोर ठाकले असता अमंगल तत्त्व धारण करणाऱ्या मानवाचा स्वेदस्पर्श झालेले उपचार मांगल्य म्हणून स्वीकृत होतातच ना? हनुमंता, ब्रम्हचर्य ही सुद्धा अशीच मानसिक अवस्था आहे."

"हे कपिवरा! प्रजजनाची क्षमता नसलेल्या मानवाला नपुंसक-षंढ म्हणतात. म्हणजे ब्रह्मचर्याची घमेंड किती निरर्थक आहे! परमोच्च आनंद, अतीव दुःख अथवा भीती अशावेळी नरजातीचे अल्प स्खलन होतेच! हा निसर्ग आहे. ब्रह्मचर्याची व्याख्या एवढी सवंग नाही. कंसवध करुन मी जगताचे अरिष्ट निवारण केले. त्याच्या बंदीवासात त्याच्या भोगदासी म्हणून खितपत पडलेल्या सहस्त्रावधी अबलांची मुक्तता मी केली. परंतु माझ्यासमोर कायमची आपत्ती निर्माण झाली. कंसाने भ्रष्ट केलेल्या त्या नारीसमूहाचे समाजात प्रतिष्ठापन करण्या साठी एकही शास्त्राधार मला मिळाला नाही.स्वतःच्या ईच्छे विरुद्ध कंसाच्या भोगदासी बनलेल्या सहस्रावधी अबला नारींनी आत्मनाश करावा हे समर्थनीय ठरले असते का?"

"मारुतीराया!त्या नारीजनानी त्यांचे भवितव्य माझ्यावर सोपविले. वेदविव्यास...त्यांचे पुनर्वसन करावयाला धर्मनिष्ठ समाज मान्यता देणेच शक्य नव्हते. कंसाने भ्रष्ट केलेल्या त्या अबला नारींचे पाणिग्रहण करण्याचे धाडस धर्मसंकेता विरुद्ध जाऊन मी दाखविले. त्यांनी न केलेल्या चुकीबद्दल त्यांचे जीवन हे शाप ठरावे ही गोष्ट माझ्या सदसद्विवेकबुद्धीला पटली नाही. म्हणून त्या सर्वांना माझे पत्नीपद बहाल करून नवे जीवनाभिमुख धर्मसंकेत मी रूढ केले. रामभक्ता निमित्त मात्र लोकोपवादापायी निष्कलंक चारित्र्य आणि पातिव्रत्य सिद्ध करणाऱ्या साध्वी सीतेचा त्याग प्रभुरामांनी केला. त्यानी आचरिलेला राजधर्म आणि अनाथ अबलांचे जीवन मंगलमय

करण्यासाठी स्वतःचे चारित्र्यहनन सहन करणारा मी गोपबाल! मला उमगलेला जीवनधर्म... मारुतीराया, दोघांमध्ये श्रेष्ठ कोण ते तूच ठरव. प्रचलित संकेतांविरुद्ध मी घेतलेला निर्णय अयोग्य आहे याचे तरी समर्थन मात्र तू करू नयेस अशी माझी विनंती आहे. कारण सगळे धर्माधार त्याज्य ठरतात तेव्ह सम्यक् संकल्पानुसार निर्णय घेण्याची मुभा धर्मानेच दिलेली आहे."

" मी एक सामान्य गोपबाल! हजारो स्त्रियांचे पालन कसे करावे...त्यांचा योगक्षेम कसा चालवायचा? त्यांचे सरंक्षण कसे करावयाचे? अशा असंख्य समस्या माझ्यापुढे निर्माण झाल्या. बुरसट वृत्तीने धर्मशास्त्रांचा छळ करीत राहणाऱ्या धुरिणांचा संसर्ग अन् उपसर्गही पोहोचणार नाही अशी दुर्गम, समुद्रस्थित भूमी निवडून मी द्वारका वसविली. ती धनधान्याने समृद्ध केली.माझे निमित्त मात्र का होईना पत्नीपद भूषविणाऱ्या सहावधी नारींना मी कशाचीही कमतरता भासू दिली नाही. हनुमंता, पत्नीविरहामुळे व्याकुळ झालेल्या प्रभुरामांची भग्न मनस्कता कुणालाही–अगदी तुलाही समजू शकेल. पण असंख्य पत्नींच्या नित्य सहवासामुळे मी भग्नमनस्क झालो असेन ही कल्पना तरी कुणी केली का? हनुमंता, विवाहामध्ये 'धर्मेच अर्थेच काच नातिचरामी'अशी शपथ मी घेतली होती. सस्त्रच्या गणनेमध्ये असलेल्या माझ्या स्त्रियांची चिंता... त्यापायी स्त्रीसुख ही भावनाच माझ्या मनात उरली नाही. मात्र त्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक गरजा पूर्ण करण्याचे दायित्व प्रचलित धर्मसंकेतांनुसार माझ्यावर होते.त्याच्या परिपूर्ती साठी रासक्रीडा ही निष्काम कृष्णलीला माझ्या आयुष्याचा एक अविभाज्य घटक बनली. माझ्या सान्निध्याचे अल्प सुखही प्राप्त झाले नसते तर हनुमंता, त्या स्त्रिया व्यभिचार करायला प्रवृत्त झाल्या असत्या! "

“अंजनीसुता कामेच्छा- भोगलालसा मला कधी स्पर्शही करु शकली नाही. भोग-शमन-तृप्ती हे सगळे शब्द प्रयोग केवळ मानसिकतेचे-प्रवृत्तीचे निदर्शक आहेत. हे ब्रम्हचारिन् त्या दृष्टीने पाहता कामशमन, वासनातृप्ती अथवा इंद्रिय भोगांच्या आहारी जाऊन हा कृष्ण कधीही कामातुर झाला नाही. कृष्ण हा मातृपूजक आहे. मानवी जीवन व्यवहारात स्त्री हे सौख्याचे-शांतीचे परमनिधान आहे. गृहस्थधर्माचे यश तर निःसंशय स्त्रीच्या कर्तृत्वावर अवलंबून असते. स्त्रीचे दुराचरण, स्वैर वर्तन आणि तिचे पतन यासाठी दुरान्वयाने का होईना पण पुरुषच कारणीभूत असतो, हे त्रिकालबाधित सत्य होय. माता, भगिनी, कन्या आणि पत्नी ही स्त्रीची चार रुपे आहेत. हे आंजनेया, कृष्ण स्त्रीच्या पत्नीरुपाशी कधीच तादात्म्य पावू शकला नाही. म्हणून निरंतर स्त्रीसहवासात राहूनही मी निर्लेप राहू शकलो.”

“रुक्मिणी-सत्यभामा यांच्याशी माझे विवाह म्हणजे माझ्या पतितोद्धाराच्या कार्याला मिळालेल्या समाजमान्यतेचे द्योतक आहेत.तो माझ्या राजकारणाचा,समाज कारणाचा एक भाग आहे. माझ्या राण्यांना झालेली अपत्यप्राप्ती हा त्यांच्या दृष्टीने शरीरसुखाचा भाग असेल, पण माझ्यासाठी ते केवळ अपरिहार्य कर्तव्य होते. माझ्या पालनकर्त्या दूधमातेचाच नव्हे तर, तिच्या समवयस्क गोपींचा मी बाळ होतो. केवळ सुभद्रेचाच नव्हे तर, कोणतेही प्रत्यक्ष नातेसंबंध नसलेल्या कृष्णेचा मी बंधू आहे.समग्र मानव वंशाच्या इतिहासात कामाच्या उन्नयनाचे असे एकही उदाहरण, आंजनेया, तुला खचितच सापडणार नाही. कृष्णाच्या बासरीचा ध्वनी उद्दीपक नव्हता तर विरेचक होता. त्या ध्वनीने देहभान हरपलेल्या माझ्या सहस्त्रावधी स्त्रीया कृष्णरुपाशी तादात्म्य पावू शकल्या. कृष्णाच्या कृति-उक्तीमध्ये विषयाचा अंशही नव्हता म्हणून कृष्ण उपस्थित

असतानाही नारीसमूह निर्भयतेने मुक्त आचरण करु धजावत असे.हनुमंता, म्हणूच एकावेळी असंख्य स्त्रीयांशी रत होऊनही कृष्णाचे ब्रह्मचर्य भंग होऊ शकले नाही. आंजनेया, माझा एक सल्लास्मरणात ठेव.युगधर्मानुसार बदलत जाणारे, स्वैर आचरणाकडे झुकणारे मानवी वर्तन तू पाहत आहेस. मला अवतारी पुरुष मानूनही माझा स्त्रीसहवाव तुला रुचला नाही. तरी हे कपिवरा, कलियुगामध्ये तू चुकूनही प्रकट होण्याचे धारिष्ट्य करु नकोस. त्यावेळचे प्रच्छन्न व्यवहार पाहता तुला चिरंजीवित्व हा शाप वाटेल! ”

“प्रभु! तुमच्या कथनामुळे माझ्या मनातील विकल्प आता पूर्णपणे दूर झाले आहेत. एखाद्या व्यक्तीचा विशिष्ट वृत्तीमागचा हेतू संबंधित व्यक्तीच स्पष्ट करु शकते. इतरेजन मग ते कितीही बुद्धिमंत असेनात का? त्यांनी केलेले भाष्य हे केवळ तर्काच्या मर्यादित पातळीवर राहते हेच खरे आहे !” हनुमंताच्या या कथनामुळे व्यासांच्या मनातील संकोचही दूर झाला. कृष्णचरित्राविषयी काही विकल्प आपल्या मनात राहू नये यास्तव निर्भीड पृच्छा करण्याचे धारिष्ट्य त्यांना प्राप्त झाले. “भगवंता! तुझ्या चरित्रातील रहस्ये आता उलगडत चालली आहेत.तुझे  चरित्र हे जीवनाचे पथदर्शन ठरणारे आहे.म्हणून तुझ्या अगम्य जीवननिष्ठांचे स्वरुप तू विशद करावेस.कृष्णा,कौरव-पांडवांच्यायुद्धाला तू धर्मयुद्ध म्हणतोस. परंतु युद्धामध्ये भीष्म, द्रोण, कर्ण, दुर्योधन यांचा वध युद्ध संकेतांचा भंग करणारा आहे. धर्म-अधर्म यामधील तुला अभिप्रेत असलेला अर्थ तूच विशद करावास अशी विनंती मी करतो.”

“व्यासमहर्षी! धर्माचे श्रेठत्व तो सद्वृत्तीचे वर्धन करतो की, दुष्प्रवृत्तींचे समर्थन करतो यावर निहित असते. युद्धारंभी स्वतःच्या कृतीबद्दल संदेह पार्थाच्या मनात

निर्माण झाला. त्याच्या शौर्याला त्यामुळे मालिन्य आले. आपण केवळ राज्य तृष्णेपायी आपल्या बांधवांचा संहार करण्या साठी युद्धप्रवृत्त झालो या आपल्या कृतीचे अतीव दुःख होऊन पार्थाचे शौर्य झाकोळून गेले.माझ्या उपदेशामुळे तो पुनश्च युद्ध प्रवण झाला; तरीही त्याच्या शौर्यावर आलेले मालिन्य युद्ध अखेर पर्यंत अंशरुपाने तरी शिल्लक राहिलेच! युद्धातील काही अपवादात्मक प्रसंग वगळता प्रतिस्पर्ध्यावर निर्णायक प्रहार करताना अर्जुनाचे शौर्य, तेज प्रकट झाले नाही. म्हणून केवळ विजयप्राप्तीसाठी मला नीतीचा आश्रय घेऊन प्रसंगी युद्ध संकेत मोडूनही प्रतिप्रक्षाचा निःपात करवून घ्यावा लागला. ज्या प्रतिस्पर्ध्यांचा उल्लेख आपण केलात ते खरोखर वध्य होते का? धर्मस्थापनेसाठी त्यांचा मृत्यू अटळ ठरावा असे कोणते प्रमाद त्यांनी केले होते याचा यथातथ्य ऊहापोह मी करणार आहे."

"बादरायण! पितृसुखासाठी भीष्म प्रतिज्ञाबद्ध झाले. पुढे चित्रांगद युद्धात मारला गेला. त्याचा ज्येष्ठ भ्राता विचित्र वीर्य, याला तो सक्षम नसूनही भीष्मांनी राज्याभिषेक केला. त्याच्यासाठी भीष्मांनी काशीराजाच्या कन्यांचे अपहरण केले. स्वयंवरातील वधूंचे बळाने अपहरण हा संकेतभंग नव्हता का? क्षत्रियाने स्वतःच्या हेतुपूर्तीसाठी तसे करणे एक वेळ मान्य झाले असते. पण भीष्मांनी हे कृत्य विचित्रवीर्यासाठी केले. या त्यांच्या कृत्यामुळे विचित्रवीर्याचे सामर्थ्य हीन ठरले. सर्वच राजांनी भीष्मांच्या कृत्याचे अनुकरण केले असते तर काय अनर्थ ओढवला असता याची कल्पनाच केलेली बरी! विचित्रवीर्याचा मृत्यू झाल्यानंतर माता सत्यवतीने भीष्मांना विवाह करण्याची आज्ञा दिली. परंतु आत्मनिष्ठ भीष्मांनी प्रतिज्ञेची सबब सांगितली. तत्कालीन परिस्थितीत कुरुंच्या साम्राज्याला समर्थ वारस नसतानाही भीष्मांनी मातेची आज्ञा पाळू नये हे कितपत समर्थनीय आहे? की पित्याच्या इच्छेसाठी

अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा करावी लागली याचे शल्य त्यांच्या मनात होते? महर्षी... द्यूतात कपटाने 'पण' जिंकलेल्या विषयांध धृतराष्ट्र पुत्रांनी एकवस्त्रा द्रौपदीला राजसभेत आणले. परंतु भीष्मांनी 'अर्थस्य पुरुषो दासाः' असे लंगडे समर्थन करीत स्पष्ट उत्तर देणे टाळले. तिची विटंबना होत असता त्यांच्यासारखा पराक्रमी वीर स्वस्थ बसला."

"हनुमंता! विरोध राहू दे... किमान हे निंद्य कृत्य पाहणे नको म्हणून सभात्याग करणे तरी भीष्मांना शक्य होते की नाही?" क्रोधित झालेला हनुमंत उद्गारला,"यदुवरा पतिव्रतेची विटंबना पाहून स्वस्थ बसतो तो वीर नव्हेच, धर्माचरणी तर अजिबात नव्हे. यदुवरा, मी अशा प्रसंगी माझा दुरान्वयानेही संबंध नसता तरीही अशा कृत्याचे स्वबलाने परिमार्जन केले असते अथवा आत्मघात पत्करला असता." कृष्ण पुढे बोलू लागले, "अधर्माचरण, अत्याचार घडत असता, त्याचे परिमार्जन करण्याचे सामर्थ्य असता गप्प बसून राहायचे... या कृतीचे समर्थन करणारा एखादा धर्मसंकेत असेल असे मला वाटत नाही. असला तरी तो बदलण्याचे धाडस दाखवायला हवे. शेवटी धर्म हा सदाचरणासाठी असला पाहिजे. दुष्प्रवृत्तींचा नाश कसा करावा याचे दिशादर्शनही धर्मामध्ये मिळायला पाहिजे, अन्यथा धर्म हा एकांगी, निरर्थक ठरेलच पण तो आपले अस्तित्वही टिकवू शकणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे."

"द्रोणवधासाठी धर्मराजाला सत्याचरण भंगाचा मोबदला द्यावा लागला. महर्षी! कर्ण तर स्वभावतःच दुराचारी होता. अर्जुनाचा द्वेष हेच त्याचे जीवितकार्य. तो सूतपुत्र आहे यास्तव द्रौपदीने त्याला स्वयंवरात सहभाग घेऊ दिला नाही. हा डूख मनात ठेवून राजसभेत आणलेल्या द्रौपदीची विटंबना चालली असताना त्याने दुष्टमती कौरवांना प्रोत्साहन दिले.अर्जुनाशी

स्पर्धा करण्याच्या उन्मादात तर कर्णाने परशुरामांकडून कपटाने अस्त्रप्राप्ती  करण्याचा प्रयत्न केला. पुढे प्रत्यक्ष युद्धात चक्रव्यूह भेद करणाऱ्या अभिमन्यूला एकाकी गाठून अधर्म युद्ध करणाऱ्या कापुरुषा ंमध्येही कर्ण होता. फक्त अंत्यसमयी त्याला धर्माधर्म विवेक सुचला. ज्याने स्वतः अधर्माचरण केले त्याने दुसऱ्याला धर्माचरण शिकवावे म्हणजे ‘परोपदेशे पांडित्यम्’ असाच न्याय नव्हे का?”

“कौरवांचे अधर्माचरण पाहता युद्धप्रसंगी तरी तटस्थ राहणे भीष्मांना शक्य होते. परंतु दुर्योधनाचा पक्ष घेउन भीष्म रणांगणात उतरले. म्हणून त्यांचा वध हे त्यांच्या नीतीला त्यांच्याच नीतीने दिलेले उत्तर आहे.व्यास महर्षी! द्रोण तर उघड  उघड पक्षपाती होते. त्यांनी अश्वत्थाम्याची कुवत  योग्यता,या कशाचाही विचार न करता पुत्र प्रेमापोटी त्याला संहारक अस्त्रांचे दान दिले हे तर सर्वश्रुतच आहे. दुर्योधन, कर्ण,दु:शासन या त्यांच्या शिष्योत्तमांची ख्यातीसुद्धा सर्व श्रुतच आहे. शिष्याची योग्या योग्यता न पारखता दुष्टमती छात्रांना अमोघ शस्त्रविद्या मुक्तहस्ते प्रदान केली. उलट एकलव्याच्या एकनिष्ठ गुरु भक्तीची कदरही न करता न शिकवलेल्या विद्येपोटी त्याच्या अंगुष्टाची गुरुदक्षिणा त्यांनी मागितली. त्यांच्या परस्परविरोधी वर्तनाचे समर्थन कोणी कसे करावे?राजाश्रयामुळे मिंधे बनलेले द्रोणाचार्य... गुरुपरंपरेच्या कोणत्या श्रेष्ठ संकेतांचे पालन त्यांनी केले? उलट धर्मयुद्धात अधर्माच्या बाजूने ते उभे राहीले.”

“महर्षी! दुर्योधनाला तर पांडवांचे अस्तित्वच मान्य नव्हते. सत्ता  तृष्णेपायी त्याने पांडवांना जगणेही मुश्किल केले. त्याच्या कपटी स्वभावाचे किती दाखले द्यावेत? तरीही निर्णायक युद्धापूर्वी धर्मनिष्ठ युधिष्ठिराने त्याला कोणत्याही

पांडवाशी द्वंद्वयुद्ध करण्याची अनुमती दिली होती. परंतु भीमाची प्रतिज्ञा पूर्ण व्हावी हा जणू विधिसंकेतच होता! गदायुद्धात जेव्हा त्याचा शक्तिपात होत चाललेला दिसला, तेव्हा मीच भीमाला त्याच्या जानुस्थानी प्रहार करण्यास सुचविले. दुर्योधन अंतिम क्षणी जी खेळी खेळू इच्छित होता ती मी ओळखली एवढेच! माझ्या संकेताकडे भीमाचे दुर्लक्ष झाले असते तर दुर्योधनाने युद्धसंकेत बाजूला सारुन भीमाचा कपटाने वध केला असता. महर्षी,... युद्धाचा धर्म म्हणजे विजय प्राप्ती! जी नीती आचरून कौरवांनी पांडवांना युद्ध करण्यास प्रवृत्त केले त्याच नीतीने त्यांचा पराभव झाला हे कुरु क्षेत्रीच्या युद्धाचे फलित आहे."

"सगळा समाजच सदाचरणी बनला तर, मग धर्मतत्वे, शास्त्राधार यांचीआवश्यकताच उरणार नाही. प्रत्येक युगामध्ये अनिष्ट प्रवृत्ती असतातच.असीम सुखप्राप्तीसाठी इष्ट-अनिष्ट, साधन - शुचिता यांची पायमल्ली करणे ही मानवाची सहज प्रवृत्तीच आहे.धर्माचे अंतिम ध्येय परमोच्च श्रेणीपर्यंतची प्राप्ती जी प्रायः होत नाही. सत्ता, सुखसाधने यांची प्राप्ती तर धर्माचरणापेक्षाही दुर्मार्गाने फार अल्प काळात होते जेव्हा संपूर्ण समाजातच अशा वृत्तीचे प्राबल्य होते तेव्हा समाजाची घडीच विस्कटून जाते.म्हणून धर्मावरसुद्धा नीतीचा अंकुश हा असावाच लागतो."

"महर्षी! धर्मरक्षणासाठी शस्त्राचा धाक असावा लागतो. प्रभु रामचंद्रांसारख्या पुरुषोत्तमाने तो ठेवला होता. परंतु द्वापार युगामध्ये शासकच धर्माची पायमल्ली करू लागल्यामुळे धर्म क्षीण झालाा... दुर्बल झाला.म्हणून धर्मप्रतिष्ठापनेसाठी प्रभुरामांसारखे धर्माचरणी प्रशासक स्थिर करणे हेच माझे जीवितकार्य ठरले. अर्थात शस्त्राच्या धाकाने धर्म रुजविताही येत नाही. शस्त्रबळाने फार तर बाह्यात्कारी

तात्पुरते दृश्यबदल शक्य आहेत. धर्म रुजविण्यासाठी अंतःप्रवृत्ती बदलाव्या लागतात. चित्तशुद्धी करावी लागते. स्वयंस्वीकृती हे धर्मप्रसाराचे शाश्वत निधान आहे. शस्त्राने दुर्जनांचा नाश करता येतो, दुष्टप्रवृत्तीचा नव्हे. दुःष्प्रवृत्तीचा नाश करण्यासाठी नीतीसारखे प्रभावी शस्त्र दुसरे नाही! कुरुक्षेत्रावरील युद्ध हे दोन्ही पातळ्यांवर खेळले गेले. दुष्ट निर्मूलन आणि दुष्प्रवृत्तींचे दमन दोन्हीही या युद्धाने साध्य झाली असून, अंती श्रेष्ठ धर्मतत्वांची प्रतिष्ठापना झाली आहे. म्हणूनच वेदविव्यास! कुरुक्षेत्रीचे युद्ध हे धर्मयुद्धच म्हणावे लागते!"

"हे चिरंजीवीन्! या गोपालकाला सामान्य जनांप्रमाणे त्याच्या मर्यादा सांभाळून जे करता आले ते विदितच आहे. कृपा करून कृष्णलीलांना कोणतेही देवत्वाचे परिमाण लावू नका. कृष्ण देव्हाऱ्यात राहीला तर नित्यपूजेतील पंचोपचार स्वीकारणाऱ्या पंचायतना एवढा तो नगण्य होईल. तो अलौकिक असता तर, स्वतःच्या पुत्र.पौत्रांच्या, बांधवांच्या अनिर्बंध वर्तनाला आळा घालणे त्याला सहज शक्य होते. कृष्णाच्या नजरेसमोर त्याच्या वंशीयांचा विच्छेद झाला आहे. सती गांधारीच्या शापामुळे वेदनामय मृत्यू त्याच्या वाट्याला आला आहे. हे अखिल जगताला कळू द्या. महर्षी! माझ्या कार्याचे यापरते श्रेय दुसरे कोणते बरे असेल? तेव्हा कृष्णलीलांचे वास्तव वर्णन करावे अशी माझी अपेक्षा आहे. कृष्णासह कौरव-पांडवांचे जीवनवृत्त कथन करणारा ग्रंथ नवनवोन्मेषशालीनी प्रतिभेचा आविष्कार असण्यापेक्षा सरधोपट पद्धतीने केलेले वृत्त कथन असाच असू द्या!"

कृष्ण, हनुमंत, बादरायण व्यास यांचा हा संवाद संपत असता झुडपात दडलेला व्याध प्रकट झाला. आपल्या

हातून घडलेल्या कृतीचा पश्चात्ताप झाल्याने त्याचे मुख म्लान झालेले दिसत होते. श्रीकृष्णांना वंदन करुन व्याध बोलता झाला, “श्रीकृष्णा! मी तर मृगमुख समजून शरसंधान केले. माझ्या धनुष्यातून सुटलेल्या बाणाने तुझा वेध घेतला याचे अतीव दुःख मला होत आहे. एका श्रेष्ठ पुरुषाचा वध माझ्या हातून घडल्यामुळे मला दुष्कीर्ती प्राप्त होणार आहे, याचेही शल्य माझ्या हृदयाला टोचत आहे.” धीरगंभीर स्वरात कृष्ण म्हणाले, “व्याधा! मृत्यू हे निखळ सत्य आहे. इहलोकीच्या सगळया पाप तापांचे निवारण होऊन माणसाला मुक्त करणारा मृत्यू हे तर मानवाचे परमप्राप्तव्य आहे. कदाचित आजवर न पाहिले, न अनुभवले असे दारुण दुःखही भविष्यात माझ्या नशीबी असेल... कोणी सांगावे? व्याधा, माझ्यासाठी तू तर माझा तारणहार होऊन आला आहेस. योग्य काळी, योग्य स्थळी या कृष्णाच्या जीवनाला पूर्णविराम देऊन तू एक महान कर्तव्य पार पाडले आहेस. व्याधा मी तुझा शतशः ऋणी आहे...”

कृष्णाच्या कमलनेत्रांचे तेज क्षीण होत त्यांच्या पापण्या मिटू लागल्या. क्रोधायमान झालेला हनुमंत म्हणाला, “व्याधा, तूझी चूक तू कबूल केली आहेस, तूझ्या कृत्याचा पश्चात्तापही तुला झालेला आहे. तेव्हा तुझ्या प्रमादाबद्दल मी देत असलेली शिक्षा भोगायला तू आनंदाने तयार रहा. या माझ्या गदाप्रहाराने मी तुझ्या मस्तकाचे चूर्ण करु इच्छितो.”गदा उगारायला सज्ज झालेल्या हनुमंताला आवरीत व्यास म्हणाले, “थांब हनुमंता, अशी चूक करु नकोस. हा व्याध कुणी साधासुधा नाही. प्रभु श्रीकृष्णासारख्या पुरुषोत्तमाच्या अवताराची समाप्ती करण्यासाठी व्याधरुपाने शरसंधान करणारा हा प्रत्यक्ष ‘काळ’ आहे!” अन् मग बादरायण व्यास आणि हनुमंत व्याधापुढे नतमस्तक झाले.

# ११. निषादपर्व

“प्रभासक्षेत्री यादव वीरांचा संहार झाला. बलराम, श्रीकृष्ण यांचीही अवतार समाप्ती झाली. आणि सिंधुसागर कणा कणाने द्वारकापुरी आपल्या उदरात घेऊ लागला. यादवीतून वाचलेले वृध्द, नारीजन आणि बालके यांना पार्थाने द्वारकेतून हस्तिनापुरात आणावे. त्यांचा प्रतिपाळ करावयाची जबाबदारी श्रीकृष्ण योगेश्वरानी पार्थावर सोपवलेली आहे...” दारूकाच्या मुखातून हे वृत्त ऐकून पांडव शोकाकुल झाले. श्रीकृष्णांनी सोपविलेले कार्य आपल्या हातून पार पडेल की नाही या शंकेने पार्थ ग्रासला त्याच्या सर्वांगाला कंप सुटला, हृदयाचे स्पंदन वाढले. आपण वृद्ध झाल्याची जाणीव त्याला प्रकर्षाने होऊ लागली.केवळ कर्तव्यभावनेनेच पार्थ प्रवासाला सिद्ध झाला. प्रवास दीर्घ पल्ल्याचा! अरण्य मार्गात हिंस्त्र श्वापदे, दस्यू आणि वनवासी लुटारू यांचाही धोका संभवत होता. म्हणून गांडीव धनुष्य, अक्षय भाता यासह सज्ज होऊन पार्थाने रथारूढ होऊन द्वारकेकडे प्रयाण केले.

सुवर्ण रौप्यादि अमूल्य द्रव्य शकटांमध्ये भरून, गोधना सह सारा लवाजमा द्वारके बाहेर पडला.कुरूकुलाची ध्वजा फडकवीत पार्थाचा रथ जथ्याच्या मध्य भागातून दौडत चालला. निश्चिन्त मनाने मार्गक्रमणा करीत लवाजमा पंचनद प्रांतीच्या वन प्रदेशात शिरला. अन् अकस्मातपणे घनदाट वृक्ष राजींमधून तीक्ष्ण शरांचा वर्षाव सुरू झाला. जथ्याच्या अग्रभागी असलेले गोधन शराघातांनी विंधित झाले. भयाने हंबरडे फोडीत गोधन सैरभैर उधळले. घाबरलेला नारी समूह, बालके, हल्ल्याच्या भीतीमुळे आक्रंदन करू लागली. सर्वत्र एवढा कोलाहल सुरू झाला की, क्षणभर पार्थही

दिङ्गमूढ झाला. चहू बाजूंनी वेध घेत गांडीव धनुष्यावर प्रत्यंचा चढविण्याची सिद्धता करण्यात पार्थ मग्न झाला. या पूर्वी त्याच्या गांडीवाचा प्रलयकांरी टणत्कार ऐकूनच निधड्या छातीचे महावीरही गलितगात्र व्हायचे, पण आता...?

त्या अवघड क्षणी टणत्कार दूरच... साधी प्रत्यंचा चढवितानाही पार्थाच्या सर्वांगावर अतिकष्टामुळे स्वेदबिंदू जमा झाले.थरथरत्या हातांनी धनुष्याचा दंड वाकवून प्रत्यंचा चढविण्याचा त्याचा प्रयत्न सुरू असताना दस्यू नायकाने हृदयाचा थरकाप उडविणारी सांकेतिक आरोळी मारली. प्रति पक्षाकडून कोणतेच प्रत्युत्तरप्रतिहल्ला न झाल्याने जथ्यात शिरून लूट करावयाचा इशारा दस्यूंना मिळाला. आडोशा बाहेर येत दस्यू वीरांनी यादव समूहाला चारी बाजूंनी कोंडीत धरले. खुद्द संघनायक पार्थाच्या रथाकडे निघाला.समूहात केवळ स्त्रिया, वृद्ध, बालके यांचाच भरणा...रथारुढ वृद्धा खेरीज कोणीही शस्त्रधारी  रक्षक जथ्यात नाही हे लक्षात येताच चेकाळलेल्या दस्यूंनी निश्चिंत मनाने लूटालूट सुरू केली. वस्त्राच्छादित शकटांवरील आवरणे दूर झाली. अपरिमित रौप्य सुवर्णराशी  पाहताच दस्यूंचे चेहरे हर्षोत्फुल्ल झाले. लुटारुंचे आक्रमण झाले तरीही पार्थ निष्क्रिय कसा? या शंके ने शोकाकूल यादव नारी, वृद्ध ‘‘पार्था वाचव... अर्जुना तुझ्या शरवर्षावाने लुटारूंचे निखंदन कर...’’ असा टाहो फोडू लागले.

नारी जनांचा करुण विलाप कानी येताच अती शर्थीच्या प्रयत्नांनी पार्थाने कशीबशी प्रत्यंचा चढविली. अतीव परिश्रमांनी क्लांत होऊन धापा टाकीत पार्थ किंचित काल स्तब्ध राहिला. रथारुढवृद्धाची धनुष्यावर प्रत्यंचा चढविताना उडालेली त्रेधा पाहून संघनायक निश्चिंत झालेला. मात्र त्याने प्रत्यंचा चढविली, नारी

समूहातून अर्जुनाचा उल्लेख झाला तेव्हा रथावर नजर ठेवणारा संघनायक घोड्याला टाच देऊन रथा पासून दूर-सुरक्षित अंतरावर जाऊन थांबला.पार्थाने अक्षय भात्यातून बाण काढला. तो धनुष्यावर चढविला. शरसज्ज गांडीव मस्तकी टेकीत त्याने अस्त्राचे स्मरण केले.पण मंत्रातले एक अक्षर ही त्याला आठवेना! अस्त्र नाही तर निदान प्रत्युत्तरादाखल तरी शरसंधान करावे असा विचार करून अश्वारुढ दस्यू नायकाचा वेध घेत पार्थाने बाण सोडला.''बद्द्ऽऽ भुस्स्ऽऽऽऽस्स्'' असा घोंगळ ध्वनी घुमला. वेगहीन शर वेडावाकडा जात लक्ष्यापासून निम्म्या पल्ल्यावर थडथडत भूमीवर पडला. आता ताळतंत्र सुटलेला पार्थ एका मागून एक असे भसाभसा बाण सोडू लागला.पण हे बाण पहिल्या बाणाचा टप्पाही गाठू शकले नाहीत.

अजाण शिशुला शोभेलसे रथारूढ वृद्धाचे शरसंधान पाहताच दस्यू संघनायक खदाखदा हसू लागला. निर्धास्त होऊन तो सहकाऱ्यांच्या दिशेला निघाला. प्राणभयाने थरथर कापणाऱ्या नारी -शिशु वर्गादिंच्या अंगावरील आभुषणे दस्यू हिसकावू लागले. मिळालेल्या लुटींची गाठोडी बांधायचे काम सुरु झाले. एवढ्यात संघनायकाचे लक्ष एका कमनीय यादव नारीकडे गेले. तिला बळानेउचलून त्याने आपल्या पुढ्यात अश्वाच्या पाठीवर टाकले. नायकाचे हे कृत्य पाहून अन्य दस्यूनीसुद्धा समुहातील नारींचे अपहरण सुरू केले. आता दस्यू नायकाने सहकाऱ्यांना परतीचा इशारा केला. द्रव्यपूर्ण शकट आणि अपहृत नारींसह दस्यू लुटारुंचा समूह मार्गस्थ होऊ लागला. असहाय्य पार्थाचे हृदय शतशः विदीर्ण झाले.

घटनास्थळा पासून  किंचित दूर असलेल्या कदंब वृक्षावर बसलेल्या एका वृद्ध निषादाने हे दृश्य पाहिले. निषादाहाती

झालेला कृष्णाचा वध आणि सिंधुसागरात लुप्त होणारी द्वारका या वृत्तामुळे त्यालाही विमनस्कताआलेली. द्वारकेहून हस्तिनापूरला मार्गस्थ होत असलेल्या यदूवंशीयांवर हल्ला करण्यासाठी सज्ज झालेली दस्यू लूटांरुची टोळी त्याने पाहिली. खरे तर पंचनदप्रातांत नेहमी घडणाऱ्या अशा घटनांमध्ये त्या निषादाला काडीमात्र स्वारस्य नव्हते. परंतु काही अनाकलनीय अंतःप्रेरणेने त्याला घटना स्थळी जखडून ठेवलेले! शांतपणे मार्गक्रमणा करणारा यादव नारी, बालके, वृद्ध, रथ, शकट आणि गोधन असा लवाजमा वनप्रदेशा पासून दूर असतानाच त्याने हेरला. सारा लवाजमा दृष्टी पथात येताच मध्यभागी दौडणाऱ्या रथावरील कुरू कुलाची राजमुद्रा मिरविणारी ध्वजपताका त्याला दिसली. यादव समूहा सोबत महाप्रतापी धनुर्धर अर्जुन समक्ष आहे याची खात्री पटून तो निश्चिंत झाला.

पांथस्थाना अडवून, लुटमार करून उदर निर्वाह करणाऱ्या दस्यूंबद्दल त्याला कमालीची घृणा वाटायची.आता दस्यू लुटारू यदुवंशीयांवर हल्ला करतील तेव्हा अर्जुनाच्या अमोघ शर वर्षावामुळे त्यांना चांगली अद्दल घडेल. अगदी अकल्पितपणे धनुर्विद्येचे एक अद्‌भुत गारूड आपल्याला पहावयास मिळेल. या विचारांनी त्याची उत्कंठा शिगेला पोचली. तथापि दस्यूंनी यादव समींहावर हल्ला केला, त्यानंतर अर्जुनाची झालेली केविलवाणी अवस्था पाहून त्याचा पुरता भ्रमनिरास झाला. हस्तिनापुराचा बलसंपन्न राजा, गुरूद्रोणाचा पट्ट शिष्य अर्जुन... महाभारत युद्धात अस्त्रविद्येच्या बळावर शत्रू पक्षाचा निष्पात करणारा श्रेष्ठ धनुर्धर अर्जुन...! त्याची दुःस्थिती पाहून हळहळणारा निषाद, द्रव्य आणि नारींचे अपहरण करून विजायोन्मादाने गर्जना करीत मार्गस्थ होणारा दस्यू समूह पाहून आपल्या व्रतापासून ढळला. निषादाने आपला तिरकामठा सज्ज

केला. मार्गस्थ होणाऱ्या दस्यू लुटारुंच्या दिशेने त्याने शरसंधान केले.

वृद्ध निषादाचे शरसंधान केवळ 'अतर्क्य'याच श्रेणीतले. सूंऽऽ सूं असा घनगंभीर आवाज करीत भयात्कारी वेगाने प्रकाश शलाकेप्रमाणे लखलख करीत जाणारे निषादाचे तीर...! दस्यू समूहाजवळ जाताच त्यांना वेढा घालीत त्यांच्या समूहाभोवती चक्राकार गतीने फिरत राहिलेल्या निषादाच्या तीरांनी दस्यूंचा मार्ग रोधला.त्यांची अग्निजिव्हे प्रमाणे लखलखीत अग्रे, वेग अन् चक्राकार फिरताना निर्माण होणारातीव्र ध्वनी यामुळे दस्यूंचा समूह जागच्या जागी थांबला. संघनायकाने अतिक्रोधीत होऊन आपल्या हातीचे खड्ग चक्राकार फिरणाऱ्या तीरांवर त्वेषाने फेकले.ज्या तीराच्या मार्गात ते खड्ग आले त्या तीराचा आघात होताच ते उंच फेकले जाऊन जमिनीवर पडले. आता मात्र चक्राकार फिरणाऱ्या तीरांचे कडे फोडून बाहेर पडावयाचे धैर्य समूहातील एकाही वीराला होईना. चक्राकार फिरणारे तीर वेग कमी झाल्यावर आपोआप भूमीवर पडतील, असा अंदाज दस्यूंनी केला.



दस्यू लुटारुंच्या दिशेने सरसरत गेलेले बाण पाहताच अर्जुन थक्क झाला. त्यानंतर त्या बाणांनी केलेली किमया पाहताच ते कृत्य खचितच एखाद्या निष्णात धनुर्धराचे आहे. या गोष्टी बद्दल अर्जुनाच्या मनात तीळमात्र संदेह उरला नाही. तथापि.... सांप्रत काळी संपूर्ण भरत खंडात अर्जुना खेरीज अन्य कोणीही श्रेष्ठ धनुर्धारी उरलेला नाही.... शिवाय त्या बाणांची अद्‌भूत किमया पहाता अशा प्रकारचे कोणतेही अस्त्र अस्तित्वात असल्याचे आपणास ज्ञात नाही. या गोष्टींची जाणीव त्याला झाली. तेव्हा मात्र ही किमया म्हणजे साक्षात गोपाळ कृष्णांचीच लीला असणार याची त्याला खात्री पटली. या विचारासरशी बाण आलेल्या दिशेने जरा पुढे जाऊन पहावे असे त्याला वाटले. रथातून पायउतार झाल्यावर मंद गतीने चहू बाजूला वेध घेत पार्थ कदंब वृक्षासमीप पोहोचला.

''कोणाला शोधीत आहेस रे अर्जुना?'' या शब्दासरशी चमकून वर पाहताच अर्जुन थक्क झाला. जमिनीपासून दीडएक पुरूष उंचीवर फांदीच्या बेचक्यात बसलेला काळाकभिन्न, डोक्या वरचे शिप्तर केस आवरण्यासाठी मृगाजीनाची पट्टी आवळून त्यात गरूडाचे पीस खोचलेला, वयाने त्याच्यापेक्षा थोडा ज्येष्ठ वाटणारा, सडसडीत अंगलटीचा वल्कलधारी निषाद खांद्याला वेत्रकाष्टाचे धनुष्य लटकावून दाढी मिशांच्या जंजाळातून शुभ्र पांढरे दात चमकवीत तोंडभर हसत, लुकलुकत्या भेदक नजरेने पाहताना दिसला. काही घटिकांपूर्वी दस्यूंनी हल्ला केल्यावर आपली शरसंधानाची केविलवाणी धडपड पाहिल्यामुळे तर हा असा छद्‌मी हसत नसेल ना? या विचाराने पार्थ क्रोधित झाला. राजसुलभ जरबेच्या स्वरात तो उद्‌गारला, काय रे वनचरा? तुझे साथीदार शर चक्राच्या वेढ्यात स्थानबद्ध झालेले असताना त्यांना सोडवायचा

प्रयत्न न करता तू असा मूढाप्रमाणे हसत काय राहिला आहेस?''

''हस्तिनापुराचे सम्राट, कुरूकुलभूषण धनुर्धर अर्जुनाचे अद्वितीय शरसंधान पाहून मी विस्मयचकित झालो आहे. मला हर्षोन्मादाने हसू आले. तुझ्या सामर्थ्याचे किंचितही भान न ठेवता तुझ्या डोळ्यादेखत अमाप द्रव्य आणि स्त्रिया बळाने हिरावून पळून जाणाऱ्या त्या उन्मत्त दस्यूंना चांगलीच अद्दल घडली. मी काही त्या लुटारूंप्रमाणे दस्यू नाही.आम्हा वनवासींच्या वैचित्र्यपूर्ण वेषभूषेवरून निषाद आणि दस्यू यातील भेद सामान्यातील सामान्यांनेही ओळखावा एवढा स्पष्ट आहे. मी हसलो तो दस्यूंच्या वेडगळपणाला. धनुर्धर अर्जुनाने सोडलेले दिव्य तीर दस्यू लुटारुंच्या वक्षाचा कधी वेध घेणार? हे पहावयाला मी आसुसलो आहे.''

निषादाचे बोलणे ऐकल्यावर हे दिव्य बाण कुठून आले याचे ज्ञान या निषादालाही नाही हे पार्थाने ओळखले. मग तर खात्रीपूर्वक ही कृष्णलीलाच आहे. लौकिकार्थाने प्रभुंचा अवतार समाप्त झाला असेलही. तथापि अर्जुनावरील अकृत्रिम प्रेमापोटी, त्याच्या सारखा श्रेष्ठ धनुर्धर अचंबित व्हावा अशी शर संधानाची अद्‌भुत किमया दाखवून''यत्र योगेश्वरो कृष्णः तत्र पार्थो धनुर्धरः'' ही उक्ती प्रभूकृष्णांनी सार्थ केली. एवढेच नव्हे ''यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारतः'' या गीतावचनाचा प्रत्ययही आता जनांना येईल, या विचारांनी पार्थाचे हृदय उचंबळून आले.दस्यू लुटारुंच्या कोंढाळ्याभोवती चक्राकार फिरणाऱ्या तीरांपैकी एकाची गती मंद होत आली.तत्क्षणी निषादाने आपल्या पाठीवरच्या भाल्यातून एक तीर काढला. तो कामठ्यावर सज्ज करीत दस्यू समूहाच्या दिशेने वेध घेऊन निषादाने प्रत्यंचा खेचली. निषादाचे हे कार्य सुरू असता

असा वेडेपणा करू नकोस असे अर्जुन सांगणार एवढ्यात निषादाचा तीर सूं ऽऽ सूं   करीत सुटला.

शरचक्रातील मंदगतीने फिरणारा तीर बाजूला ढकलून नवीन तीर त्याच्या जागी फिरू लागला. शर चक्राबाहेर पडलेला मंदगती तीर निषादाच्या दिशेने माघारी येत त्याच्यासमोर हातभर अंतरावर येऊन जमिनीत रुतला.निषादाने जमिनीत रुतलेला तीर काळजी पूर्वक उचलून भात्यात ठेवला. अर्जुनाकडे पाहून मंद स्मित करीत, उजव्या हाताचा पंजा उंचावून निषाद उद्गारला, ''अर्जुना! आता तरी ओळख पटते का पहा बरे!'' निषादाने उंचावलेल्या पंजाला फक्त चार बोटेच दिसली... अंगुष्ट नव्हताच. अंगुष्ट तुटल्या जागी त्वचा राठ होऊन हिंगरुड धरलेले दिसले.



पार्थाच्या नजरेसमोर सहस्त्र सूर्यांची प्रभा चमकली. त्याची स्मृती जागृत झाली. एकलव्य......खात्रीने एकलव्यच! निषादराज

हिरण्यधनुचा पुत्र एकलव्य!! बहुत संवत्सरांपूर्वी अमंगळ तिरकामठा खांद्याला लटकवून गुरू द्रोणांकडे धनुर्विद्या शिकण्यासाठी शिष्यत्वाची याचना करणारा एकलव्य!!! गुरू द्रोणांनी धुडकावून लावल्यावर निराश होऊन जड अंतःकरणाने माघारी जाणारा एकलव्य. कौरव पांडवादि राजपूत्र मृगयेसाठी वनात गेले असता भुंकणाऱ्या कुत्र्याला इजा न व्हाशी अशा बेताने त्याच्या तोंडात सात बाण मारून त्याचे  भुंकणे बंद करण्याचे अजोड शर सामर्थ्य दाखविणारा एकलव्य! आश्चर्याने थक्क झालेल्या राजपुत्रानी विचारणा केली असता हे अतुलनीय शरसंधान आपण गुरू द्रोणांकडून प्राप्त केले अशी कबुली त्याने दिली. आपण प्राप्त केलेली दिव्य अस्त्रेही फिकी पडावी असे त्या वनचर निषादाचे शरसंधान पाहून आपला क्रोध मत्सर अनावर झाला.

अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धनुर्धर कुणीही नाही अशी मुक्त कंठाने प्रशंसा करणाऱ्या गुरू द्रोणांना आपण या गोष्टीचा जाब विचारला. मुत्सद्दी द्रोणांनी एकलव्याची भेट घेतली. एकलव्याने आपल्या प्रेरणेने साध्य केलेल्या धनुर्विद्या साधनेच्या मोबदल्यात द्रोणांनी त्याच्याकडे गुरूदक्षिणा मागितली. धनुर्विद्येतला जणू प्राणच असा अंगुष्ठ! अन् मूर्ख निषादपुत्राने तत्क्षणी अंगुष्ठ छाटून द्रोणांच्या चरणी अर्पण केला. आपला प्रतिस्पर्धी संपला. या आनंदाने आपणाला अस्मान ठेंगणे वाटले. तो प्रसंग आपण विसरून गेलो अन् त्या नंतर एकलव्याच्या अस्तित्वाची धनुर्धर म्हणून गंधवार्ताही आपल्या कानी आली नाही. पण आज...? अगुंष्ठ नसतानाही आपल्या सारख्या श्रेष्ठ धनुर्धराला कल्पनातीत अतर्क्य वाटावे असे शरसंधानाचे रहस्य याने कुठे, कुणाकडे बरे प्राप्त केले असेल? पार्थाच्या मनात असंख्य प्रश्नांचे काहूर माजले.

भानावर आलेला पार्थ म्हणाला, ‘‘हो तर...! गुरू दक्षिणा म्हणून उजव्या हाताचा अगुंष्ठ छाटून गुरू द्रोणांना अर्पण करणारा माझा गुरू - बंधू एकलव्यच ना रे तू? तुझ्या अमोघ - अतर्क्य शरसंधानाने माझ्या नेत्रांचे जणीं पारणेच फिटले. पण एक कोडे मात्र मला नाही सुटले. धनुर्विद्येत अगुंष्ठ म्हणजे जणीं प्राण, शरसंधानातले ते मर्मस्थानच जणीं ! असे असता अंगुष्ठ छेदूनही तुझी धनुर्विद्या साधना खंडित कशी बरे झाली नाही? माझा तर माझ्या डोळ्यांवरही विश्वास बसत नाही. अगुंष्ठाविना शरसंधान निव्वळ अशक्य...’’त्याचे कथन खंडित करीत कडवट सुरात एकलव्य बोलता झाला,‘‘अशक्य फक्त तुम्हां क्षत्रियांना.....! मी तर निषाद कुलातला. मातेच्या उदरातून बाहेर पडतानाच आम्ही तिरकामठा हाती घेऊन येतो म्हणेनास ! ते एक आमचे जणीं सहावे ज्ञानेंद्रिय आहे असेच समज.’’

दीर्घ उसासा सोडून एकलव्य पुढे बोलू लागला.‘‘अरे अर्जुना! तुम्ही क्षत्रिय राजसत्ता कबजात ठेवण्यासाठी धनुष्य हाती घेता. प्रति स्पर्ध्याच्या काळजाचा वेध घेण्याची रक्तबंबाळ प्रतिज्ञा करून तुम्ही धनुर्विद्या प्राप्त करता. अन्याय नष्ट करण्याच्या नावाखाली नृशंस संहार करून स्वतःचा धाक आणि सत्ता पसरविण्यासाठी एक अमोघ साधन म्हणून राजनीती पुरतेच धनुष्य तुमच्या स्कंधावर असते.आम्हा निषादांच्या बाबतीत मात्र तिरकामठा हा आमचा पंचप्राण, आमचे जीवन सर्वस्वच असते. आमच्या योगक्षेमाला सहाय्यभूत असणारा, पोशिंदा म्हणून आणि प्रतिकूल परिस्थितीत आमचा संरक्षक मित्र म्हणून तिरकामठा आम्ही अष्टौप्रहर स्कंधी वागवतो. माझा अगुंष्ठ छेद करूनही माझी धनुर्विद्या साधना खंडित न होता उलट धनुर्विद्येतली अद्भूत रहस्ये

माझ्यापुढे उलगडत गेली. या गोष्टींचे मर्म तिरकामठा हे आम्ही साधन मानीत  नाही  यात आहे.''

कौशल्यपूर्ण तीर मारून मी कुत्र्यांचे भुंकणे बंद केले. त्यानंतर मत्सराने पेटणारे तुम्ही राजपुत्र गुरू द्रोणांसह माझ्या कुटी नजीक आलात. अर्जुना...!तुमच्या चेहेऱ्यावरचे भाव पाहिल्यावरच अशुभाची चाहूल लागून माझे हृदय कंप पावू लागले. तरल संवेदनशीलता हा आम्हा निषांदाचा जणू वारसाच आहे. तरीही तुम्हा क्षत्रियांच्या क्षमाशीलतेवर, त्यागी वृत्तीवर माझा भरवसा होता. अर्जुना, शरणागत कपोताच्या रक्षणासाठी स्वतःचे मांसखंड हसत हसत छेदून देणारा, एवढेच नव्हे तर पूर्ण भरपाई होण्यासाठी स्वतःचा देहच भक्ष्य म्हणून 'श्येन पक्षाला अर्पण करणारा निस्वार्थी राजा शिबी...! तुम्ही राजपुत्र त्याचे वारस असल्यामुळे माझ्या धनुर्विद्या साधनेचा उचित सत्कार तुम्हाला करावयाचा असेल असेही मला वाटले होते. पण...'' दीर्घ उसासा टाकून एकलव्य किंचित काल स्तब्ध झाला.

आवंढा घोटून अवकाशाकडे दृष्टीक्षेप टाकीत एकलव्य उद्गारला,''धनुर्विद्या शिकविणे नाकारून मला अपमानीत करून, लाथाडून लावणारे माझे परमप्रिय गुरू द्रोण! त्यांच्या एका शब्दासरशी माझे पंचप्राण,माझ्या योगक्षेमाचे एकमात्र साधन नष्ट करून मला मातीमोल करण्याचे सामर्थ्य जणू असा माझा अंगठा...! गुरू दक्षिणा म्हणून मी तो तात्काळ छाटून दिला. माझी निःस्सीम गुरूभक्ती आणि अतुलनीय त्यागाने दिपून जाण्याऐवजी आपल्याला तुल्यबळच नव्हे, वरचढ ठरणारा धनुर्धर संपला म्हणून आसुरी आनंदाची प्रभा तुझ्या चेहेऱ्यावर विलसलेली दिसली अन् आत्यंतिक

द्वेषापोटी सर्प फुत्कारापमाणेतू निश्वास टाकलास.'' एकलव्याने अर्जुनाच्या नजरेला नजर भिडवताच अर्जुनाची नजर खाली झुकली. एकलव्याचे बोलणे पुन्हा सुरू झाले. ''अर्जुना, त्या वेळच्या तुझ्या वृत्ती बाल सुलभ म्हणून दुर्लक्षितही करता येतील. पण अर्जुना आयुष्याच्या सुवर्ण पर्वातही तू महाविखारी महत्वाकांक्षा बाळगणारा, मत्सरात्माच राहिला आहेस. माझे शर संधान अगुंष्ठा बरोबरच खंडित व्हावे हा तुझा दुष्ट हेतू कसलीही भाडभीड न ठेवता माझ्या समक्ष व्यक्त करणारा तू उन्मत पार्थ! श्रीकृष्ण परमात्म्याच्या निरंतर सहवासात राहूनही त्याचा अमृतमय उपदेश विसरून श्वान पुच्छ नलिका न्यायाने तुझ्या पूर्व वृत्ती ऊफाळल्यामुळे दंभ, मद, मत्सरादिंवर तू काबू ठेऊ शकला नाहीस.''

''सकृत् दर्शनी, पूर्व परिचय नाही अशी धारणा असतानाही मला तुच्छ लेखीत वनचर म्हणून तू संबोधिलेस. पण मागाहून माझ्या शरसंधानाचा प्रत्यय आल्यावर मात्र त्याच वनचराला दांभिकतेने गुरूबंधू म्हणून संबोधिण्याचे तुझे धारिष्ट्य, तुझ्या अंगी मुरलेल्या कुटील राजनीतीला अन् सर्पफणेप्रमाणे  केवळ दिखावू अशा तुझ्या विनयी वृत्तीला शोभणारे आहे ! इतक्या प्रदीर्घ कालावधी नंतर,आयुष्याच्या उतरणीला लागल्यामुळे, असहाय्य अगतिक झाल्यामुळे तरी मला भेटल्यावर माझी ओळख पटल्यावर निदान दोन कामचलाऊ पश्चात्तापाचे शब्दही तू उद्गारले नाहीस. उलट अंगुष्ठ रुपाने जीवन सर्वस्व गमावल्या वरही मी अद्यापि जिवंत आहे, एवढेच नव्हे तर माझे शरसंधान कौशल्यही शाबूत आहे, ते खंडित झाले नाही या बद्दल खदखदणारे वैषम्य... शिष्टाचार म्हणून तरी कृतक् आनंद व्यक्त होण्याऐवजी मनीचे वैषम्य तू व्यक्त केलेस.''

‘‘अशिष्ट अर्जुना...! केवळ मृत्तिका रूपाने गुरूची स्थापना करून आत्यांतिक श्रद्धेने, आत्मप्रेरणेतून, आत्मबलावर, केवळ स्वयंसाधनेद्वारा धुनर्विद्याच काय कोणतीही साधना करणाऱ्या एकलव्याची उपासना केवळ अगुंष्ठ छेदाने खंडित व्हावी ही शक्यता तरी तू कोणत्या आधाराने गृहित धरलीस? अर्जुना, तुला कदाचित अजूनही ज्ञात नसेल पण गुरूद्रोणांना गुरूदक्षिणा म्हणून मी अंगठा छाटून दिल्यापासून माझ्या सर्व निषाद बांधवांनी तिर कामठ्याला उजव्या हाताच्या अंगठ्याच्या स्पर्श करणेही वर्ज्य केले आहे. आता आम्हा निषादांच्या लेखी शरसंधानामध्ये उजव्या हाताचा अंगठा हा त्याज्य अवयव असून निषादांच्या भावी पिढ्याही हा वारसा जतन करतील. अगुंष्ठ छेदासाठी का होईना गुरूकृपेचा लाभ निषादा सारख्या नीच वर्णियांना झाला. हा सुवर्ण क्षण आम्ही निषाद युगानुयुगे हृदयांतरी जपू...!

एकलव्याच्या सडेतोड आणि परखड कथनाने पार्थ चांगलाच वरमला. एकलव्याच्या अमोघ शरसंधानाचा प्रत्यय आल्यावरविरोचित वृत्तीने त्याचे कौतुक करण्याऐवजी अनावधानाने, तेजोभंग झालेल्या अवस्थेतही मर्मभेदक शब्द मुखावाटे उच्चारिले जाऊन त्याला डिवचण्याचे निंद्य कृत्य आपल्या हातून घडावे यांची खंत पार्थाला वाटली. त्याही पेक्षा नागरी संस्कार आणि शिष्ट वर्तन यांचा वाराही न लागलेल्या या सामान्य अरण्यवासीने नीतिकोविद असलेल्या,देववाणीचे ऋजू संस्कार झालेल्या आपल्या मुखातून सहजोद्‌गार म्हणून निघालेल्या शब्दांमधूनही आपला हेतू,आपली भावना अचूक ओळखावी याचे आश्चर्य पार्थाला वाटले. एकलव्याच्या शरसंधाना विषयी असंख्य प्रश्न - शंका पार्थाच्या मनी उद्‌भवल्या.

श्रेष्ठ धनुर्धर गुरू द्रोणांनी वर्णिल्याप्रमाणे शरसंधानात अचूकता आणि भेदक सामर्थ्य येण्यासाठी धनुर्विद्येमध्ये अंगुष्ठाचे नियंत्रण अन् वापर आत्यंतिक महत्त्वपूर्ण! बाणाची दिशा, गती व परिणामकारकता निर्भर असलेले मर्मस्थान म्हणजे अंगुष्ठ!! त्यांचा हा धडा आयुष्यभर मनात जपून आपण भरत खंडातील एकमेव, सर्व श्रेष्ठ धनुर्धर ही उपाधी प्राप्त करून ती सार्थही केली. मत्स्य - भेद, किरात रूपधारी शंकरांशी युद्ध असे किती प्रसंग आठवावे... प्रत्येक प्रसंगी प्रतिस्पर्ध्यावर मात करून गुरूद्रोणांच्या कथनाचे यथातथ्य प्रत्यंतरही आपण घेतले. आपल्या शरसंधानाला तर दिव्य अस्त्रांची जोड असायची. खेरीज गांडीव धनुष्य, अक्षय भाता या अमोघ साधनांची जोड असतानाही एकलव्याच्या कौशल्यापुढे ते सारे उणे ठरले. एकलव्याने अंगुष्ठ, अस्त्र, धनुष्य निवड, विशिष्ट पद्धतीनेच कुशल तंत्रज्ञांनी सिद्ध केलेले शर सारे-सारे निरर्थक ठरवित दाखविलेली अद्‌भूत किमया!

आयुष्यभर धनुर्विद्या साधना करूनही आपले कसब एकलव्या पुढे थिटे ठरावे ही बोचरी जाणीव पार्थाच्या मनात ठसठसत राहिली. एकलव्याच्या शरसंधानात निश्चित आपणाला नव्हे तर गुरू द्रोणानांही अगम्य असणारे इंगित-रहस्य असलेच पाहिजे या निष्कर्षाप्रत तो आला. अन् तसे असेल तर काहीही करून ते इंगित आपण एकलव्याकडून ज्ञात करुन घ्यावे. हा विचार त्याच्या मनात मूळ धरू लागला. या रहस्याचा उपयोग आपणाला होणार नाही. हे आता अटळ सत्यच आहे.तथापि आपल्या वारसांना तरी कुरूंचा देदिप्यमान वारसा पुढे चालविताना आपल्या सामर्थ्यात खचितच भर घालता येईल असा हेतू पार्थाच्या मनात उद्‌भूत झाला. अत्यंत लीन होऊन आर्जवी मार्दवयुक्त स्वरात पार्थाने पृच्छा केली.

''एकलव्या...! माझ्या हातून तुझा उपमर्द करण्याचा जो अपराध अजाणतेपणामुळे घडला, त्या बद्दल मी मनःपूर्वक क्षमा मागतो. माझी एकच विनंती आहे. एकलव्या! शरसंधानातील लक्ष्यवेध,शब्दवेध या कौशल्यांबरोबरच त्याहीपेक्षा श्रेष्ठ पर्जन्य अस्त्र,नारायणास्त्र, पाशुपत अस्त्र, अग्न्यास्त्र अशी एकूण एक प्रलयंकारी अस्त्रेही मी साध्य केली होती. या अस्त्रबळावर माझ्या अगणित प्रतिस्पर्ध्यांना मी नामोहरम केले अन् कंठस्नान घालून त्यांचे अस्तित्व शून्यवत ठरविले. पण शरचक्राची जी किमया तू करुन दाखवलीस असे काही अस्त्र माझ्या ऐकिवात नाही. या किमये मागे काही वेगळे,मला अज्ञात असे अस्त्र वा काही अद्भुत रहस्य असावे अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे. सर्व अस्त्रे अन् शरसंधान कौशल्यही पूर्णपणे गमावून या क्षणी मी हतप्रभ झालो आहे. हे तू जाणतोसच. तरीही धनुर्विद्या, धनुर्विद्येतील रहस्ये मला प्राणांहूनही प्रिय आहेत.एकलव्या केवळ जिज्ञासा तृप्ती म्हण वा कुतूहल शमन म्हणून तरी तुझ्या शर संधानामागील रहस्य कोणते आहे? ते तू कोणाकडून कसे साध्य केलेस? एकलव्या..... या माझ्या प्रश्नांची सत्य आणि केवळ सत्यच उत्तरे तू द्यावीस अशी माझी विनंती आहे.''

पार्थाचे हे कथन सुरू असताना शरचक्रातील मंदगती तीरांच्या जागी नवीन तीर सोडून शरचक्र अखंडित ठेवण्याचे एकलव्याचे कार्य सतर्क सजगतेने सुरू राहिले. पार्थाचे कथन पूर्ण झाल्यावर शरचक्रातून माघारी आलेले तीर उपसून काळजीपूर्वक भात्यात ठेवून एकलव्य बोलू लागला.''अर्जुना, अस्त्रे कोणतीही मला ज्ञात नाहीत. अरे! अस्त्र विद्या जाणण्यासाठी मंत्र शिकले पाहिजेत. अन् मंत्र येण्यासाठी देववाणी - गीर्वाण भारती अवगत केली पाहिजे. आम्हां

निषादांची बोली म्हणजे पैशाची! नियमादिंचे कसलेही बंधन नसलेली आम्हा निषादांची ती आदिम बोली ! आता नगरजनांशी क्वचित येणाऱ्या संपर्कातून गीर्वाण भारती - देव वाणी मधील काही शब्द मला अवगत आहेत इतकेच. त्यातही आश्चर्याचा काही भाग नाही की कसले रहस्यही नाही. अर्जुना भाषा हा तर मानवाचा सहजाविष्कार... तो विशिष्ट जनसमूहा पुरता मर्यादित कसा राहणार?त्यामुळे कदाचित माझ्या बोलीने तिच्या मर्यादा ओलांडिल्या असणे संभवते.''

''पण अर्जुना! धर्माज्ञा ओलांडून, जनक्षोभ पत्करून आम्हा निषादांना देववाणी, मंत्रविद्या अन् अस्त्रविद्या शिकवायला तरी कोण गुरू धजावेल? खेरीज एकदा गुरू द्रोणांनी मला शिष्यत्व नाकारील्यावर कोणा ज्ञानवंताचा अनुग्रह प्राप्त होईल अशी अपेक्षा तरी मी कशी बरे करू धजावेन? वाक्पटू अर्जुना, वनामध्ये विहार करणारे म्हणून आम्ही वनचर अशी उपाधी देववाणी पारंगत असलेला तू...मोठ्या मानभावीपणाने देत आहेस. पणअर्जुना, निषाद असलो तरी मीही मनुष्यदेहधारीच असल्यामुळे मनुष्याची समस्त मूलगामी लक्षणे माझ्यामध्येही स्थित आहेत. अज्ञानाचे सोंग पांघरून 'नागर' ऐवजी 'जानपद' अर्जुन असे संबोधन करावयाचे चातुर्य एकलव्याकडेही आहे हे तू विसरू नकोस. तर पूर्व अनुभवावरून शहाणपण आले असता पुन्हा मागचीच चूक करून अस्त्रविद्येच्या पाठी जाण्याचा विचारही माझ्या मनाला शिवला नाही. हे सत्य आणि सत्यच आहे रे अर्जुना!''

''स्वतःला मोठा धनुर्धर म्हणविणारा तू! पण लक्ष्यवेध, शब्दवेध या पलीकडेही शरसंधानातील काही कौशल्ये असू शकतात

- असू शकतील, एवढी साधी शक्यता गृहित धरण्याचे, विद्या साधनेने सहज येणारे नम्रत्वही तुजपाशी नाही. म्हणूनच पाशुपतास्त्र, पर्जन्यास्त्र अशी अवजड नावे उच्चारुन अस्त्राविना धनुर्विद्या जणू निरर्थक आहे असे ठरवू पाहणारे तुझे ज्ञान हेच मुळी घोर अज्ञान आहे. कदाचित योद्ध्याला, वधकाला सामर्थ्यसंपन्न बनविणारे हे शब्दभ्रम विशिष्ट वेळी, विशिष्ट स्थळी, विविक्षित काळापुरते अन् विशिष्ट मर्यादेपर्यंत धनुर्विद्येतील मुलभूत किमयांपेक्षा परिमाणकारक असतीलही.कदाचित त्यांच्या प्रलयंकारी स्वरूपामुळे स्वतःच्या सामर्थ्याचा डिंडिभ वाजवीत अखिल विश्वात सामाज्य पसरवू इच्छिणारे शासक त्यांना अधिक महत्व देत असतीलही पण म्हणून काही त्यांचे श्रेष्ठत्व थोडेच सिध्द होते?अस्त्र रूप शब्दभ्रमांचे स्वामित्व किती अशाश्वत अन् तकलादू आहे हे का मी तुला सांगण्याची गरज आहे? पार्था ! प्राणसंकट गुदरले असता ऐन मोक्याच्या क्षणी त्यांनी कर्णाला कसे फशी पाडले हे तुझ्या बाबतीत‘चक्षुर्वैः सत्यम्’ आहे. आणि एवढे दूर तरी कशाला जायला हवे? अवघ्या काही घटिकांपूर्वी तुला निःष्प्रभ करून त्यांनी कसे तोंडघशी पाडले हे तू अनुभविले आहेस अन् मी सुध्दा त्या समग्र घटनेचा साक्षीदार आहे.’’

‘‘अर्जुना! आता तूच सांग, ही अस्त्रे म्हणजे अळवा वरच्या पाण्यासारखी भ्रामक अन् क्षणभंगूरच नव्हेत काय? तुला ज्ञात झालेली धनुर्विद्येतील कसबे म्हणजे हिमनगाच्या जलप्रवाहा बाहेर दिसणाऱ्या भागा एवढी अल्प आहेत असे का समजेनास. परंतु आपण साध्य केलेले ज्ञान हाच चरम सीमेचा बिंदू आहे असे मानून त्या बेभरवशी अस्त्रांच्या मागे तू लागलास. तुझी आयुष्यभरची धनुर्विद्या साधना म्हणजे केवळ नृशंस नरसंहार आहे. रक्त पिपासू

अर्जुना... अंगठ्याचा वापर न करताही तीर सोडता येईल की नाही? एकदा या गोष्टीचे प्रत्यंतर तरी घेऊया.... एवढा साधा विचार जरी एखाद्या बेसावध क्षणी तुला सुचला असता तरी धनुर्विद्येतील अनंत रहस्यांचे दालन आपोआप उलगडले असते तुझ्यापुढे! आणि एका यःकश्चित निषादाच्या सामान्य कसबाचे अप्रूपही नसते वाटले तुला. डोळ्याला झापडे बांधून उभी हयात घाण्याच्या चाकोरीत फिरणारा निर्बुद्ध वृषभ आणि प्राप्त झालेल्या अत्यल्प ज्ञान संपुष्टात बंदिस्त राहून त्या पलिकडच्या अज्ञात, अस्पर्श ज्ञानकक्षांचा विचारही न करणारा तू अल्पतुष्ट अर्जुन...! दोघांमध्ये श्रेष्ठ कोण अन् कनिष्ठ कोण हे मजसारख्या पशूवृत्तीने राहणाऱ्या निषादाने कसे ठरवावे?''

वनामध्ये स्वच्छंद विहरणारी रानपाखरे अन् त्याच वृत्तीने जीवनाला सामोरे जाणारे आम्ही निषाद सुद्धा त्याच रानाची लेकरे! स्वतःच्या अंगभूत,निसर्गदत्त मर्यादांमध्ये आम्ही राहतो....पण स्वतंत्र बाण्याने! प्रत्यही येणाऱ्या विविध अनुभवांना सामोरे जाताना सहज स्फुरणाऱ्या कल्पना स्वबलावर वास्तवात आणण्याचा प्रयत्न आम्ही करतो. कारण आपण कसे जगावे हे दुसरा सांगू शकत नाही आणि आपणाला काय आवडते याची खातरजमा त्रयस्थाला विचारुन करायची नसते हे आमचे सरळ सोपे तत्वज्ञान! अर्जुना कोणतीही जीवनविद्या कोण कुणाला देऊ शकत नाही. ती कोणीही दुसऱ्याकडून घेऊही शकत नाही. ती मूलतः जशी स्वयंभू असते तशी तिची प्राप्ती सुद्धा स्वयंभूच असते...''एक दीर्घ श्वास घेऊन दस्यू लुटारुंच्या कोंढाळ्याभोवती फिरणाऱ्या शरचक्रातील मंदगती तीरांच्या जागी नवे तीर सोडून माघारी येऊन जमिनीत रूतलेले तीर सावधपणे उपसून पाठीवरच्या भात्यात ठेवल्यावर एकलव्याचे खंडित झालेले कथन पुढे सुरू झाले.

‘‘अर्जुना हे ज्ञान मला हस्तिनापुरात अपमानित होऊन माघारी वनाच्या दिशेने जाताना प्राप्त झाले. मी ज्ञान प्राप्तीसाठी मोठ्या लालसेने गुरूद्रोणांचे शिष्यत्व पत्करायला हस्तिनापुरात आलो. त्यावेळच्या घटनांचे तुला विस्मरणही झाले असेल. अर्जुना! द्रोणांची भेट होईपर्यंतच्या काळात माझे समवयस्क असलेले तुम्ही कौरव-पांडवादी राजपुत्र मोठ्या एकतानतेने धनुर्विद्येतील पूर्वपठित भागावर प्रभूत्व संपादन करण्यासाठी सराव करीत होता. वस्तुतः तुमचा तो सराव म्हणजे कंटाळवाणे अधांनुकरण आहे हे उमगलेल्या स्वतंत्र वृत्तीच्या या निषाद पुत्राचा चांगलाच भ्रमनिरास झाला होता. कौशल्य हे का निरर्थक आवृत्त्या करून मिळते? हे ध्यानी येऊन त्याच वेळी नीरस अध्ययन आपणाला रमवू शकणार नाही. हे ओळखून जरी मी माघारी आलो असतो तरी आयुष्यभर डागण्या देणारा पुढचा तो अवहेलनेचा प्रसंग आणि हे एकलकोंडे जिणे तरी टळले असते.’’ इतक्या प्रदीर्घ काळानंतरही त्या आठवणींनी एकलव्याचे नेत्र आर्द्र होऊन त्याच्या घशात हुंदका दाटून आला.

‘‘अर्जुना, पूर्व स्मृतिंनी मी आजही इतके व्यथित व्हावे याचे आश्चर्य तुझ्या मुख्यावर दिसत आहे. अरे, क्रीडेखातर केवळ करमणूक वा मनरंजनाच्या हेतूने मृगयेच्या नावाखाली निष्पाप पशुपक्षांची निर्घृण हत्या... कत्तल करून धर्म कृत्याच्या साफल्य प्राप्तीचा आनंद मानणारे तुम्ही शासक... गुरू द्रोणांचे शिष्यत्व पत्करण्याची इच्छा वनचर निषादाने बाळगावी हेच मुळी तुमच्या लेखी औध्दत्य ठरते. अर्जुना... अगुंष्ठ छेदामुळेही झाले नाही एवढे दारुण दु:ख द्रोणांनी मला नाकारल्यामुळे झाले.त्यावेळी तुम्ही राजपुत्रांनी परस्परांना नेत्रपल्लव्या करीत केलेली कुत्सित स्मिते आणि उपहासपूर्ण भाषणे... त्यांनी माझ्या काळजावर झालेल्या

व्रणांची खपली काढताच आजही मी व्यथित झालो कारण अर्जुना... निषाद, वनचर असलो तरी त्यावेळी मीसुद्धा निषाद राज हिरण्यधर्नींचा पुत्र...तुम्हा सारखाच... राजपुत्रच नव्हतो का?''

''तुम्हा नगरजनांमध्ये नसेल एवढा मान-सन्मान माझ्या पित्याला केवळ तो राजा आहे म्हणून, निषाद प्रजाजन द्यायचे. आमच्या जमातीत एकदा का एखाद्याला राजा म्हणून निवडले की मग तो करील तसा आचार आणि तो इतरांना सांगेल ती संहिता असा मुळी रिवाजच असतो. दुष्काळाच्या परखड काळातसुद्धा अन्न-अन्न करीत भटकणारे निषाद त्यांना महद्प्रयासाने मिळणारे एखादे रानफळ असीम राजनिष्ठेपायी स्वतःच्या मुखात टाकणाचा मोह त्यागून उरी फुटेतो धावत येऊन राजा असलेल्या माझ्या पित्याला द्यायचे; अन् केवळ एकच फळ आणले म्हणून माझा पिता त्यांना निर्दयपणे झोडायचा. असे राजवैभव संचितात असलेला मी राजपुत्र अपमानाचे शल्य उरी खुपत असतानाही कसा काय जिवंत राहिलो याचे कोडे मला अद्याप उलगडलेले नाही. अर्जुना, शब्दब्रह्माची घमेंड मिरविणारे तुम्ही नागर.. वाटेल ते शब्द वाटेल त्या अर्थाने वापरून तुमची पवित्र देववाणी किती विटाळता याची थोडी तरी कल्पना तुला असावी होती...''

''म्हणे धनुर्विद्या मला प्राणांहूनही प्रिय आहे...!किती व्यभिचारी शब्द योजना आहे रे तुझी ! ऐन मोक्याच्या क्षणी धनुष्याला प्रत्यंचा चढविताना उडालेली तुझी त्रेधातिरपिट अजूनही माझ्या अंतःचक्षूंसमोर स्पष्ट दिसत आहे. अर्जुना तुझ्या शब्दांमध्ये तिळमात्र जरी सत्याचा अंश असता तरी सारे बळ एकटवून शरसंधान केल्यामुळे शक्तिपात होऊन तू मुत्यू पत्कारला असतास;

पण तुझा एक तरी ‘तीर’ शत्रूचे काळीज विंधूनच गेला असता. तुझ्या श्रद्धा आणि तुझ्या निष्ठा किती पोकळ अन् ढोंगी असतात हे मला आजच उमगले. अन् माझी क्षमा याचना करण्यासाठी तू उच्चारलेले शब्दही किती निरर्थक अन् कावेबाज आहेत रे!... म्हणे अजाणतेपणी घडलेला अपराध!! वा रे वा... धन्य रे तू अर्जुना!!! आधी समोरच्या व्यक्तीचा योजनापूर्ण उपहास करावयाचा अन् मागाहून माझे हे कृत्य अजाणतेने घडले म्हणत क्षमा याचनेचे सोंग करायचे, अर्जुना हा दांभिकपणा तुम्हा शासकांनाच खुलून दिसतो.’’

‘‘माझ्या शरसंधानाचे वरपांगी कौतुक करून त्यातले मर्म माझ्याकडून ज्ञात करून घेण्यामागचा तुझा धूर्त हेतू... पार्था! मी पुरता ओळखला आहे रे! ते मर्म-इंगित जाणून घेऊन त्याचा उपयोग तुला झाला नाही.... म्हणजे तो होणारच नाही म्हणा... तरी तुझे उत्तराधिकार घेणारा तुझा वारसदार इतरांपेक्षा बलसंपन्न आणि वरचढ होण्यासाठी तरी खचितच व्हावा! हा तुझा सुप्त हेतू न ओळखण्या एवढा हा निषाद अज्ञ नाही. अर्जुना तुझ्या लेखी जरी मी शूद्र असलो तरी मी स्वतः तसे मानीत नाही.कदाचित माझा वर्ण इतर वर्णियांच्या मालिकेत अंतिम स्थानावरही असेल, पण माझ्या मते चातुवर्णियांपेक्षा भिन्न असा माझा ‘पाचवा’ स्वतंत्र वर्ण असावा. तुला ज्ञात असणाऱ्या धर्मग्रंथामध्ये तसा उल्लेख नसावा, म्हणजे नसेलही, इतर कोणत्या आधारामध्ये तसा उल्लेख असला तरी त्याचे तुला कितपत ज्ञान असेल हा प्रश्नच आहे! पण आम्हा निषादांच्या दंतकथांमध्ये ....पारंपारिक गीतांमध्ये मात्र असे काही उल्लेख मी ऐकले आहेत. माझी अल्प विकसित बुद्धी आणि मर्यादित विश्व यांच्या आधारे अलीकडेच मला या गोष्टींची प्रकर्षाने जाणीव

होऊ लागली आहे.''

''अर्जुना, तुझा धूर्त हेतू मला आकळला आहे. तरीही माझ्या शरसंधाना मागचे रहस्य मी तुला खचितच कथन करीन. तुझ्या कुतूहल शमनासाठी नव्हे तर तुझा भ्रम निरास करण्यासाठी! मी पूर्वी कथन केल्याप्रमाणे आम्हा निषादांचे जीवन मुळी तीर कामठ्याशी बद्ध असते. इतके की, तिरकामठ्याविना दिसेल तो खात्रीने निषाद नव्हे हे तू पक्के समज! आम्ही निषादांनी शतकानुशतके निष्ठेने सांभाळलेली ही परंपराच धनुर्विद्येतील अवघड रहस्ये आम्हापुढे उलगडीत जाते. धनुर्विद्या ही श्रवण, पठण वा कथनाने अवगत होणारी शब्द विद्या नव्हे. ती शिकायची नसते की शिकवायचीही नसते. असीम अंतःप्रेरणेने ती प्रस्फुट झाल्यावर अगदी सहजपणे ज्ञानेंद्रियांमध्ये मुरते आणि मगच तिच्यावर प्रभुत्व मिळवायचे अन् टिकवायचेही असते. म्हणून धनुर्विद्येमध्ये आम्हा निषादांचा ना कुणी गुरु असतो की अंधानुकरण करणारे धनुर्विद्या पिपासू शिष्यगणही निषादांच्या वस्तीत जन्म घेत नसतात.''

''अर्जुना, पंखात बळ आल्यावर माता पित्यांपासून अलग होऊन स्वतंत्र राहणारे पाखरू सुगीच्या वेळी आपोआप गोड आलाप घेत सुंदर घरटे विणते. तद्वत हिंडू फिरु लागलेले निषादाचे पोर तिरकामठा घेऊन रानावनात हिंडू लागले की ते सहज प्रेरणेने त्याचा वापरही अवगत करते.अर्जुना!द्रोणांचे शिष्यत्व पत्करायला मी हस्तिनापुरी आलो तेव्हा माझ्या खांद्याला लटकावलेला ओबड-धोबड 'कामठा' अन् पाठीला वेलींच्या भात्यात अडकवलेले तीर... ज्यांच्याकडे पाहून आपल्या जवळच्या कातीव कोरीव इंद्रधनुष्यी रंग छटा असलेल्या धनुष्यांशी अन् नाजूक सुबक आखीव

रेखीव बाणांशी तुलना करीत तुम्ही नाके मुरडून कुचेष्टा केलीत... तो कामठा नी ते तीर सुद्धा मी स्वतः बनविलेले होते. शस्त्रशाळेतील पोटार्थी कारागिरांनी घडविलेली नक्षीदार धनुष्ये आणि आखीव रेखीव बाण आयते वापरणाऱ्या तुला क्षत्रियाला यामागचे तत्व तरी कसे कळावे? धनुष्य हे स्त्री सारखे आहे. त्याच्या वरपांगी सौंदर्यावरुन त्याचे श्रेष्ठत्व ठरत नसते. ज्या धनुर्धराला तीरकामठा स्वतः बनविता येत नाही, तो शरसंधानातले कौशल्य कसे काय हस्तगत करणार...?''

''तिरकामठा स्वतः बनविल्यावरच लक्ष्यवेधातले खरे इंगित समजते. 'धनुर्विद्यारहस्या' सारख्या तुझ्या जडजंबाल ग्रंथराजांच्या वाटेलाही न गेलेला मी अक्षर शत्रू निषाद!पण तिरकामठ्याचे माझे शास्त्र मी बसविले आहे. माझा वेत्रकाष्ठापासून बनविलेला हा कामठा सात पेरांचा आहे. प्रत्येक पेरातील अंतर तर समान आहेच पण काष्ठाची गोलाईसुद्धा सारखी आहे. त्याची लांबी साडे सहा 'वितस्ती'आहे. लक्ष्यवेधामध्ये वध्य लक्ष्य,त्याची शरीरस्थिती, धनुर्धरापासूनचे अंतर आणि वेध घेण्याचा प्रकार....म्हणजे त्याला जीवे मारायचे की फक्त इजा करायची, एखादा अवयव छेदावयाचा की केवळ बद्ध करायचे हे ध्यानात घेऊन काष्ठाची लांबी कमी जास्त असावी लागते.साधारणपणे तीन भिन्न लांबीची काष्ठे उपयोगी पडतात.दरवेळी इतक्या प्रकारची काष्ठे बरोबर कशी वागविणार? म्हणून मी या पूर्ण लांबीच्या वेत्रकाष्ठाला दोन्ही बाजूंनी समान अंतरावर तीन/तीन छेद घेऊन सोईप्रमाणे कमी जास्त लांबीची प्रत्यंचा फक्त बदलतो.''

''प्रत्यंचेसाठी घोरपडीच्या आणि गव्याच्या आतड्याचा वापर

मी करतो. ही आखूड प्रत्यंचा घोरपडीच्या आतड्याची असून ती कंबरेभोवती वेष्ठून मी सोबत वागवितो. अर्थात अलिकडे प्रत्यंचा न बदलताही इष्ट परिणाम साध्य करायचे कसब अंगवळणी पडले आहे हे खरे! आता हे तीर पहा. या तीरांसाठी वापरलेले दंड १२ मुष्टी, ११ मुष्टी, ९ मुष्टी, ७ मुष्टी अशा भिन्न लांबीचे आहेत. त्यांची गोलाई अन् वजने ही कमी जास्त असावी लागतात. आखूड पल्ल्यासाठी जड तीर तर लांब पल्ल्यासाठी हलके तीर वापरणे इष्ट असते. शरचक्रातील तीर वजनाने अत्यंत हलके, पुच्छाची लांबी जास्त असलेले, तीक्ष्ण अग्रांचे आहेत. म्हणून ते अधिक काळापर्यंत आवर्तने घेऊ शकतात. तीरासाठी निवडावयाचा दंड पूर्ण वाढ झालेला, विशिष्ट नक्षत्रावर तोडलेला असतो. तीरांची अग्रे सुद्धा परिणाम लक्षात घेऊन भिन्न धातूंची अन् आकारांची आहेत. सूचीकाग्र तीर पक्षांच्या मृगयेसाठी वापरतो. हा चंद्रकोरीच्या आकाराप्रमाणे अग्र असणारा तीर पहा. भूमीवर सरपटणारे जनावर त्याला इजा ही न पोचवता या तीराने स्थान बद्ध करता येते. अग्राची दोन्ही टोके भूमीत घट्ट रुतून सर्प वर्गीय प्राणी जागच्या जागी अडकतो. तीराचा मध्यभाग गुळगुळीत आहे. म्हणून सर्पाला इजा होत नाही पण त्याला मागे पुढे जाताही येत नाही.''

''अर्जुना, माझ्या शरसंधानातले महत्त्वाचे इंगित तीराच्या पुच्छामध्ये आहे.पुच्छाची लांबी, वापरावयाची पिसे कोणत्या पक्षाच्या, कोणत्या अवयवाची हे मी अनुमानाने अन् अनुभवाने ठरविले आहे. गृघ्र, गरूड, ससाणा, हंस आणि कावळयाची पिसे ही मी पुच्छासाठी वापरतो. पुच्छामध्ये अडकविलेली पिसे उलट सुलट दोन्ही दिशांनी कार्य करणारी आहेत म्हणून लक्ष वेध करून माझे तीर माघारी येतात;अर्थात तीर सोडतानाचे विशिष्टतंत्र आहे.त्यामुळेही विशिष्ट

अंतरावर लक्ष वेध केल्यावर तीराला विरुद्ध दिशा मिळते. अर्जुना, ही सगळी तंत्रे तीं शिकलेल्या शास्त्राला सम्मत नसतीलही पण ती अनुभव सिध्द आहेत. आम्हा निषांदाचा तिरकामठा प्राण ओतून सिध्द केलेला असतो. म्हणून कोणताही निषाद प्रसंगी प्राण देईल पण स्वतःचा तिरकामठा देणार नाही. आमच्या जमातीत एखाद्या निषादाला मृत्यू आला की त्याच्या शवासोबत त्याच्या तिर कामठ्यालाही श्रध्देने अन् सन्मानाने मूठमाती देण्याचा रिवाज आहे.''

''अर्जुना!माझे श्वान मुखीचे शरसंधान पाहून गुरू द्रोणांच्या मार्गदर्शनाखाली त्याहीपेक्षा वरचढ अशी कौशल्ये प्राप्त करणे तुला सहज शक्य होते. पण तू मात्र माझा द्वेषच केलास, अन् परिणाम स्वरूप मला अंगुष्ठ गमवावा लागला. अर्जुना, त्यावेळी माझे काळीज तीक्ष्ण शराने विंधले असतेत तरी चालले असते परंतु सत्ता मदाने बेहोश झालेल्या तुम्हा राजपुत्रांना मला सुखाने मरण देण्यापेक्षाही मला हतप्रभ करून असहाय्यतेने आयुष्यभर मरणभोग सहन करीत जीवनाच्या आनंदापासून वंचित करण्यातच अधिक स्वारस्य वाटले. अन् म्हणून माझा अगुंष्ठ छेदून माझा जणू जीवन रस शोषून कायमपणे निराशेच्या गर्तेत लोटून तुम्ही हास्य विनोद करीत निघून गेलात. पण अर्जुना! सृष्टीत जसे क्रौर्य आहे तशी करूणासुध्दा आहे. मला असहाय्य -अगतिक करून तुम्ही अरण्याबाहेर गेला असाल नसाल... त्यावेळी तुमच्या मृगया क्रीडांमध्ये लक्ष्य वेध चुकल्यामुळे एक पंख अर्धवट तुटून लोंबत असलेल्या स्थितीतही उडणारे आंगठ्याएवढे पाखरू मला दिसले, अन् त्याच क्षणी माझ्या समोरचा अंधःकार दूर झाला.''

‘‘अंगठा तुटला म्हणून काय बिघडले? प्रत्यंचेवर ठेवलेला तीर पकडण्यासाठी हाताच्या पंजावर केवळ दोन बोटे उरली तरी पुरेशी आहेत हा विचार...ही प्रेरणा त्या पंख छेदलेल्या पाखराने मला दिली. अर्जुना! तर्जनी, मध्यमा, अनामिका, करंगुली यापेकी कोणत्याही दोहोंचा उलट सुलट वापर करून मी तीर सोडू शकतो. एवढेच कशाला ? डाव्या उजव्या कोणत्याही हाताचा वापर मी करू शकतो. अर्जुना! असा अचंबित होऊ नकोस. माझ्या सगळ्या कसबांचे कथन अजून पूर्ण झालेले नाही. आता प्रत्यक्ष बघच!’’ एकलव्य भूमीवर आसनस्थ झाला. दोन्ही पायांच्या अंगठ्यांनी वेत्र काष्टावर पकड घेऊन त्याने ते जमिनी समांतर स्थिर केले. दोन्ही ओठांमध्ये धरून त्यावर तीर सज्ज केला. मग ओठानीच प्रत्यंचे सह तीरावर घट्ट पकड घेत त्याने प्रत्यंचा ताणली अन् मानेला हिसका दिला. यावेळी थरथरणाऱ्या प्रत्यंचेने सर्प फीं त्काराप्रमाणे ध्वनी निर्माण केला. तो ऐकून एखादा बलिष्ट नागराज तर समीप आला नाही ना या भीतीने पार्थ दचकून मागे सरकला. या वेळचा तीर शरचक्रात भूमी लगत रिंगण घेऊ लागला. त्याचा वेग एवढा तीव्र की शरचक्रातील इतर तीरांपूर्वीच त्याचे मंडल पूर्ण होऊ लागले.

यावेळी शरचक्रामधील मंदगती तीर बदलताना एकलव्याने डावा हात, एक हात, एक पाय,यांचा वापर करूनही तीर सोडून दाखविले. आश्चर्याने थक्क झालेल्या अर्जुनाला तो म्हणाला, ‘‘अर्जुना, ही काही आश्चर्य करण्यासारखी कसबे नाहीत. कसब असेलच तर अशा विविध प्रकारे तीर सोडता येतात का ? हा विचार सुचणे हेच असावे.अर्थात तुम्हा क्षत्रियांना हा विचार तरी का अन् कसा सुचावा? तुम्ही धनुर्विद्या प्राप्त करता ती फक्त प्रतिस्पर्ध्यांचा

प्राणघात करावयाच्या एकमात्र हेतूनेच! तुमचे ध्येय्यच सीमित असल्यामुळे तुमच्या प्रभुत्वावरही मर्यादा येणे सहजच आहे! अर्जुना अंगुष्ठ छेदनाच्या वेदनांनी मला आणखीही एक महत्वाची दृष्टी दिली. शराघाताने होणाऱ्या यातना, विशेषतः लक्ष्याचे मर्मस्थळ विंधल्यावर त्याला होणाऱ्या यातनांची दाहकता किती तीव्र असेल हे सत्य मला प्रथमच आकळले. याविचारांनी माझ्या चित्तवृत्तींमध्ये एवढे मूलगामी परिवर्तन झाले की, अर्जुना अंगुष्ठ छेदानंतर आजपर्यंतच्या माझ्या मृगयेत एकाही जीवाची हत्या दूरच, त्याला साधा ओरखडाही उठू नये याची दक्षता मी घेत आलो आहे.''

''अर्जुना,माझ्या नैसर्गिक उर्मीही आता बदललेल्या आहेत. कदाचित तू विश्वासही ठेवणार नाहीस, पण मी मांसाशन पूर्ण वर्ज्य केले असून कंदमुळे,फळे हाच माझा आहार आहे.माझ्या अघोरी साधनेचे व्रताचरणात रुपांतर झाल्यावर माझ्या संवेदना अधिक तीव्र झाल्या. माझे अवधान पटकन केंद्रित होते. अन् प्रायः विचलित होत नाही, याचाही प्रत्यय मला आला. आता अरण्य विहार करताना मृगयेचा शुध्द सात्विक आनंद मला मिळू शकतो. कसा ते तू प्रत्यक्षच बघ!'' असे म्हणत एकलव्याने त्यांच्या माथ्यावर आकाशात उंच भराऱ्या घेणाऱ्या एका गरुडाकडे अंगुलीनिर्देश केला.भात्यातून एक अत्यंत हलका, नाजूक सूचीकाग्र तीर निवडून जवळच्या रानवेलीचा हातभर लांबीचा तुकडा तीराभोवती वेष्टित वेलीचे एक टोक अग्रात खुपसले. तीर सज्ज करुन वेध घेताच 'सुईऽऽक' असा स्वर काढीत कामठ्यावरुन सुटलेला तीर गरुडाच्या दिशेने सरसरत गेला.

काही निमिषातच गोल गोल घिरट्या मारीत गरगरत गरुड भूमीवर पडला.त्याच्या दोन्ही पंखाच्या टोकाकडच्या पिसांमध्ये

एखाद्या कसबी शिंप्याने शिलाई घ्यावी तद्वत गुंफलेली वेल दिसली. दोन्ही पंख वेलीच्या तुकड्याने एकत्र बद्ध झाल्यामुळे त्याला धड बसताही येईना. गरुड जमिनीवर आल्यानंतर सूचीकाग्र तीर तरंगत येऊन एकलव्या समोर जमिनीत रुतला.जखडबंदगरुड क्रोधाने चित्कार करीत पंखांचा फडफडाट करायचा केविलवाणा प्रयत्न करीतराहिला.थोड्या प्रयत्नानंतर त्याच्या पंखात गुंफलेली वेल सुटली अन् भरारी मारीत तो दृष्टी आड गेला. गरुडाच्या दिशेने विस्मयाने पहाणाऱ्या अर्जुनाला एकलव्य म्हणाला, ''तुझे कुतूहल शमन म्हणा, सुप्तहेतू पूर्ती व्हावी असे प्रांजळ कथन कसलाही आडपडदा न ठेवता मी केले आहे. आता माझे कथन सत्य आहे की, सत्याचा आभास निर्माण करणारे असत्य आहे हे मात्र तुझे तुलाच ठरवायला हवे. कारण नेत्र दूषित असले, विचारांमध्ये विखार असला की अवघ्या चराचरातच व्यंग भरले आहे असे वाटू लागते.''

''अर्जुना! गुरुच्या एका शब्दासरशी परिणामांची फिकीरही न करता धनुर्विद्येचे मर्मस्थान,चरितार्थाचे एकमेव साधन असलेला अंगठा छेदून देणारा एकलव्य,तू पूर्वी केलेल्या अपमानाचा, अन्यायाचा कोणताही किंतू मनात न ठेवता, ऐन मोक्याच्या क्षणी तुला सहाय्यभूत ठरलेला वनचर एकलव्य, असत्य भाषण करील ही शंकाही घेणे केवळ तुलाच शोभते. कारण आयुष्याचे श्रेय आणि प्रेय म्हणून जपलेले सत्य कथनाचे दिव्य व्रत क्षुल्लक स्वार्थासाठी मोडणाऱ्या धर्मराजाशी तुझे रक्ताचे नाते आहे. कपटनीतीचा आधार घेऊन प्रतिस्पर्धी असहाय्य-निःशस्त्र असता त्याचा प्राणघात करुनही स्वतःला श्रेष्ठ पराक्रमी पुरुष म्हणवून घेण्याची तुझी मानसिकता आहे. अर्जुना, तू अन् धर्मराज दोघांच्या कृत्यामागे कृष्णाचा आग्रही सल्ला असल्याचे गुळगुळीत समर्थनही तू करु नयेस. कारण अंतिम

निर्णय अन् कार्यवाही तुम्ही स्वतःच्या बुध्दिनुसारच केलीत. कुणी सांगावे...भगवंताने तुमची कसोटीही घेतली असेल. तुमचे सामान्यत्व सिध्द करावयाची ती कृष्ण नीतीही असेल.''





‘‘अर्जुना! माझ्यापुरते पहावयाचे तर सत्य आणि असत्य यातला भेदही मला पुरतेपणी उमगलेला नाही. द्रोणांनी केलेला माझा

अव्हेर सत्य की, मी स्वयं प्रेरणनेने शिकावे यासाठी त्यांनी केलेला उपाय हे सत्य? माझा अगुंष्ठ छेद हे सत्य की, अगुंष्ठा शिवाय धनुर्विद्या साधना करण्यासाठी दूर दृष्टीने केलेले दिशा दर्शन हे सत्य? कारण आता वाटणारे असत्य क्षणभरानंतर सुद्धा सत्य ठरू शकते उलट सुवर्ण कांतीने झळाळणारे सत्य याचा मुलामा उडाल्यावर हिणकस असत्य ठरते. म्हणजे आपल्यासमोर आहे ते सत्य की असत्य हे ठरविणे शेवटी प्रत्येकाच्या कुवतीवर अवलंबवून असते. मला तर त्याही पलिकडे जाऊन वाटते की या भूतलावर शाश्वत स्वरूपाचे सत्यही अन् असत्यही वास करीत नसावे.''

साक्षात योगेश्वराच्या मुखी शोभावी अशी शब्दकळा आणि त्याने दाखविलेल्या विश्वरूप दर्शनाची उपमा सार्थ ठरावी असे शरसंधान कौशल्य यामुळे पार्थ भारावून गेला. त्याचे मस्तक आदराने झुकले.आवाजात अतीव मार्दव आणीत तो म्हणाला, ''निषादराज, हा इंद्रप्रस्थाचा सत्ताधारी, नरपुंगव, वीर शिरोमणी, श्रेष्ठ धनुर्धर आणि श्रीकृष्णाचा परमभक्त पार्थ तुमच्यापुढे नतमस्तक झाला आहे. आपण उदार मनस्क असून पूर्णप्रतापी सूर्यासमान स्वयंप्रकाशी असून वेद वाणीच्या तोडीचे माधुर्य अन् आशय तुमच्या वाणीमध्ये आहे. तुमच्या व्यक्तिमत्वाचे हे नव्याने दर्शन झाल्यामुळे माझे अष्ट सात्विक भाव जागृत झाले आहेत. मी आपणावर केलेल्या अन्यायाचे परिमार्जन व्हावे यास्तव आपण द्याल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे. मात्र तत्पींर्वी या दासाची एक नम्र विनंती आहे. मला आयुष्यभर कर्तव्याभिमुख करुन माझा शौर्य स्फुल्लिंग सतत जागृत ठेवणाऱ्या कृष्णाचा मी ऋणी आहे. म्हणूनच अंत्यसमयी त्यांनी माझ्यावर विश्वासाने सोपविलेले एक अवघड कार्य पूर्ण करणे हे माझे आद्य कर्तव्य ठरते.''

आपल्या कथनाचा इष्ट परिणाम निषादावर होतोआहे अथवा नाही याचा अंदाज घेण्यासाठी अर्जुन किंचित विराम घेऊन एकलव्याच्या मुखावरील भाव अवलोकन करू लागला. त्याच्या निर्विकार मुद्रेवरून अर्जुनाला काहीच अंदाज घेता येईना. ''निषादराज, साक्षात श्रीकृष्णांनी निर्धारित केलेले कार्य पूर्ण करण्यास मी असमर्थ ठरलो असलो तरी काही विधिसंकेतानुसार आपण माझ्या सहाय्यार्थ आला आहात. काही घटिकांपूर्वी भरत वर्षामध्ये स्वतःच्या पराक्रमाने सुवर्णपान म्हणून जपावे असा इतिहास निर्माण केलेल्या पार्थावर कर्तव्यच्युत झाल्याचा जणू ठपकाच येऊ घातला होता. माझ्या समक्ष, माझ्या दौर्बल्याचा फायदा घेऊन यदूवंशियांची संपत्ती आणि नारीवर्गाचे अपहरण दस्यू लुटारू करू पाहत होते. त्यांना साधा प्रतिकारही मी करू शकलो नाही, हे लांच्छन माझ्या चरित्राला कायमचे चिकटले असते. परंतु तुम्ही मला या दारुण जनापवादापासून वाचविले आहे.''

''निषादराज,महाभारत युध्द पर्वाला आपल्या सहाय्याचा नवासर्ग, इतिहासकार,चरित्रकार यांना आता जोडावा लागेल. कृष्ण निर्वाणानंतरही कृष्ण कृपेचा साक्षात्कारच मला तुमच्या रूपाने झाला आहे. हे मी प्रांजळपणे कबूल करतो. आता क्षणाचाही विलंब न लावता दस्यू लुटारुंच्या ताब्यातील यादवांची संपत्ती आणि नारीजनांचे विमोचन करून, त्यांना शरचक्राबोहर काढून मजकडे सुपूर्द करून, हस्तिनापुरापर्यंत सुरक्षित पोहोचण्यासाठी, आपण आशीर्वाद द्यावेत यास्तव मी आपणांस वंदन करीत आहे.''अर्जुनाचे हे कथन ऐकल्यावर एकलव्य नेत्रातून पाणी येइपर्यंत खदाखदा हसला.''अर्जुना, आपला हेतू मोठ्या संभावितपणे दुसऱ्यांच्या गळी उतरून ईप्सित साध्य करण्यासाठीचे तुझे शब्द लाघव, धुरंधर

मुत्सद्यालाही लाजविणारे आहे. माझ्या सामर्थ्यावर स्वतःचा हेतू साध्य करताना माझ्या इच्छा अनिच्छेची फिकिर तरी तू कां करावीस? तुझी उक्ती तुझ्या राजनीतीला शोभणारीच आहे.''

मजसारख्या यःकश्चित निषादाला हस्तिनापुराच्या कुरू कुल भूषण सम्राटाने विनंतीपूर्वक सहाय्य करण्याची संधी द्यावी हे माझे जणू परमभाग्यच म्हणायला हवे! या पामराला अशी लोकोत्तर संधी देऊन त्याचे आयुष्य उजळून निघावे असा सन्मान जणू करीत आहोत असे भासवीत भ्रामक शब्दांचे बुडबुडे काढून माझ्या अंगी नसलेले गुणही मला चिकटवून माझ्या सामर्थ्याच्या ढाली आड स्वतःचे अकर्तृत्व लपविणारी तुझी निर्लज्ज नीती, तुझी राजकारण पटुता सिद्ध करणारीच आहे. तुझ्या देदिप्यमान इतिहासातील एक काळेकुट्ट पर्व पुसून टाकून संभाव्य जनापवाद टाळण्यासाठी चाललेली तुझी धडपड आणि तुझा कावेबाज स्वार्थी हेतू, पार्था, माझ्या पूर्णपणे लक्षात आला आहे. एकदा का या दस्यु लुटारुंच्या कचाट्यातून सुटून तू सुरक्षितपणे राजप्रासादात जाऊन पोहोचलास की, कर्तव्यपालनाचे साफल्य आणि श्रेय तुला खचितच गवसणार आहे.''

''अर्जुना...! तुझे चरित्रकार उपमा उत्प्रेक्षांची उदार हस्ते उधळण करीत तुझ्या देदिप्यमान इतिहासाला कर्तव्य पालन पर्वाच्या सुवर्ण पानांची पुष्टी देतील. कदाचित या पर्वाला कृष्ण लीलेचे परिमाण देऊन तुझे दौर्बल्य आणि अकर्तृत्व हे कृष्ण विरहाचे फलित असल्याचे सामान्य बुद्धीला पटणारे तर्कट रचून सत्य कथनाच्या आभासाने त्या पर्वाला एक वेगळीच झळाळीसुद्धा येईल. निषादाचे सहाय्य हे तर निमित्त मात्रच आहे! कुणी सांगावे? साक्षात कृष्ण परमात्म्यानेही तुझ्या सहाय्यार्थ निषादरूप धारण केले असेल,हे सत्य

कुणीही स्वाकारील.अर्जुना! ला शब्दभ्रमाच्या जाळ्यात अडकवून विचार करण्याचा अवधीही न देता आपला हेतू साध्य करण्याच्या गडबडीत अनवधानाने तुझी वृत्ती उघड व्हावी अशी एक चूक तू करून बसला आहेस.''

''अर्जुना, माझे शरसंधान आणि सामर्थ्य या बळावर स्वतःचे प्राक्तन बदलू पहात असतानाही केवळ स्वतःच्या श्रेयाचाच विचार करण्याचा मोह तुला टाळता आला नाही. यादव नारींची सुटका हे तुझे इप्सित नसून स्वतःचे दौर्बल्य, पराक्रम शून्यता हे न्यून झाकायचे, हेच तुझे इप्सित तू सरळ सरळ उघड करीत आहेस. तुझे कथन किती दुटप्पी आहे पहा बरे...! एकीकडे आपल्या अन्यायाची शिक्षा भोगण्याचे औदार्य दाखवित असता कर्तव्य पालनासाठी यादव समूहासह अगोदर हस्तिनापूर गाठणे किती गरजेचे आहे,हे तू पटवित आहेस. अन् त्यासाठी केवळ शाब्दिक क्षमायाचना हीच जणू तुझ्या हातून घडलेल्या अन्यायाची शिक्षा आहे अन् तेवढीच पुरेशी आहे असे मानून तुला यदुवंशीय आणि त्यांची संपत्ती या सह सुरक्षित पोहचविण्याची हमी मी द्यावी, असे अत्यंत सावध शब्द योजना करीत तू सूचित केले आहेस.''

''अर्जुना,त्याही पुढे जाऊन तुझ्यासारख्या परम कृष्ण भक्ताच्या मुखातून उमटलेले शब्द म्हणजे मजसारख्या निषादाला सांगितलेली दुसरी भगवद्गीताच आहे,असा आवआणून आणखी कसलाही विचार करण्यात वेळ न दवडता मी तत्क्षणी तुझ्या सांगण्याप्रमाणे वर्तावे असेही तू गृहित धरीत आहेस. अर्जुना, तुझा हा संभावित संधिसाधूपणा लक्षात आल्यावर तुझ्या समोर आऽ वासून राहिलले प्राक्तन ही नियतीची उचित योजना आहे, असे माझे

मत बनत चालले आहे. घटनारंभी तुझ्या सारख्या वीराची झालेली गलितगात्र अवस्था पाहून तुझ्यावर अशी वेळ येता कामा नये होती असा विचार माझ्या मनात आला. जनमनातील तुझी प्रतिमा, धनुर्विद्येतील तुझे सामर्थ्य, अक्षरशः पायदळी तुडवून तुला नगण्य ठरवीत दुर्लक्षून,दस्युंनी चालविलेली बेधुंद लुटालींट पाहिल्यावर निर्णयाच्या अंतिम क्षणी तुझ्या सहाय्यार्थ तिरकामठा उचलण्याचा झालेला मोह मलाही आवरता आला नाही. यास्तव माझ्याशी संबंध नसलेल्या घटनेत मी हस्तक्षेप केला.

अर्जुना,या घटनेतील माझा हस्तक्षेप ही तुझ्या लौकीकाच्या दृष्टीनेही इष्ट घटना असताना देखील, अपयशाच्या अंतिम क्षणी, क्षात्रतेजाला न शोभणारी मग्रुरी तुला काबूत ठेवता आली नाही. म्हणूनच मी तुझा बदला घेतला तरी चालेल असे तू म्हणू शकलास.माझ्या हेतूविषयी शंका घेऊन पार्था, तू तिसऱ्या वेळेलाही माझ्यावर अन्यायच करु पाहिलास! बदला घेणे हा बलवंतांचा स्थायीभाव असेलही; परंतु त्यासाठी लागणारी तामसी विवेक शून्यता, अर्जुना, माझ्याकडे तरी नाही. कदाचित हस्तिनापुरचा माझ्या अपमानाचा प्रसंग आणि अगुंष्ठ छेद या दोन्ही वेळी बदला घेण्यासाठी मी असमर्थ होतो, म्हणून गप्प राहिलो असा सोईस्कर समज तू करून घेतलेला दिसतो.म्हणून या क्षणी असहाय्य,बलहीन आणि दस्यूंकडून तू पराभूत असता हा मोका मी साधावा असे मोठ्या उदार मनस्कतेने तू मला सांगतोस.वाघ-सिंहादिकांनी शिकार करून भक्ष्यावर यथेच्छ ताव मारला की, त्यांनी त्यागिलेले उच्छिष्ठ कोल्हे, गिधाडांनी खावे त्या प्रमाणे मी तुझ्यावर सूड उगवावा एवढा का मी अधम आहे?''

''अर्जुना,माझ्यावर अन्याय झाला आहे हे सत्य असले तरी त्याचा बदला घ्यावा ही भावना माझ्या मनाला स्पर्श करू शकली नाही. एकतर माझा अव्हेर खुद्द गुरू द्रोणांनी केला. तसेच गुरूदक्षिणा म्हणून अंगुष्ठ छेदाची मागणीही त्यांनीच केली. तथापी त्यांचा बदला मी का घ्यावा? माझा स्वीकार, अव्हेर काहीही निर्णय ते घेऊ शकतात. प्रत्येक निर्णय दुसऱ्याच्या इच्छेनुसार कसा घेता येईल?'' अंगुष्ठ छेदापूर्वी त्यांच्या प्रेरणेने मी विद्या प्राप्त केली, याची खातरजमाही त्यांनी केली होती. त्याहीपलीकडे जाऊन सांगायचे तर आपल्या इच्छा अनिच्छांचे नियंत्रण खुद्द त्यांच्या हाती तरी कुठे होते? ते कुरू वंशीयांकडून अन् मुख्यत्वे तुझ्यासारख्या शिष्योत्तमा कडून केले जात आहे हे माझ्या ध्यानी आले होते. दोन्ही घटनांचे वेळी त्यांच्या नेत्रातील असहाय्य अगतिक भाव मी अचूक टिपले होते.''

''बरे या घटनांमागील प्रेरक शक्ती तू आहेस असे गृहित धरले तरी प्रत्यक्ष कृतीमध्ये तुझा सहभाग शून्य असल्यामुळेच तुझा बदला घेणेही असमर्थनीय नव्हे का?अर्जुना खरेतर बदल्याच्या भावनेत सतत होरपळत राहून हे सुंदर जीवन सुडाच्या प्रवासात विद्रुप करायचे हा माझा पिंडच नव्हे. आयुष्य जसे आहे तसे जगणारा, इतरांना जणू देणारा मी एक निर्मळ वृत्तीचा निषाद आहे! अर्जुना मोहाचा एक क्षणही मानवाचे पतन व्हावयास पुरेसा ठरतो. हे संपूर्ण घटनेचा साकल्याने विचार करता माझ्या ध्यानी आले आहे. म्हणूनच तुला सहाय्य करण्याची सूचना तू करीत असलास तरी असा अविवेकी निर्णय घेऊन तिहेरी पातकाचा धनी मी कशाला होऊ?

''एकतर आपल्याशी संबंध नसलेल्या घटनेत हस्तक्षेप करू नये हा निषाद म्हणून माझा श्रेष्ठ धर्म आहे.दुसरे म्हणजे लुटालींट

करणे हा दस्यींचा व्यवसाय असून तोच त्यांचा योगक्षेम आहे.तिसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की,यदुवंशीयांना सुरक्षितपणे हस्तिनापुरा पर्यंत नेण्याचे उत्तरदायित्व तुझ्यावर असून देखील त्याचा गांभिर्याने विचार देखिल तू केला नाहीस.अर्जुना, स्वसामर्थ्याच्या फाजिल आत्मविश्वासा मुळेच हा अनवस्था प्रसंग तू ओढवून घेतला आहेस. एवढेच नव्हे तर तुझ्या अहंकारापोटी भग्नमनस्क यदुवंशीयांवरही दुरवस्था आली आहे. एखादी शस्त्र सज्ज अश्वस्वारांची तुकडी जर तू बरोबर घेतली असतील तर हा लाजिरवाणा प्रसंग उद्‌भवलाच नसता.पण सामर्थ्याची, लौकिकाची फाजिल घमेंड बाळगून पवित्र राजधर्माची पायमल्ली तू केली आहेस.''

''अर्जुना, निसर्ग नियमानुसार तुझे प्राक्तन तुझ्या समोर ठाकले असता या घटनेला येथील वृक्ष-लतांप्रमाणे मी ही एक नगण्य साक्षीदार आहे, याचे भान न ठेवता विधी योजनेत हस्तक्षेप करावयाचे पातक माझ्या हातून घडले असते. तथापि भावनेच्या आहारी जाऊन आततायी निर्णय न घेण्याचे बाळकडू निर्सगाने आम्हां निषादाला चाटविलेले असते. त्यामुळेच स्वतःची चूक सुधारण्याची संधी मी अद्यापही गमावलेली नाही. अर्जुना, हस्तिनापूर पर्यन्तचा तुझा प्रवास सुकर व्हावा अशा माझ्या सदिच्छा जरूर राहतील. पण तुझ्या विनंतीप्रमाणे आशीर्वाद देणे हे मला तरी अनुचित वाटते. मी तुझ्यापेक्षा कनिष्ठ पंचमवर्णीय असल्यामुळे मी तुला आशीर्वाद देणे हा पवित्र धर्म संकेताचा भंग होईल. बरे सामर्थ्य श्रेष्ठत्वाचा मुद्‌दा विचारात घेतला तरीही तुझ्यापेक्षा श्रेष्ठ ठरणे दूरच पण मी तुला तुल्यबळही होऊ शकत नाही. कारण माझे शरसंधान अंगुष्ठा शिवाय आहे. अन् ही बाब तुझ्या धनुर्विद्या शस्त्राला संमत असणे मला तरी

असंभव वाटते.''

''अर्जुना,आशीर्वाद देण्याचा अधिकार सिद्धवाणीच्या तपाचरणी ऋषि मुनींनाच शोभतो.त्यामुळे तुलाच काय पण अखिल विश्वात कोणालाही आशीर्वाद देण्याएवढे तपःसामर्थ्य वा कर्तेपण मजकडे नसताना मी तुला आशीर्वाद देणे म्हणजे तुझा उपहास- तुझी वंचना करणेच ठरेल.! त्यापेक्षा उर्वरित जीवन प्रवासात माझ्या वृत्ती शांत संयमी रहाव्यात असा आशीर्वाद इंद्रप्रस्थाचा स्वामी या नात्याने तूच मला दे... !'' असे बोलत निषादाने अर्जुनाचे पद वंदन केले. अर्जुनाने वामहस्त उंचावित त्याच्या नमस्काराचा स्वीकार केला. ''पार्था! शेवटी प्रत्येकाच्या प्राक्तनात जे अटळ आहे ते ज्याचे त्यानेच भोगायला हवे. आता या प्रसंगातून सुरक्षितपणे बोहर पडण्यासाठी मी तुला सहाय्य केलेच तरीही हस्तिनापूर गाठीपर्यंत अजूनही दीर्घ पल्ला बाकी रहातो. त्या संपूर्ण मार्गात तुला सुरक्षिततेची हमी देण्याएवढे सामर्थ्य मजकडे नाही......आणि असलेच तरीही आतातेच तुझे उदाहरण पहाता तसा धाडसी निर्णय घेण्याएवढे आता माझे वयही राहिलेले नाही...''

एकलव्याचे कथन पूर्ण झाले.शरमेने अधोवदन झालेल्या पार्थाला आपल्या संवेदनाच जणू बधीर झाल्याची जाणीवझाली. एकलव्याने आपला तिरकामठा सज्ज करून दस्यू लुटारुंच्या कोंढाळ्याकडे मोहरा वळविला.त्याने एकामोगामाग एक असे तीन तीर सोडलेले पहाताच पार्थ अनिमिष नेत्रांनी त्या बाणांची किमया पाहू लागला.तीनही तीरांनी शर चक्राचा भेद केल्यावर गरगरा फिरणारे शरचक्रातील तीर एक एक करून माघारी येत एकलव्याच्या समोर जमिनीत रूतले. शरचक्राचा वेढा दूर होताच दस्यू संघनायकाने

परिस्थितीचा अंदाज घेऊन साथिदारांना संकेत केला. तत्क्षणी आनंदाने आरोळ्या मारीत द्रव्य आणि यादवनारी यांच्यासह दस्यू समूह मार्गस्थ होऊन काही क्षणताच गर्द वनराईमध्ये दिसेनासा झाला. हताश झालेला पार्थ दोन्ही हातांनी मस्तक गच्च आवळीत मटकन खाली बसला. एकलव्याने निर्विकारपणे जमिनीत रूतलेले तीर उपसून काळजीपूर्वक भात्यात ठेवले. कामठा खांद्याला लटकावून पार्थाकडे पहाणे जाणीवपूर्वक टाळून एकलव्य मंद मंद पावले टाकीत आपल्या राहुटीच्या दिशेने चालू लागला.



# प्रा. श्रीराम विनायक काळे

एम.ए.एम.एड. एम.फिल.

- बी. एड् कॉलेज , देवगड येथे २८ वर्षे प्राध्यापक पदावर सेवा.

- नवलेखक उत्तेजनार्थ अनुदाना तून प्रचार प्रकाशन , कोल्हापूर तर्फे 'रुजवातीच्या गोष्टी' हा कथासंग्रह प्रसिद्ध.

- अणुरेणू, देवदुर्ग,आरती, वैनतेय, किरात, प्रसाद, अपूर्व, माहेर, वसुधा , जत्रा या दिवाळी विशेषांकात कथा प्रसिद्ध .

- पुढारी नवांकुर कथास्पर्धा, तरूणभारत अक्षर यात्रा कथास्पर्धा , प्रतिबिंब पुणे आयोजीत राज्यस्तर कथास्पर्धा , को. म. सा. प. देवरूख आयोजित कथास्पर्धा, i Pustak HUB पुणे आजोजित कथास्पर्धा, अशा विविध स्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त.

- कालराज प्रकाशन तर्फे ' पाखरांची भाषा ' हा कथासंग्रह प्रसिद्ध.

- विघ्नेश प्रकाशन,कणकवली तर्फे "बॅड कमांड" हा कथासंग्रह प्रसिध्द

- ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे यांच्या मार्फत "रूजवातीच्या गोष्टी" हा ई कथासंग्रह प्रकाशित

## ‘पाखरांची भाषा ’लेखक - प्रा. श्रीराम काळे

प्रा. काळे यांचं अनुभव-विश्व राजापूर आणि देवगड या कोकणातील तालुक्यांमधल्या लोक जीवनाशी निबद्ध आहे. मैलोनगणती पसरलेला कातळ, त्यावरची खुरटी झाडंझुडपं, दटावणारं काळं करडं आभाळ, भणाणता वारा, नदीकाठच्या खाडीकाठच्या लोकवस्त्या, लेखक ज्या समाजात वाढला तो ब्राह्मण समाज, या समाजाच्या आजूबाजूने वावरणारे कुळवाडी - कातकरी, त्यांच्या मधले लोकभ्रम यांच्यासकट लेखक वाढला आहे. यांचं प्रत्ययकारी दर्शन ‘पाखरांची भाषा ’ या प्रस्तुत कथा संग्रहातील सर्व कथांमधून खचितच घडेल .

**-ज्येष्ठ लेखक आणि समीक्षक**
**कै.डॉ. विद्याधर करंदीकर**

## ई साहित्य प्रतिष्ठान सोळा वर्षाचे होत आहे.

## प्रा.श्रीराम काळे यांचे हे ई साहित्यवरील दुसरे पुस्तक.

प्रा. श्रीराम काळे हे एक सिद्धहस्त प्रतिभाशाली अक आहेत. देवगड येथील बीएड विद्यालयात त्यांनी नवीन पिढ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांच्या पिढ्या घडवल्या. गेली आळीसेक वर्षे ते लेखन करत आहेत व अनेक नामवंत नियतकालिकांतून त्यांच्या कथांना प्रसिद्धी लाभली आहे. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. ते मानतात की ई पुस्तके हे दिवसेंदिवस वाढत जाणारे भविष्य काळाचे माध्यम आहे व ते मराठीतही वाढायला हवे.

प्रा. श्रीराम काळे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे.

अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर (४पुस्तके),शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ.मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४),डॉ. स्मिता दामले(९),डॉ.नितीन मोरे(४५), अनील वाकणकर(९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर(१५),अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२),साहेबराव जवंजाळ(२),अरुणवि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा.लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२),अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२),आसावरी काकडे(१२),श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे(७),अरविंद बुधकर(४), जयश्री पटवर्धन

(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस, मिलिंद कपाळे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।